
नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड.

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - १९९५-९६



# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

54

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड.

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04285
DATE: 8/6/2015

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

• १९९५/१९९६ •

- वर्ष : २३ वे व २४ वे -

923.60954/NAG
Y.C.P
G04285
LIBRARY

❒ प्रकाशन :

डॉ. अशोक चौसाळकर, कोल्हापूर

यांच्या शुभहस्ते

मंगळवार दि. २२ सप्टेंबर १९९८

❒ प्रकाशन स्थळ :

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड.

❒ प्रकाशक :

**नगराध्यक्ष,**

कराड नगरपरिषद, कराड.

❒ मुद्रक :

**सौ. माधवी प्रमोद गिजरे**

२८४, सोमवार पेठ, कराड.

❒ मुद्रणस्थळ :

**लोकमान्य मुद्रणालय**

४०४, गुरुवार पेठ, कराड.

फोन : २२१५६.

# मनोगत

'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाले'त दिनांक १२, १३ व १४ मार्च १९९५ रोजी मा. चव्हाण साहेबांच्या जन्मदिनानिमित्त महाराष्ट्रातील एक ध्येयवादी विचारवंत, राजकारण - समाजकारण व अर्थकारणाचे गाढे अभ्यासक व प्रभावी वक्ते प्राचार्य पी. बी. पाटील, सांगली यांची '' महाराष्ट्राची जडण-घडण आणि यशवंतराव'' या विषयावर अभ्यासपूर्ण अशी सलग तीन व्याख्याने झाली. आणि त्याच सालात दि. २५-११-१९९५ रोजी स्व. यशवंतरावजींच्या ११ व्या पुण्यतिथीदिनी महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव व अरुणाचल प्रदेशाचे माजी राज्यपाल मा. राम प्रधान, मुंबई यांचे ''मी पाहिलेले एक अष्टपैलू व्यक्तिमत्व - यशवंतराव चव्हाण'' या विषयावरील एक व्याख्यान, तसेच १९९६ सालातील 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेमध्ये' दिनांक १३ व १४ मार्च रोजी महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत व प्रभावी वक्ते प्रा. ग. प्र. प्रधान, पुणे यांची ''भारतीय लोकशाहीची वाटचाल'' या विषयावर झालेली सलग दोन व्याख्याने, अशा या दोन वर्षांच्या व्याख्यानांची एकत्रित मुद्रित प्रत वाचकांच्या हाती देतांना मनाला एक प्रकारचे समाधान वाटते.

कऱ्हाडचे सुपुत्र, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व भारताचे उपपंतप्रधान मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे नेत्रदीपक व्यक्तिमत्व आणि विशेषत: त्यांचे विचार नि उच्चारांचा सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा आणि स्थित्यंतरांचा परिचय व्हावा व समाजातील विचारवंतांचे विचारधन मुक्तपणे उपलब्ध करून देण्याच्या हेतूने मा. यशवंतराव चव्हाणांच्या नांवाने सन १९७३ सालापासून ''यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला'' स्वतंत्रपणे आयोजित करण्यात आली आणि कांही विचारवंतांच्या सूचनेवरून या व्याख्यानमालेतील अभ्यासपूर्ण व्याख्याने पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यात येऊ लागली.

मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या नांवाने व्याख्यानमाला सुरू केली ती गिनीज बुकात नोंद झालेले माजी नगराध्यक्ष मा. श्री. पी. डी. पाटील यांनी आणि तिला पाठींबा दिला त्यांच्या सहकाऱ्यांनी. यात पी. डी. पाटील साहेबांची योजकता व समयसूचकता सिद्ध होते.

विचारांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या विचारवंतांची जीवनचरित्रे नेहमीच प्रेरक व मार्गदर्शक असतात. अखिल विश्वाविरुद्धही झगडण्याची क्षमता असलेल्या या विचारवंतांच्या विचारवैभवाने आपण दिग्मूढ होतो. विवेकनिष्ठेचा आग्रह धरणारांची आपल्या देशातील परंपरा ज्या थोड्या लोकांनी जतन केली आहे त्यात यशवंतरावजी अग्रणी आहेत. लोकशाही ही एक केवळ राजकीय प्रणाली नसून ती सर्वव्यापी अशी संकल्पना आहे. ती जीवननिष्ठा झाली पाहिजे. पण भारतीय जातिव्यवस्था आणि लोकशाही यांतील आंतरिक विसंगती नष्ट करणे हे त्यांनी आपले महत्वाचे उद्दिष्ट मानले आहे. तेच ध्येय या व्याख्यानमालेच्या आयोजनामागेही आहे.

विचाराने माणसे निर्भय बनतात, त्यांचा आत्मविश्वास वाढतो. समस्येच्या मुळाशी जाण्याची, तर्कशुद्ध विचार करण्याची, तो बोलून दाखविण्याची, कृतीत उतरविण्याची आणि त्यातूनच समाज व देश यांच्या अभ्युदयासाठी झगडण्याची तळमळ लोकांमध्ये वाढावी हे या व्याख्यान-मालेचे उद्दिष्ट आहे.

या व्याख्यानमालेतील व्याख्यानातून यशवंतरावांच्या जीवन-चरित्राची केवळ चर्चा होत रहावी हा प्रधान हेतू मुळीच नाही. आज भारतीय समाजाच्या, राष्ट्रीय जीवनाच्या ज्या समस्या आव्हानाचे स्वरूप घेऊन आपल्यापुढे उभ्या राहिल्या आहेत, त्या सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्यांचा अभ्यासपूर्ण उहापोह अधिकारी व्यक्तींच्या नियोजित व्याख्यानातून व्हावा हाच प्रधान हेतू आहे.

विविध ठिकाणांहून मोठमोठे विचारवंत नगरपालिकेच्या आमंत्रणानुसार कराड येथे येतात. आपले विचार प्रस्तुत करतात. नगरपालिकाही त्या विचारांचे संवर्धन करण्यासाठी पैसा खर्च करून पुस्तक रूपाने ते विचार जतन करते. कारण ज्यांना प्रत्यक्ष येऊन हे विचार ऐकावयाची संधी मिळत नाही, त्यांच्यासाठी या पुस्तकांचा उपयोग व्हावा ही त्यामागील सद्‌भावना आहे. अशा पुस्तकरूपाने प्रकाशित झालेल्या पुस्तकांपैकी सन १९७९ चे पुस्तक शिवाजी विद्यापीठाने व सन १९८० चे पुस्तक मुंबई विद्यापीठाने एम. ए. ला अधिक वाचनासाठी नियुक्त केले होते. यावरून आस्थेवाईक अभ्यासकांना हा उपक्रम किती उपयुक्त ठरत आहे याची प्रचीती येते. लोकसंवादासाठी नगरपालिका हा वाग्यज्ञ उभारीत आहे.

हे शब्दांकित स्वरूप प्रकट होतांना नगरपालिका नगरवाचनालयाचे माजी ग्रंथपाल श्री. विठ्ठलराव पाटील यांचा यशवंतराव हा व्यासंगाचा व आस्थेचा विषय असल्यामुळे त्यांनी जणू हे स्वतःचेच काम असल्याचे मानून कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न करता जे अथक परिश्रम घेतले आहेत त्याबद्दल त्यांचे आभार मानणे आवडणार नाही, म्हणून त्यांचा येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत आहे. लोकमान्य मुद्रणालयाचे संचालक श्री. प्रमोद गिजरे आणि त्यांचे कुशल मेहनती कामगार यांनी हे व्याख्यान-पुस्तक वेळेवर व सुबक छापून दिलेबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

आमच्या विनंतीस मान देऊन मा. प्राचार्य पी. बी. पाटील, सांगली, मा. राम प्रधान, मुंबई व प्रा. ग. प्र. प्रधान, पुणे या तीन थोर विचारवंतांनी या मालेत व्याख्याने दिली त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे आमचे कर्तव्य आहे.

हे व्याख्यान - पुस्तक आपल्या हाती देतांना ज्यांच्यासाठी उदंड आयुरारोग्य लाभावे अशी करुणा भाकावी त्या यशवंतरावांच्यावर मृत्यूचा घाला पडला! आणि या देशातील अतिशय थोर, तळागाळातल्यांविषयी अखंड आत्मीयता बाळगणारा सर्वगुणसंपन्न असा जाणता नेता, कृष्णा-कोयनेच्या पवित्र संगमाच्या कुशीत कायमचा विसावला आहे. प्रबोधनाची गंगोत्री नियतीच्या आघाताने अबोल झाली. जनसामान्यांची रसिकता फुलविणारा कृष्णा-काठ मूक झाला. आता उरल्या फक्त पवित्र स्मृति. त्यांच्याच स्मृतिला हे व्याख्यान-पुस्तक समर्पण करून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

**अशोक शिवराम भोसले**
नगराध्यक्ष
कराड नगरपरिषद, कराड.

कराड
दि. २१/९/९८

❑❑❑

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड.

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

अंतरंग

वर्ष - २३ वे • सन - १९९५

दि. १२, १३ व १४ मार्च १९९५

**"महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव"**

व्याख्याते - प्राचार्य पी. बी. पाटील, सांगली

दि. २५ नोव्हेंबर १९९५

**"मी पाहिलेले एक अष्टपैलू व्यक्तिमत्व – यशवंतराव चव्हाण"**

व्याख्याते - श्री. राम प्रधान, मुंबई

वर्ष - २४ वे • सन - १९९६

दि. १३ व १४ मार्च १९९६

**"भारतीय लोकशाहीची वाटचाल"**

व्याख्याते - प्रा. ग. प्र. प्रधान, पुणे



प्राचार्य पी. बी. पाटील,
सांगली

वाळवा तालुक्यातील चिकुर्डे येथील गरीब शेतकरी कुटुंबात जन्म. प्राथमिक शिक्षण जन्मगांवी, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण इस्लामपूर, सांगली व कोल्हापूर येथे.

राष्ट्रसेवादलाचे क्रियाशील कार्यकर्ते.

आचार्य जावडेकरांच्या सहवासात महाराष्ट्रातील लोकशाही, समाजवाद व सामाजिक चळवळीचे प्राथमिक धडे घेतले. राजाराम कॉलेजमध्ये अभिनेते, वक्ते, शाहीर म्हणून त्यांची विद्यार्थीदशा गाजलेली आहे. सांगली येथील नवभारत शिक्षण संस्था व शांती निकेतन लोकविद्यापीठ या संस्थेचे संस्थापक.

प्राचार्य पी. बी. पाटील हे महाराष्ट्रातील एक ध्येयवादी विचारवंत, प्रभावी वक्ते, क्रियावान पंडित व पुरोगामी कार्यकर्ते म्हणून सुपरिचित आहेत. शिक्षणक्षेत्रातील, राजकारणातील, सभासंमेलन-परिसंवादातील अभ्यास समित्यामधील त्यांचा संचार सुप्रसिद्ध आहे.

राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजविकास, शिक्षण व्यवस्था हे त्यांचे देश - विदेशातील अभ्यासाचे विषय.

स्पष्ट वक्ते प्राध्यापक, प्राचार्य, आमदार, प्रांतीय काँग्रेसचे सरचिटणीस, पंचायत राज्य मूल्यमापन समितीचे अध्यक्ष, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सदस्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त व संस्थापक सरचिटणीस अशा विविध स्वरूपात प्राचार्य पी. बी. पाटील महाराष्ट्रापुढे वावरले व वावरत आहेत.

❑❑❑

# '' महाराष्ट्राची जडण-घडण आणि यशवंतराव ''

कै. यशवंतरावजी चव्हाण यांच्या ८२ व्या जयंतीदिनी, मी त्यांच्या प्रतिमेस प्रथम अभिवादन करतो. त्यांच्या नांवे ही व्याख्यानमाला सुरू करून गेली तेवीस वर्षे अखंडपणे चालवणाऱ्या कराड नगरपालिकेस धन्यवाद देतो. या अत्यंत उचित अशा उपक्रमाच्या पाठीशी ज्यांची प्रेरणा आहे ते कराड नगरीचे भूषण ठरलेल्या आणि चव्हाण साहेबांच्या विचारांचे खरेखुरे वारस असलेल्या, मा. पी. डी. पाटील साहेबांचे तर आज विशेष अभिनंदन करतो. विधानसभेच्या अटीतटीच्या निवडणुकीत ते आजच निवडून आले आहेत. या धवल यशाबद्दल मी माझ्या आणि आपल्या सर्वांच्या वतीने, आपल्या सदिच्छांचे प्रतीक म्हणून, हा हार घालून त्यांचे स्वागत आणि अभिनंदन करतो.

विधानसभेच्या निवडणूक निकालाचा आजचा धामधुमीचा दिवस असतानाही, तुम्ही एवढ्या मोठ्या संख्येने व्याख्यानासाठी उपस्थित आहांत, ही मी माझ्या भाग्याची गोष्ट समजतो. तुमच्या रसिक ज्ञानार्जन वृत्तीला अभिवादन करतो.

दोन वर्षापूर्वी याच दिवशी मुंबईमध्ये प्रचंड बॉंबस्फोट झाले. सारा देश हादरला. आजचे निवडणूक निकाल हेही महाराष्ट्रातले राजकीय बॉंबस्फोटच आहेत. आज दुपारी भूकंपाचाही हादरा बसला. एकूण महाराष्ट्राची भूमी आणि मनोभूमी आज हादरून गेली

आहे. आमचे आजचे राजकारण, अर्थकारण, शिक्षण आणि समाजकारण सारेच भोवऱ्यांत सापडल्यासारखे झाले आहे. एक प्रकारचे अराजक आपल्या भोवती घोंगावत आहे.

अशा मन:स्थितीत आणि परिस्थितीत मी आपल्यापुढे उभा आहे आणि व्याख्यानासाठी "महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव" असा विषय निवडला आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीतील स्वातंत्र्यसेनानी म्हणून, सातारा जिल्ह्यातील चळवळीचे "डिक्टेटर" म्हणून कै. यशवंतराव चव्हाण यांनी दिलेले योगदान, आणि राष्ट्रीय नेता म्हणून केंद्र सरकारमध्ये जाऊन, राष्ट्रीय राजकारणांतील त्यांचे कार्यकर्तृत्व, ही चव्हाणसाहेबांच्या जीवन कार्यातील दोन मोठी दालने सोडून, आजच्या महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीचा संदर्भ घेऊन, मी आपल्यापुढे तीन व्याख्याने देणार आहे.

आज महाराष्ट्रातील राजकारणांत, भरवशाच्या म्हशीनी, टोणगेच जन्माला घालण्याचा जो सपाटा लावला आहे, आणि मराठी जनतेला " अगं अगं म्हशी, मला कुठं नेशी? "असं म्हणण्याची जी पाळी आणली आहे, अशा वातावरणांत माझी भाषणे आपणांस संदर्भहीन वाटणार नाहीत अशी मला खात्री आहे.

कै. चव्हाणसाहेबांच्या जयंतीनिमित्त ही व्याख्यानमाला सुरू करून, समाज शिक्षणाची, लोकमानस जागवण्याची ही वीणा, कराड नगरपालिकेने गेली तेवीस वर्षे खांद्यावर घेतली आहे, ही गोष्ट खरोखरच कै. चव्हाणसाहेबांची स्मृती जागवणारी आणि त्यांच्या देशभक्तीचा वसा चालवणारी उचित अशी कामगिरी आहे. समाज प्रबोधन, लोकजागरण, आणि त्यातून समाज परिवर्तन हा चव्हाणसाहेबांचा एक ध्यास होता. सुधारणा, विकास, परिवर्तन, बदल, क्रांती अगर प्रतिक्रांती या सर्वांचे मूळ ठाणे माणसाचे मन आहे. मन बदलणे, मन जागवणे, मनांत विचार भावनांची जडणघडण करणे, हीच कोणत्याही बदलाची आधारशीला आहे. "जन गण मन " हे आपले राष्ट्रगीत आहे. स्वतंत्र भारतात जन गण मन अधिनायकाचा जय होवो, अशी आपली धारणा आणि प्रतिज्ञा आहे. पण हे जन गण मन जागवण्यासाठी, जनगणांच्या मनाची जडणघडण करण्यासाठी, ते "सोशल" व "रॅशनल" करण्यासाठी, आपण काय करतो? मतांचे हिशोब सारेजण करतात, पण जनगणांच्या मनापर्यंत कुणी जात नाही. लोकमतावर चालणाऱ्या लोकशाही राजकारणांत तर लोकशिक्षणाची मशाल सतत प्रज्वलित ठेवली, तरच राजकारण प्रकाशमय रस्त्यावरून चालते, नाहीतर "अन्धेन इव नियमाना यथा अंध:" म्हणजे आंधळ्याने आंधळ्याला रस्ता दाखवण्यासारखे राजकारण घोटाळते.

याची जाण आणि भान ज्यांना नाही, ते लोकशाहीत राजकारण करायला पात्र ठरत नाहीत.

स्वतंत्र भारताचा ध्येयवाद आहे, राज्यघटनेने काही राष्ट्रीय जीवनमूल्ये उद्घोषित केली आहेत, त्या ध्येयवादाची, त्या राष्ट्रीय जीवनमूल्यांची निष्ठापूर्वक प्रतिष्ठापना, भारतीय जन गण मनांत करण्यासाठी झटणे, ही स्वतंत्र भारतातील प्रथम क्रमांकाची देशभक्ती आहे. स्वातंत्र्य मिळवण्याचा इतिहास, लोकजागरण, लोकसंघटन आणि प्रसंगी लोकआंदोलन या मार्गानेच घडविला आहे. स्वातंत्र्याची उद्दीष्टे साध्य करण्यासाठीही लोकशक्तीचे जागरण आणि संघटन तितकेच आवश्यक आहे. परंतु स्वातंत्र्यानंतर हे लोकमानस जागृत संघटित करण्याचे काम, ज्या गतीने आणि ज्या जबाबदारीने व्हायला पाहिजे होते, तेवढे झालेले नाही. लोकमताला "बनवण्याचे" उद्योग चालतात, पण लोकमताची जडणघडण करण्यात कुणाला रस वाटत नाही. कारण हे काम दमाधीराचे सातत्याने चालवायचे आणि स्वयंसेवी बाण्याचे, कष्टाचे काम आहे. देशभक्तीचे हे अवघड व्रत, सातत्याने चालू ठेवल्याबद्दल, कराड नगरपालिकेला मी मनापासून धन्यवाद देतो.

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मराठी मनाची जडणघडण कशी होते हे नीटपणे समजून घेतले पाहिजे. मनाच्या जडणघडणीमध्ये इतिहासाचा वारसा परिणामकारक, प्रेरक वा मारक ठरत असतो. महाराष्ट्राचा आणि मराठी भाषेचा वारसा ज्या रीतीने आपण समजून घेतो आणि देतो, तो पुरेसा नाही. आमचे महाराष्ट्र गीतही असेच अधुरे, अपुरे आहे. आमचा खरा प्राचीनतम विशाल वारसा समजून देणारे ते गीत नाही. संयुक्त महाराष्ट्रातील सर्व मराठ्यांना ते आपले वाटेल असे नाही. पूर्वीच्या पश्चिम महाराष्ट्राचे ते गीत आहे असे वाटते. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर तरी नवे महाराष्ट्रगीत लिहायला हवे होते. हा महाराष्ट्र केवळ अंजन कांचन करवंदीचा काटेरी देश नाही. केवळ दगडा-धोंड्यांचा नाही, आमचा वारसा केवळ वारकऱ्यांचा नाही, केवळ धारकऱ्यांचाही नाही, आमचा मराठीचा इतिहास ज्ञानेश्वरीपासूनच सुरू होत नाही. इ.स.पूर्व दीडशे वर्षापासून वररुचीच्या व्याकरणांत, सर्व प्राकृत भाषांत, तोलामोलाने वावरणारी आमची मराठी भाषा आहे. सम्राट चंद्रगुप्ताच्या, सम्राट अशोकाच्या तोडीचे, परंतु त्यांच्यापेक्षाही अधिक काळ इ.स. पूर्व १५० ते इ. सनाच्या पाचव्या शतकांपर्यंत, प्रचंड साम्राज्य चालविणाऱ्या सातवाहन सम्राटांचा हा महाराष्ट्र आहे. गंगेच्या खोऱ्यापासून दक्षिणेत तिन्ही समुद्रावर सत्ता प्रस्थापित करून चाललेल्या विशाल साम्राज्याची राजधानी पैठणनगरी होती. सातवाहनानंतर चालुक्य, वाकाटक, अहीर, शिलाहार, राष्ट्रकूट, यादव ते छत्रपती शिवराय, अशा शककर्त्या राजघराण्यांचा हा महाराष्ट्र आहे. राजकारणाबरोबर

सातासमुद्रावर सत्ता गाजवणारे आम्ही दर्यावर्दी खलाशी आहोत. रोमच्या साम्राज्याशी प्रचंड मोठा व्यापार करणारे व्यापारी आहोत. गावागावांत केवळ शेतीप्रधान नव्हे, तर अत्यंत उच्च कोटीची कारागिरीप्रधान अर्थव्यवस्था चालवून जगातून संपत्ती गोळा करणारे संघटित कारागीर व्यापारी होते. साऱ्या जगाने आजही तोंडात बोटे घालावीत अशी वेरुळची लेणी खोदणारे आम्ही, विश्वकर्म्याचे वारस शिल्पी होतो. अजंठ्याची विश्वविख्यात चित्रे कोरणारे चित्रकार होतो. दीड दीड हजार वर्षे जे रंग टिकून रहातात असे रंग वनस्पतीतून शोधून काढणारे रसायनशास्त्रज्ञ होतो. भाषाशास्त्रे, आयुर्वेद, खगोलशास्त्रे यातही आघाडी घेणारे वैज्ञानिक होतो. दोन अडीच हजार वर्षे, उन्हापावसांत उभे असलेल्या धातूशिल्पांना गंज चढणार नाही, असे धातू शोधून वापरणारे आम्ही धातूशास्त्रज्ञ होतो. या पृथ्वीवर, याच जन्मात स्वर्ग निर्माण करणारे, दिग्विजयी जीवन जगणारे आम्ही होतो, हा आमचा वारसा आम्ही समजून घेत नाही. नव्या पिढीच्यापुढे उचित स्वरूपांत ठेवीत नाही. पुरुषार्थाची अनंत क्षितीजे काबीज करणारा हा वारसा कालप्रवाहात आम्ही बुडवून बसलो आहोत. तुकारामाच्या गाथा ज्या प्रवृत्तीने इंद्रायणीच्या डोहांत बुडविल्या, त्याच वृत्तीने हा उज्वल इतिहासही कालप्रवाहात बुडवून टाकला आहे.

इ.स. सातव्या शतकांत प्रसूत केलेल्या "ब्रह्म सत्य जगत् मिथ्या" या भ्रमिष्ट तत्वज्ञानाने, आमची मने गुलाम केली. मायावाद, दैववाद, नशीबवाद, आमच्या हाडामांशी भिनवले. इहवादाचा पूर्ण विसर पाडून, आमची मनेच परलोकवादाला टांगून ठेवली. आमचा सारा तेजस्वी वारसा मातीमोल केला. वर्णवर्चस्ववादाच्या विकृतीने, इहलोकी, स्वर्ग निर्माण करण्याची आमची उमेद, आमचे ज्ञान, आमचे कलाकौशल्य, आमचा सारा जगण्याचा वैभवशाली व्यवहारच थांबवला. गुणकर्तृत्वाला क्षुद्र लेखले, मागच्या पुढच्या जन्माचे थोतांड, कर्मविपाकाचे गूढ आणि मूढ तत्वज्ञान, ब्रह्माचा भ्रम, यांच्या नशेत, "ब्रह्मानंदी टाळी लावून", मुक्तीकडे तारवटलेले डोळे लावून आम्हाला बसवण्यात आले. इहलोकांतील सफल जीवनाचे जे आधार-विद्या, सत्ता, संपत्ती आणि श्रम याच्या जन्मजात मक्तेदाऱ्या निर्माण केल्या. त्यात जन्माधिष्ठित उच्चनीचता ठासून भरली. आणि इहलोकी जे मिळते ते गुणकर्तृत्वाने मिळत नसून, मागच्या पुढच्या जन्मातील पापपुण्याप्रमाणेच मिळते, अशा संस्कारात जन्मापासून मने भिजवत ठेवून कुजवली. आम्ही इहलोकीची शुद्धच हरवून बसलो. गलितगात्र, हतबल होवून प्रथम ब्राह्मण धर्मातील उच्चवर्णियांचे गुलाम झालो. ते उच्चवर्णियही या भ्रमिष्ठ शिकवणुकीचे गुलामच होते. शेवटी सारा देशच आक्रमकांचा गुलाम झाला. स्वर्गतुल्य भरतखंडाचा गोठा झाला.

आमचा इतिहास म्हणजे फक्त आर्यांचा इतिहास, फक्त आर्यावर्ताचा इतिहास, असेच शिकविले गेले. हेहि अर्धसत्य आमच्या मानसिक गुलामगिरीस पोषक झाले. आर्यापूर्वीचा किमान वीस हजार वर्षांचा अनार्य संस्कृतीचा आमचा वारसा ''राक्षसी'' म्हणून बदनाम करून, कालप्रवाहात बुडवून टाकला आहे. मोहोंजोदडो, हडप्पा अशा प्राचीन नगरांचे अवशेष, ''इडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो'' अशा फक्त आठवणी, चुकूनमाकून शिल्लक राहिल्या. पण त्यांचा काहीही तपशील आम्हाला ठाऊक नाही. आर्येतरांचा इतिहासच आम्हाला कुणी नीट सांगत नाही. आर्यांच्यापूर्वी द्रविड संस्कृती होती, द्रविडापूर्वी नाग संस्कृती होती. नागापूर्वी मुंडावी संस्कृती होती, मुंडावीपूर्वी गोंड संस्कृती होती आणि ती अर्ध्या जगांत पसरली होती, याचे भानसुद्धा राहू नये अशी व्यवस्था केली गेली आहे.

परवाच मी अमेरिकेसंबंधीच्या इतिहासाचे एक पुस्तक वाचीत होतो. पुस्तकाचे नांव ''पीपल्स हिस्ट्री ऑफ युनायटेड स्टेटस्'' असे आहे. अमेरिकेतील मूळचे लोक ''रेड इंडियन'' नांवाने ओळखले जातात. आपल्याला सांगण्यात येते, कोलंबस हिंदुस्थानचा रस्ता शोधायला निघाला, वाटेत त्याला अमेरिकेची भूमी सापडली, त्याला हिंदुस्थानचीच भूमी भेटली असे वाटले. तिथल्या मूळ रहिवाशांना त्याने ''इंडियन'' म्हटले, नंतर तेच नांव रूढ झाले. परंतु तेथील मूळ रहिवाशी हे कोलंबसने गफलतीने म्हटले म्हणून ''इंडियन'' नाहीत, तर खरेच ते इंडियामधून सुमारे २५ हजार वर्षापूर्वी अलास्काच्या सामुद्रधुनीतून, आशियातून अमेरिकेत आलेले लोक आहेत असं पुस्तकाच्या लेखकाने म्हटले आहे. अलास्काची ती सामुद्रधुनी आता पाण्याखाली गेली आहे आणि पूर्वी ती पाण्याच्या वर असलेली, दोन खंडांना जोडणारी भूपट्टी होती, असंही तो लेखक म्हणतो. अमेरिकेतले रेडइंडियन हे आमचेच पूर्वज आहेत, मेक्सिकोमधील सूर्योपासना करणारी माया-संस्कृती आमच्या प्राचीन संस्कृतीशी निगडित आहे, पण जग आणि जगाचा इतिहास हा युरोपियन लोक सांगतील तोच, असं डोळे झाकून मानण्याची गुलामी वृत्ती आज रूढ झाली आहे. ब्राह्मण सांगेल तोच धर्म, तोच देव आणि तीच संस्कृती, हे जसे या देशांत पक्के रुजले आहे, तसेच आज जगांत युरोपियन बोलेल तोच आदर्श, तेच सत्य आणि तेच अनुकरणीय असे रुजवले गेले आहे.

इंग्लंडहून प्रसिद्ध झालेले आणखी एक चित्रमय पुस्तक माझ्या वाचनांत आले. ''प्लेसेस ऑफ विल्डरनेस इन द वर्ल्ड'', अशा नावाची १०० खंडाची एक मालिका, लंडनहून प्रसिद्ध झाली आहे. मी वाचलेल्या खंडात ब्राझीलमधल्या ॲमेझॉन खोऱ्यातील घनदाट जंगलांची माहिती होती. त्या प्रचंड पानथळीच्या जंगलात अजूनही मनुष्य जाऊ शकत नाही अशी बरीच ठिकाणे आहेत. त्या जंगलातील खडकांचा अभ्यास करून

लेखक म्हणतो की, ब्राझीलमधील हे खडक आफ्रिका खंडाच्या पश्चिम किनाऱ्यावरील खडकासारखे आहेत. आफ्रिकेतील खडक हे सह्याद्रीच्या कातळाशी जुळणारे आहेत. अती अती प्राचीन काळी, द. अमेरिका, आफ्रिका आणि द. भारत हा सलग भूभाग होता असे आता अनेकांनी अनुमान काढले आहे. ॲमेझॉन खोऱ्यातील त्या जंगलाचे प्राचीन नांव ''गोंडवन फॉरेस्ट'' असे होते असं तो लेखक म्हणतो. आता वन म्हणजे फॉरेस्ट हे त्याला माहित नसेल. गोंडवनाची प्राचीनता आणि त्याखालचा अवाढव्य भूप्रदेश याची कल्पना केवढी विस्मयजनक आहे? गोंडाची राज्ये नागपूरकडे होती. त्यांचे किल्ले आजही साक्षीला उभे आहेत. परंतु त्या गौंड संस्कृतीची आम्हाला कुणी माहिती देत नाहीत. आर्यांच्या पूर्वी विकसित झालेल्या नाग, द्रविड यांच्या संस्कृतीबद्दलही आम्हाला कुणी फारसे सांगत नाहीत. आम्ही या सर्व संस्कृतीचे वारस आहोत. हे आमच्या नव्या पिढ्यांना, स्पष्टपणे शोधून, उचित रीतीने, सातत्याने सांगितले पाहिजे.

महाराष्ट्र हा अनेक प्राचीन संस्कृतीचा प्रीती-संगम आहे. याचे तरी भान आमचे कुठे शिल्लक आहे? इरावतीबाई कर्वे यांनी आर्यांच्या दक्षिणेतील प्रदेशासंबंधी लिहिले आहे. विंध्य पर्वत ओलांडणे त्याकाळी कित्येक शतके आर्यांना दुर्धर झाले होते. दक्षिणापथावर आर्य आले, ते कोकणमार्गे दक्षिण भारताकडे उतरले. दक्षिणेतले द्रविड पूर्व किनाऱ्याने उत्तरेकडे गंगाखोऱ्यांत पसरले होते. या दोन संस्कृतीच्या प्रवाहांचा भोवरा कित्येक शतके कृष्णा खोऱ्यांत फिरत राहिला. उत्तर दक्षिण संघर्षाची सरहद्द कृष्णा खोऱ्यात बराच काळ रेंगाळली. या सरहद्दीच्या संघर्षात, कित्येक पिढ्या सतत रणभूमीवर उभा राहिला तो मरहट्टा. कैक शतकानंतर आर्य-अनार्य संघर्षाचा शेवट समन्वयांत झाला. त्या सांस्कृतिक ऐक्याचे निशाण प्रथम प्रीतिसंगमावरील मराठ्यांनी, खांद्यावर घेतले. ही, प्रखर विरोधी संस्कृतीचा प्रीतीसंगम घडवून आणणारी, मराठी संस्कृती ही उज्वल समन्वयाची प्रतीक आहे. सहनशील सह्यगिरी ज्याच्या पाठीचा कणा आहे, आणि विविध संस्कृतीच्या समन्वयाचे, एकात्मतेचे निशाण ज्याच्या खांद्यावर आहे, त्या महाराष्ट्राचा वारसा आमच्या नव्या महाराष्ट्रगीताने अभिमानाने सांगितला पाहिजे.

महानुभावपंथी चक्रधर स्वामींनी महाराष्ट्राची काही स्वभाव वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

''महंतराष्ट्र म्हणोनि महाराष्ट्र, राष्ट्र भणिजे देशः, परि सुखरुप आणि इष्टकारक.....''

''आपण अनाचारु न करी, आणि कासि करु नेदि इति ते महाराष्ट्र, धर्मसिद्धी जाय ते महाराष्ट्र.....''

उपभोगापेक्षा त्यागाकडे, व्यक्ती उत्कर्षापेक्षा सामाजिक संस्थात्मक उत्कर्षाकडे ओढ, स्वातंत्र्य, समता, न्याय याकडे अधिक ओढ, महाराष्ट्र हा स्वराज्यप्रेमी देश आहे. छत्रपती शिवरायांचे राज्य ते एका राजाचे राज्य नाही, तर ते "हिंदवी स्वराज्य" आहे, त्यातला सैनिक हा 'स्वराज्या' चा शिलेदार म्हणून अभिमानाने लढतो. लोकमान्य टिळक "स्वातंत्र्य माझा जन्मसिद्ध हक्क" असे म्हणत नाहीत, तर "स्वराज्य" माझा जन्मसिध्द हक्क आहे" अशी गर्जना करतात. स्वातंत्र्य कशासाठी ? तर हिंद स्वराज्यासाठी अशी म. गांधी मीमांसा करतात. "ग्रामस्वराज्यासाठी" चे स्वातंत्र्य हा विचार, प्रतिसरकार चालवतानाही आम्हाला अधिक भावतो. आणि स्वराज्यासाठी मरायला किंवा मारायला आम्ही सिद्ध होतो.

इतिहास प्रेरणा देतो. नवा इतिहास घडवण्याची प्रेरणा आणि आत्मविश्वास जागवतो. मराठी माणसाला महाराष्ट्राचा हा प्राचीन, अतिप्राचीन इतिहास नीटपणे सांगितला पाहिजे. आम्ही केवळ वारकरी नाही, केवळ धारकरी नाही, केवळ शेतकरी नाही किंवा केवळ कामकरी नाही. आम्ही शककर्त्या राज्यकर्त्यांचे वारस आहोत. जगभर समुद्र पर्यटन करणारे दर्यावर्दी खलाशी आहोत. जगाशी व्यापार करणारे व्यापारी आहोत. रोमच्या सम्राटाला आणि पोपला भुरळ पाडणाऱ्या कलाकुसरीच्या वस्तू तयार करणारे कारागीर आहोत. अजोड शिल्पी, चित्रकार, रसायन शास्त्रज्ञ, धातूशास्त्रज्ञ, खगोलशास्त्रज्ञ, गणिततज्ञ, आयुर्वेदाचार्य, भाषाप्रभू, साहित्यिक, कलाकार, संगीतकार, नाटककार आहोत. जीवनाचे कुठले क्षेत्र आम्हाला अज्ञात नाही. हे भान, हा विश्वास, हे चैतन्य आम्ही आमच्या इतिहासांतून जागवू शकलो पाहिजे. खरा सलग प्राचीन इतिहास, सद्हेतूने आणि उचित स्वरुपात नव्या पिढ्यांच्यापुढे परिणामकारक रीतीने सतत मांडला पाहिजे.

आमचा शाळा कॉलेजमधल्या पाठ्यपुस्तकांतला इतिहास देवगिरीच्या यादव सम्राटापासून सुरू होतो. यादव सम्राटांनी आजचा महाराष्ट्र साकारला. "ज्ञानेश्वरी" सारखे लेणे मराठी भाषेत खोदले. "अमृतातेहि पैजा जिंके" अशा श्रेष्ठ पदावर प्राकृत मराठी भाषेला बसविले. राजदरबाराची भाषा म्हणून मराठीला राजसिंहासनावर बसविले. त्या मराठी भाषेच्या आधारावरच आजचा महाराष्ट्र उभा आहे.

अल्लाउद्दीन खिलजी, मलिक अंबर, बहामनी सुलतानशाह्या आणि मोंगल यांनी आमच्यावर राज्ये केली. त्या काळांत आम्ही पंढरपूरच्या वाऱ्या सुरू केल्या. मराठी भाषेला इहलोकीचे विषय वर्ज करून, देव, धर्म, परलोक, नशीब, दैव या विषयाना बांधून टाकले. ब्रह्मानंदी टाळी लावून या क्षणभंगूर जगण्याच्या कटकटीतून मुक्ती देणारा, आणि मेल्यावर सर्व सुखे मिळतात म्हणणारा, ब्राह्मणधर्म बुडू नये म्हणून सर्व जातीतून

आम्ही संत उभे केले. जातीपाती भेदाभेदांची जन्माधिष्ठीत समाजव्यवस्था प्रमाण मानून, मायावादी भ्रमांत निचेष्ठ होऊन पडलो. इहवादातील विद्या, सत्ता, संपत्तीला पूर्णपणे पारखे होऊन अवघा बहुजन समाज स्त्रीशूद्राचे जिणे जगण्यास तयार केला.

भ्रमचित्त रोग्याला एकाएकी शुद्ध याची, तसा थोडा पन्नास पाऊणशे वर्षाचा काळ, सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात आला. "हिंदवी स्वराज्या" च्या विजा मराठी मनांच्या आभाळात चमकल्या. राजे शहाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, सेनापती संताजी घोरपडे, आणि महाराणी ताराबाई यांच्या कारकीर्दीची पन्नास पाऊणशे वर्षे हा मराठी अस्मितेचा अलिकडील इतिहासातील सर्वात तेजस्वी कालखंड आहे. तीन बादशाह्या पालथ्या घालून, शेवटी आलमगीर औरंगजेबाची कबर, मराठी मातीत बांधण्याचा महापराक्रम, याच काळात घडला. त्यानंतर मात्र पुन्हा भ्रमचित्त कोमात मराठी मन नेले गेले. पेशवाईने हिंदवी स्वराज्याचे निशाण टाकून दिले. ब्राह्मणी राज्यांचे सोवळे फडकावले. जन्मजात चातुर्वर्ण्यांचेच नव्हे तर कुटील विष्णुगुप्त चाणक्याने वळलेले, द्विवर्णाचे दावे, मराठी मनाला करकचून बांधले. छत्रपतींनाही शूद्र म्हणून राज्याभिषेक नाकारण्यापर्यंत या ब्रह्मवृंदाने मजल मारली. तिसरा पेशवा नानासो याने तर मातागमनी राजकारण करून, सातारच्या छत्रपतीनाच कैद केले. रायगड किल्ला उध्वस्त केला. शिवछत्रपतींनी दूरदृष्टीने उभारलेले आणि कान्होजी आंग्रे यांनी नावारूपाला आणलेले मराठी आरमार बुडविले. आणि तेहि इंग्रज आरमाराची मदत घेऊन. आणि शेवटी पानिपतावर मराठी अस्मितेची धुळवड खेळून, महाराष्ट्र भूमीत अश्वत्थाम्याच्या डोकीतले सूडांचे चिरंजीव किडे, पेरून ठेवले. त्या किडयांनी आजतागायत मराठी मन पोखरण्याचे काम चालूच ठेवले आहे. प्रधानाने राणीसह राजाचे राज्य बळकावले असा वग तमाशांत असतो, तसाच तमाशा पेशवाईने हिंदवी स्वराज्याचा केला. सेवकाचे स्वामी झाले आणि ब्राह्मणी राज्यासाठी महाराष्ट्रची एकात्मता, महाराष्ट्राची अस्मिता देशोधडीस लावली.

महाराणी ताराबाईने औरंगजेबाचा पराभव केल्यानंतर खरे तर सारा हिंदुस्थान मराठ्यांना, हिंदवी स्वराज्यासाठी मोकळा झाला होता. परंतु हिंदवी स्वराज्याचा ध्येयवाद फेकून देवून ब्राह्मणी राज्याच्या डबक्यात उड्या मारीत बसलेल्या बेडकांना, शेजारचा द. हिंदुस्थानही निष्कंटक करता आला नाही. छत्रपतींच्या घरात भाऊबंदकी पेटवून पेशवाई निर्माण केली, पेशवाईतही भाऊबंदकी वाढवून शनिवारवाड्यात खुनाखुनी केली, आणि शेवटी शत्रूलाच फितूर होऊन, ब्रह्मावर्ताचे पेन्शन आणि पुण्यातील चौदा हजार ब्राह्मणांना भोजन, एवढ्या मोबदल्यात सारे मराठी राज्यच इंग्रजाना देऊन मोकळे झाले.

महाराष्ट्रीयांची मने जुळवून दिव्य इतिहास घडविणारे हिंदवी स्वराज्य, पेशवाईने मोडीत काढले आणि संशयकल्लोळ, विश्वासघात, फसवणूक, भाऊबंदकी, फंदफितुरी, जातीभेद अशा रोगजंतूची कायमस्वरूपी पेरणी, मराठी मनांत करून पेशवाई संपली. इंग्रजी गुलामीचे दावे मराठी माणसाच्याही गळ्यात घट्ट बसले. परंपरागत ब्राह्मणी गळफास तर मूळचाच आवळला गेला होता. या दुहेरी गळचेपीतून सामान्य जनगणाला श्वास घेणेही अवघड झाले होते. गव्हर्नर जनरल एल्फिन्स्टंन कडून पेशवाई श्राद्धाचे ब्राह्मण भोजन उरकून सारा पुणेरी ब्रह्मवृंद पगड्या फिरवून इंग्रजी नोकरीत शिरला आणि वेदमंत्राप्रमाणे "भो पंचम जॉर्ज" ही प्रार्थना म्हणीत, इंग्रजांचे हस्तक म्हणून पुन्हा इथल्या आपल्याच लोकांवर "राज्य" करू लागला. हे जीवघेणे गुलामीचे फास ढिले करायला जोतीबा फुल्यांच्या रूपाने एक महात्मा पुढे सरसावला, तर या ब्रह्मवृंदानी शिव्याशाप, दगडधोंडे, शेणघाण यांचा वर्षाव त्याच्यावर केला. त्याला तोंड देवून त्या धैर्यधर महात्म्याने, ब्राह्मणी वर्चस्वाचा गळफास ढिला केला. त्याचवेळी विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक यांनी इंग्रजी गुलामीचे दावे ढिले करताना, ब्राह्मणी गळफास मात्र अधिक आवळला आणि म. फुले यांची टिंगल टवाळी केली. त्यामुळेच बडोद्याचे सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांची वेदोक्त प्रकरणे पेटवली गेली. क्रांतदर्शी सत्यशोधक चळवळीला त्यामुळेच ब्राह्मणेतर चळवळीचे प्रतिक्रियात्मक स्वरूप आले. राजर्षी शाहू महाराजांनी, ब्राह्मण धर्माने उतरंडीप्रमाणे रचलेल्या एकाच्या तोंडावर दुसरा आशा, जाती व्यवस्थेंलाच आव्हान दिले. सर्वच जातीजमातीच्या गळ्याभोवतीचे गळफास ढिले केले. आपल्या हातातली मांडलिक राजाची एवढीशी सत्ता, शक्ती, साधने यांचा पुरेपूर उपयोग ही जातीपातीची मानसिक गुलामी तोडण्यासाठी केला. एवढेच नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सारखा तळागाळातील अस्पृश्यांचा नेता उभा करून, मानव मुक्तीचा वारसा पुढच्या पिढीच्या समर्थ हातात दिला.

इंग्रजांची गुलामी केवळ राजकीय नव्हती ती एक महाभयानक वसाहतवादी अर्थव्यवस्थेची गुलामी होती हे लक्षांत यायला पेशवाई बुडाल्यापासून दोन पिढ्यांचा काळ गेला. इंग्रजांच्या राजवटीच्या आडून पाश्चात्य सांस्कृतिक गुलामीचे दावे हिंदुस्थानी जनगणमनावर हळू हळू पण बळकटपणे अडकू लागले. परंपरागत ब्राह्मणी संस्कृतीची मानसिक गुलामी आणि इंग्रजानी गळ्यात अडकवलेली विलायती संस्कृतीची गुलामी, यांतही मोठा विसंवाद होता. इंग्रजी आचार-विचार प्रचाराच्या संपर्कात येणारी मने, ब्राह्मणधर्माने उभा केलेला मानसिक गुलामीचा आणि भ्रमिष्ट तत्वज्ञानाचा पिंजरा समजून घेऊ लागली. त्यातील अंधश्रद्धा, अमानुष विषमता, शोषण उघडे पडू लागले.

लोकहितवादी, म. फुले आणि त्यांच्याही पूर्वी राजा राममोहन रॉय यांच्या वस्तुनिष्ठ आणि सत्यशोधक वृत्तीने जनगणमनावरची, ब्राह्मणी शिकवणुकीमुळे चढलेली नशा उतरू लागली

आणि अशा ब्राह्मणी विलायती गुलामीच्या जंजाळातून बाहेर पडून मानवतावादी सत्याग्रही जीवनाचा रस्ता दाखवणारा दुसरा महात्मा पुढे आला. साऱ्या राष्ट्राला त्याने मंत्रमुग्ध केले. माणसातले सत्व जागवले. प्राचीन भारतीय संस्कृतीमधील, अहिंसा सत्य अस्तेय, विविधतेतील एकता, विश्वकुटुंब ही अमृततत्वे, जी ब्राह्मणधर्माने मायावादांत आणि कर्मकांडात बुडवून टाकली होती, ती पुन्हा जगापुढे ठेवली. म. गांधींच्या रूपाने प्राचीन भारतीय संस्कृतीचा आत्माच जणू अवतार धारण करून बोलू लागला. हिंदी जनगणमनाला, म. गांधी थेट जाऊन भिडले. हिंसा, विषमता, स्वार्थ, भोग, स्पर्धा, संघर्ष यांतून रखडत चाललेला मानवी व्यवहार, साऱ्या मानवजातीलाच अस्वस्थ, असहाय्य करीत होता. त्यांना म. गांधींचे विचार आणि आचार संजीवक वाटू लागले. मानवमुक्तीचा एक न भूतो असा मार्ग दिसू लागला. बलाढ्य इंग्रजी सत्तेला आव्हान देणारी, आत्मबलावर चालणारी लोकचळवळ उभी राहिली. हीन दीन अवस्थेला जाऊन पोहचलेल्या लोकमानसांतील ईश्वरी शक्तीला आवाज देणारी लोकजागृती, लोकसंघटन करून अन्यायाविरोधी प्रखर आंदोलन करणारी लोकचळवळ उभी राहिली. इंग्रजी राजकीय गुलामीचे दावे तर तोडलेच पण पाश्चात्य संस्कृतीच्या लोंढ्यातून वाहून न जाता, स्वतंत्र स्वयंपूर्ण सत्याग्रही सर्वोदय जीवनपद्धतीचा, नवा मार्ग मानव जातीपुढे उघडून दिला. परलोकवाद मायावाद यातून भारतीय मने मुक्त केली आणि इहवादाची अत्युच्च आनंद देणारी मांडणी करण्याला, नवा समाजधारक विचार आणि आचारही, त्याच्यापुढे ठेवला.

भूतकाळांत डोके खुपसून, मागे पहात पुढे चालणारे सनातनी दुराभिमानी लोक, आणि पाश्चात्याच्या चकाकणाऱ्या सुखवादी गतिमान भौतिक जीवनाने भारावून गेलेले तथाकथित पुरोगामी सुशिक्षित पण भोगवादी साहेब लोक, या दोघांनाही आधांतरी करणारा, सत्य शिव सुंदर जीवन मार्ग, म. गांधींनी सत्याचे प्रयोग करीत्त शोधून काढला. संस्कृत पंडित आणि इंग्लिश पंडित, या पढीत पंडितांची, या सत्यशोधक सत्याग्रही कर्मयोग्याने, मोठी पंचायत करून ठेवली. सामान्य जनगणमन मात्र म. गांधींच्या सत्याग्रही जीवनमार्गाच्या दर्शनाने भारावून गेला.

म. जोतीबा फुले ते म. गांधी हा सुमारे शंभर वर्षाचा कालखंड मराठी जनगणमन जागरणाच्या दृष्टीने आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीच्या दृष्टीने फार महत्वाचा ऐतिहासिक

कालखंड आहे. महाराष्ट्राच्या आनंदवनांत जी विवेक विचार तरुंची घनदाट पुष्पवाटिका बहरली. त्या साऱ्या बगिच्यातील मधुकण गोळा करीत, भरलेल्या मधाच्या कांद्याप्रमाणे यशवंतराव चव्हाण हे आपुले आयुष्य जगले. चव्हाणसाहेब हा एक इतिहासातील लोकराज्याच्या वळणावरचा दीपस्तंभ आहे.

आपसांतील भाऊबंदकी, दैववादी मनोवृत्ती, जन्माधिष्ठित उच्चनीचता, जुलमी सुलतानशाह्या, मुघलशाह्या, यांच्या वरवंट्याखाली पिचलेल्या लोकांना स्वतंत्र करून, राजेशाहीतही हिंदवी लोक स्वराज्य कसे साधता येते, याचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केला. इंग्रजी नजर कैदेत, आणि फितूर स्वकीयांच्या पहाऱ्याखाली मिळालेल्या, तुटक्याफुटक्या मांडलिक सत्तेचा उपयोग करून, दलीत, पिडीत अंधश्रद्धा, जनतेच्या कल्याणाचे राज्य, संस्थानी काळांत कसे उभे करता येते? याचा नमुना राजर्षी शाहू महाराजांनी उभा करून दाखवला. लोकशाहीच्या जमान्यांत, सामान्यातून असामान्य लोकनेतेपण आकाराला आणून, लोकशाही राज्यकारभार कसा करावा याचा आदर्श यशवंतराव चव्हाण यांनी निर्माण केला.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळातच, पाश्चात्य जगांत विकसित झालेली प्रातिनिधिक लोकशाही राज्यव्यवस्था, प्रौढ मतदान, निवडणुका, राजकीयपक्ष असे राजकारणातले "पुरोगामी" मानले गेलेले विचार इथल्या सुशिक्षितांनी स्वीकारले. भांडवलशाही , समाजवाद, साम्यवाद, उदारमतवाद, मुक्त अर्थव्यवस्था हे अर्थशास्त्रीय विचारही इथे अनुकरणीय वाटले. इंग्रजी राज्य चालवायला स्थानिक मनुष्यबळ हवे होते ते तयार करणाऱ्या शिक्षण संस्थाही इथे स्वीकारल्या गेल्या. इंग्रजी भाषा, इंग्रजी पोषाख, इंग्रजी संस्कृति आणि रीतीरिवाज, सारे काही आदर्श समजून इथल्या नवशिक्षितांनी अनुसरले. स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानांत कोणती राज्यपद्धती, कोणती अर्थपद्धती कोणती समाजपद्धती स्विकारायची, या संबंधीचे सारे संदर्भ पाश्चात्य जगातून घेतले. मतभिन्नता होती पण ती बरीचशी पाश्चात्य जगातले हे स्वीकारायचे की ते स्वीकारायचे, एवढ्यापुरतीच मर्यादित होती. इंग्रज जेते, आम्ही पराभूत. त्यांचे सारे काही अनुकरणीय, अशीच मनोधारणा इथल्या शिक्षितांची झाली होती.

स्वातंत्र्यानंतर नवभारताच्या जडणघडणीचा जो आराखडा भारतीय राज्यघटनत सर्वमान्य म्हणून स्वीकारला गेला तो चांगला साडेतीन वर्षाच्या वादविवादातून साकार झालेला आराखडा आहे. देशातले बहुतेक सारे कर्ते, नेते, विद्वान त्या वादविवादात सहभागी झाले होते. इंग्रजी राजवटीत जी वैचारिक आंदोलने झाली त्या सर्व विचार मंथनाचे नवनीत म्हणून भारतीय राज्यघटनेकडे पाहिले पाहिजे. पाश्चात्य संस्कृतीच्या

संपर्कात आल्याने जे राजकीय, आर्थिक, सामाजिक असे ऐहिक जागरण झाले, त्यातून पाश्चात्यांचे सांस्कृतिक श्रेष्ठत्वही मान्य करणारी मनोवृत्ती शिक्षितांनी मान्य केली आणि तीच या देशापुढे अनुकरणीय, आदर्श म्हणून ठेवली गेली. भारतीय राज्यघटनेचा सरनामा ही नवभारताच्या उभारणीची वैचारिक बैठक अतिशय सुस्पष्ट करणारी उद्घोषणा आहे.

''आम्ही भारतीय लोक निर्धारपूर्वक असा संकल्प करतो की, आम्ही आमच्या स्वतंत्र भारतात सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक लोकशाही राज्यव्यवस्था मांडून चालवू, आणि इथे जन्माला आलेल्या प्रत्येक नागरिकास, न्याय, स्वातंत्र्य, समता, प्रतिष्ठा आणि बंधुभावावर आधारित राष्ट्रीय एकता याची अनुभूती देणारे जीवन देण्याची हमी देऊ.'

या निर्धाराच्या संकल्पाबरोबर नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. राज्यकर्त्यांनाही मार्गदर्शक तत्वे घालून देऊन नवभारताच्या रचनेचा आराखडा निश्चित केला आहे. भारताची राज्यघटना हा एक राष्ट्रीय जाहीरनामाच आहे. महाराष्ट्राला या राज्यघटनेच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यांत आघाडीवर रहायचे आहे. महाराष्ट्राची जडणघडण घटनेच्या चौकटींत पण आपली सर्व शक्ती, युक्ती आणि देशभक्ती वापरून करावयाची आहे.

राज्यघटनेची उद्दीष्ट्ये लोकशाही राज्यकारभाराच्या माध्यमातून गाठायची आहेत. पाश्चात्य लोकशाही प्रमाणे प्रौढ मतदान व सार्वत्रिक निवडणुका यांतून राज्यकारभाराची सत्ता हातात घ्यायला विविध राजकीय पक्ष कार्यरत झाले. स्वातंत्र्याबरोबर मतदानाचा हक्क व प्रातिनिधीक लोकशाही राज्यव्यवस्था आली, हे सारेच नवे उत्साहवर्धक होते. देशाचे तुकडे करणारी ब्रिटीश कूटनीती, व दीडशे वर्षांचे वसाहतवादी शोषण, विसरून लोक ब्रिटीश लोकशाही पद्धतीचे अनुकरण मोठ्या उत्साहाने करू लागले. ब्रिटीशकॉमनवेल्थमध्ये रहाण्याचा निर्णय, १९६५ पर्यंत इंग्रजी भाषेला राज्यकारभारात प्रमुख स्थान देण्याची तरतूद आणि स्वतंत्र भारताच्या एकूणच कारभार व्यवस्थेसाठी संदर्भ म्हणून, आदर्श म्हणून इंग्रजांकडे पाहण्याची सर्वच क्षेत्रांतील नेत्यांची मनोभूमिका, हे सारे १५० वर्षांच्या ब्रिटीश संस्काराचे फलीत होते. आयुर्वेदापेक्षा ॲलोपथीचा अंगीकार जसा आधाशीपणाने झाला, तसाच भोगवादी पाश्चात्य संस्कृतीचा अंगीकार शिक्षितांनी डोळे झाकून रूढ केला.

स्वातंत्र्य मिळविले म्हणजे आमच्या देशाचा राज्यकारभार करण्याची सार्वभौम सत्ता मिळवली. ती सत्ता राज्यघटनेने दिल्लीच्या लोकसभेत व घटक राज्यांच्या विधानसभांत वाटून दिली, आणि द्विस्तरीय संघराज्य अस्तित्वात आणले. देशाच्या

फाळणीचा, जातीय दंगलीचा जबर आघात, सर्वांच्याच मनांत त्याकाळी ताजा असल्यामुळे, देशाची एकता टिकवायची तर केंद्रसत्ताच बळकट असली पाहिजे, अशीच भूमिका त्यावेळी घेण्यांत आली. मतदानाचा अधिकार प्रत्येक प्रौढास दिला पण हे मतदार जिथे रहातात त्या गांवातील ग्रामसभाकडे, कसलीच सत्ता दिली नाही. मानवेंद्रनाथ रॉय आणि म. गांधी यांनी युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीपेक्षा, स्वायत्त स्थानिक स्वराज्य संस्थावर आधारीत विकेंद्रीत भारतीय लोकशाहीचा पर्याय सुचविला होता. पण त्याकडे आमच्या दिसायला हिंदुस्थानी पण आचार-विचारांनी विलायती बनलेल्या शिक्षित पुढाऱ्यांनी, तो पर्याय अव्यवहार्य, मागास मध्ययुगीन ठरवून बाजूला टाकला. म. गांधींची तर हत्याच झाली. मानवेंद्रनाथ रॉयनी दूरदृष्टीचा परखड सल्ला, घटना समितीला दिला होता. ते म्हणाले होते, "युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीचा ढाचा जसाच्या तसा तुम्ही स्वीकारलांत तर अडचणीत याल. युरोपीय सामाजिक, आर्थिक परिस्थिती आणि भारतीय सामाजिक आर्थिक परिस्थिती पूर्णत: वेगवेगळी आहे. इथे युरोपीय पद्धतीचे राजकीय पक्षसंघटन होणार नाही. तुम्ही हट्टाने त्यांचे अनुकरण केलेत तर २५-३० वर्षांत या देशातील सर्वच राजकीय पक्ष आपला परिवर्तनाचा ध्येयवाद टाकून देतील, व केवळ सत्ताबाजीचे तत्वहीन राजकारण करतील. युरोपीय लोकशाहीचा ढाचा, आपला देश अराजकाकडे घेऊन जाईल. तो ढाचा इथे रुजणार नाही."

परंतु हा इशारा आणि म. गांधींचा, स्वातंत्र्यानंतर ग्राम स्वराज्यावर उभारलेली राज्यव्यवस्था, हा विचार घटना तज्ञांनी पूर्णत: बाजूला टाकला आणि राज्यघटनेतील उद्दीष्टे गाठायला जी राज्यव्यवस्था उभी केली ती पूर्णत: युरोपांत विकसित झालेली प्रातिनिधीक लोकशाही जशीच्या तशी स्वीकारली. वसाहतवादी राज्यव्यवस्था चालवणारी नोकरशाही तशीच चालू ठेवली. किंबहुना ती अधिक बळकट व सुरक्षित केली. स्वातंत्र्याच्या उन्मेषांत सामान्य जनगण, हे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांतील तौलनिक बरेवाईट काय हे समजण्याइतके जागृत नव्हते. म. गांधींच्या व्यक्तीमत्वाने मंत्रमुग्ध झालेल्या जनगणमनाला सारेच राजकीय पुढारी, म. गांधीच्या आचार विचारांचे अनुयायी आहेत असेच वाटले. त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीने दिपून जाऊन त्या संस्कृतीचे अंधभक्त झालेले पुरोगामी सुशिक्षित जे जे बोलतील, करतील, ते ते सारे देशभक्तीचे, देशहिताचे असे मानूनच जनता त्यांच्यावर विसंबून होती. आणि सार्वत्रिक मतदान, निवडणूकीतील सहभाग यामुळे दिग्मूढ होऊन पुढाऱ्यांच्या मागून जनगणमन डोळे झाकून चालू लागले.

प्रातिनिधीक लोकशाही राज्यव्यवस्थेतून नवभारताची जडणघडण करायची हा जसा निर्णय झाला तसा देशविकासासाठी भाषावार प्रांतरचनाही आवश्यक आहे असा विचार स्वातंत्र्याच्या चळवळीतच आकाराला आला होता. इंग्रजी राजवटीत ते जसा

देश जिंकत गेले तसे त्यांच्या कारभाराच्या सोयीसाठी, तालुके, जिल्हे, प्रांत तयार करीत गेले. त्यांत लोकांची सोय पाहण्याचा प्रश्नच नव्हता. पूर्वीची अनेक लहानमोठी संस्थानेही मांडलिक म्हणून चालू ठेवली होती. तो ५६५ संस्थानांचा मुलूख व त्याबाहेरचा ब्रिटीश अंमलाखालील मुलूख ते जसा जिंकत गेले तसे त्यांनी कारभाराचे घटक तयार केले. स्वातंत्र्यानंतर आणि विशेषत: संस्थांनी मुलूखांच्या विलिनीकरणानंतर, लोकांच्या सोयीने राज्यकारभाराचे प्रादेशिक घटक करण्याची निकड वाटू लागली. त्यातूनच भाषावार प्रांत रचनेचा प्रस्ताव देशभर अंमलात आणावा लागला. भाषा हा माणसांतील एकात्मता बळकट करणारा मोठा घटक आहे. एक भाषा बोलणारी माणसे एका घटक राज्यात असली तर ही एकात्मता वाढून, राज्यकारभाराला व विकासाला गती येईल या विचारानेच १९५६ साली भाषावार प्रांतरचना देशभर लागू झाली. घटक राज्यांची पुनर्रचना झाली. दुर्दैवाने महाराष्ट्रावर मात्र द्विभाषिक लादण्यात आले. लोकांची सोय व इच्छा डावलून गुजराथ, महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा असे मुंबई राज्य निर्माण करण्यात आले. मध्यप्रदेशांत व निझामी संस्थानांत असलेला मराठी मुलूख एकत्र आला, पण गुजराथी व मराठीचे द्विभाषिक राज्य चालू ठेवण्यात आले. त्यातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा भडका, मराठी प्रदेशांत उठला.

महाराष्ट्राची जडणघडण आणि कै. यशवंतरावजींच्या नेतृत्वाची जडणघडण यांत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला फार मोठे ऐतिहासिक महत्व आहे. सर्व मराठी भाषिकांना एकत्र येण्याची, एकत्र राहण्याची आणि परस्पर सहकार्याने आपला विकास करून घेण्याची नैसर्गिक अशी तीव्र इच्छा होती. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यशस्वी झाली. स्वातंत्र्यानंतर सर्वांगीण विकास हेच राष्ट्रापुढील अग्रक्रमाचे उद्दीष्ट आहे. विकासासाठी एकोप्याची गरज असते. असा एकोपा बळकट करणारे भाषा हे मोठे साधन आहे. एक भाषा बोलणाऱ्या लोकांनी परस्पर सहवासातून, देवाणघेवाणीतून आपली एक विशिष्ट संस्कृती. विशिष्ट अस्मिता जोपासलेली असते. आणि त्याबद्दलचा मोठा अभिमान त्या सर्व भाषिकांच्या मनांत असतो. असे एक भाषा बोलणारे लोक एका घटकराज्यांत येऊन आपला राज्यकारभार करू लागले तर परस्पर विश्वास, समजूत जिव्हाळा, बंधुभाव आणि त्यातून मनमोकळा सहभाग वाढीस लागतो. भाषावार प्रांतरचनेचे सूत्र हेच आहे की, भाषा माणसाची मने जुळवते, भावनिक एकात्मता निर्माण करते. देशभर भाषावार प्रांतरचना अंमलात आली. परंतु राष्ट्रीय राजकारणांत प्रभाव असणाऱ्या तत्कालीन काही पुढाऱ्यांच्या मनांत मराठी माणसांबद्दल आकस, अविश्वास. दुरावा, भीती रेंगाळत असल्यामुळे महाराष्ट्रावर गुजराथी वर्चस्वाचे द्विभाषिक लादण्यात आले. हा दुरावा, अविश्वास, भीती महाराष्ट्राला फार महागांत पडत आली आहे. भारतीय

राजकारणांत, इतर प्रांतियांच्या मनांत विश्वास, स्नेहभाव, आपुलकी निर्माण करण्यांत आम्ही इतिहास कालापासून अपूरे पडलो आहोत. किंबहुना त्याबद्दल बेफिकीरच राहिलो आहोत. विशेषतः पेशवाईच्या काळात ''हिंदवी स्वराज्याचा व्यापक ध्येयवाद टाकून स्वतःपुरता ब्राह्मणी राज्याचा ध्येयवाद जोपासला गेल्यामुळे, महाराष्ट्राबाहेरचा हिंदुस्थान हा फक्त स्वाऱ्या, शिकारी करण्यासाठी व चौथाई सरदेशमुखी करून लुटालूट करण्यासाठीच आहे असाच समज शनिवार वाड्यांत शिल्लक राहिल्यामुळे, मराठे म्हणजे लुटारू असा समज परप्रांतात रूढ झाला. रडणाऱ्या लहान मुलाला गप्प करण्यासाठी ''आला बागुलबुवा'' असं आपल्याकडील आया म्हणतात. तसं बंगाल बिहारकडील आया ''मराठा आया'' असं त्या मुलाला म्हणतात. ''अटकेपार झेंडे नेले तरी संध्याकाळी पुण्याकडे'' हीच मनोवृत्ती पुणेकर राज्यकर्त्यांची राहिली. आमच्या राष्ट्रवादाच्या कल्पनाही, अहंकारी, भांडखोर व अडाणी स्वभावामुळे संकुचितच राहिल्या. आमच्या जवळ जे चांगले आहे, उदात्त आहे ते अवघ्या भारतवासियापर्यंत पोहोचविण्याचा आम्ही कधी प्रयत्न केला नाही. आमचे ज्ञानेश्वर, तुकाराम, आमचे शिवछत्रपती, संभाजी, ताराबाई, आमचे महात्मा फुले, शाहू महाराज आम्ही आमच्यापुरतेच कोंडून ठेवले. लोकमान्य टिळक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर एवढे अपवाद सोडले तर आम्ही आमच्या महापुरुषांनाही राष्ट्रीय संदर्भात पुढे नेले नाही. स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती केली पाहिजे असे म्हणणारे आमचे सावरकर ऐन चळवळीत दारूत पाणी घालून बसले, आणि प्रत्यक्ष आझाद हिंद सेना उभारून, इंग्रजांना रणांगणात आव्हान देणारे सुभाषचंद्र बोस राष्ट्रीय महापूरुष झाले. आमच्या मनाचा हा भोतेपणाच मराठी माणसाबद्दल इतर प्रांतातील भारतीयांच्या मनांत दुरावा, संशय, अविश्वास, भीती, तिरस्कार निर्माण होण्यास कारणीभूत आहे. राष्ट्रीय पातळीवरील या वस्तुस्थितीची जाणीव ठेवून, दिल्लीच्या राजाकरणांत फक्त यशवंतरावजी सावधपणे वावरले. त्यामुळे त्यांच्याबद्दल देशभर आदरभाव दिसतो. पण त्यांचे चेले म्हणणारे आजचे राजकारणी, आपल्या सत्ताबाजीच्या निर्लज्ज राजकीय चालीमुळे पुन्हा महाराष्ट्र आणि मराठे यांच्याबद्दल गैरसमज, इतर भारतीयांच्या मनांत दृढ करीत आहेत.

द्विभाषिक राज्याचा महाराष्ट्रावर लादलेला सापळा, हा यशवंतरावजींना अडकवणारा मोठा चक्रव्युहच होता. राष्ट्रीय राजकारणांशी आणि म्हणून काँग्रेस पक्षांशी एकनिष्ठ राहण्याची भूमिका त्यांनी लहानपणापासूनच मोठी विचारपूर्वक व प्रयत्नपूर्वक जोपासलेली राजकीय भूमिका होती. त्यामुळे राष्ट्राचा निर्णय म्हणून तो मानणे आणि राबवणे त्यांना भागच होते. परंतु व्यक्तिशः द्विभाषिक म्हणजे देशी वसाहती वादाचीच भलावण आहे अशी मोठी प्रखर भूमिका त्यांची होती. अशा माणसाला मुख्यमंत्री म्हणून

द्विभाषिक राज्य चालवण्याची पाळी यावी हे त्या चक्रव्युहात ढकलण्यासारखेच होते. आपली राष्ट्रवादी भूमिका घेऊन त्यांनी मोठ्या चातुर्याने तो चक्रव्यूह यशस्वीपणे भेटून दाखवला आणि आपल्या मूळ भूमिकेप्रमाणे संयुक्त महाराष्ट्र राज्यांचा मंगल कलश आणून मराठी माणसाच्या हातात दिला. द्विभाषिकातून भावनिक ऐक्य साधता येत नाही, हे दर्शविण्यांत चव्हाणसाहेब यशस्वी झाले. राष्ट्रीय नेत्यांचा त्यांनी प्रथम विश्वास मिळवला. स्वजनांचा काही काळ रोष पत्करला, स्वतःच्या राष्ट्रवादी भूमिकेशी काँग्रेस पक्षाच्या निष्ठेशी त्यांनी प्रतारणा केली नाही. सामाजिक राष्ट्रीय ऐक्यातील भावनिक एकात्मतेच्या मुद्यावरच वरीष्ठांची खात्री पटवून मोठ्या मुत्सद्दीपणाने मराठी मनाची एकत्र येण्याची उत्सुकता पूर्ण करून घेतली. काँग्रेस पक्षाचा हललेला पायाही महाराष्ट्रात बळकट केला आणि इतर भाषिकांची कटूता न घेता साऱ्या देशाची वाहवा मिळवली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून अग्निपरीक्षा देवून कसास उतरलेले यशवंतरावांचे नेतृत्व देशाच्या उंचीवर गेले.

द्विभाषिकाचा चक्रव्यूह भेदून महाराष्ट्र निर्मिती साधून घेताना, अनेक ठिकाणी खरचटून घ्यावे लागले. निसर्ग समृद्ध आदिवासी डांग तालुके मराठी भाषिक असून गुजराथला द्यावे लागले. मध्यप्रदेश, कर्नाटक, आंध्र येथील लाखो मराठी माणसे महाराष्ट्राबाहेरच राहिली, गोवाही गमावून बसलो. सीमाप्रश्नांचे धोंगडे तसेच भिजत ठेवून मिळाला तेवढा महाराष्ट्र पदरात पाडून घ्यावा लागला. तरी कैक पिढ्यानंतर विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील मराठी माणसं एकत्र आली. मुंबई विदर्भ तोडण्याचे प्रयत्न नाकाम झाले, मराठी माणसांच्या नव्या संसाराची नीट घडी वसवून उरलेले प्रश्न नंतर सोडवू अशी भुमिका घेऊन चव्हाणसाहेब महाराष्ट्राचे नेतृत्व करू लागले. कैक पिढ्यांनंतर महाराष्ट्रांत उत्साहाचे, ईर्षेचे आणि काहीतरी करून दाखवण्याचे वातावरण निर्माण झाले.

महाराष्ट्र निर्मितीनंतर अवघी दोन वर्षे यशवंतरावजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले. परंतु तेवढ्याही काळांत त्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीची जी धोरणे आखली, जी पाऊले उचलली आणि जी कार्यपद्धती अवलंबली त्यामुळे सारा महाराष्ट्र कैक वर्षांनी चैतन्याने उचंबळून आला. लोकशाही, समाजवाद आणि राष्ट्रीय व सामाजिक एकात्मता हा त्रिशूल हातात घेऊन कै. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रातील सरंजामी, विषमतावादी व जातीयवादी प्रकृती विरुद्ध लढाई सुरू केली. अज्ञान, आळस, परलोकवादातून लोकमानस मुक्त करण्याचे मोर्चे बांधले. शिक्षण प्रसाराची प्रचंड चळवळ उभी केली. दारिद्र्य, बेकारी, गरीबीचे विरुद्ध सहकारी पद्धतीने लोकशक्ती संघटित करून महाराष्ट्राची सारी ग्रामीण अर्थव्यवस्था जी आटत चाललेल्या, साचलेल्या डबक्यासारखी झाली होती ती

गट तट, कडे, बांध फोडून प्रवाहित केली. सहकारी कृषी औद्यागिक समाजरचनेची नवी स्वप्ने मराठी मनावर कोरली. त्याचबरोबर गावोगांव पंचायत राज्यसंस्थाना नवा आशय, नवी दिशा व दृष्टी देवून लोकशाही समाजजीवन पद्धती खोलवर रुजवण्याचे आणि स्थानिक विकासांत लोकसहभाग मिळवून विकासाला प्रचंड गती देण्याचे उपक्रम हाती घेतले. कोयनेसारखी धरणे बांधून, प्रचंड वीज निर्मिती करून शेत बांधावर वीज नेली. नव्या आधुनिक ज्ञान-विज्ञानाच्या शक्तीचे दर्शन शेतबांधापर्यंत दिले. कारखानदारी, उद्योग, शहरीकरण, दळणवळण, रस्ते, पाटबंधारे, व्यापार साऱ्या आर्थिक आघाड्या मराठी माणसासाठी उघडून दिल्या. क्रीडा, कला, लोककला, साहित्य, चित्रपट, इतिहास याही क्षेत्रातील मराठी उर्मी जागवून प्रचंड झेप घेण्यासाठी उठवून उभ्या केल्या आणि सर्वात महत्वाचे म्हणजे परलोकवादाच्या चातुर्वर्ण्याच्या आणि जातीपातीच्या मानसिक गुलामीत पिढ्यानूपिढ्या असहाय्य हतबल होऊन उध्वस्त झालेल्या सामान्य माणसाला नवा हुरूप, नवा आत्मविश्वास, नवी स्वप्ने दिली. सर्वच जाती जमातींना विश्वास, दिलासा दिला. परस्पर समजूतदारपणा, मनमोकळेपणा, विश्वास वाढून, परस्पर सहकार्याची कृती उत्तेजित केली. नव्याने महाराष्ट्रांत एकत्र आलेल्या साऱ्या मराठी मनांत भावनिक एकात्मता निर्माण व्हावी, परिदृढ व्हावी यावर तर यशवंतरावांनी फार कटाक्षाने भर दिला. छत्रपती शिवरायांच्या नंतर पुन्हा एकदा मराठी मने "मेळवून" "मराठी स्वराज्य" निर्माण करण्याचा ध्येयवाद मराठी मनांत भरला. त्याचवेळी राष्ट्रीय भारतीय अस्मितेला बळकट करणारा समर्थ महाराष्ट्र याचेही भान त्यांनी मराठी मनांत जागते ठेवले. महाराष्ट्राच्या जडणघडणीची, आधारशीला मराठी मनांतील परस्पर एकोप्याची, विश्वासाची बंधुतेची भावना हीच आहे याची जाणीवपूर्वक दक्षता घेवून यशवंतरावांनी आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीची पायाभरणी केली. त्यांनी घालून दिली घडी संभाळून व त्यांनी दिलेली दिशा व दृष्टी ठेवून, यशवंतराव दिल्लीला गेल्यानंतर १०-१२ वर्षे महाराष्ट्र चालला. त्यानंतर मात्र मराठी मनातील भावनिक एकतेकडे परस्पर विश्वासार्हतेकडे, दुर्लक्ष करणारे आणि केवळ सत्ता, स्वार्थ प्राप्तीसाठी संधीसाधूंचे राजकारण करणारेच नेते, राज्यकर्ते आणि त्यांचे सल्लागार महाराष्ट्रात वाढले गेल्यामुळे महाराष्ट्राची घडी पुन्हा विस्कळीत झाली. आणिबाणीच्या राजकारणांमुळे देशाचे राजकारण जसे उध्वस्त केले गेले तशी महाराष्ट्राची घडीही उस्कटून गेली. त्या आणीबाणीपासून आजतागायत महाराष्ट्राचे आणि देशाचे राजकारण, अर्थकारण, समाजकारण, शेपूट तुटलेल्या पतंगासारखे गिरक्या घेत फरफटत चालले आहे.

संयुक्त महाराष्ट्रांची चळवळ मराठ्यांनी हिरीरीने चालविली. पण महाराष्ट्र निर्मितीनंतर मराठी मनाची एकात्मता साधून सामुहिक संघशक्तींवर विद्या, सत्ता, संपत्तीच्या

क्षेत्रांत मराठी माणूस का आघाडीवर जात नाही? ही सामुदायिक मनांतील एकात्मतेची भावना जोपासून भरभक्कम करणे हीच महाराष्ट्राच्या जडण घडणीची आधारशीला आहे हे यशवंतरावांनी आग्रहाने दाखवून दिले असतानाही नंतरच्या राज्यकर्त्यांनी, विद्वानांनी, साहित्यिक विचारवंतांनी, त्यासाठी काही भरीव उपक्रम राबवले का? कित्येक शतकानंतर एकत्र आलेली मराठी मने, पूर्ण विश्वासाने, प्रेमाने, आदराने, भावनिक जिव्हाळ्याने, एकात्मता साधून, एक डोळस शक्ती म्हणून, राष्ट्र उभारणीच्या विविध आघाड्यावर समर्थपणे उभी राहील यासाठी आम्ही काही केले का ? ''हिमालयाच्या रक्षणाला सह्याद्री धावला'' एवढे म्हणून आम्ही यशवंतरावांच्या संरक्षणमंत्री म्हणून झालेल्या निवडीचे कौतुक केले. पण त्या संरक्षण क्षेत्रांत तरी महाराष्ट्र आघाडीवर राहील यासाठी काही विचारपूर्वक पावले टाकली का? स्वतःच्या अहंकारांत बुडवून घेऊन आम्ही आत्मघातकी दंभाचे जगणे उराशी कवटाळून बसतो. आणि महाराष्ट्राबाहेर, उघड्या जगांत आत्मविश्वासाने वावरायला कुचराई करतो. मराठ्यांची ही स्वयंकेंद्री मानसिकता महाराष्ट्राला फार महागात पडते. विविध आघाड्यावर सर्वांपुढे उभे राहण्याची कुवत असूनही आम्ही या मानसिकतेमुळे मागे राहिलो आहे. इतरांच्या दुराव्याच्या भावनेस खतपाणी घालतो आहे. ही आत्मसंतुष्ट स्वयंकेंद्री संकुचित भावना घालवण्यासाठी, संयुक्त महाराष्ट्रातील आपल्या साऱ्या मराठी मनांतही परस्पर बंधुतेची, विश्वासाची भावना परिदृढ करण्यासाठी गेल्या ३०-३५ वर्षात आम्ही काही केले नाही. उलट आम्ही वाटणीची भांडणेच सुरू केली. विभागीय भावना जोजावण्याचा तर काहींनी विडाच उचलला. ऐतिहासिक काळापासून चालत आलेले दुरावे, जातीजमातीचे दुरावे, परस्पर संपर्क टाळल्यामुळे गैरसमजुतीमुळे निर्माण होणारे दुरावे, विभागीय असमतोलामुळे उमाळणारे दुरावे, असे सारे दुरावे जोपासून परस्पर भेदाभेद, विद्वेष वाढेल असेच उद्योग आम्ही करीत राहिलो आहे. राष्ट्रीय एकता आणि महाराष्ट्राची अस्मिता जोपासणेसाठी जी एकात्म मानसिकता लागते, तिचा आम्हाला पूर्ण विसर पडलेला आहे. ''भावनिक, मानसिक एकात्मतेची ऐसी-तैसी'' याच नावाचे नाटक, महाराष्ट्र निर्मितीनंतर मराठी मंडळीनी चालू ठेवले आहे.

स्वातंत्र्यासाठी पडेल ती किंमत देणारी, कोणताही त्याग करणारी पिढी संपली. स्वतंत्र राष्ट्रउभारणीसाठी खरं म्हणजे स्वातंत्र्य चळवळीपेक्षाही देशाला प्रत्येकाने अधिक काहीतरी देण्याची, त्याग करण्याची, वाहून घेण्याची गरज आहे. परंतु स्वातंत्र्य म्हणजे समाजात, देशांत जे काही आहे ते ओरबडून घेण्याचे स्वातंत्र्य असा अर्थ आज झाला आहे. इंग्रज ज्या वसाहतवादी मनोवृत्तीने हा देश ओरबडून नेत होता, त्याच पद्धतीने आम्ही आमच्यातले तथाकथित ''सुशिक्षित'' हा देश ओरबडून खात आहेत. ते जेवढे

देशाला देतात त्यापेक्षा अधिक कितीतरी पटीने अधिक या समाजातून घेतात. मते आणि मदत, सत्ता आणि पैसा हेच साधन मानले जात आहे. राजकीय पक्ष, प्रचार साधने, साहित्यसंघटना, कामगार कर्मचारी संघटना, उद्योग व्यवसाय घराणी, विद्यापीठे, विचारवंत, सारेचजण पक्षीय, जातीय, विभागीय आणि व्यक्तिगतही हितसंबंध जोपासण्यासाठी आपली शक्ती पणाला लावत आहेत. एकमेकांची आम्हाला जणू अडचण वाटते आहे. आम्ही मराठी माणसे एकमेकांचे बंधू, मित्र, सहकारी वाटत नाही. आम्ही एकमेकांचे स्पर्धक, वाटेकरी झालो आहोत. आम्हाला आमच्याच घरातली भाऊबंदकी वाढवणेत आनंद वाटतो आहे.या आमच्या मूर्खपणाचा पहिला परिणाम, सीमेवरच्या मराठी बांधवांचा विसर पडण्यात झाला आहे. दुसरा परिणाम, बहुमत मराठी असताही गोवा गमावण्यात झाला आहे. तिसरा परिणाम, मुंबई महाराष्ट्राची राजधानी असली तरी मुंबईत मराठा, भांडी घासणाऱ्या मोलकरणीच्या, गिरणीतल्या कामगाराच्या आणि माथाडी स्वरूपांतच अजून वावरतो आहे. मुंबईतील मराठी माणसांची संख्या अगदीच अल्पमतात घसरली आहे. मुंबईतील कॉस्मोपॉलिटिन संस्कृतीच्या लोंढ्याला घाबरून आमचे बोलघेवडे साहित्यिक, लेखक, विचारवंत आपली मुले परदेशांत पाठवून मुंबई सोडून नाशिक पुण्याकडे पळ काढताहेत. "क्रांतीकारक" मराठी पुढाऱ्यांनी कापड गिरण्या बंद पाडून, हजारो मराठी गिरणी कामगारांना मुंबई सोडून देशावर पळवून लावले आहे.

महाराष्ट्रातील मराठी मनाच्या एकात्मतेची अक्षम्य हेळसांड केल्यामुळे ही मराठी माणसे महत् प्रयासाने महाराष्ट्रात एकत्र आली आहेत. त्यांच्यातच आज विघटनांच्या भावनांचे बीजारोपण झालेले दिसते आहे. महाराष्ट्रात आल्याचा पश्चाताप व्हावा अशी भाषा वापरली जात आहे. राजकारणी जसे या प्रश्नाबाबत बेफिकीर कृतीने वागतात तशीच बेफिकीर राजकारणाबाहेरचेही लोक, संस्था, संघटना दाखवतात. जोडण्याऐवजी मोडण्याकडे, शिवण्याऐवजी उसवण्याकडे, संघशक्तीऐवजी एकांडे शिलेदार होण्याकडे मराठी मनाचा जो कल आहे. तो कसा बदलायचा हाच एक मूलभूत प्रश्न आपल्यापुढे आहे.

महाराष्ट्र निर्मितीच्यावेळी मराठी मनांतील शंकासूरांना मूठमाती देण्यासाठी चव्हाणसाहेबांनी फार जाणीवपूर्वक पावले टाकली होती. द्विभाषिक मुंबई राज्याची महाराष्ट्र व गुजरात अशी दोन राज्ये करण्याचे विधेयक विधीमंडळात सादर करताना, मुख्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी मुंबई शहर, विदर्भ, मराठवाडा, यांना दिलेली आश्वासने ही जाणता राज्यकर्ता, किती सावध व दूरदृष्टीने विचार करतो, याची निदर्शक आहेत. ना. चव्हाणसो त्यावेळी म्हणाले होते.

"मुंबई शहराचे बहुरंगी सांस्कृतिक व्यक्तिमत्व जाणण्याचा आणि मुंबई शहराच्या विकास विषयक गरजाकडे विशेष लक्ष पुरवण्याचा भावी महाराष्ट्र शासनाचा दृढसंकल्प आहे, असे अभिवचन मी मुंबई शहराच्या नागरीकांना देऊ इच्छितो...... आपले वैध हितसंबंध जपले जाणार नाहीत, अशी भीती विदर्भाच्या लोकांनी बाळगण्याचे कोणतेही कारण नाही, असे मी त्यांना आश्वासन देऊ इच्छितो. किंबहुना त्यांच्या वैध हितसंबंधाचे आग्रहपूर्वक रक्षण केले जाईल आणि त्यांची जपणूक हे भावी महाराष्ट्र शासन आपले एक पवित्र कर्तव्य मानील असे अभिवचन मी विदर्भातील लोकांना देतो. "नागपूर करार" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या करारातील शर्तीचे पालन केले जाईल, इतकेच नाही तर शक्य असेल तेथे त्याहूनही अधिक झुकते माप त्यांच्या पदरात टाकले जाईल....."

विदर्भाप्रमाणे मराठवाड्यांतील जनताहि शेकडो वर्षाच्या निजामी राजवटीनंतर एकत्र संसार करायला महाराष्ट्रात आली होती. त्यानाही मायेने जवळ घ्यायचे होते. आश्वासीत करायचे होते. चव्हाणसो। विधीमंडळातील त्यांच्या भाषणात पुढे म्हणाले.....

"नागपूर करार" केवळ विदर्भापुरता नसून मराठवाड्यालाही त्यातील प्रमुख तरतूदी लागू आहेत, याची सभागृहाला कदाचित जाणीव असेल. नागपूर करारातील ज्या तरतूदी मराठवाड्याला उद्देशून आहेत, त्या सर्व शर्तीचे देखील पूणर्त: पालन केले जाईल असे निवेदन मी करू इच्छितो. राज्याच्या या भागातील बांधवाना निश्चिंत करावयाच्या उद्देशाने मुंबई शहर, विदर्भ, मराठवाडा या विभागाविषयी आताच मी वाचून दाखवलेले धोरणविषयक निवेदन, सभागृहाच्या कामकाजाचा भाग म्हणून मी औपचारिकरीत्या सादर करीत आहे.

विदर्भ, मराठवाडा मुंबई शहर यांच्याप्रमाणे कोकण व दुष्काळी भाग यांनाही निश्चिंतपणे महाराष्ट्रात नांदता यावे याची दखल चव्हाणसाहेबांनी अधिकृतपणे घेतली होती. ते म्हणाले "महाराष्ट्रातील दुष्काळी भाग, कोकणचे जिल्हे यांचा नियोजनबद्ध विकास होण्याची गरज आहे या गोष्टीवरही भर देण्यासाठी मी या संधीचा लाभ घेत आहे."

भारताच्या राज्यघटनेतील ३७१ व्या कलमाकडे लक्ष वेधून चव्हाणसाहेब म्हणाले होते, त्या कलमाप्रमाणे "आर्थिक विभागासाठी स्वतंत्र विकासमंडळे, विकास योजनासाठी समप्रमाणात निधीची तरतूद, धंदेवाईक व उच्च तांत्रिक शिक्षणासाठी समप्रमाणांत पर्याप्त व्यवस्था राज्य शासनाच्या अखत्यारीतील सेवामध्ये नोकऱ्यांच्या पर्याप्त संधी यांची तरतूद या कलमान्वये केलेली आहे. ते संरक्षण नव्या महाराष्ट्र राज्यातही राहील.

केवळ विधीमंडळात आश्वासने देऊन मुख्यमंत्री यशवंतराव थांबले नाहीत. (आणि त्यांच्या शब्दावर विसंबून राहण्याइतकी विश्वासार्हता पूर्णपणे त्यांनी मिळवलेली असताना) नागपूर करार, घटना कलम ३७१ (२) विधीमंडळात पत्करलेली बांधीलकी या सर्वांवर आधारित "महाराष्ट्र राज्याची मार्गदर्शक तत्वे" ही शासनाची पुस्तिका १९६० साली प्रसिध्द केली. महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांची जबाबदारी जाहीर करुन मराठी बाधवांना राज्यात एकत्र येऊन महाराष्ट्राचा संसार सर्वांसाठी समर्थपणे चालवायचा, याबाबत निश्चित केले.

कै. यशवंतरावांनी मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रला जी दिशा, दृष्टी आणि विश्वास दिला, त्याची निष्ठापूर्वक जोपासना नंतरच्या राज्यकर्त्यांनी केली असती तर आज महाराष्ट्र देशातील सर्वात आघाडीवरचे राज्य म्हणून समर्थ झाला असता. महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी आवश्यक असणारी मराठी मनाची एकता, विश्वास, निश्चितता पुढील राज्यकर्त्यांना परिदृढ करता आली नाही. त्यामुळे आज मराठी जनगणमनात परस्पराबद्दल दुरावा, संशय, अविश्वास पुन्हा भरून येत आहे. फसवणूक झाल्याची भावनाच परिदृढ होत असून त्यातून महाराष्ट्राच्या अस्तित्वालाच आव्हान देऊ शकणारा प्रादेशिक विकासातील असमतोलाचा प्रश्न अनुत्तरित, दुर्लक्षित राहिला आहे.

नागपूर शहराला दिलेला उपराजधानीचा दर्जा दरवर्षी तिथे विधिमंडळाचे एक अधिवेशन या तरतुदी फक्त उपचारापुरत्या चालू ठेवल्या आहेत. प्रशासन व उच्च शिक्षण यांत लोकसंख्येच्या प्रमाणात अजून सहभाग नाही. शासननियुक्त महामंडळे, समित्या यातील प्रतिनिधीत्वही कधी समाधानकारक ठेवलेले नाही. मुख्यमंत्री म्हणून चव्हाणसाहेबांनी विधिमंडळांत महाराष्ट्रशासनातर्फे दिलेली आश्वासने नीटपणे जबाबदारीने व मनमोकळपणाने अंमलात आणली नाहीत. त्यासाठी काही यंत्रणा व पद्धतीच घालून दिली नाही. प्रत्येक विभागाच्या विकासासाठी काय तरतूद केली, कोणती विशेष काळजी घेतली, ती कशी अमलात आणली याचा अहवाल दरवर्षी विधिमंडळापुढे ठेवून खुलेपणाने सर्व आश्वासनांच्या पूर्ततेसंबंधी चर्चा करायची, वचनभंग होत नाही याची विधीमंडळातील सर्व लोकप्रतिनिधीपुढे उघडपणे माहिती द्यायची व प्रामाणिकपणे सर्व गोष्टींचा पाठपुरावा करायचा हे आश्वासनच पाळले गेले नाही. त्यामुळे राज्यकारभार करणाऱ्या शासनाच्या हेतूबद्दलच विदर्भ, मराठवाड्यांत शंका निर्माण झाल्या. प्रामाणिकपणा दिसेनासा झाला, परंपरागत शंका सूरांना टिंगलटवाळी करणाऱ्यांना आयतीच अनुकूल परिस्थिती मिळू लागली.

नागपूर, औरंगाबाद येथे उच्च न्यायालयाची खंडपीठे झाली. विभागवार शेती विद्यापीठे तर केवळ विभागीय भावना दृढ करण्यासाठीच झाली. अर्धवट, अप्रामाणिक वरवरच्या गोष्टीमुळे उलट विश्वास डळमळू लागला. महाराष्ट्रात एकत्र येवून सर्व मराठी माणसांचा एकत्र संसार समर्थ आणि सुखासमाधानाचा होतोय अशी निश्चितताच वाटेनाशी झाली. कैक पिढ्यानंतर एकत्र आलेल्या विदर्भ , मराठवाड्यातील मराठी बांधवांच्या मन:स्थितीची आपुलकीने समजूतदारपणे व जबाबदारीने नंतरच्या राज्यकर्त्यांनी हाताळणी केली नाही. महाराष्ट्राच्या एकतेपेक्षा, व्यक्तिगत स्वार्थ, आपापल्या मतदारसंघाचे हित, जातजमातवाद, विभागीय अहंकार जोपासणे म्हणजे राजकारण करणे, असेच निवडून जाणारे आमदार, खासदार मानू लागले. स्थानिक, प्रांतिक व केंद्रपातळीवर राज्यकारभार करण्यासाठी निवडून जाणाऱ्या लोकप्रतिनिधींना, आपापल्या कर्तव्यासंबंधीचे राजकीय शिक्षण कोणताच राजकीय पक्ष देत नाही. प्रातिनिधीक लोकशाहीत लोकांच्यावतीने लोकप्रतिनिधींनी राज्यकारभार करायचा आहे. तो राज्यकारभार करायचा म्हणजे नेमके काय काय करायचे हेच लोकप्रतिनिधींना समजले नाही आणि त्यांच्या राजकीय पक्षांनी त्यांना समजूत देवून जबाबदार राज्यकर्ते म्हणून त्यांना तयार केले नाही तर राज्यकारभाराची सत्ता लोकांच्या हातात नाही तशी लोकप्रतिनिधींच्याही हातात नाही असे होते. शिकारीसाठी बाहेर पडावे तसे लोकप्रतिनिधी निवडून जातात आणि सत्ताबाजीच्या डावपेची राजकारणांत कुस्त्यांचे फड उभे करताना दिसतात. पक्षीय गटबाज्या, जाती जमातीचे हितसंबंध आणि सोयीप्रमाणे विभागीय अस्मिता कुरवाळत बसणे म्हणजे राजकारण करणे, अशीच समजूत बहुतेक लोकप्रतिनिधींची पक्की झालेली आहे. पक्षांतील नेते बॉस बनतात ते व नोकरशाही मिळून, लोकशाही निकालांत काढतात.

सरकारी कारभार यंत्रणा, तर नि:पक्षपातीपणाच्या व इंपर्सनल कारभारपद्धतीच्या नावाखाली, धूर्तपणे पक्षपाती आणि इनह्यूमन व्यवहारच करीत असते. प्रादेशिक विकासाच्या असमतोलाची भावना त्यांनी अशीच बेजबाबदारपणे हाताळली. असमतोल पैशांत काढून पुढे दहा वर्षांनी कुठे किती पैसे खर्च झाले अशी आकडेवारी त्यांनी जाहीर केली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्यावेळी विदर्भावर तेवीस कोटी व मराठवाड्यावर अेकोणीस कोटी रुपये कमी खर्च झाल्याचे प्रथम जाहीर केले. त्याची भरपाई चवथ्या व पाचव्या पंचवार्षिक योजनेत करण्याचें आश्वासन देण्यात आले. पाटबंधारे, रस्ते, प्राथमिक शिक्षण या तीन क्षेत्रात विदर्भ, मराठवाडा मागे आहेत. हे मान्य करण्यात आले. वीजपुरवठ्यात मराठवाडा मागे आहे हेही दाखवून दिले. पाटबंधारे व प्राथमिक शिक्षण यासाठी जादा निधीची तरतूद केली पण रस्त्यासाठी जादा निधी धरता आला नाही.

कारण उर्वरित महाराष्ट्रातील नियोजित अपुरी कामे पूर्ण करण्याची होती. दुसऱ्याच्या वाटणीचा पैसा आपल्या मतदारसंघात ओढून नेण्याचे ''स्पिल ओव्हर'' कामाचे एक तंत्रच काही हुषार आमदार नामदारांनी विकसित केले.

राज्य पातळीवरील विकास योजनेची विभागवार वाटणी द्यायची नाही आणि मुख्यतः करारातील शर्तीपुर्ततेसंबंधीचा वार्षिक अहवाल विधीमंडळापुढे ठेवायचा नाही, यामुळे संशय, अविश्वास,वचनभंग, फसवणूक अशा भावना भागाभागात वाढत चालल्या. कराराला गटबाजीच्या पक्षीय राजकारणाचा विषय कराराला काहीजणांनी सुरुवात केली. स्वार्थी सत्ताबाजींच्या राजकारणांसाठी सोयीस्करपणे कराराचा उपयोग करून लोकमानसांत विभागीय भावना भडकवण्यास कराराचा उपयोग सुरू झाला. सत्तेची खुर्ची मिळाली की, ''जय महाराष्ट्र'' आणि नाही मिळाली की, ''जय स्वतंत्र विदर्भ'' अशा घोषणा करण्यास काँग्रेस मधल्याही पुढाऱ्यांनी सुरुवात केली. आज तर भा. ज. प. सारखा पक्ष स्वतंत्र विदर्भाचीच मागणी आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात करतो आहे. सत्तालोलूप आयाराम गयारामांना, आणि काँग्रेसमधल्या मतलबी संधीसाधूंना सर्वात जवळचा पक्ष म्हणून भा. ज. प. चा पर्याय सोयीस्कर वाटू लागला आहे.

संयुक्त महाराष्ट्रातील ज्या तरतुदीवर मराठी माणसे एकत्र आली, त्या तरतुदीच्या आधारे प्रादेशिक राजकारण वाढू नये पण विकासातला असमतोल अधिक चांगल्या रीतीने हाताळता यावा म्हणून महाराष्ट्राच्या धोरणास काही मूलभूत वळण देण्याचा प्रयत्न तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी केला. २० ऑगस्ट १९६९ रोजी त्यांनी विधीमंडळांत पुढीलप्रमाणे एक महत्वाचे निवेदन केले.

''१९६० साली महाराष्ट्रराज्याची निर्मिती झाली. त्यावेळी अशी कल्पना होती की, विदर्भ, मराठवाडा, कोकण हे विभाग राज्यांतील इतर विभागांशी तुलना करता मागे असल्यानें त्यांच्या विकासासाठी जास्तीत जास्त अर्थसहाय्य दिले जावे. परंतु राज्यातील एकदोन जिल्ह्याचा अपवाद वगळता सारेच महाराष्ट्र राज्य बहुतांशी अविकसित अवस्थेत आहे, ही वस्तुस्थिती लक्षांत घेता, अमूक एक जिल्हा वा प्रदेश अविकसित अवस्थेत आहे आणि त्याच्या विकासासाठी जादा तरतुद केली पाहिजे हा दृष्टीकोन आता आपण सोडून दिला पाहिजे. त्या ऐवजी राज्याचे सर्वच भाग कमी अधिक प्रमाणात अविकसित असल्याने सर्वच विभागांचा समतोल विकास साधण्यासाठी प्रयत्न करण्यावर यापुढे आपले लक्ष केंद्रीत केले पाहिजे. विकासविषयक या वस्तुस्थितीची दखल घेऊन आणि वरील उद्दीष्ट स्वीकारून नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने जिल्हा हा पायाभूत घटक मानावा असा निर्णय शासनाने घेतला आहे.''

मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे विधानसभेतील हे निवेदन महाराष्ट्राच्या समतोल विकासाच्या दृष्टीने नागपूर कराराला एक प्रकारचे पर्याय देणारेच होते. प्रदेश हा घटक फार मोठा असून प्रदेशांतर्गत विकासाचा असमतोल फार मोठा आहे आणि त्या प्रदेशांतर्गत असमतोलाचा निचरा करण्यासाठी प्रदेशाहून आकारमानाने लहान असा जिल्हा हा पायाभूत घटक धरून विकासातील असमतोलाचा विचार व्हावा ही भूमिका निश्चितच पुरोगामी होती. त्यामुळे त्या निवेदनाला विधीमंडळांत कुणीही विरोध केला नाही. विकासाचा असमतोल गावागांवात तालुक्यातालुक्यातही आहे. हे आमदार अनुभवीत होते. त्यामुळे प्रदेशापेक्षा जिल्हा हा घटक धरून तेथून विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न होणे हे अधिक उपयुक्त, परिणामकारक होईल याची खात्री होती. महाराष्ट्रात जिल्हा परिषदेचा कायदाही त्यावेळी चांगल्यारीतीने अंमलात येत होता. जिल्हा नियोजन मंडळाचे पाऊलही उचलले होते. त्यामुळे जिल्हा हा पायाभूत घटक धरून विकासाचा प्रश्न हाताळण्याचा पर्याय सर्वांना योग्य वाटला.

परंतु विकासाच्या असमतोलापेक्षा राजकीय उद्दीष्टासाठीच विकासाचा असमतोल वापरण्याचे हेतू ज्यांच्या पोटांत होते, त्यांनी विधीमंडळाबाहेर विरोधी सूर काढले. २७ जुलै १९७३ रोजी दिल्लीत इंदिरा गांधींचे राजकारण उचलून धरणारे खासदार वसंतराव साठे यांनी घटना दुरुस्ती सुचवणारे एक खाजगी विधेयक सादर केले. तसेच एक विधेयक १ ऑगस्ट १९७८ रोजी मराठवाड्यातील खासदास स. कृ. वैशंपायन यांनीही मांडले होते. परंतु त्या खाजगी विधेयकावर चर्चा झाली नाही.

"नागपूर कराराप्रमाणे स्वतंत्र प्रादेशिक विकासमंडळे नेमणे , समप्रमाणांत विकासनिधी देणे औद्योगिक व इतर विकास समतोलाने, सर्व भागांचा साधणे, याबाबत राज्यशासन टाळाटाळ करीत आहे. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा, कोंकण या प्रदेशावर अन्याय होतो आहे, ही भावना कमी न होता वाढीसच लागली. नाम. वसंतराव नाईकांनी मांडलेली धोरणात्मक दुरुस्तीही पूर्ण समजूतीने आणि प्रामाणिकपणे अमलात आली नाही. १९७०-७२ नंतर जिल्हापरिषदा आणि जिल्हा विकासमंडळे बळकट समर्थ अशी होऊ द्यायची नाहींत अशीच पावले उचलण्यात आली. कायद्याने दिलेले अधिकार परिपत्रक काढून बदलण्याचा सपाटा सचिवालयांतून केला गेला. आर्थिकदृष्ट्या जिल्हा परिषदा पंगू करण्यात आल्या. जिल्हा हा पायाभूत घटक धरून राज्याच्या विकासाचे नियोजन आणि अंमल करण्याची बांधिलकी प्रामाणिकपणे अंमलात आणली नाही. उलट प्रादेशिक असंतोषाच्या भावना चेतावण्यासाठी असमतोलाचा प्रश्न लोंबकळत ठेवण्यातच काही मंडळींनी धन्यता मांडली. राजकीय असंतोषाच्या तापल्या तव्यावर आपल्या सत्तेच्या राजकारणाच्या, पोळ्या भाजून घेता याव्यात, म्हणून मराठी मन तशाच दुखावल्या अवस्थेंत ठेवण्यात आले.

१९७४ ते७९ या काळांत पांचव्या पंचवार्षिक योजनेत जिल्हा हा पायाभूत घटक धरून प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांची चर्चा केली. त्यावेळी १९६१-६२ ते १९७८-७९, म्हणजे महाराष्ट्रनिर्मितीपासून पुढच्या काळांतील, विदर्भ व मराठवाडा यांच्या विकासावर खर्ची पडलेल्या रक्कमांचा हिशोब देणारे एक निवेदन शासनातर्फे वाटण्यात आले. १९७९-८० च्या अंदाजपत्रक तक्ता क्र. २.१ प्रमाणे विदर्भाचा पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांतील अनुशेष तेवीस कोटी रुपयाचा होता. त्यानंतर प्रत्यक्ष खर्चात ३३.८० कोटी करून १०.८० कोटी रुपये जादा रक्कम विदर्भावर खर्च झाल्याचे दाखविले. मराठवाड्याचा अनुशेष १९ कोटी रुपयाचा होता. प्रत्यक्षांत १२९.४६ कोटी म्हणजे १०४.४६ कोटी रु. जादा खर्च झाल्याचे सांगण्यात आले.

या निवेदनाप्रमाणे नागपूर करारातील शर्तीची शंभरटक्के पूर्तता झाली असे शासनाला दाखवावयाचे होते. प्रत्यक्षांत नियोजित विकासावर झालेला एकूण सर्व खर्च यांत दाखवला नव्हता. फक्त निम्मा शिम्मा खर्च धरला होता. त्यामुळे दरडोई विकास खर्च कमीच भरला. अशा हातचलाखीमुळे महाराष्ट्रात परस्पर विश्वास वाढण्याऐवजी अविश्वास वाढत गेला. त्याचा परिणाम म्हणून १९८० साली प्रादेशिक विकासाच्या असमतोलाचा प्रश्न पुन्हा उचलून धरला गेला. नियोजन खात्याने प्रत्येक जिल्ह्याच्या विकास कार्याचा अभ्यास हाती घेतला. पाटबंधारे, रस्ते, आरोग्य, तांत्रिक शिक्षण यांत लक्षणीय तफावत आढळली. आरोग्य व तांत्रिक शिक्षण यांतील तफावत १९८५ पर्यंत दूर करण्याचे ठरले. पण रस्ते, पाटबंधारे यांतील तफावत दूर करायला पैसा उपलब्ध करता आला नाही.

प्रादेशिक असमतोलाच्या प्रश्नावर राजकीय घोषणा करण्याची पुन्हा अहमहमिका सुरू झाली. १९८० मध्य विधानसभेत मुख्यमंत्री शरद पवार यांनी विदर्भासाठी १४ कलमी, मराठवाड्यासाठी ३५ कलमी आणि कोकणासाठी प्रथम १३ व नंतर ४ मिळून १७ कलमी कार्यक्रम जाहीर केला. त्याप्रमाणे काम होते की नाही हे पहायला नियंत्रण व आढावा समित्या नेमल्या. डिसेंबर १९८१ मध्ये विदर्भासाठी आणखी २१ कलमी कार्यक्रम जाहीर करणेत आला. मार्च १९८२ मध्ये कोकणचे मागासपण समजून घ्यायला अभ्यासगट नेमला. २९ जुलै १९८३ रोजी सबंध राज्याचे मागासपण अभ्यासायला दांडेकर समिती नेमण्यात आली.

दरवर्षी प्रदेशवार झालेल्या विकास खर्चाचा अहवाल विधानसभेत मांडून त्यावर चर्चा केल्या असत्या, लोकमताच्या त्यावरील प्रतिक्रिया नियमित ऐकण्याची व्यवस्था केली असती तर, ही गुंतागुंत व अविश्वास वाढला नसता. उठसूट विकासाचा कलमी

कार्यक्रम जाहीर करण्यांमुळे गटपक्षाचे राजकारण साधले गेले, पण विकासाचा असमतोल आणि राज्यशासनावरील अविश्वास वाढतच राहिला. मराठी मनाची भावनिक एकात्मता जोपासण्याच्या प्रश्नाचा सत्तेच्या राजकारणांसाठी, नंतरच्या राज्यकर्त्यांनी फुटबॉल केला. त्यामुळे महाराष्ट्राच्या जडणघडणीला आज उभा तडा गेला आहे.

विकासाच्या प्रश्नातील असमतोल आणि मागासपण या दोन वेगळ्या गोष्टी आहेत आणि त्या वेगवेगळ्या पद्धतीने हाताळल्या पाहिजेत याचेही भान आम्हाला राहिले नाही. मागासपण हे केवळ आर्थिक नाही, ते सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि मानसिकही आहे. त्याची मुळे हजारो वर्षाच्या खोल रूढी, प्रथा परंपरा मध्ये आहे. जन्माधिष्ठीत उच्चनीचतेच्या मांडणीपासून आणि विद्या, सत्ता, संपत्तीच्या जन्मजात मक्तेदाऱ्या निर्माण केल्यापासून विकासांतील असमतोल व मागासपण परिदृढ करून ठेवले आहे. आदिवासींचे मागासपण, दलित अस्पृश्य यांचे मागासपण, महिलांचे मागासपण, भूमिहीन शेतमजूरांचे वा निमबेकारांचे मागासपण यांतील भेद नीट आकलन झाले पाहिजे. त्याशिवाय मागासपण निश्चित करण्यासाठी पुढारलेपण म्हणजे नेमके काय हेही स्पष्ट आणि निश्चित झाले पाहिजे. विकसित व्हायचे म्हणजे नेमके काय व्हायचे विकसित व्यक्ती, विकसित समाज याची नेमकी रूपरेखा न ठरवताच आम्ही विकास योजनांवर हजारो कोटी रुपये खर्च करत आहोत काय, याचा जरा शांतपणे आढावा घेतला पाहिजे.

मागासपण आणि विकासातील असमतोल हा प्रचलित समाजव्यवस्थेचा अटळ आणि परिदृढ झालेला परिणाम आहे. ती व्यवस्था तशीच पुढे चालू ठेवण्याची परंपरागत मन:स्थिती यांत त्यांची मुळे खोल रुजली आहेत. त्या मन:स्थितीचे प्रथम आणि त्यानंतर परिस्थितीचे अमूलाग्र परिवर्तन करण्याचा मूलगामी आणि दूरगामी कार्यक्रम निर्धाराने हाती घेतल्याशिवाय केवळ शासकीय अंदाजपत्रकांतलेआकडे मागेपुढे करून सुटणारे ते प्रश्न नाहीत. आम्ही मागासपण आणि असमतोल विकास याचा निचरा करणारी मूलगामी उपाययोजना हाती घेत नाही. या प्रश्नांची केवळ बौद्धीक जाणीव पुरेशी नाही. सवयींच्या आणि हितसंबंधाच्या विळख्यातून सारा व्यवहार बाहेर काढल्याशिवाय बौद्धीक जाणिवेतील व भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात रेखाटलेला, नवा भारत उभारता येणार नाही. तोंडाने मार्क्स आणि महात्मा गांधी यांचा कितीही आम्ही पुरस्कार करीत राहिलो असलो तरी आमचा प्रत्यक्ष आचार आणि व्यवहार मनु आणि मेकॉले यांच्या पट्टशिष्यांचाच राहिला आहे. केवळ बौद्धीक जाणिवेने आमचा सवयीचा आणि हितसंबंधाचा व्यवहार बदलत नाही.

जन्माधिष्ठीत उच्चनीचता आणि काम, दाम व आराम यांची चुकीची मांडणी यातून असमतोल जोपासला जातो. गुणकर्तृत्वाची जोपासना करता येत नाही. गुणकर्तृत्वाप्रमाणे स्थान, मान, दाम आणि आराम देणारा समाजच तोल सांभाळून प्रगत होत असतो. प्रादेशिक निसर्ग साधनसंपत्तीची उपलब्धता, त्यांचे सम्यक संरक्षण करणाऱ्या उचित उपयुक्त सुलभ अशा तंत्रज्ञानाची उपलब्धता आवश्यक त्या भांडवलाची उपलब्धता आणि मुख्यतः सुधारणा, विकास, परिवर्तन यासाठी आसुसलेली त्या त्या विभागातील लोकांची मानसिकता यावरच कोणत्याही देशाचा वा प्रदेशाचा विकास अवलंबून असतो. लोकांची जागृती, लोकांचे संघटन, स्वयंशिस्त व कार्यक्षमता याशिवाय बाहेरून येऊन कोणी स्थानिक विकासाला कायमची गती देवू शकत नाही. विकास हा केवळ परिस्थितीचा होऊन चालत नाही. परिस्थितीच्या अगोदर मनःस्थितीचा विकास आवश्यक आहे. सरकारी पैसा समान रीतीने वाटणे म्हणजे समतोल विकास साधणे एवढाच अर्थ घेतला जातो. सार्वजनिक सोयी सुविधा समान पातळीवर आणणे म्हणजे विकास असा दुसरा एक अर्थ रूढ केला जात आहे. यातून विकासाचा असमतोल निर्माण करणारी जी मानसिक, नैसर्गिक संघटनात्मक अशी मूलभूत कारणे आहेत ती तशीच रहातात. आणि भौतिक सुविधा वाढवीत जाऊन, जीवन गुंतागुंतीचे, परावलंबी व अतृप्त ठेवणारा विकासाचा ढाचा लोकावर लादला जातो.

व्यक्ती, समाज व सृष्टी या तिघानाही विकसित करीत, त्यांचे परस्परपूरक व परस्परपोषक असे नाते बळकट करणारा, निसर्गसुंदर सहज सुलभ असा व सर्वांच्या आनंददायी गरजा सहजरीतीने भागविणारा विकासाचा ढाचा, गाववार मांडून लोकांनीच तो अंमलात आणण्याची चळवळ, गटतट पक्षजातीचे राजकारण टाळून सुरू करावी लागेल.

महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी, विचारवंतांनी, साहित्यिक संपादकांनी, इतकेच काय, शिक्षक प्राध्यापकांनीही, प्रशासन अधिकाऱ्यांच्याप्रमाणे, सारा महाराष्ट्र समजून घ्यावा. महाराष्ट्राच्या अविकसित, मागास भागांत जाऊन संधी मिळेल तेव्हा रहावे, तिथे बदल्या करुन काम करावे, मनामनांतील दुःखे, संशय, गैरसमज प्रत्यक्ष संपर्कातून दूर करावेत. अटकेपार झेंडे फडकवून पुन्हा संध्याकाळी घराकडे, ही वृत्ती टाकून द्यावी. साऱ्या मराठी माणसांत विशेषतः कैक पिढ्यांनंतर एकत्र आलेल्या मराठी लोकांत, "सहनाववतु सहनौभुनक्तु सहवीर्यं करवावहै" असे कार्यक्रम जाणीवपूर्वक पार पाडावेत, रोटी बेटी व्यवहारांना उत्तेजन द्यावे, संकुचित, आत्मकेंद्रीत, पायापुरते पहाण्याची वृत्ती सोडावी. मराठी माणसांत भावनिक एकात्मता परिदृढ करण्याची

जबाबदारी केवळ सरकारची नाही, सर्वांची आहे, हे समजून अंमलांत आणण्याची तयारी केली पाहिजे. सरकारने यासाठी सोयी सुविधा देण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा. आपल्याच गावांत, भागांत, आयुष्यभर राहून तिथे गटबाज्या, भाऊबंदक्या माजवीत रहाण्यापेक्षा, ज्यांना ज्यांना शक्य आहे त्यांनी महाराष्ट्रात बंधुभाव वाढवीत राहिले पाहिजे. कारण मराठी भाषिकांतील मानसिक एकात्मता ही महाराष्ट्राच्या जडणघडणीची आधारशीला आहे.

दि. १२ मार्च १९९५

- प्राचार्य पी. बी. पाटील
सांगली

# ''महाराष्ट्राची जडण-घडण आणि यशवंतराव''

सन्माननीय अध्यक्ष आणि बंधुभगिनींनो,

''महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव'' या विषयावरील माझ्या दुसऱ्या व्याख्यानास आपण आज अधिक संख्येने उपस्थित आहात याबद्दल मी स्वत:ला धन्य समजतो. खरं म्हणजे आजकाल व्याख्यानमालांना चांगले दिवस राहिलेले नाहीत. लोकजागृतीसाठी विचार प्रसार आणि विचारप्रसारासाठी व्याख्यानमाला, हा उपक्रम स्वातंत्र्यानंतर हळू-हळू रोडावत चालला आहे. वक्ते, श्रोते आणि परिस्थिती साऱ्यांचा मिळून तो परिणाम असला पाहिजे. मुख्य कारण मला दिसते ते विचार आणि व्यवहार यांतील वाढलेले अंतर हे असावे. विचाराने जगणे हे अवघड झाले आहे. त्यापेक्षा अविचारानें किंवा विचार न करता जगणे हेच सोयीस्कर म्हणून अंगवळणी पडले आहे. सार्वजनिक क्षेत्रांत जातीपाती, गट, पक्ष यांच्या बाजारांत, विचारवंताची उपेक्षा सुरू झाली. ती उपेक्षा समजून घेता येते. पण आंजकाल विचारांचीच उपेक्षा होत असल्याने चिंताजनक परिस्थिती वाटते आहे.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत अशी विचारांची उपेक्षा कै. यशवंतराव चव्हाण यांना अपेक्षित नव्हती. महाराष्ट्राच्या प्रगतीची आधारशीला मराठी माणसांच्या मनोमन एकात्मतेत आहे हा यशवंतरावजींचा विचार, मी कालच्या भाषणांत मांडण्याचा प्रयत्न केला. या एकात्मतेला बळकटी देणाऱ्या ऐतिहासिक घटना नव्या पिढीपुढे नीटपणे

ठेवण्याची जशी गरज आहे तशी इतिहासांतून चालत आलेले अन्याय, अत्याचार, संशय, मानापमान, फसवणूक, विश्वासघात, भाऊबंदकी, फंदफितुरी यांचा निचरा करण्याची दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्रात मुख्यत: तीन जाती या विशेष आक्रमक व महत्वाच्या ठरल्या आहेत. ब्राह्मण, मराठा आणि महार या तीन जाती जेव्हा एकोप्याने परस्पर विश्वासाने महाराष्ट्र चालवतात, त्या त्यावेळी महाराष्ट्राने काही उज्वल इतिहास घडविला आहे. मुळांत हिंदूधर्मातील जातीवर्ण व्यवस्थेनेच हा सारा देश दुबळा करून ठेवला आहे. सर्व जाती-जमाती, सर्व धर्म, स्त्री पुरुष यांच्यात अद्वैताची, विविधतेतील ऐक्याची भावना परिदृढ करणे महाराष्ट्र वा राष्ट्र समर्थ करण्यासाठी मूलभूत आवश्यक असणारी गोष्ट आहे. द्विभाषिक मुंबई राज्यातून महाराष्ट्र निर्माण करतांना एकभाषा बोलणारे लोक एकात्म भावना जोपासून सर्वांच्या सर्वांगीण विकासासाठी एक दिलाने झटतील अशीच भूमिका होती. चव्हाण साहेबांनी ती फार डोळसपणे उचलून धरली होती. आणि मराठी भाषिकांतील ती भावनिक एकात्मता निश्चित करण्यासाठी भरभक्कम पावलेही उचलली होती.

एकात्मभाव हाच राष्ट्रीयत्व या कल्पनेचाही आधार आहे. समाजधारणेसाठी हा बंधुभाव, एकात्मभाव आवश्यकच आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् एकदा म्हणाले होते-

"राष्ट्रीय एकात्मता ही एखाद्या इमारतीप्रमाणे चुना-विटांची घडविण्याची बाब नव्हे, राष्ट्रीय एकात्मता ही भावना लोकमानसांत हळूहळू व जपून रुजविली पाहिजे. त्यासाठी शिक्षण हे समर्थ परिणामकारक ठरेल.... भारतीय राज्यघटनेतील ध्येये व मूल्य ध्यानात घेऊन योग्य तऱ्हेने ती आचरणांत आणण्याच्या कामी मदत करणे ही शिक्षणावरील जबाबदारी आहे......."

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मराठी माणसांची मन:स्थिती आणि परिस्थिती बदलण्यासाठी यशवंतराव चव्हाणांनी हाती घेतलेल्या तीन महत्वाच्या चळवळी नवमहाराष्ट्र उभारणीस पायाभूत अशा ठरल्या आहेत. शिक्षणप्रसाराची चळवळ, सहकारी कृषी औद्योगिक समाजरचनेची चळवळ आणि स्थानिक स्वराज्याकडे नेणारी पंचायत राज्याची चळवळ. लोकशाही समाजवादाच्या पुस्तकी घोषणा, भाषणे करणारांना लोकशाही, समाजवाद आणि सामाजिक एकात्मता साधणारा व्यवहारी कार्यक्रम देता येत नाही. स्वातंत्र्यानंतर भूदान चळवळ ही एक आमूलाग्र क्रांतीची मूलभूत चळवळ होती. वीतभर जमिनीसाठी भाऊ भावाचा मुडदा पाडायला तयार होतो अशा घट्ट मालकी हक्काच्या वातावरणांत हजारो, लाखो एकर जमिनीवरची मालकी लोकांनी सोडली. संपूर्ण गावे ग्रामदानी झाली. लोकांनी त्या क्रांतीला तयारी दाखविली. पण भूदानानंतर पुढे

काय ? याचा कार्यक्रम देता आला नाही. नवसमाज निर्मितीचा पूर्ण आराखडा आणि त्यासाठी क्रमाक्रमाने व्यवहारी पावले टाकीत इच्छित क्रांतीकडे नेणारा कार्यक्रम देता आला नाही. भूदानाची क्रांती विझून गेली. हीच गोष्ट जाणून कै. यशवंतरावांनी राजकीय, आर्थिक, सामाजिक ध्येयवादाला व्यवहारी कार्यक्रमाची जोड दिली. उच्च ध्येयवादांतून लोकांचे दैनंदिन प्रश्न सोडवणारे उपाय शोधून काढले. प्रतिभावंत नेतृत्वाचा आदर्श कसा असतो त्याचे उदाहरणच त्यांनी देशापुढे ठेवले.

महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी शिक्षण किती आवश्यक आहे हे आग्रहाने सांगण्याचा पहिला मान म. जोतिबा फुले यांच्याकडे जातो. पेशवाई बुडाल्यानंतर इंग्रजांची राजकीय गुलामी सर्व देशावर पक्की स्वार झाली. पण या इंग्रजी गुलामीचे सर्वसामान्य लोकांनी स्वागतच केले म्हणजे त्यापूर्वीची अवस्था या गुलामीपेक्षाही अधिकच जाचक, भयंकर होती. तिचा शोध घेतांना म. जोतिबांना सामान्य माणसांच्या "मानसिक गुलामगिरीचा" शोध लागला ब्राह्मण धर्माने चातुर्वर्ण आणि कुटील विष्णुगुप्त चाणक्याने जो द्विवर्ण रूढ केला त्याचा अतिरेक पेशवाईने केला. ब्राह्मण सोडून सारे शूद्र, आणि शूद्र हे विद्या, सत्ता, संपत्ती धारण करण्यास जन्मत:च अपात्र अशी शिकवण धर्म म्हणून सर्वसामान्यांच्या मनांत रुजवली. विद्या, ज्ञान, शिक्षणापासून वंचित ठेवलेला समाज कसा जनावरांचे जिणे जगतो हे म. फुले यांनी समजून घेतले आणि त्यानंतरच इंग्रजी गुलामी विरुद्ध शस्त्र हाती घेण्यापेक्षा, या हाडीमांशी खिळलेल्या मानसिक गुलामी विरुद्ध बहुजन समाज जागा करणे, संघटित करून लढणे, हेच त्यांनी आपले जीवन कार्य मानले. सार्वत्रिक शिक्षण हाच सामान्य जनगणांच्या उद्धाराचा मार्ग आहे हे सत्य शोधून काढताच त्यांनी अस्पृश्यांच्या मुलींच्या शिक्षणापासून म्हणजे जातीवर्ण व्यवस्थेच्या उतरंडीतील तळच्या गाडग्याला हात घालून, आपल्या क्रांती कार्याला सुरुवात केली. त्यांचा तो "अखंड" अभंगासारखा सर्वतोमुखी आहे. "विद्येविना मती गेली, मती विना नीती गेली, नीतीविना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके सारे अनर्थ एका अविद्येने केले....."

१८८३ सालच्या सुमारास इंग्लंडच्या महाराणीचा पुत्र प्रिन्स ऑफ वेल्स हा हिंदुस्तानच्या भेटीस आला होता. त्यावेळी त्याच्या स्वागताचा एक दरबार पुणे येथे भरविला होता. त्या दरबारांत झाडून सारे मांडलिक राजे, महाराजे, संस्थानिक भरजरी वस्त्रे, झुली, दागिने, मानचिन्हे घालून हजर होते. इतर निमंत्रितात राव बहादूर, रावसो , बडे बडे व्यापारी, कारखानदार, अम्मलदार होते. महात्मा जोतिबांनाही समाजसुधारक कार्यकर्ते म्हणून निमंत्रण होते. दरबाराच्या स्वागत कमानीतच म. फुलेंना अडविले. कारण ते साध्या शेतकऱ्याच्या वेषात दरबाराला आले होते. स्वागत करणारांना वाटले,

कोण हा भिकारडा माणूस एवढ्या मोठ्या दरबारांत शिरतोय ? पण तेवढ्यात कुणी तरी जोतिबांना ओळखले आणि त्यांना स्टेजवर नेऊन बसवले. महाराणीच्या युवराजांच्या स्वागतासाठी इंद्राचा दरबारच सजविला होता. त्या दरबारांत प्रिन्स ऑफ वेल्सला उद्देशून मा. जोतिबा फुल्यांनी सात मिनिटाचे जे इंग्रजी भाषण केले ते सामान्य प्रजेच्या वतीने केलेले ''वन मॅन डेमोन्स्ट्रेशन''च होते. जोतिबा म्हणाले..... ''युवराज महाराज, साता समुद्रपलीकडून हिंदुस्तानातील आपल्या प्रजेला भेटायला आपण आलांत याबद्दल सारी प्रजा आपणांस धन्यवाद देत आहे. परंतु ती प्रजा म्हणजे या दरबारांत झुली, दागदागिने, भरजरी वस्त्रे लेवून बसलेली ही मंडळी नव्हे. खरी प्रजा अशी माझ्यासारखी फाटकी. तुटकी वस्त्रे लेवून, उपासपोटी जगणारी करोडोच्या संख्येने या दरबाराबाहेर आहे. त्या प्रजेच्या वतीने आपल्यापुढे एकच मागणे मागतो. ही प्रजा अशिक्षित, निरक्षर आहे. अशी १७ कोटी प्रजा निरक्षर असून जनावरांचे जिणे जगत आहे. त्यांना शिक्षण द्या. तुम्ही परत इंग्लंडला जाल त्या वेळी तुमच्या आईला राणीसाहेबांना माझा एवढा निरोप द्या.की, हिंदुस्थानच्या प्रजेला शिक्षण हवे आहे. त्यांना शिक्षण द्या एवढे एकच माझे मागणे राणीसाहेबांच्या , तुमच्या आईच्या कानावर घाला.''

त्यानंतर प्रिन्स ऑफ वेल्स परत गेला. म. जोतिबाही गेले. काँग्रेसच्या एका अधिवेशनापुढे पुन्हा तसाच एक शेतकऱ्यांचा पुतळा उभा करून गेले. स्वातंत्र्याची चळवळ झाली. इंग्रज देश सोडून गेला. इंग्रजांची राजकीय गुलामी संपली. स्वातंत्र्य मिळवून आता ५० वर्षे होत आली. पण परिस्थिती काय आहे? म. फुल्यांच्यावेळी १७ कोटी निरक्षर होते. आता आपल्या भारतात ४५ कोटी निरक्षर लोक आहेत. आता कुणाच्या आईला कुणी जाऊन म. फुलेंचा सांगावा सांगायचा? की स्वतंत्र भारतात ४५ कोटी लोक निरक्षर असून जनावरांचे जिणे जगताहेत!

गोपाळ कृष्ण गोखले, राजर्षी शाहू महाराज, म. गांधी अशा राष्ट्रीय नेत्यांनी सार्वत्रिक शिक्षणाचा आग्रह धरला. महाराष्ट्रांत स्वातंत्र्यपूर्व काळांतही कोल्हापूर, सातारा, अमरावती अशा ठिकाणी शिक्षणक्षेत्रांतील कर्मवीरांनी शिक्षण प्रसारासाठी रात्रीचा दिवस केला. भारतीय राज्यघटनेतही सार्वत्रिक शिक्षणाचे कलम घातले. चौदा वर्षे वयापर्यंत प्रत्येक मुलामुलीला सरकारने मोफत शिक्षण, सक्तीने द्यावे आणि ते घटना अमलात आल्यापासून १० वर्षात द्यावे. असा मुदतबंद कार्यक्रम सरकारला दिला.

परंतु या शिक्षण सार्वत्रिक करण्याच्या निर्णयाची मुदतबंद अंमल करणारी व्यवस्था मांडता आली नाही. लॉर्ड मेकॉलेने १८३६ पासून सुरू केलेली शाळापद्धती हीच प्रमाण मानून, आम्ही त्या वाढवावयाच्या प्रयत्नाला लागलो. यशवंतरावांनी या शिक्षण प्रसाराच्या

कामाला अग्रक्रम दिला. प्राथमिक शिक्षण ही सरकारची जबाबदारी हे स्वीकारून ते शिक्षण प्रसाराला लागले. शालेय फीमुळे गरीबांना शाळेत मुले पाठवणे शक्य होत नव्हते. अशा गरीब पालकांच्या मुलामुलींची शालेय फी भरायची जबाबदारी सरकारकडे घेतली. गांव तिथे शाळा काढण्याचा संकल्प केला. प्राथमिक शाळांच्या विस्ताराबरोबर माध्यमिक शाळांची मागणी वाढली. महाविद्यालयाची मागणी वाढली. सार्वजनिक विश्वस्त म्हणून काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना मोठा उत्साह दिला. शिक्षणाची चळवळच महाराष्ट्रात सुरु झाली. बौद्ध धर्म स्वीकारलेल्या दलितांना दलितांच्या सवलती तशाच चालू ठेवल्या. हजारो, लाखो मुलेमुली कित्येक पिढ्यानंतर शाळेच्या प्रांगणांत बागडताना दिसू लागली. शिक्षितांच्या ज्या जगांत ज्यांना शेकडो पिढ्या कुणी प्रवेश दिला नाही, त्या जगांत डोळे उघडून हजारो लाखो तरुण वावरू लागले. म. जोतिबा फुल्यांना हवा असणारा अविद्येचा निचरा करून विद्येचा प्रसार करण्यांत महाराष्ट्राने आघाडी मारली. अनेक समाजसुधारकांच्या शिकवणुकीला, चव्हाण साहेबांनी प्रतिसाद दिला.

अर्थात इथेही अडथळे आले नाहीत असं नाही. विद्येच्या मक्तेदारांनी यशवंतरावांना पेचांत धरावे म्हणून एक प्रश्न उभा केला. "एवढा शिक्षणप्रसार कशाला? यांना कुठल्या नोकऱ्या देणार? सुशिक्षित बेकारी काय म्हणून वाढवता? या शिक्षित बेकारांच्या फौजा तुमच्याच मागे हात धुवून लागतील. तुम्हाला राज्य करू देणार नाहीत."

चव्हाणसाहेबांनी या शंकासुरांना पुढील अर्थाचे समर्पक उत्तर दिले.

"अशिक्षित बेकारांच्या फौजा घेऊन राज्य करण्यापेक्षा सुशिक्षित बेकारांच्या फौजा घेऊन राज्य करणे चांगले." शिक्षण म्हणजे नोकरी एवढाच अर्थ शिक्षणाचे मक्तेदार संभावीतपणे घेत होती. यशवंतरावजी चव्हाण म्हणजे मानसिक गुलामीतून बाहेर पडण्याचा दरवाजा मानीत होते. अशिक्षित माणूस आपल्या सुखदुःखाची मिमांसा दैववादाने करीत असतो. हताश, निष्क्रीय, मृतप्राय होतो. शिक्षित मनुष्य आपल्या सुखदुःखाची कारणे परलोकांत किंवा मागच्या पुढच्या जन्मात शोधणार नाही. आपल्या अडचणीची कारणे तो या जन्मांत आणि सभोवतालच्या समाज परिस्थितीत शोधील. तो इहवादी बनेल. ब्रह्मानंदी टाळी लावून, देवाची लीला म्हणून सारीं दुःखे, अडचणी निपचितपणे सोसत बसणार नाही. ही जागृती हीच महत्वाची, जागृत नागरिक हाच प्रगती करील, समाजपरिवर्तन करेल, आणि अशा इहवादी जागृत नागरिकांची फौज शिक्षणातून तयार होत असेल तर ती हवीच आहे अशी चव्हाण साहेबाची भूमिका होती.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा पेच सोडवीत आणल्यानंतर असाच कुटिल आणि कुत्सित प्रश्न काही शंकासुरांनी विचारला होता. नव्या महाराष्ट्रात राज्य मराठीचे की मराठ्यांचे होणार? राज्य सर्व मराठी भाषिकांचे होणार. मराठा जातीचे नाही.'' हे उत्तर चव्हाणसाहेबांनी दिले. दुर्दैवाने आज राज्य मराठ्यांचे तर नाहीच पण मराठीचेही राहिले नाही. पण त्यांची खंत त्या शंकासुरांना वाटत नाही. जाती जातीतील अविश्वास, दुस्वास अजूनही मनामनांत किती रेंगाळतो आहे त्याचेच हे प्रतीक आहे. काही मंडळी प्रश्न उपस्थित करणे एवढेच आपले जीवनकार्य समजतात. त्या प्रश्नांना उत्तरे शोधून, ते प्रश्न सोडवण्याच्या कामात ते कुठेच दिसत नसतात. त्यासाठी करावे लागणारे श्रमसायास इतरांनीच करावेत. तसे श्रमसायास करणे हेच तर शूद्रांचे जन्मजात कर्तव्य असंच ते मानतात. इंग्रजी शाळांतून आपली मुलेमुली शिकवून, परदेशी स्थायिक करून, पुन्हा मराठीच्या जागतिक परिषदा भरविण्यास आणि सोवळे नेसून सोवळ्यातील मराठीच्या दुरवस्थेबाबत गळा काढून भाषणे ठोकण्यास ही मंडळी सर्वापुढे असतात.

स्वातंत्र्यानंतरचा महाराष्ट्रातील शिक्षण प्रसार ही महाराष्ट्राच्या जडणघडणीस मोठी उपयुक्त ठरणारी चळवळ आहे. दुर्दैवाने शिक्षण प्रसाराबरोबर शिक्षणाची उपयुक्तता व गुणवत्ता आणि शिक्षणातील समता याकडे पूर्णत: दुर्लक्षच झाले. किंबहुना इंग्रजीत राज्य चालवायला स्थानिक भाडोत्री कारकून तयार करण्यासाठी जी शिक्षणपद्धती लॉर्ड मेकॉलेने विचारपूर्वक सुरू केली होती, तीच शिक्षण व्यवस्था जशीच्या तशी वाढवण्याचा आम्ही प्रयत्न केला. शाळा कॉलेजांचा जो सांगाडा, तो आकृतीबंद, जो ढाचा इंग्रजानी त्याची उद्दीष्ट्ये साधण्यासाठी बनवून रूढ केला, तोच आम्ही प्रसारत नेण्याचा आंधळेपणाने खटाटोप केला. भारतीय राज्यघटनेतील निर्धारपूर्वक जाहीर केलेली उद्दीष्ट्ये व संकल्प अमलांत आणण्याची प्रतिज्ञा करून बाहेर पडणारे किती लोक या शिक्षण व्यवस्थेतून तयार होतात? याची आम्ही काहीही काळजी केली नाही. लॉर्ड मेकॉलेचे उद्दीष्ट मात्र शंभर टक्के साधून द्यायचे काम या शिक्षण व्यवस्थेने केले आहे. दिसायला हिंदुस्थानी पण आचार विचाराने विलायती असा ''ॲंग्लोइंडियन'' तयार करण्याचा उद्देश लॉर्ड मेकॉलेने जाहीर केला होता.

लॉर्ड मेकॉलेने रचून दिलेली शाळा ही सार्वत्रिक शिक्षणाची शाळा होऊ शकत नाही, ती मूठभराना सामावून घेणारीच शाळा आहे हे अजूनही आमच्या लक्षांत येत नाही. जागा, इमारती, फर्निचर, पूर्ण वेळ शिक्षक, पुर्ण वेळ विद्यार्थी, रजा, सुट्ट्या, वेळापत्रक, परीक्षा, शिकवायचे विषय, शिकवण्याच्या पद्धती आणि या सर्व व्यवस्थेसाठी खर्ची घालायचा वेळ, पैसा आणि शक्ती, आणि त्यातून पदरात पडणारे साध्य, याचा विचारच करायचे आम्ही सोडून दिले आहे. आम्ही ज्या शिक्षण पद्धतीचा प्रसार

करण्यासाठी आटापिटा करतो आहे, ती शिक्षणव्यवस्था मोठ्या भोकाच्या चाळणीसारखी आहे. सक्तीच्या शिक्षण कायद्यामुळे, प्राथमिक शाळेतील शिक्षक इ. पहिलीच्या वर्गात, वय वर्षे ६ ते ११ या वयोगटातील मुलेमुली, मोठ्या संख्येने हजेरीपटावर आणण्यासाठी प्रयत्न करतात. संपत्तीचा कायदा म्हणून आणि वर्गातील पटसंख्येवर शिक्षक संख्या अवलंबून असल्यामुळे, ही पटसंख्या भरण्याचा प्रयत्न दरवर्षी होतो. पण पहिलीच्या वर्गात १०० टक्के मुले या चाळणीत घेतली तर इ. ५ वीच्या वर्गात ज्यावेळी ती मुले जातात त्यावेळी त्यांतील ५० टक्के मुले गळलेली असतात. इ. ८ वी पर्यंत आणखी २५ टक्के मुले गळतात आणि फक्त १७-१८ टक्के विद्यार्थी इ. १० वीच्या परीक्षेला बसतात. त्यांच्यापैकी निम्मी मुले परीक्षेत नापास केली जातात. आणि इ. १० वी पर्यंत उभी केलेली ही प्रचंड खर्चाची शिक्षण व्यवस्था फक्त ८ ते ९ टक्के मुलांना १० वी पर्यंतचे शिक्षण देते. ही एक चाळण पुरेशी वाटली नाही म्हणून अकरावी बारावीची दुसरी तशीच मोठ्या भोकाची चाळण लावली आहे. सुमारे ७ टक्के मुले अकरावी वर्गात प्रवेश घेतात. त्यापैकी निम्मी पुन्हा इ. १२ वी च्या परीक्षेत नापास केली जातात. ५० वर्षाच्या स्वातंत्र्यानंतर आजही आमच्या या शिक्षण व्यवस्थेतून, गळती, नापासीच्या मोठ्या भोकाच्या चाळणीतून ९६.३ टक्के मुले टाकून दिली जातात. आणि जे खऱ्या अर्थाने माणसाला विशेषाधिकाराला (प्रिव्हीलेज) पात्र करते ते महाविद्यालयीन उच्च शिक्षण घ्यायला फक्त ३.७ टक्के मुलेमुली कॉलेजच्या दारापर्यंत पोहोचू शकतात. ही वस्तुस्थिती साक्षात समोर असताना, या शिक्षण व्यवस्थेतूनच सार्वत्रिक शिक्षण पूर्ण करण्याचा आमचा अट्टाहास म्हणजे पोटात भला मोठा ट्युमर झालेल्या बाईला मूल होईल, म्हणून वाट बघत बसण्यासारखे आहे.

या शिक्षणांतील गुणवत्तेची अशीच फसवी व्याख्या रूढ असून परीक्षा आणि परीक्षेतील मार्क्स म्हणजे गुणवत्ता अशी व्याख्या रूढ असून त्यासाठीच शाळा कॉलेजमध्ये सारा खटाटोप चाललेला असतो. इ. १० वी ला महाराष्ट्रातून १२ ते १४ लाख विद्यार्थी परीक्षेला बसतात. त्यांतील बोर्डात पहिल्या ५० क्रमांकात येणाऱ्या विद्यार्थ्यांचे यश म्हणजे साऱ्या शिक्षण व्यवस्थेचे यश मानले जाते लाखो मुलामधून शंभर मुलांचे "गुणवत्ताधारक" म्हणून कौतुक करणारी आणि त्याचवेळी सहासात लाख कोवळ्या वयातील मुलामुलींना नापास, ना-लायक म्हणून शिक्का मारून त्यांची उमेद मारणारी ही शिक्षण व्यवस्था, डोळे झाकून आम्ही तशीच चालवायचा, वाढवायचा खटाटोप करीत आहोत.

आणि परीक्षेतील या मार्कात किती गुणवत्ता असते? गुणवत्ता म्हणजे जीवन जगण्याची लायकी, चारित्र्य संभाळण्याची आणि चरितार्थ मिळवून स्वावलंबी जीवन

जगता येण्याची पात्रता, भारताच्या राज्यघटनेतील राष्ट्रीय जीवन मूल्यांचा पूर्ण निष्ठेने स्वीकार आणि त्यांची जोपासना करण्याचा निर्धार, जन्माधिष्ठीत उच्चनीचता, भेदाभेद, परलोकवाद, भ्रमिष्ठ दैववाद यांच्या आंधळ्या श्रद्धांतून, मानसिक गुलामगिरीतून मुक्तता आणि इहवादी दृष्टीने या जन्मात विद्या, सत्ता, पैसा मिळवून समर्थ, संपन्न, संस्कारक्षम जगण्याची कुवत जोपासणे, सत्यशोधक सत्याग्रही वृत्तीने स्वयंपूर्ण, सर्जनशील, आनंदमय जीवन जगण्याची पात्रता म्हणजे गुणवत्ता. या खऱ्या गुणवत्तेचा आणि आजची शिक्षणव्यवस्था ज्या परीक्षेतील मार्कांना गुणवत्ता समजते, त्या मार्कांचा काय संबंध आहे? जीवन जगण्याची पात्रता दूरच पण इ. १० वीच्या परीक्षेत जो विद्यार्थी बोर्डात येतो तो दोन वर्षांत १२ वी च्या परीक्षेत काठावर पास होतो किंवा नापासही होतो. या गुणवत्तेला काय म्हणायचे?

अलीकडे परीक्षा, पेपर तपासणी आणि मार्कांची टक्केवारी यांत विश्वासार्हता किती शिल्लक राहिली आहे. हा एक वेगळाच प्रश्न आहे. परीक्षा पास होण्याची एक कामगिरीच काही शिक्षक, विद्यार्थी व शाळा यांनी विकसित केली आहे. शिक्षणव्यवस्थेंचा हा सर्वदृष्टींनी टाकावू झालेला सांगाडा, कळत असूनही चालू ठेवला जातो. कारण या व्यवस्थेत शिक्षक, संस्थाचालक आणी प्रशासकीय अधिकारी यांचे फार मोठे हितसंबंध निर्माण झाले आहेत. त्यांना या व्यवस्थेत बदल नको आहेत. मूलभूत बदल तर होऊच द्यायचे नाहीत असा जणू त्यांनी चंगच बांधला आहे.

बारावी पर्यंतच्या शिक्षणाचा आकृतीबंध आणि त्याची अंमलबजावणी अशीच बेबंद आहे. मुलांत लहान मुलांचे सार्वत्रिक शिक्षण त्याच्या कोणत्या वयापासून सुरू करायचे? याचा आमचा अजून निर्णय होत नाही. राज्यघटनेत चौदा वर्षे वयापर्यंतचे शिक्षण हे सक्तीचे व सार्वत्रिक शिक्षण असे म्हटले आहे. ते वयाच्या कोणत्या वर्षी सुरू करावे हे कुठे सांगितलेले नाही. पण लॉर्ड मेकॉलेची शाळा सुरु झाल्यापासून इ. १ ली ते सातवी हे प्राथमिक शिक्षण आणि वयाची ६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ७ व्या वर्षी पहिलीत प्रवेश, असे केव्हातरी त्यावेळच्या राज्यकर्त्यांच्या सोयीनुसार ठरले असेल, तो आकृतीबंध तसाच डोळे झाकून आम्ही सार्वत्रिक शिक्षण म्हणून चालू ठेवला. आमचा बेजबाबदारपणा इतका की, वयाच्या ७ व्या वर्षी मूल पहिलीत दाखल झाल्यावर वयाच्या चौदाव्या वर्षी ते कोणत्या इयत्तेत जाते हे सुद्धा आम्ही समजून घेतले नाही. जुन्या रूढ संकेताप्रमाणे वयाच्या १४ व्या वर्षी मूल इयत्ता ८ वीत जाते आणि घटनेतील तरतूदीप्रमाणे इ. ८ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे सक्तीचे, मोफत व सार्वत्रिक शिक्षणाची मर्यादा असे मानून त्याप्रमाणे अंमल करीत आलो.

जगातील शिक्षण तज्ञांनी लहान बालकांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करून असा निर्णय केला आहे की, मूल जन्माला आल्यानंतर त्याचे संपूर्ण संगोपन आई वडिलांच्या व कुटुंबाच्या प्रेमळ उबदार भावनिक वातावरणांतच झाले पाहिजे आणि वयाची तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्या मुलाला हळूहळू पण निश्चितपणे कुटुंबाबाहेरच्याही जगाची ओळख व्हायला आणि त्यांत वावरायला शिकले पाहिजे हे वयाच्या ४ थ्या वर्षापासून प्रत्येक बालकांला द्यावयाचे घराबाहेरचे शिक्षण हाही सार्वत्रिक शिक्षणाचा पायाभूत आणि महत्वाचा भाग आहे. आणि ते सक्तीचे व मोफत देणे सरकारची जबाबदारी आहे. हे आमच्या शिक्षण क्षेत्रांतील प्रस्थापित हितसंबंधी लोक सोयीस्करपणे विसरले आहेत. मग श्रीमंतांनी व जागरूक पालकांनी स्वत:च्या मुलांसाठी खाजगी कान्व्हेंट स्कूल वा तत्सम शिक्षण व्यवस्था चालवायची. त्याचे उत्तम शिक्षण व संगोपन चौथ्या वर्षापासून करायचे आणि त्याच्याबरोबर वयाच्या सातव्या वर्षी सरकारी शाळेत प्रवेश घेऊन शिकणाऱ्या सामान्य जनगणांच्या मुलांनी इ. १० वी, १२ वीच्या परीक्षेत मार्कासाठी स्पर्धा करायची अशी उघड पक्षपाती आणि गरीबांच्या मुलांमुलींना खचविणारी शिक्षणव्यवस्था आम्ही डोळे झाकून चालू ठेवली आहे. वय वर्षे चार ते चौदा एवढेच नव्हे तर आता त्यांत आणखी दोन वर्षांची भर घालून, वय वर्षे चार ते सोळा असे एकूण तेरा वर्षाचे शिक्षण हे सार्वत्रिक, सक्तीचे व मोफत झाले पाहिजे. एवढेच नव्हे तर, शिक्षण व्यवस्थेतील भयानक गळती आणि नापासी थांबवणारी नवी सुदृढ, जबाबदार व पालकांच्या पूर्ण नियंत्रणाखाली चालणारी आणि मुलांच्या संपूर्ण व्यक्तीमत्वाचा विकास करून त्यांना जीवन जगण्याची पात्रता मिळवून देण्याची हमी देणारी शिक्षण व्यवस्था गावोगांव उभी केली पाहिजे. गावागावातील किमान ५०० कुटुंबातील सार्वत्रिक शिक्षणाच्या सर्व गरजा भागविणारे शिक्षण व संगोपन केंद्र आजच्या प्राथमिक शाळांच्या जागी स्थापन केले पाहिजे आणि पूर्णत: पालकांच्याच ताब्यात पाहिजे. सार्वत्रिक शिक्षण ही सार्वजनिक पैशातून चालणारी सार्वजनिक सेवा आहे. त्या सेवेवर व त्यासाठी खर्च होणाऱ्या सार्वजनिक पैशावर सर्वांचा सारखा अधिकार आहे. म्हणून हा पैसा गाववार लोकसंख्येच्या प्रमाणात वाटला गेला पाहिजे. त्या पैशाचा विनियोग करण्याचे अधिकार पालकांना,.ग्रामसभेला दिले पाहिजेत. शिक्षण सेवक हे त्या शिक्षण व संगोपन केंद्राचे शिक्षक हवेत. ते नेमायचे व त्यांच्याकडून काम करून घ्यायचे पूर्ण अधिकार त्या केंद्राच्या पालक समितीलाच असले पाहिजेत. पालक सभा वा ग्रामसभा यांच्याकडे शिक्षण सेवकांनी अन्याय झाला तर अपिल करावे. पण ग्रामसभेचा व पालक सभेचा निर्णय अंतीम असला पाहिजे.

वस्तुतः मूल आयुष्य जगायला लायक करणे ही जबाबदारी पालकांची, कुटूंबाचीच आहे. सर्व व्यवस्था एकेका कुटुंबाला करता येत नाही म्हणून काही कुटुंबानी एकत्र येऊन केलेली व्यवस्था म्हणजे शाळा, अशीच पुनर्रचना शिक्षण केंद्राची झाली पाहिजे. सरकार कडील उपलब्ध पैसा, न्यायाचा वाटा, हिस्सा म्हणून पालकांचेकडे आला पाहिजे. अनुदान म्हणून नव्हे. अनुदानावर चालणाऱ्या सार्वजनिक सेवा या देठावर लोंबकळणाऱ्या सेवा आहेत. त्यांना मुळे फुटत नाहीत. पालकांनी चालविलेली शिक्षण केंद्रे ही स्वतःच्या भक्कम मुळावर चालणारे केंद्र होईल आणि त्यांत सरकारी शक्ती सामर्थ्याबरोबर लोक शक्तीचाही फार मोठा सहभाग मिळू लागेल.

स्वातंत्र्यानंतर इंग्रज गेले पण इंग्रजी कारभार पद्धती, इंग्रजी नोकरशाही आणि इंग्रजी भाषा ही आमच्या मानगुटीवरून आज तागायत खाली उतरलेली नाही. प्रजेवर राज्य करणारी नोकरशाही, वसाहतवादी राज्य चालविण्यात वाकबगार आहे. पण स्वातंत्र्यात लोकशाही कारभार चालवून प्रजेचा सर्वांगीण विकास करायला ते उपयोगी नाही, उलट हानिकारक आहे. अत्यंत अकार्यक्षम, बेजबाबदार आणि प्रचंड खर्चिक आहे, हे अजूनही आमच्या लक्षांत येत नाही. या सरकारी नोकरशाहीचे अनुकरण सर्व सार्वजनिक सेवा क्षेत्रांतही सही सही झाल्याने सेवा क्षेत्र हे सेवकांची सेवा करण्यासाठी शिल्लक राहिले आहे हे आम्ही समजून घेत नाही. शिक्षण क्षेत्रांत आज विद्यार्थी, पालक, त्यांचे भवितव्य, यांची काळजी घेणारे कुणीच राहिले नाही. नोकरभरती, नोकरपगार, भत्ते, रजा, सुट्ट्या, बदल्या , बढत्या, सेवाशर्ती, सोयीसुविधा, यापलीकडे कशाचीही चर्चा नाही. विद्यार्थी आणि पालक यांची सेवा करणारे ते नोकर नाहीत. तर संस्थाचालक, सेवा संघटना, आणि शिक्षण खाते यांची सेवा करणेसाठी आहेत. असं ते समजतात. ज्या कामासाठी त्यांची नेमणूक असते. त्या कामाचा आणि त्यांना द्यावयाचे पगार भत्ते, सेवासंरक्षण आणि सुविधा यांचा काहीही संबंध आज राहिलेला नाही.

हा रोग आता शिक्षण व्यवस्थेच्या काळजापर्यंत भिडलेला आहे. शिकण्या शिकवण्याची प्रक्रिया हा शिक्षण व्यवस्थेचा प्राण आहे तो प्राणच आता कंठाशी आला आहे. ही अत्यावस्थ शिक्षण व्यवस्था मरू द्यायची नाही, जिवंतपणा बधीर अवस्थेत टिकवून धरायचे अशी व्यवस्था करण्यांत संस्था चालक, शिक्षक सेवक आणि प्रशासक यशस्वी झाले आहेत.

ही भयंकर स्थिती बदलणे पुरेसा निर्धार असेल तर, शक्य आहे. साऱ्या सेवा क्षेत्रांत, "पे ॲण्ड प्रोटेक्शन इन सर्व्हीस, शाल गो वुईथ परफॉर्मन्स इन सर्व्हिस" आणि परफॉर्मन्स् शाल बी इव्हॅल्युटेड बाय द बेनिफिसरीज ऑफ द सर्व्हिस" एवढे एक तत्व खंबीरपणे लागू केले. तर साऱ्या सेवा क्षेत्राचे हे प्रचंड बांडगुळी स्वरूप झडून जाईल.

प्रचलित शिक्षण व्यवस्थेचा खर्च आणि लाभ यांचे प्रचंड व्यस्त गणित, तर सार्वत्रिक शिक्षणाचा आग्रह धरणाऱ्या साऱ्या समाजसुधारकांच्या आत्म्याला शांती ऐवजी स्वर्गात अशांती मिळवून देणारी आहे. तो खर्च पालकांच्या खिशाबाहेर पूर्वीपासूनच गेला आहे. पण आता सरकारी तिजोरीच्या आवाक्याबाहेर ही गेला आहे. एकूण शिक्षण खर्चापैकी ५ टक्के खर्च केवळ पगारावरील खर्च आहे. प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर पगाराचा खर्च ९५ टक्के होतो. शिक्षण क्षेत्र आता एक अग्रेसर पगार हमी क्षेत्र झाले आहे. अशिक्षीताना जशी रोजगार हमी, तशी शिक्षितांना पगार हमी, म्हणूनच मुख्यत: शिक्षण क्षेत्र चालू ठेवले आहे.

या व्यवस्थेचे फलीत काय? इ. १२ वी पर्यंत ९६.३ टक्के गळती आणि नापासी, जेवढ्यांना या शिक्षणाचा लाभ होतो त्यांना या देशातील चांगले नागरिक म्हणता येईल का? भारतीय राज्यघटनेतील राष्ट्रीय जीवनमूल्यांना त्यांनी बांधून घेतले आहे का? चारित्र्य आणि चरितार्थ मिळवण्याची पात्रता त्यांनी कमावली का? देशाचा ते एक ''ॲसेट'' म्हणून उभे राहिलेत की देशावरची ''लाएबिलिटी'' बनून राहिलेत ? मायावादी, परलोकवादी भ्रमिष्ट धारणेतून त्यांची मने बाहेर आली का? जातीभेद, जन्माधिष्ठीत उच्चनीचता या अमानुष कुसंस्कारातून ते मुक्त झालेत का? या सर्व प्रश्नांची उत्तरे निराशाजनकच आहेत.

साऱ्या जगातील निरक्षरापैकी ५५ टक्के निरक्षर लोक आपल्याच देशांत आहेत. साक्षरांचीही राक्षसी वृत्ती कमी झालेली असते, असं नाही. तो ''सोशल'' आणि ''रॅशनल'' होतो याचीही प्रचिती नाही. या साऱ्या इंग्रजी शिक्षण पद्धतीचे, स्वतंत्र भारताच्या उभारणीवर काय भयंकर परिणाम झाले आहेत आणि आमचे सारे राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण कसे आत्मविनाशाच्या गर्तेकडे चालले आहे याचा काही संदर्भ, मी उद्याच्या भाषणासाठी राखून ठेवीत आहे.

महाराष्ट्रातील शिक्षण प्रसाराची चळवळ ही मुख्यत: ब्राह्मण धर्मातील भ्रमिष्ट, परलोकवाद, कर्मवाद, जन्माधिष्ठीत उच्चनीचता, भेदाभेद, विषमता, शोषण आणि उच्चवर्णियांचे वर्चस्व, यांतून मानवी मन मुक्त व्हावे, म्हणून समाजसुधारकांनी सुरू केली. विजेत्या पाश्चात्य संस्कृतीचे सामर्थ्य समजून यावे, मनामनांत समता, एकता, बंधुभाव वाढून सारा विस्कळीत समाज संघटित व्हावा. माणुसकीचे हक्क व कर्तव्ये याची त्याला जाणीव व्हावी. न्याय, अन्याय, सत्य, असत्य, चांगले वाईट हे त्याला समजावे आणि न्याय, सत्य, चांगले असेल त्याची बाजू घेऊन त्याने आयुष्य जगावें अशाही अपेक्षा शिक्षणप्रसाराच्या चळवळी पासून होत्या. म. जोतिबा फुल्यांनी वर्णन केलेली अविद्या

नष्ट व्हावी आणि विद्येच्या प्रसाराबरोबर स्त्री शूद्रादि सर्व मानवांस सन्मती, नीती, प्रगती, संपत्ती साधता येऊन सफल आयुष्य जगता यावे अशीच कल्पना होती.

शिक्षण प्रसाराचा हेतू साध्य करण्याची व्यवस्था उभी केली पण ती फार तुटकी फुटकी गळकी निघाली. जे आणि जसे शिकवले जाते तो शिक्षणाचा आशय लोणी काढून घेतलेल्या आंबट शिळ्या ताकासारखा झाला. मन:स्थिती परिवर्तनासाठी शिक्षणप्रसार मांडला, पण हे परिवर्तन विकृतीकडेच वळले.

महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी मराठी माणसांतील भावनिक एकता, बंधुभाव परिदृढ करून निश्चित विश्वासाची भावना जागवण्यासाठी यशवंतरावांनी प्रयत्न केले. अगोदर विश्वास मग विकास हे सूत्र फार महत्वाचे आहे. शिक्षणप्रसाराची चळवळ जोपासून पिढ्यान् पिढ्यांच्या मानसिक गुलामीतून मराठी मन मुक्त करून इहलोकाची, या जन्मातील समोरच्या परिस्थितीशी डागडुजी करून फेरबांधणी करण्यासाठी ते मन उद्युक्त केले. सर्वांपर्यंत शिक्षण गेले पाहिजे, माणसं शहाणी झाली पाहिजेत. निदान ती इहलोकांत आली पाहिजेत. आपल्या सुखदु:खाचे विचार इथेच आहेत. इथेच त्याची कारणे आहेत. या सभोवतालच्या व्यवस्थेमध्ये दडलेली ती कारणे शोधली पाहिजेत. एवढे तरी त्यांना कळले पाहिजे. मगच आपले प्रश्न सोडविण्यास ते उद्युक्त होतील. ही शिक्षण प्रसारामागील उद्दीष्टे होती.

महाराष्ट्राच्या बांधणीसाठी यशवंतरावांनी जो तिसरा उपक्रम हाती घेतला तो आर्थिक परिस्थिती बदलण्याचा. मन:स्थितीप्रमाणे परिस्थिती बदलण्याचा एक नवा मोठा रस्ता त्यांनी काढून दिला. आर्थिक परिस्थिती बदलणे हे सर्व भारताच्या आर्थिक धोरणांवर अवलंबून असते. त्या धोरणाप्रमाणेच पुढे जाण्याचा त्यांनी व्यवहारी मार्ग काढून त्या मार्गाने महाराष्ट्र पुढे नेण्याचा मोठा प्रयत्न केला.

आपल्याला माहिती आहे की, स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये इंग्रज का नको याची पहिली अर्थशास्त्रीय मिमांसा, १८८८ साली राष्ट्र पितामह दादाभाई नौरोजी यांनी केली. त्यापूर्वी म्हणजे १८५७ नंतरच्या अव्वल इंग्रजी कालांत इथल्या भल्या भल्यांची अशी समजूत झाली होती की, ''इंग्रज हे देव लोक आहेत. ते आपल्या उद्धारासाठी आले आहेत. ते रामकृष्णाचे अवतार आहेत. रामकृष्णांना कुठे दाढीमिशा होत्या. इंग्रज साहेबालाही दाढी मिशा नाहीत आणि त्याची एकेक करणी पहा कशी अद्भूत. ती आगीनगाडी साहेबांच प्वॉर मोठं नकली गा. बिनबैलाची गाडी कशी हाकली. त्यांचा गोरा गोमटा रंग, त्यांचा पोशाख, त्यांची शिस्त, त्यांची रहाणी, सारंच अघटित होते.

आमच्या लोकांना पेशवाईच्या बेबंदशाहीनंतर इंग्रज बहादुरांची कारकीर्द सुरू झाली. आता काटीला सोनं बांधून काशीयात्रा करावी! अशा दिङमूढ अवस्थेतून भारतीय मन जागं करणारा महात्मा म्हणजे दादाभाई नौरोजी, काँग्रेसच्या स्थापनेमध्ये तेही होते. इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये निवडून गेले होते. मोठे पारशी व्यापारी होते. मोठे विद्वान अभ्यासू होते. त्यांनी १८८८ साली इंग्रजी राजवटीवर एक मोठा ग्रंथ प्रसिद्ध केला. ''पॉव्हर्टी अँड ब्रिटीश रूल इन इंडिया.'' त्या ग्रंथात त्यांनी पहिल्यांदा दाखवून दिले की, इंग्रज हे सावाचा आव आणणारे चोर आहेत. ते आपल्या उद्धाराला आले नसून हिंदुस्थानला लुटायला आले आहेत.'' आणि त्यांनी इंग्रजी नोकरशाहीच्या कारभाराची सखोल चिकित्सा करून दरवर्षी किती कोटी रुपयांची लूट ते इंग्लंडला नेतात हे सप्रमाण दाखवून दिले. इंग्रजांनी प्रत्येक जिल्ह्यात पहिले मोठे अधिकारी नेमले ते कलेक्टर्स, कलेक्टर म्हणजे गोळा करणारा. जनावराला माणसाळून खायला घालून, गोंजारून, जशी धार काढतात, तसे ते हिंदुस्थानला गोंजारून पिळून काढतात. जळवा जशा रक्त शोषतात पण वेदना होऊ न देता. तशी ही इंग्रजांची लुटालूट आहे. इंग्रज मूळचे व्यापारी. व्यापार, पैसा हाच त्यांचा सर्व व्यवहारामागील प्रधान हेतू होता.

दादाभाईंच्या या ग्रंथानंतरच खऱ्या अर्थाने काँग्रेसच्या चळवळीला खरे राजकीय रूप येऊ लागले. वसाहतवादी अर्थ व्यवस्थेच्या शोषणाचे भयंकर रूप लोकांना समजू लागले. इथले उद्योग, व्यवसाय बंद पाडून संपवायचे, इथला कच्चा माल मातीमोलानं घ्यायचा. इथल्या लुटीतून इंग्लंडला कारखाने सुरू करायचे, कच्च्या मालाचा पक्का माल करायचा आणि तो आणून परत या वसाहतीमध्ये दामदुप्पटीला विकायचा, इथल्या शेतीत इंग्लंडच्या कारखानदारीला लागणारा कच्चा माल पिकवायला शेतकऱ्यांना भाग पाडायचे. अन्नधान्य नाही पिकले तर इथले लोक उपाशी मरतील, पण इंग्लंडमध्ये सोन्याचा धूर निघेल, याची ते दक्षता घेत. इथले कारागिरीचे धंदे मोडले. शेती उध्वस्त केली. चहाचे मळे, कॉफीचे मळे, निळंबीचे मळे, युरोपीयन लोकांनी इथल्या जमिनी मातीमोलाने घेऊन मोठमोठे मळे उभे केले. इथल्याच लोकांना मजूर म्हणून जनावरासारखे राबवून घेतले. जगभर त्यांचे हेच वसाहतवादी शोषण चालू होते. हिंदुस्थानांतील लोक स्वखुषीने गुलाम होत होते. जनावरासारखे राबायला तयार होते. नशिबाचे भोग, देवाची करणी म्हणून सारे अत्याचार शोषण निमूट भोगत होते. आणि आमच्यातले उच्च वर्णीय ''भो पंचम जॉर्ज'' म्हणून इंग्रज बादशहाची रोज प्रार्थना म्हणून त्याचे हे वसाहतवादी राज्य आपल्याच देशातील लोकांवर चालवायला एक निष्ठेने मदत करावयाचे.

इंग्रजांच्या या युरोपीय वसाहतवादी आक्रमणाचे भयंकर राक्षसी रूप दादाभाईंनी वरवरचा मखमली पडदा फाडून दाखविले. इंग्रजी राजकारण, अर्थकारण हे नीतीशी

जोडलेले नसून अन्याय, अत्याचार, अनीतीशी जोडलेले आहेत. हे त्यानंतर हिंदुस्थानी लोकांच्या ध्यानात येऊ लागले.

स्वातंत्र्याची चळवळ झाली. इंग्रजी वसाहतवादी शोषणातून देश मुक्त झाला. पण स्वातंत्र्यानंतर आम्ही कोणती अर्थ नीती अवलंबिली. नवभारताच्या उभारणीची आपली प्रतिज्ञा भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यांत जाहीर झाली आहे. तिचा मी काल उल्लेख केला. आमचा निर्धारपूर्वक केलेला संकल्प आहे की, आम्हाला स्वतंत्र भारतात सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक लोकशाही समाज उभा करायचा आहे. प्रत्येक भारतीयास न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता मिळवून द्यावयाची आहे. सामाजिक ऐक्यभाव जोपासून राष्ट्राची एकता बळकट राखायची आहे. या आमच्या ध्येयाला पोषक, पूरक अशी आमची अर्थनीती असली पाहिजे. आमच्या राज्य नीतीला अर्थनीतीची जोड दिलीच पाहिजे. आपल्याला स्वातंत्र्यानंतरचा काळ आठवत असेल. अर्थव्यवस्थेबाबत एक शब्द कानांवर येत असे, "को-ऑपरेटिव्ह कॉमन वेल्थ" पुढे पंडित नेहरुंच्या प्रभावाखाली आम्ही लोकशाही, समाजवाद असा शब्द वापरू लागलो. त्यावेळी जगाच्या पाठीवर लोकशाही मानणारे भांडवलशाही देश होते, आणि लोकशाही न मानणारे साम्यवादी देश होते. आमच्या स्वप्नांत लोकशाही आणि समाजवाद दोन्हीचे प्रचंड आकर्षण होते. म्हणून आम्ही आमचा ध्येयवाद, जगाच्या पाठीवरील दोन्ही गटांतील आम्हाला जे चांगले अनुकरणीय वाटले ते एकत्र करून लोकशाही समाजवाद असा निश्चित केला. त्याला पूरक अशी खाजगी क्षेत्र व सरकारी क्षेत्र अशी दोन्ही क्षेत्रांत अर्थ व्यवस्था चालविणारी संमिश्र अर्थनीती जाहीर केली.

लोकशाही मानणाऱ्या व समता मानणाऱ्या दोन्ही ध्येयवादांची स्वतःची अशी अर्थव्यवस्था आहे. उत्पादन विभाजन, वितरणाची दिशा निश्चित आहे. पाश्चात्यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्था विकसित केली. कम्युनिस्ट रशियांत साम्यवादी अर्थव्यवस्था विकसित झाली. आम्ही एक पिढीभर जोरजोरांत जाहीर केले "वुइ आर नॉट कॅपिटॅलिस्ट, वुई आर नॉट कम्युनिस्टस, वुई आर डेमॉक्रेटिक सोशॅलिस्ट" आम्ही भांडवलशाहीवादी नाही, आम्ही कम्युनिस्टही नाही, आम्ही लोकशाही समाजवादी आहोत" काँग्रेस पक्षाच्या आवडीच्या अधिवेशनात या ध्येयवादाची स्पष्ट घोषणा झाली. आम्ही आमचा अर्थ व्यवहार पब्लिक सेक्टर आणि प्राइव्हेट सेक्टर या दोघांत वाटून दिला. "पब्लिक सेक्टर" हा तसा पब्लिक नव्हता. तो सरकारी सेक्टर होता. पब्लिकशी त्याचा संबंध नव्हता. पब्लिक स्कूल जसे पब्लिकशी संबंध नसलेले असत तसा.

लोकशाही समाजवाद हे आमचे ध्येय व त्याचा अंमल करणारी संमिश्र अर्थव्यवस्था ही आमची अर्थनीती, असा निर्णय घेऊन आम्ही कामाला लागलो. आमचे बेकारीचे, दारिद्र्याचे, विषमतेचे, शोषणाचे प्रश्न या अर्थ नीतीतून सोडवू असे आम्हाला वाटले. सुबत्ता, समता साधू, सर्वांचा समतोल विकास साधू, देशाची आर्थिक घडी नीट बसवून मजबूत करू अशा विश्वासाने आम्ही केंद्रीय नियोजन मंडळ सुरू केले. देशाच्या जडणघडणीचा रस्ता निश्चित करून आम्ही त्या मार्गाने वाटचाल सुरू केली. महाराष्ट्रात देशाची आर्थिक धोरणे राबवितांना यशवंतरावांची राजकीय प्रतिभा पुन्हा प्रत्ययाला आली. महाराष्ट्राची आर्थिक घडी बसवतांना देशाचे संमिश्र अर्थ धोरण तर अंमलात आणलेच परंतु एक तिसरा अधिक व्यवहारी रस्ता त्यांनी विकसित केला. कै. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, अशा अर्थ पंडितांच्या सहकार्याने आणि पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सारख्या कर्मवीरांच्या व्यवहारी शहाणपणातून त्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी तिसरा रस्ता विकसित केला. सहकारी कृषी औद्योगिक समाजरचना लोकशाही समाजवादाकडे जाणारे ''प्राइव्हेट सेक्टर आणि पब्लिक सेक्टर एवढे दोन मार्ग तर स्वीकारलेच पण सहकारी चळवळीचा तिसरा सेक्टर अधिक व्यवहारी, अधिक पूरक, अधिक जवळचा रस्ता आहे हे त्यांनी दाखवून दिले. ''को-ऑपरेटिव्ह कॉमन वेल्थ'' या मूळ विचारांचाच हा परिपोष होता. विशेषत: ग्रामीण अर्थ व्यवहाराची पुनर्रचना सहकारी मार्गानेच अधिक शक्य आहे, आणि लोकशाही समाजवादाची पर्यायी अर्थव्यवस्था होण्याची क्षमता सहकारी अर्थ व्यवस्थेत आहे. याचे प्रात्यक्षिक महाराष्ट्रात उभे करण्याची चळवळ यशवंतरावांनी सुरू केली.

अर्थ व्यवस्थेचे तीन मुख्य विभाग सेक्टर मानले जातात. प्राथमिक क्षेत्र, दुय्यम व तिय्यम क्षेत्र. शेती आणि पूरक ग्रामीण उद्योग व्यवसायाचे प्राथमिक क्षेत्र, उद्योग व्यापाराचे दुसरे क्षेत्र आणि नोकरी सेवा यांचे तिसरे क्षेत्र. अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेचे, विकासाचे जे सिद्धांत, मार्ग पाश्चात्यांनी विकसित केले ते मुख्यत: अर्थव्यवस्थेच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या क्षेत्राचा म्हणजे उद्योग व्यापार, नोकरीसेवा यांच्या हिताचे ठरले आहेत. प्राथमिक क्षेत्राच्या विकासाचे नाहीत. प्राथमिक क्षेत्र वापरून घेण्याचे त्यात विचार आहेत. पण प्राथमिक क्षेत्राचे प्रभुत्व टिकवण्याऐवजी संपवण्याचाच त्यांत प्रधान हेतू आहे. भारतीय संस्कृतीचा अर्थ विचार हा ''उत्तम शेती, मध्यम व्यापार, आणि कनिष्ठ नोकरी'' असा आहे. पाश्चात्य जगात जमीनदारी, सरंजामी अर्थव्यवहाराला मागे टाकून जो वाणीव्यापारी वर्ग पुढे आला, त्यांनी व्यापार उद्योगाला मोठी प्रतिष्ठा देऊन, सरंजामी समाजरचना बदनाम करून मोडून काढली. परंतु जमीनदारी, सरंजामदारी म्हणजे शेतकरी नव्हे, शेतीपूरक उद्योग व्यवसाय करणारे कारागीर नव्हेत. नैसर्गिक

विकेंद्रीत अर्थव्यवस्थांचा स्वतंत्र, स्वयंपूर्ण, सर्जनशील व सुरक्षित मानवी जीवन उभे करून चालवू शकते. केंद्रीभूत, संघटित, औद्योगिक शहरी समाजाची निर्मिती ही मानवी जीवन व निसर्ग या दोहोंना उध्वस्त करणारी समाज निर्मिती आहे. हे सत्य अर्थव्यवस्थचे पुरोगामी अर्थव्यवस्था म्हणून भजन, पूजन, अनुकरण करणारी मंडळी अजूनही मान्य करीत नाहीत. भारतीय लोकशाहीत अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक क्षेत्रांत शेती व कारागिरी यांवर अवलंबून असणारे ८० टक्के ग्रामीण लोक हेच लोकशाहीचे, सत्तेचे, राज्यकारभाराचे खरे मालक आहेत. परंतु त्यांनाच वेठीला धरून, इथली मूठभर उद्योग व्यापार नोकरपेशांत स्थिरावलेली मंडळी, स्वत:साठी सुरक्षित सोयीस्कर संपन्न शहरी वसाहती उभ्या करण्यासाठी देशाची साधनसामुग्री वापरीत आहेत. यशवंतरावांना त्या ८० टक्के सामान्य बहुजनांची लोकशाही व्हावी असे वाटत होते. त्यांचे आर्थिक जीवन हाच देशउभारणीच्या प्रश्नातील अवाढव्य असा प्रश्न आहे, त्या प्रश्नाच्या सोडवणूकीसाठीच देशाची सर्व शक्ती, साधनसामुग्री वापरली पाहिजे, त्यातून या ग्रामीण आर्थिक प्राथमिक क्षेत्राची पुनर्रचना करून, ते क्षेत्र विकासाच्या वाटेवर गतीमान राहील यासाठीच स्वातंत्र्यानंतरची सारी धोरणे व कार्यक्रम राबविले गेले पाहिजेत, आणि याच भूमिकेतून महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी सहकारी कृषि औद्योगिक समाज रचनेचा, अत्यंत व्यवहारी शहाणपणाचा आणि लोकशाही समाजवादाच्या ध्येयाला खऱ्या अर्थाने बळकटी देणारा असा मार्ग, असा उपाय, यशवंतरावांनी अंमलात आणला. स्वर्गीय आण्णासाहेब शिंदे यांनी कुठल्या तरी एका मुलाखतीत म्हटल्याप्रमाणे यशवंतरावजी चव्हाण देशाचे पंतप्रधान झाले असते तर, लोकशाही समाजवादाची अर्थव्यवस्था म्हणून, सहकारी कृषी औद्योगिक समाजरचनेची क्रांती देशाचे आर्थिक धोरण म्हणून त्यांनी अंमलात आणली असती. असे झाले असते तर, आज देशाची अर्थव्यवस्था जी अनर्थाच्या आवर्तात सापडली आहे, त्या संकटातून देश वाचला असता.

संमिश्र अर्थव्यवस्थेची प्रेरणा मूलत: पाश्चात्य अर्थशास्त्राची आहे. भांडवलशाही आणि साम्यवाद दोन्हीही सिद्धांतापुढे विकासाचे जे मॉडेल आहे ते भौतिक विकासाचे आहे. त्यांना जो नवा समाज हवा आहे तो शहरी संघटित औद्योगिक समाज असाच आहे. ग्रामीण शेती, कारागीर प्रधान, विकेंद्रित लोकशाही प्रधान असा सहकारी कृषि औद्योगिक समाज त्यांच्या पुढे मॉडेल म्हणून नाही. युरोपमध्ये, अमेरिकेमध्ये, रशियामध्ये जो नवा समाज साकारला गेला होता, तोच संमिश्र अर्थव्यवस्थेच्या पुढचा आदर्श होता. संमिश्र अर्थव्यवस्थेचा ३०-४० वर्षे अंमल केल्यानंतर प्रत्यक्ष परिणाम काय झाला? पब्लिक सेक्टरच्या नांवाखाली प्रचंड गुंतवणूकीची, सरकारी नोकरशाहीने चालवलेली कारखानदारी उभी राहिली. खाजगी क्षेत्रही आपल्या वाटून दिलेल्या क्षेत्रांत पाय रोवून

उभे राहिले. सुरुवातीचा १५-२० वर्षाचा काळ प्रगतीचा वाटला. काही नाही तरी पब्लिक सेक्टरमध्ये खूप नोकऱ्या निर्माण झाल्या. असंख्य लोक कामाला लागले. पण पब्लिक सेक्टरचा खरा फायदा खाजगी क्षेत्रांलाच झाला. त्यांना लागणारा माल हवा तेवढा हवा त्या दराने मिळाला. वीज, लोखंड, वहातुक, कोळसा आणि राष्ट्रीयकरणानंतरही बँकातील पैसा, दुर्लक्षितपणे प्रचंड अशी ग्रामीण बाजारपेठ त्यांना हव्या त्या दराने उपभोग्य वस्तू विकायला होतीच. संमिश्र अर्थव्यवस्थेमुळे खाजगी क्षेत्राचा प्रचंड फायदा झाला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जी औद्योगिक घराणी १-२ कोटींचा व्यवहार करीत होती ती अब्जावधी कोटी रुपयांची उलाढाल करू लागली. पब्लिक सेक्टर मात्र भरमसाट नोकरभरती, अकार्यक्षम व्यवस्थापन, संप, बंद, मोर्चे यामुळे डबघाईला आले. पब्लीक सेक्टर व्यवस्थापन आणि कामगार नोकर यांनी, २५ वर्षात कसा मुळासकट खाऊन टाकला हे पब्लिकला लवकर कळालेच नाही. पुरोगामी कामगार संघटना चालविणारांनीही पब्लिक हिताचा बळी देऊन कामगार हित साधले. व्यवस्थापनही मुख्यत: सरकारी नोकरशाहीचेच होते. पांढऱ्या वाळवीने प्रचंड वृक्षांची मुळे खाऊन टाकावी आणि तो वृक्ष वठून जावा तशी अवस्था व्यवस्थापकीय नोकरशहा व कामगार संघटना यांनी पब्लिक सेक्टरची केली आहे. आपल्या सर्व सार्वजनिक सेवाक्षेत्रातही नोकरकामगार सेवकांची अशीच मनमानी चालू आहे.

रशियातील ७० वर्षाची साम्यवादी रचना का ढासळली हे समजून घ्यायला, रशियात जायला नको. आमच्या पब्लिक सेक्टरचा अभ्यास किंवा आमच्या सार्वजनिक सेवा क्षेत्राचा अभ्यास, त्यासाठी फारच उपयुक्त आहे. आमच्या संमिश्र अर्थव्यवस्थेचा तोल शेवटी भांडवलदारी बळकट करण्याकडेच झुकला. भांडवलशाहीमध्ये जशा मक्तेदाऱ्या निर्माण होतात. तशा मक्तेदाऱ्या उभ्या राहिल्या. आणिबाणीनंतर हे परिणाम स्पष्ट होऊ लागले. तोंडाने लोकशाही समाजवाद म्हणत, संमिश्र अर्थव्यवस्थेची म्हैस आम्हाला भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या गोठ्यांत घेऊन आली. " अगं अगं म्हशी, मला कुठं नेशी ". अशी वरकरणी ओरड आम्ही करत राहिलो. पण आता भांडवलशाहीचा गोठा बरा वाटू लागला आहे. लोकशाही समाजवादाचे तर आता कुंकूही पुसून टाकले आहे.

संमिश्र अर्थव्यवस्थेतून लोकशाही समाजवादाकडे जाण्याऐवजी युरोपीय भांडवलशाहीकडे जशी आम्ही उडी घेतली, त्याबरोबर यशवंतरावानी मांडलेल्या सहकारी कृषी औद्योगिक समाजरचनेच्या उद्दीष्टांचीही आज वाट लावली आहे. सहकारी अर्थव्यवस्थेच्या रस्त्यावरून चालणारांनाही त्या उद्दीष्टांची पूर्ण जाण राहिली नाही.

यशवंतरावांचे भजन, पूजन करणारांनाही सहकारी चळवळीच्या वैचारिक भूमिकेचा विकास करता आला नाही. कित्ता गिरवावा तसे, जेवढी सुरुवात झाली तेवढ्याच तिवढ्याभोवती फिरत रहावे तसे फिरत राहिले. सहकारी अर्थव्यवस्था ही एक पर्यायी अर्थव्यवस्था होऊ शकते. लोकशाही समाजवादाची जोपासना सहकारी अर्थव्यवस्थाच करू शकते. भांडवलशाही व साम्यवाद या दोन्ही अर्थव्यवस्थेला पर्याय देणारी सर्वंकष अर्थव्यवस्था म्हणून सहकारी चळवळ विराट रूप धारण करू शकते याचे दर्शन सहकारी कार्यकर्त्यांनीही घेतले नाही. आणि त्या अर्थाने सहकारी चळवळीची विकसित भूमिका कुणी पुढे आणली नाही.

सहकारी चळवळीची सर्वंकष भूमिका काय? यासंबंधी झालेली एक महत्वाची चर्चा मला आठवते. १९६७-६८ साली सांगलीला, आखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन होणार होते. त्या अधिवेशनाची पूर्वतयारी दोन तीन महिने अगोदरपासून चालली होती. वसंतरावदादा स्वागताध्यक्ष होते. त्यांचे स्वागताचे भाषण काय असावे अशी चर्चा सुरुवातीपासूनच चालू होती. अधिवेशनाच्या पूर्वतयारीत सारे असतानाच वसंतरावदादांना शंकरराव देव यांचे एक पत्र आले. महाराष्ट्र काँग्रेसच्या जडणघडणीमध्ये शंकरराव देवांचा मोठा ऐतिहासिक वाटा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ते बाजूला पडले. सासवडच्या आश्रमातून त्यांचे पत्र आले होते. त्यांत त्यांनी म्हटले होते, "मला सांगलीला यावयाचे आहे. तुझे सहकारी चळवळीतले काम खूप नावारुपाला आलेले मी ऐकतो आहे. दोन तीन दिवस राहून मला तुझे काम पहायचे आहे. काम म्हणजे मला इमारती, कारखाने, शेती पहायची नाहीत, तर सहकारी चळवळीचा तुमचा विचार मला समजून घ्यायचा आहे. तुम्हाला नेमके काय साधायचे आहे? आणि ते सहकारी चळवळीतून कसे साध्य होण्याची शक्यता आहे? ते मला तुमच्याकडून समजून घ्यायचे आहे.

शंकरराव देव वसंतदादांना एकेरी नावानेच बोलावीत. त्यांचे तितके जवळचे संबंध होते. शंकरराव देवांचा स्वभावही तसा कडक, स्पष्ट. त्यांच्याशी चर्चा करायची म्हणजे काहीतरी थातुर मातूर चालायचे नाही. आणि वसंतरावदादांची अडचण त्यावेळी वैचारिक चर्चा करण्याची. त्यांनी डोंगराएवढी कामे उभी केली पण त्या कामामागची वैचारिक भूमिका सांगायची, तीही शंकरराव देवा सारख्या ज्येष्ठ नेत्यांच्या शंका निरसन होतील अशा पद्धतीने सांगायची म्हणजे मोठी पंचाईत होती. त्यावेळी अधिवेशनासाठी काही साहित्य तयार करायला व इतर चर्चा करायला, मान. नरुभाऊ लिमये, द्वा. भ. कर्णिक, वि.स.पागे, गुलाबराव पाटील,तात्यासाहेब कोरे अशी ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळी व कार्यकर्ते सांगलीत उतरत होती. रोज रात्री सांगली साखर कारखान्याच्या जुन्या गेस्ट

हाऊसवर एकत्र जमत होती. शंकरराव देवांच्या पत्राची त्यात आम्ही चर्चा केली. सहकारी चळवळीची वैचारिक भूमिका सिद्धांताच्या स्वरूपात कशी मांडायची? पुष्कळ खल झाला. त्यात मी काही विशिष्ट मांडणी सर्वांपुढे ठेवली. त्यावर सर्वजण खुष झाले. शंकरराव देवाना बोलावले. ते तीन दिवस राहिले. तीन दिवस रोज आामच्या शांतिनिकेतन मध्येच बैठकी झाल्या. त्या सर्व मंथनातून सहकारी चळवळीची एक पर्यायी अर्थव्यवस्था देणारी वैचारिक बैठक आकाराला आली. ती समजून घेऊन शंकरराव देवानीही शेवटी सांगितले "हीच तुमची भूमिका असेल तर मी तुमच्याशी पूर्ण सहमत आहे. माझा सर्वोदय आणि तुमचा सहकारी समाजवाद मी एकच समजतो. माझे पूर्ण समाधान झाले आहे."

त्या चर्चेत मान्य झालेली सहकारी चळवळीची वैचारिक भूमिका थोडक्यात अशी होती. अर्थशास्त्राची सुरुवात मानवी गरजा आणि त्या भागविण्याची व्यवस्था यांतून होते. ही व्यवस्था म्हणजे उत्पादन, वितरण, विनिमय व्यवस्था, भांडवलशाही, साम्यवाद समाजवाद हे सर्व वाद उत्पादनव्यवस्थेशी संबंधित आहेत. आम्ही कॉलेजमध्ये अर्थशास्त्र शिकवताना उत्पादन व्यवस्थेचे चार मूलभूत घटक असतात इथून सुरुवात करतो. उत्पादन व्यवस्थेतील चार मूलभूत घटक म्हणजे कच्चा माल, भांडवल, श्रम आणि गिऱ्हाईक. उदाहरणार्थ आपला साखर कारखाना. साखर कारखाना चालविण्यासाठी ऊस म्हणजे कच्चा माल हवा, शारीरिक श्रम करणारा कामगार नोकरवर्ग हवा आणि शेवटी तयार केलेली साखर घेणारे गिऱ्हाईक हवे. या चार घटकापैकी एकजरी त्यांत नसेल तर कारखाना चालणार नाही म्हणून उत्पादन व्यवस्थेत हे चारही घटक फार महत्वाचे. त्यांच्या सहयोगाशिवाय उत्पादन व्यवस्था उभीच रहात नाही.

आता पाश्चात्यांनी विकसित केलेली भांडवलशाही आणि रशियाने मांडलेली साम्यवादी अर्थव्यवस्था म्हणजे काय? उत्पादनाच्या प्रक्रियेत भांडवल या घटकालाच प्रमुखपद असून बाकीचे घटक दुय्यम वा खरेदी करता येण्यासारखे आहेत. म्हणून भांडवल देणाराच त्या उत्पादन व्यवस्थेचा मालक असला पाहिजे अशी वैचारिक बैठक स्वीकारून जी उत्पादन व्यवस्था चालते ती भांडवलशाही. त्याच्या उलट साम्यवादी विचारसरणीत सांगितले जाते की, भांडवल हा महत्वाचा घटक नसून श्रम करणारा कामगार हा महत्वाचा घटक आहे. कारण भांडवलाची निर्मिती ही शेवटी श्रमांतूनच होत असते. म्हणून उत्पादन व्यवस्थेचा कामगार हाच मालक, नियंत्रक असला पाहिजे. या दोन वैचारिक भूमिका घेऊन आज जगाच्या पाठीवर अर्थव्यवस्था चालल्या आहेत. भांडवलशाहीत भांडवलाचे हितसंबंध जपायचे, बाकीच्या तिन्ही उत्पादन घटकांचे शोषण केले तरी चालते.

साम्यवादांत श्रम करणाऱ्या कामगाराला अवास्तव महत्व देऊन बाकीच्या तिन्ही घटकांना कसेही वापरले तरी चालते. या एकेरी विचारामुळेच भांडवलशाही व साम्यवाद या दोन्ही अनर्थव्यवस्था मानवी हितसंबंधाच्या दृष्टीने अर्थव्यवस्था झाल्या आहेत.

उत्पादन प्रक्रियेतील चारी मूलभूत घटकांचे हितसंबंध जपणारी, कुठल्याही एकदोन घटकांचे प्रमुख मानून बाकीच्यांचे शोषण न करणारी अशी अर्थव्यवस्था मांडता येणे शक्य आहे आणि तेच सहकारी अर्थव्यवस्थेचे उद्दीष्ट आहे. कच्चा माल देणारा, भांडवल घालणारा, श्रम करणारा व माल घेणारा या चौघांच्याही हितसंबंधाची काळजी घेणारी, त्यांच्यातील शोषण, फसवणूक टाळून पूर्ण समजूतीने व सहकाराने चालणारी अर्थव्यवस्था हीच सहकारी अर्थव्यवस्था आहे. उत्पादनाच्या चारी घटकाच्या सहकाराशिवाय उत्पादन व्यवस्था चालूच शकत नाही. हे सहकार्य लोभ, दडपण, संघर्ष करून, वा कायदा दाखवून साधले तर फार काळ टिकणार नाही. म्हणून चारी घटकांच्या वाजवी हितसंबंधाची काळजी घेऊन, परस्पर समजुतीने व विश्वासाने चाललेली आणि चारी घटकांची मालकी मान्य करणारी सहकारी उत्पादन व्यवस्था का चालवता येणार नाही? त्यामुळे नफा, स्पर्धा, मक्तेदारी, शोषण टाळता येईल. बळी तो कान पिळी अशी व्यवस्था अर्थव्यंवहारात राहणार नाही. म्हणूनच भांडवलशाही व साम्यवाद यांना पर्याय देणारी नवी सहकारी अर्थव्यवस्था उभारून चालवता येणे शक्य आहे. अर्थात हे अंतीम उद्दीष्ट आहे. आजची सहकारी चळवळ त्या टप्प्यापर्यंत पोहचलेली नाही. ऊस घालणारा शेतकरी व भांडवल यांचे हितसंबंध जपण्याचा प्रयत्न आज आम्ही सहकारी कारखानादारीत करतो आहे. कामगारांचा सहभाग अजून पुरेसा नाही. आणि गिऱ्हाईकांचा तर अजून विचारही सुरू नाही. पण ज्या दिवशी ऊस घालणारा शेतकरी भांडवल घालणाऱ्या व्यक्ती अगर संस्था, श्रम करणारे कामगार व तज्ञ आणि साखर घेणारे गिऱ्हाईक या चारी घटकांच्या प्रतिनिधींचे संचालक मंडळ मालक म्हणून आमचा कारखाना चालवतील त्या दिवशी आम्ही सहकारी चळवळीच्या वैचारिक बैठकीप्रमाणे सहकारी मालकी प्रस्थापित केली असे होणार आहे. हे अशक्य नाही आणि सहकारातूनच हे शक्य आहे असा आमचा विश्वास आहे. सभोवंतालचा सर्व व्यवहार खाजगी भांडवलशाही हितसंबंधाचाच असल्याने सहकारी चळवळीचा विकास पर्यायी अर्थव्यवहार उभा करण्याचा ध्येयवाद न सोडता पण जपून सावधपणेच करावा लागेल.

दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे सहकारी चळवळीत लोकशाही कार्यपद्धती बळकट करण्याची शक्यता आहे. समान न्याय मिळविण्याची शक्यता आहे आणि विकेंद्रीत पद्धतीने उत्पादन व्यवहार होण्याचे आणि मुख्यंत: अर्थ व्यवस्थेत प्राथमिक क्षेत्रांची गतिमान फेरमांडणी करण्याची शक्यता अधिक आहे.

परंपरागत उत्पादनाच्या चार मूलभूत घटकामध्ये आज विज्ञान तंत्रज्ञान हा पाचवा घटक म्हणून उत्पादनांत क्रांती करून राहिला आहे. त्यामुळे तर भांडवलशाही आणि साम्यवाद यांचा मूळ पायाच फसला आहे. आता तंत्रज्ञानाला भांडवलाच्या कब्जात घेण्याचा त्यांचा प्रयत्न असला तरी ते संघर्षाशिवाय शक्य होईल असे वाटत नाही. आमचा संघर्ष म्हणजे सर्वनाश हे विज्ञान तंत्रज्ञानानेच दाखवून दिले आहे. व्यक्ती, समाज व निसर्ग यांच्यातील परस्पर पूरक व पोषक नाते जोपासून सर्वांना सुखमय मानवी संस्कृती शोधायचा मार्ग सहकार हाच आहे, संघर्ष नाही, असा विश्वास व अशी जाणीव सहकारी नेत्यामध्ये दृढमूल झाली पाहिजे.

लोकशाही समाजवाद मानणारे देशाचे शासनही या सहकारी अर्थव्यवस्थेची कुवत जाणणारे असेल तर सहकारी अर्थव्यवस्थेला एक पर्यायी अर्थव्यवस्था उभी करता येणे अधिक सुलभ होणार आहे.

सहकारी चळवळ म्हणजे इंग्लंडमध्ये रॉबर्ट ओव्हेन याने सुरू केलेली चळवळ असे पुस्तकी शिक्षणांतून शिकवले जाते. इंग्लंडमध्ये कारखानदारीला प्रारंभ झाला त्यावेळी तिथले कारखानदार ज्या अमानुषपणे कामगारांना वागवीत, त्यातून दया येऊन अशा समान पीडितासाठी ओव्हेन यांनी काही उपक्रम सुरू केले. नफा, स्वार्थ, चढाओढ यांसाठी चाललेल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेत ज्या लढाया चालतात, त्या लढाईत जे जखमी होवून व्हिवळत पडतात त्यांच्या जखमांना मलमपट्टी करण्यासाठी नर्सिंग करण्यासाठी, सहकारी चळवळ आहे असे शिकविले जाते. हे रेडक्रासचे काम म्हणजे सहकारी चळवळ हा अर्थ अत्यंत अपूरा आहे. या नर्सिंगमुळे लढाई थांबत नाही. लढाई, संघर्ष, ज्या भांडवलशाही व्यवस्थांमुळे निर्माण होतात. तो व्यवहार बदलणारी लढाई संघर्ष, संपवणारी पर्यायी व्यवस्था म्हणजे सहकार असा अर्थ यांत अभिप्रेत नाही. समाजहितसंबंधांच्या लोकांनी एकत्र येवून एकमेकांच्या सहकार्याने आपल्या हितसंबंधांचे रक्षण करावे ही सहकाराची रूढ व्याख्या पुरेशी नाही. साम्यवादांत वर्ग संघर्ष आहे. त्यातील वर्ग या संज्ञेची व्याख्याही समानहितसंबंधाचे लोक अशीच आहे त्यामुळे पर्यायी अर्थव्यवस्था देणारी सहकारी चळवळ असा विकसित अर्थ सहकारी चळवळीत कधी येऊच शकत नाही. पण जे ज़े विलायती ते वेदवाक्य म्हणून डोळे झाकून स्वीकारायचे ही वृत्ती, शिक्षणक्षेत्रांतून तर जाता जात नाही. शंकरराव देव यांचेशी झालेल्या चर्चेतून सहकारी चळवळीची एक पर्यायी अर्थव्यवस्था म्हणून विकसित होवू शकणारी वैचारिक भूमिका स्पष्ट झाली ती भूमिका स्वतंत्र भारताच्या उभारणीसाठी महाराष्ट्राला काय म्हणायचे आहे याचे प्रतिक म्हणून अ.भा. कॉंग्रेस अधिवेशनांत स्वागताध्यक्ष वसंतराव दादांच्या

भाषणांतून मांडायची असे ठरले. त्या दृष्टीने ते भाषण तयार करण्याच्या कामाला आम्ही लागलो. दुर्दैवाने त्याचवेळी कोयनेचा प्रचंड भूकंप झाला आणि ते काँग्रेस अधिवेशन सांगलीस होऊ शकले नाही. सर्व तयारी व्यर्थ गेली. स्वागताध्यक्षांचे भाषणही राष्ट्रापुढे जावू शकले नाही. परंतु पुढे वर्षभरांत राहुरीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनातील भाषणांत वसंतरावदादांनी सहकार चळवळीची पर्यायी अर्थव्यवस्था देण्याची क्षमता ही वैचारिक भूमिका मांडली, परंतु पक्षांत त्या विचारांचा पाठपुरावा पुढे झाला नाही. सहकारी चळवळीचे सरकारीकरण करण्यातच काँग्रेसच्या सत्ताधाऱ्यांनी रस घेतला. सत्तेचे राजकारण वैचारिक विकासाला बाधक ठरले.

श्री. शंकरराव देव यांच्याशी चर्चा करताना आम्ही अशीच भूमिका मांडली की, आमच्या विचारातला सहकार आम्हाला व्यवहारांत अजून आणता आलेला नाही. आता जे सहकारात काम चालले आहे. ती फक्त सुरुवात आहे. पहिली पावलं आहेत. आम्हाला कुठं जायचं आहे ते आमच्या विचारांत निश्चित आहे. दिशा नक्की आहे. आम्हांला सर्वांच्या हितसंबंधाची काळजी करणारी, संघर्षानंतर नव्हे तर पूर्ण समजून उमजून सर्वांचे हित जपणारी, को-ऑपरेटिव्ह इकॉनॉमी उभी करायची आहे. आणि ती गावोगावात भागाभागांत उभी करायची आहे. केंद्रीकरण टाळून आम्हाला विकेंद्रीत अर्थव्यवस्था मांडायची आहे. गावागावातील सारे उत्पादन सहकारी पद्धतीने कसे करता येईल? उत्पादकाला लागणाऱ्या सर्व सोईसुविधा पुरवठा, तरी सहकारी पद्धतीनें वेळच्यावेळी, खात्रीलायक पद्धतीने कसा करता येईल? पाणीपुरवठा, पतपुरवठा, खते, बियाणे पुरवठा, कारागीरांना कच्चा माल, औजारे इ. चा पुरवठा हा सर्व वेळच्यावेळी माफक खर्चात उत्पादकांना पुरविणाऱ्या विविध कार्यकारी सोसायट्या आम्हाला गावोगांव बळकट करायच्या आहेत. गावात चालणारे सर्व आर्थिक व्यवहार, उत्पादन, वितरण, खरेदीविक्री, सर्व काही सहकारी पद्धतीने करता आले पाहिजे. अगदी आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचाही पुरवठा सहकारी पद्धतीने प्रत्येक कुटुंबाला व प्रत्येक उद्योग व्यवसायाला करता आला पाहिजे.

गावाच्या सर्वांच्या गरजा व त्या भागविण्यासाठी लागणाऱ्या सेवा व वस्तू यांचे उत्पादन स्थानिक पातळीवर व्हावे म्हणूनही सहकारी चळवळीला लक्ष द्यावे लागणार आहे. गावागावाची स्वयंपूर्णता हे ध्येय ठेवलेच पाहिजे. तरच केंद्रीकरणाला आळा बसेल. एकमेकांच्या गरजा भागवून, एकमेकांचा सहकार साधून एकात्म गाववस्ती चालली पाहिजे. सहकारी ग्रामव्यवस्थेचे एक आगळे दर्शन आहे. एक नवीनच रस्ता आहे. समाज जीवनाची एक वेगळी बैठक आहे. ध्येय म्हणून ती स्वीकारून चालायची आहे.

परंतु आम्हाला सहकारी चळवळ त्या वैचारिक भूमिकेवरून चालवता आली नाही. कुत्र्याचे शेपूट जसे वाकडे ते वाकडेच रहाते. तसे सहकारांत काम करणारे कार्यकर्तेही भांडवलशाहीतील खाजगी उत्कर्षाकडेच वळले. सहकारी चळवळीची एक आचार-विचार संहिता करून ती कठोरपणे अंमलात आणता आली नाही. सहकारांतून व्यक्तीगत लाभ घेऊन जीवनमानाच्या वरच्या श्रेणीत गेलेले शिडीप्रमाणे सहकार वापरून लाथाडून देताना दिसताहेत सहकारातून बडी झालेली घराणी आता सहकार सोडून खाजगी व्यापारी, कारखानदार, यांच्या चालीने चालू लागली आहेत. खाजगी करणाच्या पालख्या वहायला लागली आहेत. संमिश्र अर्थव्यवस्था जशी शहरी औद्योगिक, संघटित समाजनिर्मितीकडेच झुकली तशी आमची सहकारी चळवळही त्याच वळणावर नेली गेली. यशवंतराव, धनंजयराव, वैकुंठभाई यांनी काढून दिलेल्या दिशा सुटल्या, ते रस्ते काळवंडून गेले. गावागावातील सहकारी चळवळीची आज काय अवस्था आहे? त्यांच्यात सहकार किती राहिला आहे? तिथे लोकांचा सहकार राहिलेला नाही. विस्कळीत लोक जागृत व संघटित करण्याची क्षमता सहकारांत आहे. संबंधित सर्वांच्या हितसंबंधात सहकार साधायचा असल्यामुळे प्राथमिक क्षेत्रातील शेतकरी शेतमजूर, कारागीर यांच्या बलाढ्य संघटना, सहकारी चळवळीनेच बांधायला हव्या होत्या, सारे प्राथमिक क्षेत्र संघटित करून दुय्यम व तिय्यम क्षेत्राकडून त्यांचे जे वसाहतवादी शोषण आजही चालू आहे ते थांबवता आले असते. शेती, शेतकरी आणि कारागिरी यांचे गेलेले वैभव आणि महत्व पुन्हा प्रस्थापित करून भारतीय अर्थव्यवस्थेचा शोषण विरहित नमुना सहकारी चळवळीतूनच गावोगांव उभा करता आला असता.

आज मात्र सहकारी संस्था या राजकारणाचे अड्डे म्हणून आम्ही चालवतो. सहकाराचे सरकारीकरण केल्यामुळे राजकारणी लोकांना सहकारी संस्था म्हणजे मधाचे पोळे वाटते. या सरकारीकरणामुळेच सहकाराची पर्यायी अर्थव्यवस्था देण्याची क्षमता संपून गेली. पब्लिक सेक्टर जसा सरकारी नोकराने तुडवून टाकला आणि खाजगी क्षेत्राला पर्याय देण्याऐवजी खाजगी क्षेत्रालाच उचलून धरणारा आधार म्हणून पब्लिक सेक्टर वापरला. तशीच अवस्था सहकार क्षेत्राचीही करून ठेवली. सत्ताधाऱ्यांनी तर गावागावातील सहकारी चळवळ ही गट तट भांडणे वाढवण्याची योजना म्हणून राबवली. आज गावागावांत त्या सहकारी दूध सोसायट्यांची काय अवस्था आहे ? एकेका गावांत ५-१०-१५ पर्यंत दूध सोसायट्या रजिस्टर केल्या आहेत. प्रत्येकाने आपला गट, आपला माणूस सांभाळायचा. मग त्या गावच्या चिंध्या झाल्या तरी चालेल. सर्व दूध सोसायट्या तोट्यांत गेल्या तरी चालतील. हे राज्यकर्ते यशवंतरावांचे नांव घेतात, काहीजण तर मानसपुत्र म्हणून मिरवितात. गावपातळीवर अनेक शाळा, सोसायट्या, इतकेच काय


NTRAO CH

पण वाडीवस्तीला ग्रामपंचायत मंजूर करताना, त्यांना गावांत सहकार, समन्वय, एकोपा नांदावा असे वाटते का? गावांत पाणी पुरवठा, पत पुरवठा, दूध विक्री, रेशनवाटप, सर्व ठिकाणी गटबाजी, वादावादी कशी वाढेल हे या नतदृष्ट राजकारण्यांनी पाहिले आहे. बारामतीजवळ तर एका गावांत १९ सहकारी दूध सोसायट्या रजिस्टर करायला मंजूऱ्या दिल्या आहेत असं मी ऐकलं. सत्ताबाजी, गटबाजी, घराणेशाही, गुंडगिरी यासाठीच राजकारण अशी त्यांची वैचारिक भूमिका. स्वातंत्र्य मिळविले कशासाठी? भारतीय घटनेची प्रतिज्ञा काय? यशवंतरावांची महाराष्ट्रउभारणीची दिशा काय होती? दृष्टी काय होती? विचारांची बैठक काय होती? याची कशाचीही जाणीव नाही. भान नाही. बेभानपणे निवडणूका लढवायच्या, साताजन्माचे वैर असल्याप्रमाणे विरोधकांना चित करायचे, सत्ता हातात आली की, पैसा, पदे, प्रसिद्धी यासाठी हापापलेल्याप्रमाणे वाटेल त्या थराला जायचे.

सहकारातून नवे गांव उभे करणे शक्य होते. एक मजबूत विविध सेवा सोसायटी, एक मजबूत दूध, अंडी, मांस, मच्छी सहकारी सोसायटी, कारागिरी, शेतमाल प्रक्रिया, खरेदी विक्री, गावचा सर्व आर्थिक व्यवहार अत्यंत कार्यक्षमतेने पाहणाऱ्या मजबूत पण मोजक्याच संस्था चालवून प्रत्येक पंचवार्षिक योजनेतून गावाचा चेहरामोहरा बदलत, विकासाच्या पायऱ्या चढत, संपन्न, स्वयंपूर्ण, स्वायत्त, सुरक्षित, एकात्म ग्रामस्वराज्याच्या दिशेने नवे गावआंदोलन चालविणे सहकारी चळवळीतून शक्य आहे.

पारतंत्र्याच्या पडझडीनंतर आपण स्वतंत्र झालो. नवराष्ट्र निर्मितीसाठी आणखी एक उदाहरण देणे मला योग्य वाटते. मराठी माणसांनी युरोपीयन लोकांची आंधळी नक्कल करू नये. पण युरोपीयन लोकांनी तीन चारशे वर्षापूर्वी त्यांचे देश जे भिकार होते, ते आज वैभवाच्या शिखरावर कसे नेले. त्यांचा अभ्यास करावा. छ. शिवरायांच्या काळांत तीन चारशे वर्षापूर्वी हे युरोपीयन लोक काय करीत होते? आपल्या देशांत समुद्राच्या काठाला व्यापारी वखारी घालून पोट भरत होते. त्यांचे देश गरीब होते. पण जगभर फिरण्याची त्यांची तयारी होती. देशोदेशीच्या व्यापारासाठी त्यांनी प्रचंड व्यापारी कंपन्या स्थापन केल्या होत्या. केवळ इंग्रजांची इस्ट इंडिया कंपनी होती असं नव्हे. स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स, हॉलंड, डेन्मार्क अशा सर्वांच्या इस्ट इंडिया कंपन्या होत्या. हिंदुस्थान आणि चीन या दोन देशांशी व्यापार करायला मिळावा म्हणून ते आपसांत लढाया करीत. चीन हिंदुस्थान यांचेशी युरोपचा व्यापार त्याकाळी मुख्यतः तुर्कस्थान मधील कॉन्स्टॅटिनोपल वरून येणाऱ्या खुष्कीच्या मार्गाने होत होता. खैबर, गिलगिट, काराकोरम या खिंडीतून ते हिंदुस्थानांत येत. १५ व्या शतकांत कॉन्स्टंटिनोपल शहर ख्रिश्चन लोकांकडून मुस्लीम राजांनी जिंकून घेतले. या घटनेचा युरोपवर विपरीत परिणाम

झाला. पूर्वेकडील व्यापारच थांबला. युरोपमध्ये हाहाकार माजला. त्यावेळी स्पेन व पोर्तुगाल ही युरोपमधील अग्रेसर राष्ट्रे होती. पोर्तुगालचा एक खलाशी उठला. वास्को-डी-गामा त्याचे नांव. समुद्र पालथे घालून आफ्रिकेला वळसा घालून तो केरळ.ध्ये उतरला. हिंदुस्थानला जायचा नवा रस्ता त्यांने शोधून काढला. पोर्तुगालमध्ये, युरोप ध्ये गुढ्या उभ्या राहिल्या, हिंदुस्थानला जायला मिळणे म्हणजे कुबेराच्या खजिन्याला भेट देणे होते. आज आपण आपल्या मुलीला नवरा शोधताना जावईबापू फॉरेन रिटर्न असेल तर केवढी छाती फुगवून सांगतो. त्या काळी युरोपातील आईबाप जावई इंडिया रिटर्न असेल तर मुलीचे साता जन्माचे कल्याण झाले असं मानीत होते. स्पेनमधला तो कोलंबस कशासाठी अनोख्या समुद्रात जहाजे घालून बसला? तोही इर्षेने उठला आणि म्हणाला, साऱ्या जगाला प्रदक्षिणा घालतो. पण हिंदुस्थानला जायचा नवा रस्ता शोधून काढतो आणि त्याला वाटेत अमेरिका सापडली. हिंदुस्थानशी व्यापार करण्यात त्यावेळचा युरोप जन्माचे सार्थक झाले असं मानीत होता.

त्यांचा धाडसी, उद्योगी, चिकाटीचा व सांघिक प्रयत्नांचा स्वभाव, चिकित्सक, संशोधक वृत्ती आणि मुख्यत: याच जन्मात पुरुषार्थ करून दाखवण्याची जिद्द यामुळे मागास युरोप तीन चारशे वर्षात जगाचा सावकार बनला. आम्ही मात्र गर्भ, श्रीमंत घराण्यात जन्माला येऊन आज जगात भिकारी बनलो आहोत. याची कारणे प्रत्येक मराठी माणसाने नीट समजून घेतली पाहिजेत. गेल्या तीन चारशे वर्षात हे युरोपीयन लोक ब्रह्मानंदी टाळी लावून हरी भजन करीत बसले नाहीत, असेल हरी तर देईल खाटल्यावरी म्हणत बसले नाहीत, त्याने जगाचा कानाकोपरा धुंडाळला, सारे समुद्र पालथे घातले. अमेरिकेचा परराष्ट्र मंत्री, जॉन फॉस्टर डल्लेस याने एक पुस्तक लिहिले आहे "वॉर ॲण्ड पीस." रशियाच्या स्टॉलस्टायचे याच नांवाने प्रसिद्ध पुस्तक आहे पण डल्लेस चे पुस्तक वेगळे. त्याने त्यात गेल्या तीन चारशे वर्षात युरोपने जग कसे जिंकले याचा उहापोह केला आहे. तो म्हणजे युरोपियन समाजाने एक त्रिशुळ हाती घेतला. मिशनरी, मर्चंट आणि मिलीटरी. "थ्री एम" हे त्या त्रिशुळाचे नांव. अनोख्या प्रदेशांत प्रथम मिशनरी पाठवायचे. मग मर्चंट व्यापारी जायचे. तिथल्या लोकांच्या मन:स्थितीचा आणि परिस्थितीचा पूर्ण अभ्यास करायचे. आणि मग साम, दाम, दंड, भेद असा चौफेर हल्ला करणारी मिलिटरी वापरून तो प्रदेश जिंकून घ्यायचा मिशनरी मर्चंट आणि मिलिटरी हा त्यांचा त्रिशुळ तो प्रदेश जिंकून घेतल्यानंतर केवळ ओरबडून खात बसले नाहीत. तेथील कच्चा माल, मजूर माती मोलाने वापरून आपल्या देशांत कारखाने चालवीत. उपयोगी कल्पक लोक. पाण्यापासून वाफ, वीज त्यांनी शोधून

काढली. मनुष्य शक्ती, बैल, घोड्याची शक्ती नव्हे तर वीज, वाफ यांची शक्ती त्यांनीच शोधली. लोखंडाची यंत्रे शोधून त्यावर नवे प्रचंड उत्पादनाचे कारखाने चालविले. ते उत्पादन जिंकून घेतलेल्या प्रदेशात हक्काची बाजारपेठ म्हणून दामदुपटीने विकले. असा उद्योग ते गेली तीन-चारशे वर्षे करताहेत. युरोपियन लोकांनी संपत्तीचे ढीग उभे केले. एवढेच नाही तर जिंकून घेतलेल्या अनेक प्रदेशात तेथील स्थानिक लोक मारून टाकले. त्यांचे विशाल देश जिंकून तेथे बोटी भरभरून युरोपातील माणसे लाखाने पाठविली. तेथे नव्या वस्त्या, गावे वसविली युरोपच्या भूमीवरचा भार हलका केला. पुढच्या १०-२० पिढ्यांना पुरेल एवढा जमीनजुमला त्यांनी करून ठेवला आहे.

काही वर्षापूर्वी ऑस्ट्रेलियातील दोन मुली आमच्याकडे आल्या होत्या. १६-१७ वर्षाच्या तरुण मुली जग पहायला एकट्या-दुकट्या हिंडत होत्या. त्या जेवायला माझ्याकडे आल्या असतांना मी त्यांना आपल्या पद्धतीने विचारले "वडील काय करतात?" त्या म्हणाल्या "शेतकरी आहेत" पुन्हा विचारले "किती जमीन आहे ?" एकजण म्हणाली "१० हजार एकर." दुसरी म्हणाली "१५ हजार एकर." आम्ही पहातच राहिलो. आमच्या ४-६ गांवाजवळ जेवढी जमीन नाही तेवढी तिथे एकेका शेतकऱ्याजवळ आहे. असे कसे? तर ३-४ पिढ्यापूर्वी त्या मुलीचे आजोबा, पणजोबा युरोपातून तिथे वसाहत करावयाला गेले. आणि तिथले आदिवासी मारून तिथे अशा प्रचंड जमिनी ताब्यात घेऊन राहिले. आज तिथे इमीग्रेशनचे कायदे करून इतरांना देशांत वस्ती करून देत नाहीत. ते सर्व शेती यंत्राने करतात. शेळ्या, मेंढ्या, गाई, घोड्यांचे प्रचंड कळप पाळतात. शेतात मध्यवर्ती त्याचे घर, सर्व यंत्र सामुग्री, ३०-४० मैलावर एक बाजारपेठ, तिथे मोटारीने किंवा हेलिकॅप्टरने बाजारहाट करायला जातात. अशा कुटुंबियातील त्या मुली आता संसार करताना मुलेही कमीच जन्माला घालतात. युरोपात तर एक दोन मुले. गेल्या तीन-चारशे वर्षात ही युरोपियन मंडळी असा संसार करतात. आम्ही कसा संसार करीत आहोत. पहिला आमचा पक्का समज ब्राह्मण धर्माने करून दिला आहे की हे जग मायाजाल आहे. हा जन्म क्षणभंगुर आहे. इथे काही मिळवायचे नाही. जे मिळवायचे ते वर गेल्यावर. मेल्यावर. आपण करतो म्हणून इथे काही मिळत नसते. नशिबात असेल तर मिळते. देवाच्या मनात असेल तर मिळते. म्हणून देवाचे भजन, पूजंन करीत बसावे. उगीच मृगजळाच्या मागे धावू नये. "असेल हरी तर देईल खाटल्यावरी" म्हणून खाटले सोडू नये. खाटल्यावरचा उद्योग मात्र चालूच ठेवला. किती मुले जन्माला घालावीत हे आपल्या हातात थोडेच असते? तो वर बसला आहे. त्याच्या मनात असेल तर खंडीवर पेंढी सुद्धा देईल. म्हणजे २० वर एक २१ पोरेही

जन्माला येतील "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव " हा तर देवा-ब्राह्मणांचा आशिर्वादच होता. देवाची करणी नारळांत पाणी. भरमसाट प्रजा जन्माला घातली. कुठला नवीन प्रदेश जिंकला नाही. हजारो वर्षात हिंदुस्तानचा मनुष्य दुसऱ्याच्या भूमीवर त्याने पाय ठेवला नाही. नवा उद्योग शोधला नाही. ब्रह्मानंदी टाळी लावून मुक्तीची वाट पहात मरून जायचे. खंडीवर पेंडी किंवा अष्टपुत्रपुत्री जन्माला घालून जायचे.

युरोपीय लोक आमच्या दारातील व्यापारी होते. ते जगाचे मालक, सावकार झाले. आम्ही तीन-चारशे वर्षापूर्वी सावकार होतो. ते आज भिकारी झालो. हे का ? व कसे? हे समजून घेतले तर नव महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी काय केले पाहिजे हे वेगळे सांगायची गरज पडणार नाही. महाराष्ट्रातील मराठी मनाची "अटकेपार झेंडे नेले तरी संध्याकाळी घराकडे" ही पेशवाई मनोवृत्ती सोडली पाहिजे. हा हातातला एकच जन्म आहे. स्वर्ग किंवा नरक इथेच जन्मातच भोगायचा आहे. तो आपल्या गुण कर्तृत्वावर अवलंबून आहे. लाथ मारीन तेथे पाणी काढीन, अशा इर्षेने समर्थ संसार करण्याचा आत्मविश्वास वाढवून संसार केला तर आपणही या महाराष्ट्राचे आनंदवन करू शकतो.

मनुष्य शक्ती, अश्व किंवा बैल शक्ती या बरोबर वाफ, वीज, पवन, सूर्यशक्ती आणि अलीकडील अणुशक्ती ही सामर्थ्य पाश्च्यात्यांनी शोधून कामाला लावली आहेत. सूर्यशक्तीतील अजून अनेक किरणांची शक्ती पूर्णत: कब्जात आलेली नाही. परलोक वादाच्या भ्रमातून जागे होऊन आपणही इहवादात आपले लक्ष केंद्रीत केले. भौतिक जगातील सृष्टीतील सत्य शोधायला लागलो, तर प्राचीन ऋषीमुनींनी ज्या अनेक निसर्ग शक्तीची दर्शने घेतली होती. त्या साऱ्या शक्तींचा साक्षात्कार आपणांसही झाल्याशिवाय राहणार नाही. अर्थात शोधापेक्षा शोधक इहलोकातच घट्ट पाय रोवून राहिला पाहिजे. खरे सुख, खरा आनंद कशात आहे हे त्याला मनोमन समजले असले पाहिजे. आत्मज्ञानाच्या भक्कम बैठकीवर दृढ उभे राहूनच त्याला विज्ञान तंत्रज्ञानाची "अस्त्रे" कौशल्याने हाताळता आली पाहिजे.

अज्ञान, आळस, अहंकार, भेदाभेद, रूढी ग्रस्तता, यातून आपल्या भोवतीचे जग, समाज, निसर्ग आणि आपण स्वत: यांचे वास्तव दर्शन आपल्याला होत नाही. आत्मज्ञान, दृष्टीज्ञान याचे वास्तव भान आपण ठेवीत नाही. ब्राह्मण धर्माची मानसिक गुलामगिरी, मुस्लीम व ब्रिटीश राजवटीतून वाढलेली सत्वहीन राजकीय गुलामगिरी यामुळे दुसऱ्याच्या आधाराशिवाय आमचे मन उभेच राहात नाही. लाचारी, अनुकरण प्रियता आणि जनावरी सुखलोलुपता यामुळे आम्ही अस्मिता घालवून असलो आहो. स्वातंत्र्यानंतर या सर्व दोषापासून मुक्त झालेला मानसिक षड्रिपूवरही विजय मिळविणारा,

सत्यशोधक, सत्याग्रही, कर्तृत्ववान मराठा कसा तयार करावयाचा याचा ध्यास महाराष्ट्राने घेतला पाहिजे. महाराष्ट्राची या पुढची, जडणघडण ही मराठी मनाच्या अशा जडणघडणीवरच अवलंबून आहे. आजचे भाषण इथेच थांबवितो. मा. अध्यक्ष व आपणा सर्वांचे आभार.

दि. १३ मार्च १९९५

- प्राचार्य पी. बी. पाटील
सांगली

# '' महाराष्ट्राची जडण-घडण आणि यशवंतराव ''

व्याख्यान मालेतील शेवटच्या सत्राचे अध्यक्ष आणि नागरिक बंधू भगिनींनो,

स्वातंत्र्यानंतर देशाच्या जडणघडणीचे मुख्य साधन शासनसंस्था हेच आहे. जी काही स्वातंत्र्याची उद्दीष्टे होती, नवराष्ट्र निर्मितीची जी स्वप्ने होती, जी नवी जडणघडण करायची होती, त्यासाठी मुख्य साधन राज्यसत्ता हेच आहे. आधी समाज सुधारणा की, आधी राजकारण या टिळक, आगरकरांच्या वेळच्या वादाचा, ''अगोदर स्वातंत्र्य मिळवू या, आपल्या देशाची राजकीय सत्ता हातात घेऊ या, मग आपल्या समाजातील जे काही सामाजिक, आर्थिक प्रश्न असतील ते प्रश्न सोडवू'' असाच निकाल घेतला गेला होता. समाजातील विविध प्रश्नांच्या सोडवणूकीला राजकीय सत्ता हातात घेतल्यानंतरच वेग देता येईल. सत्ता हे परिवर्तनाचे मोठे साधन आहे, ही भूमिका, हा विश्वास अनाठायी नव्हता आणि नाही. गुलामगिरीत ज्या गोष्टी करता येत नाहीत, त्या गोष्टी राज्य चालविण्याची सार्वभौम सत्ता हातात घेऊन सहज करता येतील. त्याप्रमाणे आपण आपली राज्यघटना तयार केली. राज्यव्यवस्थेची मांडणी केली. केंद्र व घटक राज्यांत कामाची वाटणी केली. अधिकार, सत्ता, पैसा, कारभार यंत्रणा यांचीही मांडणी केली. आणि आपण नवभारताच्या जडणघडणीच्या कामाला लागलो.

"के. यशवंतराव चव्हाण यांनी सत्तेशिवाय राजकारण केले नाही, ते नेहमी सत्तेच्या बाजूने राहिले." असा एक कुत्सित सूर काही मंडळी काढतात. ग्रामीण, गरीब मागास लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठीच राजकारण करायचे असते आणि स्वातंत्र्यानंतर लोकशाही पद्धतीने सत्ता हातात घ्यावी आणि ती लोकांचे प्रश्न सोडवायला वापरावी. सत्तेशिवाय लोकांचे कैक पिढ्यांचे प्रश्न सोडवता येणार नाहीत, या भूमिकेत गैर काय आहे? अर्थात ही टीका मत्सरांतून केलेली होती. बोडकीने गरतीच्या शयनगृहाची उठाठेव करण्यासारखीच ती टीका होती.

अर्थात लोकशाही राज्यसंस्थेची सत्ता ही समाजाच्या जडणघडणीला नवसमाजनिर्मितीला, मुख्य साधन म्हणून उपयोगाची आहे. इथपर्यंत सत्ता परिवर्तनाचे साधन हे बरोबर वाटते. परंतु राज्यसंस्थेचे लोकशाही स्वरूप विस्कळीत झाले किंवा लोकशाहीच राहिली नाही तर "सत्ता परिवर्तनाचे साधन" होईलच याची खात्री नाही. इतिहासांत अनेक राजेशाह्या, सुलतानशाह्या, हुकूमशाह्या होऊन गेल्या. तिथे सत्ता हे जुलूम जबरदस्तीचे, प्रजेला छळण्याचे, गुलाम करण्याचे प्रमुख साधन बनले आहे.

लोकशाही राज्यव्यवस्था ही लोकांची, लोकांसाठी, लोकांकडूनच राबवली जाणारी सत्ता आहे, असं आपण म्हणतो. प्रातिनिधीक लोकशाही ही राजकीय पक्षावरच उभी असते. वेगवेगळ्या लोकशाहीच्या देशहिताच्या गोष्टीवर लोकमत जागृत व संघटित करण्याचे महत्वाचे काम राजकीय पक्षांनी करायचे असते. राजकीय सत्ता ही कायदे करून, योजना आखून काम करीत असते. या राजसत्तेला लोकांची अनुमती व लोकशक्तीची जोड राजकीय पक्षांनी मिळवून द्यायची असते. त्यामुळे कायदा आणि लोकमत, राजसत्ता आणि लोकसत्ता दोन्हीही शक्ती देशाच्या जडणघडणीला लावण्याचे कार्य लोकशाही राज्यव्यवस्थेत केले जाते. निदान केले जावे अशीच अपेक्षा आहे. जनतेच्या विश्वासाचे राज्यकर्ते त्यामुळेच समाजपरिवर्तनाच्या कामास गती देऊ शकतात. यशवंतरावांनी आपल्या कारकिर्दीत हे साधून दाखवले आहे.

एक गोष्ट मीही मान्य करतो की, स्वातंत्र्यानंतर समाजाच्या जडणघडणीसाठी राज्यसत्तेवर आपण अधिक विसंबून राहिलो आणि जागृत व संघटित लोकशक्ती कार्यप्रवण करण्यात कमी पडलो, अर्थात आपण कमी पडलो म्हणजे राजकीय पक्ष कमी पडले. प्रातिनिधीक लोकशाहीच्या राजकारणांत राजकीय पक्षांना अनन्य साधारण महत्व आहे. प्रातिनिधीक लोकशाहीचे आधारस्तंभ राजकीय पक्षच आहेत. राजकीय पक्षांची राज्यशास्त्रांत निश्चित व्याख्या आहे. लोकहिताचा, देशबांधणीचा काही निश्चित ध्येयवाद, विचार, धोरण पक्षाला हवे, तो ध्येयवाद धोरण अंमलात आणणारा, व्यवहारी

पण निश्चित असा कार्यक्रम पक्षाजवळ हवाच. तो ध्येयवाद व राष्ट्रीय कार्यक्रम यावर निष्ठा ठेवून कार्यरत होणारे जास्तीत जास्त अनुयायी सदस्य, कार्यकर्ते पक्षाने संघटित केले पाहिजेत. आणि पक्षाच्या ध्येयवादाने भारलेले आचारविचारांचा आग्रह धरणारे, अनुकरणीय, विश्वासू, प्रेरक असे नेतृत्वही पक्षाजवळ पाहिजे. ध्येयवाद, कार्यक्रम, नेते व अनुयायी या चार गोष्टी एकत्र आल्याशिवाय राजकीय पक्षनिर्माण होत नाही. असं राज्यशास्त्र सांगते. आणि असेच राजकीय पक्ष हे प्रातिनिधीक लोकशाहीचे आधारस्तंभ असतात.

आम्ही लोकशाहीचा सिद्धांत स्वीकारला. सार्वभौम सत्ता लोकांची हे तत्व मनापासून स्वीकारले पण लोकशाहीचा सिद्धांत व्यवहारांत आणताना मूळ तत्वाशी तडजोड करून, युरोपियन पद्धतीची प्रातिनिधीक लोकशाही स्वीकारली. मोठी लोकसंख्या, मोठे देश असल्यामुळे लोक प्रत्यक्ष शाही चालवू शकत नाहीत, म्हणून पर्याय काढला. लोकांनी आपले प्रतिनिधी निवडावेत. त्या प्रतिनिधींनी राज्यकारभार करावा आणि लोकांनी त्यातच समाधान मानावे अशी मूळ तत्वाशी तडजोड करुन, युरोपियन पद्धतीची प्रातिनिधीक लोकशाही स्वीकारली. मोठी लोकसंख्या, मोठे देश असल्यामुळे लोक प्रत्यक्ष शाही चालू शकत नाहीत, म्हणून पर्याय काढला. लोकांनी आपले प्रतिनिधी निवडावेत. त्या प्रतिनिधींनी राज्यकारभार करावा आणि लोकांनी त्यातच समाधान मानावे अशी मूळ तत्वाशी तडजोड केली. लोकशाही ऐवजी लोकप्रतिनिधीशाही असा पर्याय आपण स्वीकारला. आणि या पर्यायी लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षांना मोठे महत्व आले. लोकशाही, राजकीय पक्ष व देशाची जडणघडण यांचे हे नाते चव्हाण साहेबांनी सांभाळले. पक्ष मोडून राजकारण करणाऱ्या इंदिरा गांधींशी मतभेदही केले. १९६९ नंतर शिस्तबद्ध पक्षाचे राजकारण मागे पडले. पैशाचे राजकारण सुरू केले गेले.

राजकीय पक्षांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही. आपल्याच ध्येयवादावर लोकमत जागृत व संघटित करून देशाच्याजडणघडणीच्या कामात राज्यसत्तेबरोबर लोकशक्तीचा सहभाग हवा तेवढा मिळवला नाही. भारतीय राज्यघटनेची शपथ घेतात पण त्या घटनेतील उद्दीष्टांची त्यांना आठवण रहात नाही. स्वतःच्या पक्षाच्या ध्येयवादाशीही ते प्रामाणिक रहात नाहीत. ध्येयवादाचे सामाजिक, आर्थिक, परिवर्तनाचे देशाच्या जडणघडणीचे राजकारण ते करीत नाहीत. तर संकुचित स्वार्थासाठी पदे, पैसा, प्रसिद्धी मिळवण्यासाठी सत्ताबाजीचे राजकारण करतात. त्यासाठी पक्ष बदल करून 'आयाराम गयाराम'चे संधीसाधू राजकारण करतात. या राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या पुढाऱ्यांनी राजकारणाचे व्यापारीकरण केले. गुन्हेगारीकरण केले. काहीजण तर

अतिरेकीकरण करायलाही मागेपुढे पहात नाहीत. साऱ्या राजकीय पक्षांनी आपल्या चिंध्या करून घेतल्या आहेत. तत्वहीन, संधीसाधू राजकारण करून भारतीय लोकशाही अराजकाच्या भोवऱ्यात येऊन सापडली आहे, असे आज आपल्या अनुभूतीस येत आहे.

महात्मा गांधींच्या सेवाग्राम येथील ''बापूकुटी'' च्या दारावर, सात पापे कोणती ते लिहीले आहे. त्या सात पापामध्ये तत्वहीन राजकारण हे प्रथम क्रमांकाचे महापाप असे लिहीले आहे. हे महापाप स्वतंत्र भारतातील सर्व राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांनी केले आहे. त्या त्यांच्या पापांची फळे भोगायची पाळी भारतीय जनगणाला आली आहे. राजकीय पक्षाच्या तत्वहीन सत्ताबाजीच्या राजकारणांमुळे नवभारताच्या उभारणीमध्ये प्रचंड अडथळे आणि प्रश्न निर्माण झाले आहेत. परिवर्तनाचे, उभारणीचे, नवभारत निर्मितीचे मुख्य साधन म्हणून आपण राज्यसत्तेकडे पहातो, तिथेच राजकीय पक्षांनी ही अनागोंदी चालविल्यामुळे ऐन लढाईच्यावेळी दारुगोळा पाण्यात टाकल्यासारखे झाले आहे. सारेच पक्ष ''इझम'' बोलतात, कुणी ''कॅपिटॅलिझम'' कुणी ''कम्युनिझम'' कुणी ''सोशॅलिझम'' तर कुणी ''डेमोक्रॅटिक सोशॅलिझम''च्या नावाने पक्ष काढतात. काहीजण तर ''हिंदुइझम'', शिखीझम, '' मुस्लीम फंडामेंटॅलिझम'' असेही बोलतात. लोकांची दिशाभूल करतात. पहिली २०-२५ वर्षे या दिशाभूलीत गेली असता सारेच इझम विरले आहेत. सर्वांनी आता एकच इझम व्यवहारांत आणला आहे तो म्हणजे ''ऑपॉर्च्युनिझम'' संधीसाधूपणा. देशातील आजच्या अराजकसदृश्य परिस्थितीचे मुख्य कारण हा राजकीय पक्षांचा सत्ताबाजीसाठी चाललेला संधीसाधूपणा आहे. त्यामुळे बांधणीचे, जडणघडणीचे मुख्य काम बाजूला पडले आहे. सर्व बाज्यामध्ये ही सत्ताबाजी भयंकर. तिला महापाप म्हटलंच आहे, बाकीच्या बाज्या व्यक्ती किंवा कुटुंब उध्वस्त करतील पण ही सत्ताबाजी सारा देश उध्वस्त करते. सारा समाज बेबंदशाहीत ढकलून देते. सत्तेसाठी काहीही करणेस हे पक्ष तयार आहेत. संस्कृतमध्ये ''कामातुराणाम् न भयं न लज्जा'' असं एक सुभाषित आहे. आता म्हटले पाहिजे ''सत्तातुराणाम् न भयं न लज्जा''. देश चालवण्यासंबंधीचा आपला विचार, ध्येयवाद, कार्यक्रम निश्चितपणे लोकांपुढे ठेवावा. लोकशिक्षण करावे, जागरण करावे, लोकमत घडवावे, बनवावे आणि ते आपल्या पक्षाच्या पाठीशी संघटित करावे. प्रातिनिधीक लोकशाहीत राजकीय पक्षाचे हे मुख्य काम. परंतु असे लोकशिक्षण, प्रबोधन करून लोक आपल्या पाठीशी घेण्याची गरज वाटत नाही. त्यापेक्षा लोकांची खुषमस्करी करण्याच्या क्लृप्त्या प्रत्येक पक्ष करीत असतात. कोणी धर्म वापरतो, कुणी जातीजमाती वापरतात, कुणी पैसा वापरतो, विचार जागृत करण्यापेक्षा विकार, दुराभिमान जागवण्यांत प्रत्येकजण आघाडी घ्यायला पहातो आहे.

म. गांधीनी राजकारणाचे आध्यात्मीकरण केले ते काही जणांना प्रतिगामी वाटते. सत्यशोधक, सत्याग्रही राजकारण, पुरोगामीतत्वाच्या नावाखाली सत्ताशोधक, संपत्तीशोधक अवस्थेत खाली घसरले. म. गांधीचे नांव घेऊन राजकारण करणारांनीही व्यवहाराच्या नांवाखाली राजकारणाचे व्यापारीकरण, बाजारीकरण केले.

म. गांधींच्या नीतीच्या, तत्वाच्या, आध्यात्मावर आधारीत, सत्याग्रही राजकारणाला विकृत करून काही जणांनी सोदेगिरी केली आहे. राजकारणांत धर्मजाती घुसडण्याचा प्रयत्न चालवला आहे. धर्मांध, जात्यांध राजकारण सत्याचे होत नाही. मुस्लीम, शीख, हिंदु, ख्रिश्चन धर्माच्या आरोळ्या ठोकून काहींनी राजकारण चालवले आहे. ते सारे बॅ. जीनांचेच अनुयायी होत. धर्मातीत राष्ट्र अमान्य करून धर्माधिष्ठीत राष्ट्र, हा बॅ. जीनांचा विचार, आर. एस. एस. वाले, खलिस्तानवाले आणि ''इस्लाम खतरेमें'' अशा घोषणा देणारेआजही करत आहेत. भारतीय संस्कृतीतील विविधतेतील एकता, हे शिवधनुष्य ज्यांना पेलत नाही. ते हे सारे आधुनिक रावणाचे वारसदार आहेत. गांधींचा देवधर्म, आध्यात्म यावरील विश्वास आंधळा नव्हता. तो सत्याग्रही होता. देवधर्म जातीच्या नावातून राजकारण साधू इच्छिणारे आजकालचे धर्मवादी यांना देव, धर्म, आध्यात्म सत्ताबाजीसाठी वापरायचे आहे. आजचे ''अधर्मी आणि धर्मांधी'' दोघेही सत्याग्रही नाहीत. ते असत्याग्रही आहेत, संपत्ती शोधक आहेत, तत्वहीन राजकारणांतले ते संधीसाधू (सत्ताबाज) आहेत.

सत्तेच्या राजकारणासाठी आर्थिक, सामाजिक सुधारणेचा ध्येयवाद टाकून देव धर्म जातीजमाती वापरण्याची स्पर्धाच देशांत चालू आहे. जातीधर्म निरपेक्षतेचा उद्घोष करायचा आणि जाती, धर्म संघटनांचे मेळावे भरवीत सुटायचे. निवडणुकीतली तिकीटे जातीधर्मावर वाटायची. निवडणुकातील मतांसाठी जातीधर्म जमाती गोंजारत बसायचे. आमक्या जातीचा एक माणूस मंत्री केला की, त्या सर्व जातीचा उद्धार झाला, त्यासंबंधीचे कार्य पार पाडले अशा साळसूद समजूतीचे राजकारण चालले आहे. समाज परिवर्तनाच्या पुढे ज्या अडचणी आहेत, जे दोष आहेत, ते दोष, त्या अडचणी हाच काही मंडळींच्या राजकारणाचा आधार झाला आहे. गरीबी, जातीपाती, मागासपण यांच आधारावर जे राजकारण करतात, ते आपले आधार सुरक्षित आणि भक्कम करण्याचाच प्रयत्न करतात. ते आणि मग हे असले राजकारण समाजपरिवर्तनात देशाच्या जडणघडणीत धोंड म्हणून आडवे पडते. पुढे जायचा रस्ताच अडतो आणि राजकारणाबरोबर सारा समाज, सारा देश घोटाळ्यांत पडतो. मते आणि मदत यासाठी काहीही करत सुटायचे, असले राजकारणी यशस्वी म्हणून मिरवू लागले.

सत्तेच्या राजकारणाला, संपत्तीचे राजकारण, पैशाचे राजकारण जोडले जातेच. राजकारणांतील सत्तापदे मिळवायला पैशाचे राजकारण सुरू होते. सत्तापदे मिळाली की दामदुपटीने पैसा गोळा केला जातो. राजकारणी, राज्यकर्ते, प्रशासक, अर्थसंस्था, पतसंस्थांचे पदाधिकारी यांची एक विशेष साखळी, साऱ्या अर्थव्यवस्थेला वेटोळे घालून बसते. त्यांतून हर्षद मेहतासारखा ''महाबैल'' शंकराच्या नंदीप्रमाणे विशेष स्थान प्राप्त करतो. बाकीचे बैल, कुणी नंदीबैल म्हणून, काही वळू बैल म्हणून, गावोगाव हिंडत असतात. हर्षद मेहतासारखे सहा हजारकोटी रुपये दिवसाढवळ्या लुटणारे, उचले आणि बुडवे यांचा सुळसुळाट त्या विशेष साखळीच्या संरक्षणांत होत असतो.

राजकारणात सत्ताबाज संधीसाधू,अर्थकारणांत उचले आणि बुडवे, तसे धर्मकारणांत बडव्यांचा सुळसुळाट झाला की, अराजकांचे कडे पूर्ण होत असते. अयोध्येचे राममंदीर प्रकरण त्याचे अगदी ताजे उदाहरण आहे. १५ व्या शतकांत बांधलेली आणि आज सोडून दिलेली मशीद, ती पाडायचे धर्मकार्य आर.एस.एस. च्या कारसेवकांनी केले. तिथे आता राममंदीर बांधायला गावागावातून ''रामशिला'' या नांवाने विटा गोळा करायच्या. त्याच्या प्रचारासाठी रामरथ देशभर फिरवायचा. केवढे हे धर्मकार्य आणि केवढी ही रामभक्ती, गावातील राममंदीरच नव्हे, तर अनेक देवदेवतांची मंदीरे पडून झडून त्यांच्या आवरांत हागंदारी झाली आहे. त्याकडे पिढ्यान् पिढ्या कुणी लक्ष देत नाही. पण मशीद पाडून त्याच ठिकाणावर राममंदीर उभारण्याने हजार वर्षांचा इतिहास ते बदलणार आहेत. लोकांना मूर्ख समजून त्यांच्या धर्म भावनांचा राजकारणांसाठी असा उपयोग करण्याची कुटील, चाणक्य नीती आर. एस. एस. ने चालविली आहे. खरं म्हणजे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्राबद्दल साऱ्या हिंदूंना आदर आहे. श्री राम काही केवळ आर. एस. एस. च्या ओळखीचा नाही. आमच्याही ओळखीचा, भक्तीचा श्री राम आहे. पण आमचा श्रीराम वेगळा, त्यांचा श्रीराम वेगळा. जनगणांच्या मनांतील श्रीराम, म. गांधीच्या समाधीवर कोरलेला आहे. ३० जानेवारी १९४८ ला दिल्लीच्या बिर्ला मंदीरात श्रीरामाची ''रघुपती राघव राजाराम'' ही प्रार्थना करायला गांधीजी निघाले असताना, प्रार्थना स्थलावर त्यांना आर. एस. एस. च्या नथुरामाने गोळ्या घातल्या. तिथेच गांधीजी कोसळले. प्राण सोडताना त्यांनी शेवटचा शब्द उच्चारला ''श्री राम''. तो श्रीराम आमच्या ओळखीचा, आमच्या भक्तीचा पण बाबरी मशीद पाडून रामाचे देऊळ बांधू म्हणणारा तो श्रीराम नव्हे. तो नथुराम आहे. धर्मकारणात अशाच बडव्यांची आज चलती झाली आहे.

इंग्रजीत एक सुभाषित आहे ''पॉलिटिक्स इज ए गेम ऑफ स्काऊंड्रल्स''

''स्काऊंड्रल'' या शब्दाचे भाषांतर बहुतेकजण बदमाश असे करतात. मी आपला खेड्यातला माणूस. मी त्या शब्दाचं भाषांतर ''भडवा'' असं करतो. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या भाकिताप्रमाणे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २५-३० वर्षात, भारताच्या धर्मकारणांत बुडवे, अर्थकारणांत उचले आणि बुडवे आणि राजकारणांत भडवे यांचेच प्रस्थ आज फार वाढले आहे.

दुसरे महायुद्ध संपले. इंग्लंडमध्ये लगेच निवडणूका झाल्या. मजूर पक्षाचे अॅटली पंतप्रधान झाले. युद्ध जिंकून देणाऱ्या चर्चिलला सत्तेवरून उचलून विरोधी पक्षाच्या बाकावर इंग्लिश मतदारांनी बसविले. पंतप्रधान अॅटली यांनी हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देण्याची घोषणा १९४५ साली केली. १९४२ ला, ''चले जाव''. ''इंग्रजांनो हिंदुस्थान सोडून चालते व्हा'' अशी काँग्रेसने मागणी केली होती. आणि बरोबर तीन वर्षांनी ब्रिटीश पंतप्रधानाने तिथल्या पार्लमेंटमध्ये जाहीर केले, ''आम्ही हिंदुस्थान सोडून जातो. हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देतो''.

या ऐतिहासिक घोषणेवर, विरोधी बाकावरील विन्स्टन चर्चिल यांनी अत्यंत कठोर शब्दांत टीका केली. हिंदी लोकांच्याबद्दल चर्चिलने त्यावेळी काढलेले उद्गार मी मुद्दाम तुम्हाला वाचून दाखवतो. तो म्हणाला, ''पॉवर वुईल गो इन टू द हॅण्डस् ऑफ रास्कल्स, रोगझ अॅण्ड फ्रीबूटर्स. नॉट अ बॉटल ऑफ वॉटर ऑर ए लोफ ऑफ ब्रेड शाल एस्केप टॅक्सेशन. ओन्ली द एअर वुईल बी फ्री अॅण्ड द ब्लड ऑफ दीज हंग्री मिलियन्स वुईल बी ऑन द हेड ऑफ मि. क्लेमंट अॅटली. दीज मेन ऑफ स्ट्रॉ ऑफ ह्यूम नो स्ट्रेस वुईल बी फाऊंड ऑफ्टर फ्यु इयर्स. दे वुईल फाईट अमंग देमसेल्वज् अॅण्ड इंडिया वुईल बी लॉस्ट इन पोलीटिकल स्कॉबल्स.''

चर्चिलच्या तिरस्कारानं भरलेल्या भाषणाचा अर्थ असा, ''चोर, बदमाश आणि भुक्कड लोकांच्या हातात सत्ता जाईल. घोटभर पाण्यावर आणि भाकरीच्या तुकड्यावरही ते कर बसवतील. फक्त हवा मोकळी राहील. आणि या आधाशी, भुकेल्या कोट्यावधी लोकांचे पाप, मिस्टर क्लेमेंट अॅटलीच्या माथ्यावर बसेल. हे इंडियन्स केरकचऱ्याच्या लायकीचे असून, स्वातंत्र्यानंतर थोड्याच काळांत त्यांचे कस्पट सुद्धा दिसणार नाही. आपसांत झगडे, दंगली आणि कळवंडी करून, जो अराजकाचा भोवरा निर्माण करतील, त्यांत हिंदुस्थान बुडून नष्ट होईल.''

आमच्याबद्दल, हिंदी लोकांबद्दल निदान हुजूर पक्षीय इंग्लिश लोकांत किती तिरस्काराची, तुच्छतेची भावना होती, याचा हा एक नमुना आहे. आमच्यावर राज्य

करताना ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या मनांत मावरी, निग्रो अगर रेड इंडियन्स या आदीवासी लोकांच्यापेक्षा फार वेगळी भावना नव्हती. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ३०-४० वर्षात आमचे राज्यकर्ते, चर्चिलचे भाष्य खरे करून दाखवायला लागलेत काय? असं वाटतं आहे. स्वातंत्र्य मिळवणाऱ्या पिढीनंतर जी दुसरी राजकर्त्यांची पिढी सर्वच राजकीय पक्षांतून पुढे येत आहे, त्यांच्या निष्ठा, विचार, तत्वे, ध्येयवाद यावर किती? आणि पदे, पैसा, प्रसिद्धी यावर किती? याची प्रत्यक्ष चाललेल्या व्यवहारांत जी प्रचिती येते त्यातून चर्चिल खरा ठरेल काय? याची भीती वाटते.

तत्वांची, विचारांची निश्चित भूमिका घेऊन महाराष्ट्र चालविणारे राजकारणी यशवंतरावांच्या बरोबरच संपले असं दिसतं आहे. चव्हाणसाहेबांच्या बरोबर माझी झालेली पहिली मुलाखत मला आठवते. १९६१ चा डिसेंबर महिना होता. मी इंग्लंडहून बोटीने परत आलो होतो. लंडन युनिव्हर्सिटीत "समाजविकास" या विषयाचा अभ्यास संपवून मी आलो होतो. मुंबईत मी सकाळी १० च्या सुमारास बोटीतून उतरलो आणि मला आश्चर्य वाटले. मला घ्यायला आलेल्यामध्ये, आमच्या शिराळा तालुक्यातील चिखलीचे आनंदराव तात्या होते. सर्व सामान बॅगा घेत असतानाच तात्यांनी सांगितले "चव्हाणसाहेबांनी तुम्हाला बोलाविले आहे." मला मोठे आश्चर्य वाटले. "कधी ? कुठे ?" मी थोडे गोंधळूनच विचारले आणि अगदी तसेच बोटीवरून तात्या मला सचिवालयातील मुख्यमंत्र्याच्या चेंबरमध्ये घेऊन गेले. त्यापूर्वी माझी चव्हाणसाहेबांना थोडी माहिती होती. पण समोरासमोर चर्चा अशी ही पहिलीच वेळ होती. त्यांनी माझ्या प्रवासाची अभ्यासाची चौकशी केली. २०-२५ मिनीटे आम्ही बोलत होतो. पुढे काय करणार? या त्यांच्या प्रश्नातून चर्चा राजकारणाकडे वळली. खरं म्हणजे त्यावेळेपर्यंत मी काँग्रेसशी संबंधीत नव्हतो. मी विद्यार्थी दशेत राष्ट्रसेवादलात होतो. आचार्य जावडेकरांच्या सान्निध्यात होतो. भूदान चळवळीतही भाग घेतला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत १९५७ च्या निवडणुकात काँग्रेसच्या विरोधी काम करून, शिरोळ तालूक्यातून श्री. सा. रे. उर्फ आप्पासो पाटील यांना दे. भ. रत्नाप्पा आण्णाच्या विरोधी निवडून आणण्यात सहभागी झालो होतो. त्यामुळे आणि सत्यशोधक चळवळीपासून चालत आलेल्या "शेडजी, भटजी" च्या वर्चस्वाबद्दल मनांत राग आणि अविश्वास असल्यामुळे, काँग्रेसबद्दल मनांत दुरावाच होता. परंतु म. गांधींचे आकर्षण, शेडजी, भटजींचे वर्चस्व मोडून महाराष्ट्रातील सामान्य माणसाचा आत्मविश्वास वाढवल्याबद्दल चव्हाणसाहेब यांच्याबद्दलही फार आदर वाटत होता.

लंडनमधून जगाकडे आणि आपल्या देशाकडे पाहताना तुम्हाला काय वाटले? असा एक प्रश्न चव्हाणसाहेबांनी विचारला आणि मी प्रामाणिकपणे म्हटले, साहेब तेथे

गेल्यानंतर एक वेगळाच चित्रपट दिसतो. जमिनीवरून डोंगराकडे पहाताना व डोंगरावरून खाली जमिनीकडे पहाताना जसा संपूर्ण चित्रपट दिसतो तसे काहीसे लंडनमधून जगाच्या राजकीय चित्रपटाकडे पहाताना भावते. जगाच्या पाठीवर दोन मोठे हत्ती झुंज घेताहेत. कम्युनिझम आणि कॅपिटॅलिझम. जगावर कब्जा करण्यासाठी त्यांची निकराची झुंज चालली आहे. बाकीचे जग घाबरून ती झुंज पहाताहेत. आणि आमचा ''डेमॉक्रॅटिक सोशॅलिझम'' कोकरासारखा कुठेतरी कोपऱ्यात निरागस उड्या मारीत आहे असे वाटते. हत्तीच्या पेक्षा शेळीचा उपयोग गरीबाना जास्ती आहे. पण या झुंजीत तुडवून न जाता टिकून रहायचे असेल तर ज्यांचा ज्यांचा लोकशाही समाजवादावर विश्वास आहे त्या सर्वांनी एकत्र येवूनच लोकशाही समाजवादी व्यवस्था उभी करून दाखवली पाहिजे. आपले वेगवेगळे गट, पार्ट्या आणि तपशीलाचे किरकोळ मतभेद बाजूला ठेवून लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्याची ही अखेरची संधी आहे. समजून उमजून निकराचे प्रयत्न केले पाहिजेत. नाहीतर या दोन रेड्यांच्या झुंजीत लोकशाही समाजवादाला उभे रहायला कुठे जागाच राहणार नाही. एक ''लास्ट चान्स टू ट्राय'' म्हणूनच सर्व लोकशाही समाजवाद्यांनी, जयप्रकाशजी, पं. जवाहरलाल नेहरु आणि इतर सर्व समाजवाद्यांनी एकत्र येवून हिंदुस्थानचे राजकारण केले पाहिजे. जगाला एक तिसरा, मधला मार्ग काढून दिला पाहिजे. हिंदुस्थान जगाला तिसरा मार्ग काढून देऊ शकेल, पण हे एकदोन पिढ्या तरी सर्वात एकोपा आणि प्रयत्नांची शिकस्त कशी साधता येईल? याची निकड फार फार वाटते.

माझे हे मनापासूनचे विचार चव्हाणसाहेब फार कौतुकाने ऐकत होते. त्यांच्या चेहऱ्यावरून आणि नजरेतून मला ते शेवटी जाणवले. त्यामुळे मला आणखी उत्तेजन मिळाले.

''साहेब, मला एक प्रश्न तुम्हाला विचारायचा आहे. तुमच्याजवळ मला मन मोकळं करावसं वाटतं. म्हणून विचारतो. माझा हा आगाऊपणा किंवा लहान तोंडी मोठा घास घेतल्यासारखं वाटेल. तुम्हाला, खरंच ही काँग्रेस, समाजवादी आहे असं वाटतं का?

चव्हाणसाहेब मागे खुर्चीला रेलून बसले, मी असा प्रश्न विचारुन अयोग्य तर केलं नाही ना? असं मनांत येऊन गेले. गंभीर पण शांतपणे चव्हाणसाहेब म्हणाले, ''समाजवादांत समाजाचे हितसंबंध आहेत. सामान्य माणसाचे हितसंबंध तर समाजवादातच आहेत. काँग्रेसला सामान्य माणसाचेच राजकारण करायचे आहे, केले पाहिजे. ज्या दिवशी काँग्रेस समाजवाद सोडेल त्यादिवशी समाज काँग्रेसला सोडून देईल.''

चव्हाणसाहेबांच्या या उत्तराने माझे मन उजळून गेले. १९६० च्या डिसेंबर महिन्यातले चव्हाणसाहेबांचे हे उद्गार आहेत. दुर्दैवाने आजकॉंग्रेसने समाजवाद सोडला आहे आणि समाजाच्या मनांतून कॉंग्रेस पूर्णत: उतरली आहे. चव्हाणसाहेबांचे राजकारण तत्वांचे होते. लोकशाही, समाजवाद आणि राष्ट्रीय एकता ही त्यांच्या राजकारणाची त्रिसूत्री होती. त्यांचा समाजवादावर पूर्ण विश्वास होता. समाजवादाचा पाळणा महाराष्ट्रात तरी प्रथम हलवू. त्यांनी केलेली ती प्रतिज्ञा होती.

दुर्दैवाने १९६९ नंतर कॉंग्रेसमध्ये समाजवादाची भाषा राहिली पण पक्षांतर्गत लोकशाहीला घरघर लागली आणि आणिबाणीमुळे तर देशातल्याच लोकशाहीच्या नरडीला नख देण्याचा प्रयत्न झाला. समाजवादाची "गरीबी हटाव" ची भाषा ही सुद्धा सत्ताबाजीचे व्यक्तीनिष्ठ राजकारण साधण्यासाठी, समाजाला व गरीबांना बनवण्यासाठी वापरलेली भाषा ठरली राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये समाजवाद व धर्मनिरपेक्षता हे दोन शब्द घातले, बँकांचे राष्ट्रीयीकरण केले, परराष्ट्रीय व्यापार सरकारने ताब्यांत घेतला. तरीही संमिश्र अर्थव्यवस्थेचा प्रत्यक्ष व्यवहार खाजगी क्षेत्राला जोपासण्यासाठीच झाला. विचार आणि व्यवहार यांतील विसंगती वाढली. सहकारी कृषी औद्योगिक समाजरचना हे ध्येय डोळ्यापुढे नव्हते. शहरी संघटित औद्योगिक समाज याचीच नक्कल करण्याची घाई सर्वांना झाली होती. संमिश्र अर्थव्यवस्थेची मांडणी आणि कार्यपद्धतीच अशी होती की, त्यातून नोकरशाही वाढली. नोकरशाहीचे पांढरे हत्ती सार्वजनिक क्षेत्रात जोपासले गेले. नवी संस्थानेच जणू वाढली, पण ती मांडलीक होती खाजगी क्षेत्राची. गेल्या ३०-३५ वर्षातील संमिश्र अर्थव्यवस्थेचे प्रत्यक्ष व्यवहार पाहिले तर खाजगी क्षेत्राची तळी उचलून सार्वजनिक क्षेत्राचे दिवाळे निघावे असेच झालेले दिसतील, सार्वजनिक क्षेत्र तोटयांत आणि खाजगी क्षेत्राची भांडवली गुंतवणूक मग शंभर शंभर पटीने वाढली. तुम्ही कोणतेही खाजगी औद्योगिक घराणे काढा. त्याची स्वातंत्र्य मिळाले तेव्हा काय अवस्था होती आणि आज काय आहे? दोन तीन कोटीची उलाढाल करणारी घराणी आता शेकडो नव्हे हजारो कोटीची उलाढाल करताना दिसताहेत. तोंडानं समाजवाद बोलायचा, गरिबी हटाव म्हणायचे, प्रत्यक्षात श्रीमंत अधिक श्रीमंत कसे होतील तेच पहायचे, तोंडात म. गांधी, कार्ल मार्क्स, व्यवहारांत मेकॉले आणि मनू यांचे पट्टशिष्यच, सर्वच शिक्षितांनी मनांतून निर्णय घेतला होता, इंग्लंड सारखं व्हायचं, युरोपासारखा समाज निर्माण करायचा, अमेरिकेप्रमाणे सुधारायचं. जो रस्ता, जी धोरणे, जो कार्यक्रम आम्हाला युरोपीय जीवनाकडे नेईल तेच अंमलात आणायचे. सारा समाज, सर्व लोक त्या पातळीवर नाही नेता आले तरी, सत्ता संपत्तीच्या ठाण्याजवळच्या लोकांनी तरी, विलायती जगणे, विलायती वस्त्या, विलायती कुटुंबव्यवस्थाही मांडायचा प्रयत्न

करायचाच. पाश्चात्यांचा तो चकचकीत, समर्थ, संभावीत, शिस्तबद्ध चेहरा आम्हाला भुरळ पाडीत होता. आणि त्या चेहऱ्याला आम्ही भुलून गेलो होतो. प्रेयसीसाठी आपल्या आईचं काळीज आणून देणाऱ्या प्रियकरासारखी आमच्या तथाकथित शिक्षितांची मन:स्थिती झाली आहे.

विलायती विकासाचं मॉडेल, शहरी संघटित औद्योगिक समाजरचनेचं युरोप अमेरिकेतील मॉडेल उभे करायला काय काय लागतं? ते भांडवल कसं, कोठून आणि किती काळांत उभे करता येतं? विज्ञान तंत्रज्ञानावर केवढा अधिकार प्राप्त व्हावा लागतो? औद्योगिकरणासाठी लागणारा कच्चा माल, श्रम आणि मुख्यत: उत्पादित वस्तू खपवण्यासाठी हक्काची बाजारपेठ कशी कुठे मिळविता येते? आणि हे सर्व युरोपनं ज्या रीतीने केलं ती रीती, तेवढा काळ आपल्याला झेपेल, मिळेल का? युरोपनं गेली तीन चारशे वर्षे जग जिंकून भांडवल गोळा केले, जिंकून घेतलेल्या देशाची हक्काची बाजारपेठ केली. वसाहतवादी आर्थिक पिळवणूक केली. मातीमोलानं कच्चा माल, श्रम वापरले आणि गिरण्यातून प्रचंड उत्पादन करून, तो माल मन मानेल त्या किंमतीत त्या हक्काच्या बाजारपेठेत खपवला. ते लोक इहवादी, उद्योगी, धाडसी, अभ्यासू आहेत. त्यांनी अनेक शोध लावले. वाफ, वीज, अणू अशी शक्ती शोधून हातात घेतली. यंत्रतंत्रे जुळवली. युरोपमधील लोकसंख्येचा भार हलका केला. आम्ही यापैकी काहीच न करता युरोपसारखं होण्याचा निर्णय घेतो, याला काय म्हणावे?आमच्या शिक्षिताना, राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण करणाऱ्या नेत्यांना,विचारवंतांना, पाश्चात्य संस्कृतीच्या मानसिक गुलामीतून काही मुक्त होता येत नाही.

युरोपनं सारं जग जिंकून, प्रचंड व्यापारउदीम करून, अनेक शोध लावून, गेल्या तीन चारशे वर्षाच्या कालावधीत जेवढे भांडवल उभे केले, ज्या मातीमोलानं हवा तेवढा कच्चा माल आणि श्रम वसाहतीमधून मिळवला आणि कारखानदारीतून पक्का माल तयार करून मन मानेल त्या दराने पुन्हा वसाहतीच्या हक्काच्या बाजारपेठांतून विकला. तशी संधी, तेवढा काळ आपल्या देशाला यापुढे मिळणार आहे काय? हे शक्यच नाही. युरोपला संधी मिळाली, प्रचंड उद्योग केला, म्हणून उद्योगाच्या घरी रिद्धःसिद्धी त्यांच्याकडे पाणी भरते आहे. आम्ही ब्रह्मानंदी टाळी लावून, असेल हरी तर देईल खाटल्यावरी अशा समजूतीत पिढ्यांन पिढ्या भजन करीत बसलो. त्यामुळे भोजनाला महाग व्हायची पाळी आली. आमच्या घरी साडेसातीचा खराटा फिरायला लागला.

हे सर्व स्पष्ट असूनही आमच्या शिक्षितांनी युरोपीय मॉडेलचा नाद सोडला नाही,सारा देश युरोपप्रमाणे करता येत नाही ना? ठीक. मग वाळवंटातल्या ओॲसिस

प्रमाणे युरोपसारख्या शहरी वस्त्या उभ्या करूया असा त्यांनी निर्णय घेतला. सारं जग जिंकून वसाहतीप्रमाणे वापरता येत नाही ना? मग आपलाच असंघटित, अशिक्षित ग्रामीण भाग वसाहतीप्रमाणे शोषून घेऊया, असे निर्णय घेतले गेले, आधुनिकीकरण म्हणजे पाश्चात्तीकरण आणि सर्व देशांत ते आणता येत नाही, तर मग शहरापुरते आणू या. आमची नगरे आणि महानगरे जी उभी रहात आहेत ती युरोपीयन शहरी, औद्योगिक संघटित समाजरचनेची भ्रष्ट नक्कल आहे. त्यासाठी आमचाच ग्रामीण भाग आम्ही वसाहतीसारखा वापरीत आहोत पूर्वी जी वसाहतवादी अर्थव्यवस्था इंग्लंडच्या भरभराटीसाठी मांडली होती, ती तशीच स्वातंत्र्यानतर आम्ही चालू ठेवली आहे. फरक एवढाच की, ती वसाहतवादी लुटालूट इंग्लंडला जायची, आता देशांतच शहरी भागाला पोहोचवली जात आहे.

दादाभाई नौरोजींनी ही वसाहतवादी लुटालूट इंग्रजी कशी करतो हे अगदी तपशीलवार आपल्या प्रसिद्ध ग्रंथात दिले आहे. त्या ग्रंथातील पानंच्या पानं आमच्या अर्थव्यवस्थेतील लुटीला, जशीच्या तशी लागू करता येतील. शहरातल्या झोपडपट्ट्या या स्वस्त मजूरीची गोडावून आहेत आणि त्या शहर उभारणीसाठी आणि चालविणेसाठी आवश्यक आहेत. शेतमालाच्या किंमतीचा प्रश्न वसाहतवादी दृष्टीतूनच हाताळला जातो. शेती उत्पादनाच्या खर्चाचासुद्धा विचार केला जात नाही. शेतमालाच्या किंमतीसाठी आणि शेतीक्षेत्रांतील अडचणीसाठी जे लोक चळवळी करतात, त्यांच्याही डोळ्यापुढे मॉडेल म्हणून शहरी, संघटित, औद्योगिक समाजव्यवस्थाच आहे. सहकारी कृषी औद्योगिक समाजरचनेसारखी, अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्राचे वर्चस्व टिकवून धरणारी व्यवस्था मॉडेल म्हणून नाही. उद्योगव्यापार, सेवक कल्याण यांच्या प्रभुत्वासाठी शेतीप्रधान ग्रामीण अर्थव्यवस्थेचे क्षेत्र लुटले तरी ते जरा शिस्तीने लुटा, दुखापत न करता बलात्कार करा, एवढीच अपेक्षा आजच्या शेतकरी संघटना चालवणारांची दिसते. उत्पादक घटकांतील आंतरविरोध टाळून त्यांच्यात पूर्ण सहकार साधून, त्या उत्पादक घटकांचेच अर्थव्यवस्थेवर पूर्ण नियंत्रण राहील आणि अनुत्पादक घटकांचे बांडगुळी वर्चस्व पूर्णतः मोडीत काढले जाईल, अशी भूमिका घेऊन, नोकरी, शेतमजूर, कारागीर यांच्या परस्परपूरक संघटना करणे आज आवश्यक झाले आहे.

शेतीतील श्रम आणि शेतीतील माल, उद्योग व्यापारातील श्रम व त्यांतील उत्पादीत वस्तू व सेवा, यांच्या किमती समान सूत्राने का ठरत नाहीत? ''इंडस्ट्रीयल कॉस्टींग'' शेतमाल व शेतीतील श्रम यांना लागू न करता ते फक्त ''रिम्युनरेटिव्ह'' ठेवले जाते. मग औद्योगिक क्षेत्रालाही ''रिम्युनरेटिव्हचा''फॉर्म्युला का लागू केला जात नाही?

शेतमालाच्या किंमती उत्पादन खर्चाशी निगडीत ठेवल्या जातात. औद्योगिक मालाचा उत्पादन खर्च का जाहीर होत नाही? आणि त्याच्या किंमती या उत्पादन खर्चाशी निगडीत अशा का ठेवल्या जात नाहीत? इथेच साऱ्या संघटित वर्गानी, असंघटिताचे वसाहतवादी शोषण चालू ठेवण्याचा निर्धार करून तीच शोषक अर्थव्यवस्था चालू ठेवली आहे. या लुटालुटीतून आम्ही काय निर्माण केले? जी शहरे सूज आल्याप्रमाणे आम्ही फुगवीत चाललो आहे, ती शहरे तरी मानवीवस्त्या म्हणून चांगल्या आहेत काय? गर्दी, गोंधळ, घाणीने बरबटलेली, माणसांचा चेहराच हरवून बसलेली शहरे, या माणसातल्या जनावरी प्रेरणा उत्तेजित करणाऱ्या वस्त्या आहेत. ज्या असंघटित ग्रामीण भागाची आम्ही वसाहतवादी लूट चालूच ठेवली आहे. ती गावे तर आज पिण्याच्या पाण्यालाही महाग झाली आहेत. आमच्या पन्नास वर्षातील आठ पंचवार्षिक योजनेतून आम्ही कसला विकास साधला? उध्वस्त, उजाड गांवे आणि बेढब, विकृत शहरे. सर्व विकासाचे अंतीम मोजमाप, कसला माणूस, कसली मनुष्यवस्ती तुम्ही उभी करता यावरच होत असते. भरमसाठ वस्तूंचे ढीग, बटन दाबले की सर्व सुखसोयी समोर उभ्या करणारे विज्ञान तंत्रज्ञान, वेगवान वहाने, जळी स्थळी अवकाशी संचार, चकचकीत रस्ते, प्रचंड वास्तू ही सारी प्रतिसृष्टी निर्माण करणारी कर्तृत्वशक्ती अगाध, अफाट आणि नतमस्तक करायला लावणारी असली तरी माणूस षड्रिपूंच्या हातातील बाहुला म्हणूनच व्यवहार करीत राहिला, तर ती सोन्याची लंका रावणाची, राक्षसांची राहणार. राक्षसांची कर्तृत्वशक्ती देवापेक्षाही अफ़ाट असते. पण संस्कृतीऐवजी विकृतीने ग्रासलेले त्यांचे मन, त्या शक्तीतून पृथ्वीचा नरकच करून टाकतात. पाश्चात्यांची ही महाराक्षसी विकृत कर्तृत्वशक्ती, व्यक्ती, समाज आणि सृष्टीच्या अंतीम हिताची नाही. याची जाणीव बोथट करणारा विकास हा शेवटी विनाशातच संपून जाईल.

अनेक धर्मगुरु, विचारवंत, शास्त्रज्ञही या विनाशाची घंटा वाजवून अधून मधून इषारे देत असतात. परंतु दारुच्या आहारी गेलेला दारुड्या माणूस कधीमधी आपण करतो आहे हे बरं नाही असं जाणतो, बोलतो, पण त्याचे ते व्यसन सुटत नाही. अशी काहीशी झिंग, पाश्चात्यांच्या भोगवादी संस्कृतीने माणसांना आणली आहे.

आमच्या विकासातून ज्याला ज्याला पुढे यायची, पैसा मिळवायची संधी मिळते, तो शहराकडे धावतो. गावात जे रहातात ते नाईलाज म्हणूनच, गांवांत आता चांगलं असं शिल्लक रहात नाही. चांगल मक्याचं कणीस आलं, तरी ते शहरांत नेऊन विकावस वाटत. घरांत म्हशीचं दुभतं जरी केलं, तरी ते शहरांत विकावच लागतं. घरातल्या मुलांना ते देणं परवडत नाही. चांगली मुलगी जरी जन्माला आली तरी ती शहरातच दिली जाईल,

जे जे म्हणून चांगलं असेल ते ओढून शोषून घेण्याची जादू शहरी संस्कृतीच्या हातात आम्ही या विकासांतून दिली आहे.

आणि या शहरी वस्त्या तरी माणसाच्या विकासाच्या दृष्टीतून कशा आहेत? गर्दी, गोंधळ, घाणीने तर बरबटलेल्या आहेतच पण त्यांत रहाणाऱ्या माणसाची काय अवस्था आहे? त्याचं जगणं, त्याची नीतीमत्ता, त्याचं सुखसमाधान याचं काय होतं? वेगानं फिरणाऱ्या चक्रावर बसवून त्याला पिळून घेणारं हे शहरी जीवन त्याच्या व्यक्तीमत्वाचं चिपाड करून टाकतं, ते गिरणी कामगार, ते माथाडी, त्या झोपडपट्टया, ती गर्दी, सारं जगणं बाज़ारांत मांडल्याप्रमाणे असतं, गावाचं गावपण शहरांत नाही. पोट भरण्यासाठी जमा झालेली वस्ती, कोण कुठून आलेला आहे याचा पत्ता नसतो. एकमेकांची माहिती नसते. अनेक ठिकाणांहून, अनेक प्रकारच्या पार्श्वभूमीतून आलेली अनोळखी माणसं एकत्र रहातात. अनोळख्यांची वस्ती, व्यवहारापुरते संबंध, चेहराच नसलेलीही मनुष्यवस्ती, एकमेकांच्या सुखदु:खात कशी सामील होणार ? अशा चेहरा नसलेल्या मनुष्यवस्तीत आपल्याला कुणी ओळखत नाही अशा वातावरणांत, माणसातले पशुस्वभाव जागे होतात. सभ्यतेचा बुरखा निघून जातो. समजा आपण सिनेमागृहात बसलो आहोत. एकाएकी सर्व लाईटस् जाऊन अंधार पडला तर एकदम ''हुई'' म्हणून ओरडतात. अंधारात आपल्याला कुणी ओळखणार नाही असे वाटले की, माणूस नैसर्गिक पशुवृत्तीने वागतो. शहरी वस्त्या अशा पशुवृत्ती जागवणाऱ्या आहेत. तिथे गावपण, कम्युनिटीची माणुसकीची भावना क्षीण होते, प्रत्येकजण दुसऱ्याकडे बाजारातल्या वस्तूप्रमाणे पहातो. गर्दीत कुणी ओळखत नाही, कुणासाठी कुणी थांबणार नाही, कोण कुठून आला आहे पत्ता नाही, अशा वस्तीत प्रसंग आला तर चटकन दंगली उसळतात, लुटालूट होते. खून खराबा होतो. माणसांची वस्ती अशी ती रहातच नाही. उद्योगधंदे, व्यापारउदीम, सरकारी कामकाज, शहरात केंद्रीत झालेले असते. त्यामुळे कामधाम काहीतरी मिळते. घाणीत, गर्दीत का होईना पण उदरनिर्वाह चालतो. खेड्यांत उलटी स्थिती. पिण्याच्या पाण्याला महाग झालेल्या खेडूत वस्तीत माणूस काय करणार? कसा घडणार? दुष्काळी भागांत तर वर्षातले सहा महिने ''जगायला बाहेर जाण्याची'' पद्धतीच आहे. पाऊस नाही, पाणी नाही, शेतीभाती जनावरे सांभाळता येत नाहीत. उद्योगधंदा कसलाच नाही, कामाला जागा नाही, मालाला मोल नाही. उध्वस्त गांवे, पिढ्यान् पिढ्या एकत्र राहिलेली, गावपण सांभाळणारी, माणुसकीची पांढर ओस पडत चालली आणि पशुवृत्ती जागवणाऱ्या शहरी वस्त्या वाढत चालल्या.

आर्थिक परिस्थिती जशी गांव सोडायला मजबूर करते त्याप्रमाणे आमची

जन्माधिष्ठीत उच्चनीचतेची सामाजिक परिस्थिती माणसाला गांवात रहाणे नको करते. सारख्या आर्थिक स्थितीतील माणसेही गावांत जुन्या पद्धतीने महार, मांग, चांभार, बलुतेदार म्हणून एकमेकांना वागवणार ही मानसिक कुचंबणा नव्या पिढीला तर सहन होणारी नाही, मग ते गावाचं तोंड नको असं म्हणणारच. अशी ही आमच्या गावांची आणि शहरांची दशा करून टाकली आहे. तमाशातला राजा जशा बँडवाल्यासारखा दिसतो, तसा आमचा हा युरोपसारखं दिसण्याचा हव्यास, हास्यास्पद झाला आहे.

आमच्या माणसांचं आणि मनुष्यवस्तीचे काय होतय हे आम्ही न पहाताच विकास योजना अमलांत आणतोय. परदेशी चलनाचा साठा, दरडोई भांडवल उभारणी, दरडोई उत्पन्न, गुंतवणूक खर्च, अशा आकडेवारीतून सामान्य माणसाला काय मिळते? दरडोई कर्ज वाढल्याचेही त्याच्या लक्षांत येत नाही. त्याच्या जगण्याच्या गरजा, अंगभर वस्त्र आणि नीटपणे निर्वाह होण्यापुरते उत्पन्न याचा विचार न करता पन्नास वर्षे विकास करतो आहे. आणि म्हणतो आहे आम्ही युरोपसारखे दिसू लागलो आहोत.

सांगली जिल्ह्याचा २०-२५ वर्षाचा दूरदर्शी विकास आराखडा तयार करायचं काम मी केलं आहे. प्रादेशिक विकास योजना कायद्याखाली १९७३ साली अेक सांगली - मिरज प्रादेशिक विकास मंडळ नेमण्यात आले. जिल्ह्याच्या विविध क्षेत्रांतील ज्येष्ठ अनुभवी अशी ३०-३५ मंडळी सदस्य होती. ६०-७० तज्ज्ञ अधिकारी मंडळाच्या दिमतीला होते. मी त्या मंडळाचा उपाध्यक्ष होतो. अध्यक्ष पदसिद्ध कमिशनर असतात. आम्ही सात वर्षे अभ्यास करून, सुंदर विकास आराखडा तयार केला. जिल्ह्याचे कलेक्टर, तो आराखडा घेऊन दिल्लीला गेले. त्यांच्या परिषदेत त्याची फार वाहवा झाली. सर्व जिल्हा हा घटक धरून त्याचा अेकात्मिक विकासाचा २० वर्षाचा आराखडा असा तो देशांतला पहिलाच अभ्यास आहे. १९८० साली आम्ही महाराष्ट्र शासनाला दिला. शासनाने तो स्वीकारला. मुख्यमंत्र्यासह अनेकांच्या सहभागाने त्यावर चर्चा, परिषदा झाल्या. आणि त्यानंतर तो जो महाराष्ट्र शासनाच्या अनेक अहवालाबरोबर सचिवालयातील कपाटांत बंद होऊन पडला आहे त्याची अजून सुटका नाही. २००१ सालापर्यंतचा तो विकास आराखडा आहे. त्यानंतर जिल्ह्याच्या वार्षिक आणि पंचवार्षिक योजना अमलांत येताहेत. पण त्या प्रादेशिक विकास आराखड्याप्रमाणे काही नाही, आम्ही सांगितलेल्या खर्चाच्या दीडपट खर्च त्यानंतर जिल्हा विकासावर झाला आहे, पण निम्माही विकास झालेला नाही. संतुलित विकासाचा तर पत्ताच नाही. आमच्या विकासाच्या अंमलबजावणी पद्धतीबद्दल बोलावे तेवढे थोडे आहे.

आम्ही त्या जिल्हा नियोजन आराखड्यांत इ. स. २००१ साली जिल्ह्याची लोकसंख्या किती होईल याचे अंदाज बांधले. प्रत्येक गांव, पंचक्रोशी, विभाग, तालुका व जिल्हा अशी खालून वर प्रादेशिक स्तररचना केली. प्रत्येक पातळीवरील उपलब्ध जमीन,पाणी, प्राणी, वनस्पती, हवा, सूर्यप्रकाश अशा उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभ्यास केला. जिल्ह्यांत, महाराष्ट्रात व देशांत विकासाची जी साधनसामुग्री, भांडवल इ. उपलब्ध होऊ शकते त्याचे अंदाज बांधले, विज्ञान, तंत्रज्ञान वापरण्याची प्रचलित पातळीही विचारांत घेतली. आणि दोन हजार सालापर्यंत किती लोकसंख्येला नीटपणे, ''बसवता'' येईल याचे आराखडे, गावपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत आखले. माणसे ''बसवायची'' म्हणजे त्यांच्या निर्वाहाची, कामाधामाची नीट व्यवस्था करायची. आणि त्यांचे जीवनमान वाढत जाईल अशी दिशा काढून द्यायची.

आमच्या अभ्यास कालांत आम्हाला तीनचार गोष्टी दिसून आल्या. सांगली जिल्ह्यातून आपल्या गावांत, भागात जगता येत नाही. म्हणून दरवर्षी सात ते साडे सात हजार कुटुंबे उठतात, देशोधडीला लागतात. सर्व उद्योग, व्यापार व नोकरी क्षेत्रांत कामकरी लोकसंख्येच्या फक्त २५% लोक काम करतात. उरलेले ७५% कामकरी लोक शेतीवर जगतात असे दाखवले जाते, पण शेतीत काम किती याचा कसलाही अभ्यास झालेला नाही. काही ढोबळ आडाखे आखून शेतीतील कामाचा आम्ही अंदाज घ्यायचा प्रयत्न केला तर आढळले की, जी ७५% कामकरी संख्या शेतीवर दाखवली आहे, त्यापैकी निम्म्या लोकसंख्येला शेतीत काम नाही. ज्या ३७ १/२ % लोकांना काम आहे. त्यापैकी १७% लोकांना फक्त हंगामी काम आहे. या शिवाय देशाच्या नियोजनांत कामकरी लोकसंख्या किती हे ठरवताना, घरकाम करणाऱ्या सुमारे १७% कामकरी महिला हिशोबातच धरलेल्या नाहीत. शहरातील नोकरी व्यवसाय करणाऱ्या फक्त ८% महिला कामकरी संख्येत धरलेल्या आहेत. म्हणजे त्या १७% महिलांचा बोजाही शेतीवरच आहे. ज्या उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्रांत उपलब्ध भांडवलाच्या ७०% भांडवल गुंतवले जाते ते फक्त २५% लोकांची जबाबदारी घेते आणि ज्या शेतीक्षेत्रांत फक्त ३०% च्या आसपास भांडवल गुंतवले जाते त्या शेतीवर ७५% लोकांचा बोजा ठेवलेला आहे.

ग्रामीण गरीबांच्या प्रश्नाची चेष्टा विकासाचे नियोजन आणखी अेका पद्धतीने करते. प्रत्येक जिल्ह्यात अनेक बँका आणि त्यांच्या आता शेकडो शाखा आहेत. त्यात जिल्ह्यातील लोक ठेवी ठेवतात. असे दिसते आहे की, ग्रामीण भागातील लोक जेवढ्या ठेवी बँकांत ठेवतात, तेवढेही भांडवल गरीब ग्रामीण भागांत वा त्या जिल्ह्यात गुंतवले जात नाही. म्हणजे गरीबांचा पैसा पुन्हा शहरात उद्योगधंद्यातच नेला जातो. आणि घोषणा भाषणे गरीबी हटावाच्या चालतात.

आमचे राष्ट्रीय गीत "वंदेमातरम्" हे आहे. सुजलाम्, सुफलाम्, सस्य शामलाम् अशी माझी मातृभूमी, तिला मी वंदन करतो. स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाण्याचा प्रश्न आम्ही कसा सोडवला ? महाराष्ट्रातील ८८ % जमीन अजून कोरडवाहू आहे. त्या भूमीने " सुजलाम्, सुफलाम्" हे गीत अजून किती वर्षे ऐकायचे? पन्नास वर्षात आम्ही फक्त १२ % शेती बागाईत केली. नद्यातून वहाणारे आमच्या वाटणीचे पाणी, वाटणी होऊन २५ वर्षे होत आली तरी, आम्ही अडवू शकत नाही. महाराष्ट्राच्या जडणघडणीत पाण्याचा प्रश्न अति महत्वाचा आहे. परंतु प्रश्नाची हाताळणी अतिगलथानपणे चालली आहे. पिण्याचे पाणी, शेतीचे पाणी, उद्योगधंद्याचे पाणी, जनावरांचे, पशुपक्षांचे पाणी, पाटाचे पाणी, लिफ्टचे पाणी, कॅनॉलचे पाणी, पावसाचे पाणी, भूगर्भातील पाणी अशी सारी त्या प्रश्नाची चिरफाड करून टाकली आहे. पाण्याचा गैरवापर, पाण्याचे प्रदूषण या गोष्टींचे काही नियोजन नाही. साकल्याने त्याचा विचार नाही. पाणी अडवा, पाणी जिरवा अशी घोषणा मुख्यमंत्री वसंतदादांनी केली, पण त्या दृष्टीने गावोगांव काम काय झाले? महाराष्ट्राचे वाळवंट होण्याचा धोका काही तज्ञ बोलू लागले आहेत.

पाण्याचा पुरवठा आकाशांतून होतो, पावसाच्या पाण्यावरच नद्यानाले, विहिरी, कॅनॉल यातील पाणी अवलंबून आहे. भूगर्भातील पाणीही पावसावरच अवलंबून आहे. तो पाऊस महाराष्ट्रात पुरेसे पाणी पुरवतो. दुष्काळी तालुके म्हणून ज्या ८७ तालुक्यांची नोंद आहे तिथेही दहा पंधरा इंचापर्यंत पाऊस पडतोच. प्रचंड पावसाची कोकण, सह्याद्री आणि विदर्भातील भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर हे जिल्हे, आणि पुरेशा पावसाचा इतर सर्व महाराष्ट्र, यात सरासरी १५ ते १५० इंचापर्यंत पाऊस पडतो. महाराष्ट्रावर निसर्ग नाराज नाही. आधुनिक ज्ञान-विज्ञान ग्रहण करण्याइतकी बुद्धीमत्ताही महाराष्ट्राजवळ आहे. कमी आहे एका गोष्टीची. परलोकातून उतरून, भोगवादाच्या नरकांत धावत जावून न पडता, इहवादांत आत्मविश्वासाने उभे राहण्याची. सुखी, सफल जीवनाच्या आवश्यक गरजा कोणत्या? तेवढ्याच निवडून त्या सहजसुलभ नैसर्गिक पद्धतीने भागविण्याची, स्वतःच्या अशा गरजा इतकीच, इतर सर्वांच्या आवश्यक गरजांची काळजी करणाऱ्या एकात्म भावाची. मातृभूमीचा विकास होण्यासाठी, मातृभूमी सुजल, सुफल सस्यश्यामल होण्यासाठी, मनोभूमीतून परलोकवाद आणि उपभोगवाद यांची हरळी मुळासकट खणून काढण्याची. देशाचे राष्ट्रगीत "जन गण मन अधिनायक जय हे" हे आहे. मनामनातील हा अधिनायक जागा झाल्याशिवाय, चांगल्याला चांगलं म्हणण्याची दानत आणि वाईटाला वाईट म्हणण्याची हिंमत त्या जनगण मनांत निर्माण झाल्याशिवाय त्या अधिनायकाचा जय विजय होणार नाही. सत्यशोधक सत्याग्रही मराठाच नव महाराष्ट्र निर्मितीचे आव्हान पेलू शकेल.

सांगली जिल्ह्याच्या अभ्यासांत, जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करूनही, सर्वांचे "पुनर्वसन" जिल्ह्यातच शक्य आहे. जिल्हा सोडून, आज जी कुटुंबे घर, गांव सोडून देशोधडीस लागतात, ते मायग्रेशन थांबवता देईल. बेकारी पूर्णपणे संपवता येईल आणि २० वर्षाच्या काळांत सर्वांचे जीवनमान दीडपटीने वाढवता येईल. असा विकास आराखडा आम्ही नियोजित केला होता. १९८० सालानंतर त्या नियोजनाप्रमाणे जिल्हा विकास योजना आखून कार्यक्षमतेने पार पाडल्या असत्या तर २००१ सालापर्यंत सांगली जिल्हा हा एक समतोल विकासाचा आदर्श जिल्हा म्हणून २००१ साली साऱ्या देशापुढे उभा करता आला असता. महाराष्ट्राच्या जडणघडणीत प्रत्येक जिल्ह्याच्या समतोल विकासासाठी बळकट पायावर खालून वर नियोजन कसे करता येते याचा एक नमुना तयार झाला असता.

आम्हाला आमच्या विकासाचा आराखडा नको आहे, युरोपीयन विकासाची कॉपी करायला हवी आहे. सारा हिंदुस्थान शहरी, औद्योगिक, संघटित करायच्या स्वप्नांत आम्ही सारे तरंगत आहोत. ज्याला ज्या संधी मिळेल तो भारत सोडून "इंडिया" त जाऊन रहातो आहे. "दिसायला हिंदुस्थानी पण आचाराने विचाराने विलायती" असे भ्रमिष्ट विदुषक, आमच्या पुढाऱ्यांच्या, तज्ञांच्या, शिक्षितांच्या रूपाने आज देश चालवीत आहेत.

महाराष्ट्राच्या, भारताच्या आणि जगाच्याच जडणघडणीमध्ये, पारंपारिक सुधारणा, परिवर्तन, विकास या सर्व कल्पनाना एक वेगळी दिशा दिली आहे ती आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाने. औद्योगिक क्रांतीने धर्मकल्पना समाजव्यवहारांतून बाजूला करून "इझम" आणले. उत्पादन व्यवस्था, अर्थव्यवस्थेशी निगडित असलेल्या आणि गेली दीड दोनशे वर्षे ज्यावर हमरीतुमरीवर येऊन वाद झाले ते सारे इझमही आता संदर्भहीन ठरू लागले आहेत. त्याचे मुख्य कारण उत्पादन, वितरण व्यवस्थेत विज्ञान तंत्रज्ञानाने केलेली प्रचंड क्रांती हे आहे. तेवढेच भांडवल आणि तेवढेच श्रम घालून नव्या तंत्रज्ञानाने जर शंभर पट उत्पन्न काढून दिले, तर मग भांडवल मोठे की, श्रम मोठे या वादांत काही अर्थच रहात नाही. साऱ्या जगातच नव्या व्यवस्थेचा विचार आवश्यक झाला आहे. नवी समाजव्यवस्था कशी असावी याबद्दल सारे जग विचारांत पडले आहे. जगातील सर्व राष्ट्रांची जी संयुक्त संघटना आहे, युनो -त्यांच्या अनेक परिषदातून जगापुढील नव्या नव्या समस्याबद्दल विचारविनिमय होत असतो. ठराव होतात, इषारे दिले जातात, धोके समजून सांगितले जातात. सार्वभौम राष्ट्र ही कल्पना मागे पडत आहे. सार्वभौम राष्ट्रानाही काही नियम, बंधने पाळावी लागत आहेत. विज्ञानाने सारे जग इतक्या जवळ आणले

आहे, विचारांची, वस्तूंची देवाण घेवाण इतकी वेगाने चालली आहे की, सारे जग एखाद्या लहानशा खेड्यासारखे झाले आहे. युनोमध्ये साऱ्या जगापुढील समस्यांचा विचार होतो. त्यांत लोकसंख्या, बालमृत्यु, महिला आरोग्य, बालसंगोपन, बालकांचे हक्क, महिलांचे प्रश्न, शिक्षणाचे, आरोग्याचे प्रश्न, हवा, पाणी, जंगले पर्यावरण, अशा कितीतरी प्रश्नांची चर्चा चालते. सारे जग एक कुटुंब आहे याची जाणीव जेवढ्या वेगाने आजचे विज्ञान देत आहे, तेवढा वेग यापूर्वी कधी मनुष्याने अनुभवला नव्हता. हे सारे प्रश्न आणि मानवापुढील या साऱ्या समस्या, यांचे उत्तर भांडवलशाही देऊ शकत नाही, साम्यवाद देऊ शकत नाही. समाजवादही नाही, या प्रश्नांची सारी उत्तरे विज्ञान, तंत्रज्ञानही देऊ शकत नाही. कारण माणसाचा स्वभाव, माणसाचे मन बदलण्याचे तंत्र सार्वत्रिक करता येत नाही. शास्त्रज्ञ आम्हाला सांगताहेत की, जगण्याच्या भौतिक गरजा कशा भागवायच्या याची काळजी करू नका, विज्ञानतंत्रज्ञानाच्या सहाय्याने जगांत आज जेवढी लोकसंख्या आहे, त्याच्या दुप्पट जरी लोकसंख्या झाली तरी, त्यांच्या गरजा भागवण्याची जबाबदारी आजही घेता येईल. आजच्या पेक्षा शंभर पटीने आम्ही उत्पादने सहज वाढवू शकतो, गेल्या दहा हजार वर्षात मनुष्याने जे आणि जेवढे निर्माण केले तेवढे दहा वर्षांत निर्माण करण्याची शक्ती, विज्ञानांत आहे. वस्तूंची निर्मिती विज्ञानावर सोपवा. ''सायन्स ऑफ इलेक्ट्रॉनिक्स'' ''सायन्स ऑफ जेनेटिक्स'' यांनी माणसाच्या हातात केवढे सामर्थ्य आणून दिले आहे, याची अजून कल्पना नाही, प्रश्न आहे हा माणूस फक्त आपल्या गरजा भागल्यानंतर थांबणार आहे काय? माणसाला केवळ गरजा भागवण्याची चिंता आहे की, तो लोभापाठीमागे लागला आहे? त्याचा लोभ त्याला आत्मनाशाकडे नेईल आणि लोभी माणसाच्या हातात विज्ञान तंत्रज्ञान आले तर स्वत:चा आणि साऱ्या जगाचा तो वेगाने नाश करेल. म. गांधीही म्हणत होते. ''नेचर इज इनफ टू सॅटिस्फाय नीड्स ऑफ ऑल, बट नॉट इनफ टू सॅटिस्फाय द ग्रीड ऑफ द फ्यु'' ''सर्वांच्या आवश्यक अशा सर्व गरजा भागवण्यास निसर्ग समर्थ आहे, परंतु थोड्यांचाही लोभ भागविणेस निसर्ग पुरणार नाही.''

''गरजा वाढवा, गरजा भागवा'' असाच संदेश ज्या संस्कृतीचा आहे, त्या संस्कृतीत आवश्यक गरजा निवडण्याचा प्रश्नच रहात नाही. संयमाचा सल्ला तिथे असणार नाही. षडरिपूंनी वेढलेला माणूस अशा संस्कृतीत कुठे जाऊन पोहोचेल याची त्या संस्कृतीला फिकीर नाही. पाश्चात्य विकासाचं मॉडेल माणसाला कायम अतृप्त ठेवण्याच्या सूत्रावर आधारीत आहे. विद्या, सत्ता, संपत्तीचे डोंगर त्यांनी उभे केले. पण मूळ जनावरी प्रेरणा मुक्त ठेवल्याने, त्या डोंगरांत वावरणारे ते भयानक राक्षस आहेत, हे आमच्या

शिक्षितांच्या अजूनही लक्षांत येत नाही.

भारताच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणांत, अर्थकारणांत आणि समाजकारणांत जो दिशाहीन गोंधळ निर्माण होतो आहे त्याबद्दल काही मूलभूत विचारमंथन होण्याची मला गरज वाटते. राजकारणाचेच क्षेत्र घेऊ.

भारतातातले राजकीय पक्ष, राजकीय पुढारी आणि प्रातिनिधीक लोकशाही या संबंधी विचार करताना राजकीय पक्ष, व त्यांचे पुढारी यांच्या गुणदोषांची चर्चा करुन प्रश्न सुटत नाही असे मला वाटते. निवडणुकीच्या प्रचलित राजकारणांत माणसे बदलून, पक्ष बदलूनही मूलभूत समस्या सुटत नाहीत. भारतीय राज्यघटनेतला नवा भारत उभा रहात नाही, लोकांचे, लोकासाठीच चाललेले प्रजासत्ताक लोकशाही राज्य निर्माण होत नाही, असे ५० वर्षाच्या अनुभवावरून दिसते आहे. निवडणूक कायद्यांत बदल, पक्षपद्धतीवर बंधने, संसदीय लोकशाही की अध्यक्षीय पद्धती, पक्षांतर बंदी कायदे, अशा चर्चा करून झाल्या आहेत. ही सारी उपाय योजना रोग रेड्याला आणि औषध पखालीला असे वरवरचे होताहेत, असं माझं मत आहे. आम्ही स्वीकारलेली इंग्लंडच्या धर्तीची प्रातिनिधीक लोकशाही हीच या देशाचे प्रश्न सोडवायला उपयोगी नाही असं माझं मत झालं आहे. आणि हे माझं मत नाही, भारतीय राज्यघटना तयार करताना, आमच्या इथल्या विलायती शिक्षण घेतलेल्या पंडितांनी, युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीचा ढाचा जसाच्या तसा स्वीकारायचा विचार जेव्हा चालू केला, तेव्हांच मानवेंद्रनाथ रॉय यांनी परखड इषारा दिला होता. युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीचा ढाचा स्वीकारू नका, युरोपची सामाजिक, आर्थिक परिस्थिती व भारतीय सामाजिक, आर्थिक परिस्थिती या फार वेगळ्या आहेत. तिथल्या व्यक्ती स्वातंत्र्याच्या कल्पना, राजकीय पक्षपद्धतीच्या कल्पना, इथे जशाच्या तशा कलम करू नका. त्या यशस्वी होणार नाहीत. इथे स्थानिक पातळीवर रशियांतील सोव्हिएटच्या धर्तीवर लोकसमित्या बळकट करा. त्यांच्याकडे सत्ता देवून लोकसमित्यांच्या विस्तृत पायावर राज्ये व केंद्र येथील राज्यव्यवस्था मांडा. युरोपिय प्रातिनिधीक लोकशाहीची नक्कल करून, त्यांच्याप्रमाणे राजकीय पक्षांत लोकसंघटन करण्याची भूमिका तुम्ही आंधळेपणाने पुढे रेटाल तर, २५-३० वर्षात असे अनुभवाला येईल की, इथले राजकीय पक्ष व पक्षांतील पुढारी हे आपला ध्येयवाद विसरतील, तत्वे टाकून देतील आणि केवळ सत्ताबाजीचे राजकारण करून देशांत अराजक निर्माण करतील''

मानवेंद्रनाथ रॉय हे कम्युनिस्ट पक्षाचे जागतिक पातळीवरचे पुढारी, खुद्द लेनिनशी तात्विक मतभेद झाले म्हणून रॅडिकल ह्युमॅनिझमचा विचार विकसित करणारे द्रष्टे

विचारवंत, ते संघटक नव्हते पण फार दूरदृष्टीचे तत्वचिंतक विचारवंत होते. त्यांनी दिलेला इशारा, तंतोतंत आमच्या राजकीय पक्षांनी व राजकीय नेत्यांनी खरा करून दाखवला. मानवेंद्रनाथ रॉयनी लोक समित्यावर आधारीत लोकशाही राज्यव्यवस्थेचा जो पर्याय सुचवला, तोच पुढे जयप्रकाश नारायण यांनी आणिबाणीपूर्व संपूर्ण क्रांतीच्या चळवळीत उचलून धरला. खऱ्या प्रत्यक्ष लोकशाहीच्या मूळ उद्दीष्टांकडे नेणारा त्यांचा पर्याय आणि म. गांधीनी आग्रहाने सांगितलेला ग्रामस्वराज्याचा विचार हे दोन्ही विचार कसे एकाच दिशेने भारतीय राजकारण विकसीत व्हावे म्हणून आग्रह करतात हे दिसेल. दुर्दैवाने विलायती शिक्षणातून जेजे विलायती, ते ते आदर्श, पुरोगामी म्हणून डोळे झाकून अनुसरणे, अशीच ज्यांची मनोवृत्ती घडली, त्यांनी युरापीय राज्यशास्त्र, पाश्चात्य अर्थशास्त्र, पाश्चात्य समाजव्यवस्था यांचीच नक्कल करीत राहण्याचा उद्योग केला. कालच्या व्याख्यानांत लॉर्ड मेकॉलेने सुरू केलेल्या विलायती शिक्षण व्यवस्थेबाबत मी बोललो. ती फक्त व्यवस्था विलायती होती असं नाही, तर शिक्षणाचा आशयही सारा विलायतीच होता. दिसायला हिंदुस्थानी पण आचार, विचार, धोरणांने विलायती, असा इंडोइंग्लिश भारतीय शिक्षित पिढ्यातून निर्माण करण्यात लॉर्ड मेकॉले यशस्वी झाला. ब्राह्मण धर्मातून जशी एक परलोकवादी मानसिक गुलामगिरी हिंदुस्थानी लोकांत निर्माण झाली, तशी पाश्चात्य उपभोगवादी मानसिक गुलामी निर्माण करण्यांत इंग्रजांनी सुरू केलेली शिक्षण पद्धती यशस्वी झाली. स्वातंत्र्यानंतरही इंग्रजी भाषा, इंग्रजी नोकरशाही आणि ही उपभोगवादी पाश्चात्य संस्कृती, यांच्या कब्जातून आमची मने सुटत नाहीत.

स्वतंत्र भारताचे राजकारण, अर्थकारण, समाजकारण आज जे अराजकाच्या भोवऱ्याकडे वहात चालले आहे, त्याचे कारण आम्ही स्वीकारलेली आणि चालू ठेवून विस्तारीत केलेली ही विलायती शिक्षण व्यवस्था आहे असं माझं मत आहे. गेल्या दीडशे वर्षात या इंग्रजी शिक्षण व्यवस्थेत आम्ही जे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र शिकलो आणि शिकवत आलो, त्यावरच आम्ही आमच्या स्वतंत्र भारतातल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व्यवस्था मांडून चालवायचा अट्टाहास करतो आहे. या पाश्चात्य शिक्षणव्यवस्थेतून जे ज्ञान, विज्ञान मिळाले तेच आदर्श, अंतीम आणि अनुकरणीय अशी पक्की धारणा आमच्या शिक्षितांची आहे. त्यापलीकडे काही राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था होत्या आणि आहेत याची दखल घ्यायला आमच्या शिक्षितांचे मनच तयार नाही.

विलायती शिक्षण व्यवस्थेतून आम्ही जे राज्यशास्त्र शिकलो , त्यात लोकशाही राज्यपद्धती हीच पुरोगामी लोकहिताची राज्यव्यवस्था आहे हे शिकलो. सार्वभौम सत्ता,

राज्यकारभार करण्याची सत्ता, शाही, सरकार, हे लोकांचे, लोकहितासाठीच, लोकांच्या नियंत्रणाखाली चालले पाहिजे हा लोकशाहीचा सिद्धांत मान्यच आहे. पण हे प्रत्यक्ष व्यवहारांत मांडून चालवायचे कसे? प्राचीन ग्रीक नगरराज्ये किंवा त्याहून अधिक विकसित झालेली आमच्याकडील प्राचीन गणराज्ये हा लोकशाही सिद्धांत अमलात आणून शेकडो वर्षे सुरळीत चालल्याचा इतिहास आहे. युरोपांत फ्रेंच राज्यक्रांती झाली, जुलुमी राजेशाही विरुद्ध भयंकर क्रांती झाली. त्या क्रांतीच्या पाठीमागे लोकशाही सिद्धांताची बैठक होती. फ्रेंच तत्वज्ञ रुसो याने जाहीर केले, "सत्ता राज्याची नाही, सत्ता सर्व लोकांची, ज्यांच्यावर राज्य चालते त्या सर्व लोकांची, लोकांची सामुदायिक इच्छा, लोकमत हाच सत्तेचा आधार आहे." रुसोने लोकशाहीला आधारभूत असलेली तीन तत्वे सांगितली. आजही ती सांगितली जातात. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही ती तीन तत्वे. लोकशाहीचे राजकारण या तिन्ही तत्वांचा परिपोष करणारेच असले पाहिजे. परंतु आमच्या शिक्षितांनी इंग्लंडच्या प्रातिनिधीक लोकशाहीची नक्कल करताना स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तिन्ही तत्वांचे पालन तो लोकशाहीचा ढाचा करतो का हे तपासले नाही. युरोपीय प्रातिनिधीक लोकशाही ही रुसोच्या तिन्ही तत्वांचे पालन करीत नाही. त्या लोकशाही ढाच्यांत समता आणि बंधुता या सामाजिक जीवनमूल्यांची उपेक्षा करून, केवळ स्वातंत्र्य या मूल्याचे एकांगी परिपोषण केले आहे. त्यामुळे या पाश्चात्य राजकारणांत व्यक्तीस्वातंत्र्याचा अतिरेक झालेला दिसतो. ज्या स्वातंत्र्याची नाळ समता व बंधुता यांच्याशी तुटलेली आहे, ते स्वातंत्र्य विकृत, हानीकारक, अतिरेकीच बनते. म्हणून मूळ रुसोचा लोकशाहीचा सिद्धांत आणि युरोपांत प्रचारांत आणलेला प्रातिनिधीक लोकशाही राज्यपद्धतीचा ढाचा, यातील विसंवाद आणि विकृती लक्षांत न घेताच आम्ही त्या ढाचाचे आंधळेपणाने अनुकरण केलेले आहे.

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रचंड विषमता, भेदाभेद आणि "जीवो जीवस्य जीवनम्" या पशुजगातील न्यायाप्रमाणे, माणूसही माणसांशी एकमेकांना शोषीत, मारीत, छळीत जगतो अशा विषम व विद्वेषी समाजांत, स्वातंत्र्य याचा अर्थ काय होतो? समर्थांनी दीनदुबळ्यांशी मनमानी व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य असाच त्या स्वातंत्र्याचा अर्थ होतो. राजकारणांत स्वातंत्र्याचा आग्रह धरायचा आणि अर्थकारणांत माणूस स्वार्थाशिवाय, नफ्याशिवाय, लाभाशिवाय काम करीत नाही. स्वार्थ हीच उत्पादनामागील मुख्य प्रेरणा आहे. असा सिद्धांत मांडायचा. स्वार्थी माणसाला पूर्ण स्वातंत्र्य हाच मुक्त अर्थव्यवहाराचा अर्थ होतो. परंतु आम्ही शिक्षित पाश्चात्यांच्या एवढे भजनी लागलो आहोत की, त्यांच्या कोणत्याही आचार विचार पद्धतीची चिकित्सा करणे हेच अडाणीपणाचे लक्षण समजतो.

प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये हे व्यक्तीस्वातंत्र्य मूलभूत तत्व म्हणून आधारभूत आहे. त्या व्यक्तीस्वातंत्र्याइतकेच समता आणि बंधुता या आधारभूत मूल्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे स्वातंत्र्याचा परिपोष एकांगी आणि अतिरेकी झाला. व्यक्ती आणि समाज यांचे नात हे मासा आणि पाणी यासारखे अतूट आहे. समाजधारणेसाठी व्यक्तीस्वातंत्र्याइतकेच व्यक्तीव्यक्तीमधील मूळ समानता आणि मनांमनामधील परस्पर बंधुभाव अत्यावश्यक आहे पण युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीत या तिन्ही मूल्यांची सारखी जोपासना करण्याची काळजी घेतली गेली नाही. त्यामुळे युरोपीय प्रातिनिधीक लोकशाही समाजधारणा नीट करू शकत नाही. प्रातिनिधीक लोकशाहीची युरोपीय रचना ही राजकीय पक्षपद्धती वर उभी केलेली आहे. ती पक्षपद्धती ज्या समाजात मोडकळीस येते, सत्ताबाजी एवढे एकमेव उद्दीष्ट जेथे पक्षांचे आणि पक्षांतील पुढाऱ्यांचे उरते तिथेही युरोपीय प्रातिनिधीक लोकशाही बेबंदशाहीतच जाऊन पडते. प्रातिनिधीक लोकशाही म्हणजे बहुमताचे राज्य, बहुमतांच्या निर्णयाप्रमाणे चालणारे राज्य असा एक समज रूढ केला आहे. प्रत्यक्षांत युरोपीय प्रातिनिधीक लोकशाही बहुमताचे राज्य देऊ शकते का? समजा प्रातिनिधीक लोकशाहीत निवडणुकीमध्ये ४-५ पक्षांनी आपापले उमेदवार उभे केले. आपल्या देशांत तर एका जागेसाठी १०-१५ उमेदवार तरी असतात. प्रत्यक्षांत मतदान ६० टक्के च्या आसपास झाले तर चांगले मतदान झाले असं मानतात. आता या ६० टक्के मतदानांत ५ उमेदवारांपैकी १३-१४ टक्के मते मिळवणाराही निवडून येऊ शकतो. आणि तो १०० टक्के मतदारांवर राज्य करू शकतो. बहुमताचे राज्य हाही युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीचा दावा फसवाच आहे.

लोकशाहीत, सार्वभौम सत्ता लोकांची, राज्यकारभारावर अंतीम नियंत्रण लोकांचे, लोकहितासाठी लोक ठरवतील त्या पद्धतीनेच राज्य चालेल. असा मूळ सिद्धांत आहे. परंतु प्रातिनिधीक लोकशाहीत फक्त मतदानाचा हक्क देवून लोकांचे राज्य निर्माण होते का? एकदा मत दिल्यानंतर राज्यकारभारावर मतदारांचे कसले तरी नियंत्रण रहाते का? निवडून जाणारे लोकप्रतिनिधी पक्षाला आणि पक्षपुढाऱ्यांना आपल्या निष्ठा वाहतात आणि नोकरशाहीच्या हातात सर्व राज्यकारभाराची सूत्रे देवून आपण फक्त सत्ता भोगण्याच्या आणि संपत्ती शोधण्याच्या मागे लागतात, असाच सार्वत्रिक अनुभव आहे. निवडणूकीत जो मत देण्याचा एकमेव लोकशाहीचा धागा लोकांच्या हातात ही प्रातिनिधीक लोकशाही देते, त्या मताच्या अधिकाराची तरी काय अवस्था आहे? मत बनवता येण्यासाठी सार्वत्रिक माहितीच्या हक्काची गरज आहे. ज्या राज्यकारभारावर मत घ्यायचे, त्या राज्यकारभाराची कितीशी माहिती मतदारांना मिळते? राजकीय पक्ष, प्रचार साधने त्या दृष्टीने किती मतदारापर्यंत पोचतात? प्रचार साधनांची उपलब्धता किती

मतदाराना होते? गरीब, अशिक्षित अशा बहुसंख्य लोकांना शिक्षण नाही, माहिती नाही, त्यांनी मत कसे बनवायचे? यासाठी प्रातिनिधीक लोकशाही काय करते? समजा मत कसेतरी बनवले तरी आपल्याला वाटते त्याप्रमाणेच मतदान करण्याची ऐपत मतदाराची आहे काय? ज्याला जगण्याचा हक्क आहे, पण जीवननिर्वाहाची हमी नाही, असा परावलंबी, भाकरीच्या मागे लागलेला मतदार आपल्या मतदानाचा हक्क कसा बजावतो? निवडणूकीच्या राजकारणांतून आज कुणाची आणि कसली लोकशाही आकाराला येते याची आम्ही काहीच चिकित्सा करीत नाही. आणि त्यामुळे खरी लोकशाही राज्यव्यवस्था निर्माण करणारे पर्यायही शोधले जात नाहीत.

युरोपीय प्रातिनिधीक लोकशाही ही शाही लोकांच्या हातात ठेवायची नाही याच मतलबी हेतूचा कसा परिपोष करते हे त्यानीच लोकशाहीत घुसवलेल्या दुसऱ्या एका सिद्धांतावरून स्पष्ट होते. युरोपांत ज्यावेळी अनियंत्रित जुलमी राजेशाह्या चालू होत्या, त्यावेळी त्या सुलतानी राजवटीत प्रजेला थोडा तरी न्याय मिळण्याला अवसर मिळावा म्हणून एक ''सत्ता विभाजनाचा सिद्धांत'' आमलात आणला गेला. या सिद्धांताप्रमाणे राज्य करण्याची सार्वभौम सत्ता राजाची असली तरी ती चालवताना तीन ठिकाणाहून चालावी. त्यासाठी राजसत्तेचे तीन भाग केले. एक कायदे करण्याची, आज्ञा देण्याची सत्ता, दुसरी त्या कायद्यांचा अम्मल करण्याची सत्ता आणि तिसरी त्या कायद्यांचा अर्थ लावून न्याय देण्याची सत्ता. या तीन विभागातील सत्ता, तीन ठिकाणी विभागून वेगवेगळ्या तीन ठिकाणाहून चालवायची म्हणजे प्रजेला तीनपैकी कुठेतरी न्याय मागायला, अन्याय होत असेल तर तो दूर करून घ्यायला संधी मिळेल. सार्वभौम सत्तेचे असे तीन तुकडे करून तीन ठिकाणी वाटून देऊन राज्यकारभार करण्याची ही पद्धती अनियंत्रित जुलमी राजेशाहीला वेसण घालण्यासाठी अस्तित्वांत आणली. परंतु राजेशाह्या गेल्या, लोकशाह्या आल्या, सार्वभौम सत्ता लोकांची असा पुरोगामी लोकशाही सिद्धांताचा उद्घोष झाला तरी. या युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीने, तो सत्ता विभाजनाचा सिद्धांत जसाच्या तसा, उलट अधिक बळकट करुन चालूच ठेवला आहे आणि तो सिद्धांत आता लोकशाहीच्याच नाकातली वेसण ठरला आहे.

कायदेमंडळ, अंमलबजावणी मंडळ आणि न्यायमंडळ अशा तीन तुकड्यात सत्ता विभागून ठेवली. लोकशाहीत आणखी एक वाटेकरी उभा केला आहे. लोकमतावर लोकशाही चालते आणि लोकमत तयार करणारी जी प्रचार यंत्रणा आहे, ती प्रसिद्धी प्रचारयंत्रणा लोकशाहीतील चौथी इस्टेट असे ठरवून टाकले आहे आणि तिला कायदेमंडळ, अंमलबजावणी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्या बरोबरीचे स्थान दिले

पाहिजे असाही निर्णय घेऊन टाकला. यापुढे ''प्रिंट मेडिया'' बरोबर किंबहुना त्यांच्यापेक्षाही जास्ती महत्वाची दृकश्राव्य साधने, इलेक्ट्रानिक्समुळे लोकमतावर परिणाम करणारी असल्यामुळे सार्वभौम सत्तेचा पाचवा वाटेकरी म्हणून त्यांनाही स्थान दिलेच पाहिजे असे हे पाश्चात्य लोक ठरवतील आणि त्याला आमचे परभूत शिक्षित माना डोलवतील.

हा सत्ता विभाजनाचा सिद्धांत डोळे झाकून आम्ही स्वीकारल्यामुळे, प्रातिनिधीक लोकशाहीत लोक आणि लोकप्रतिनिधी यांनी फक्त कायदेमंडळापर्यंत जावे, त्यापुढील अंमलबजावणी मंडळ आणि न्यायमंडळ तसेच प्रचार माध्यमे यातील सत्ता ही पगारी, तज्ञ, नोकरांच्याच हाती राहील असा व्यवहार पूर्णत: रूढ केला आहे. युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीने सार्वभौम सत्तेचे चार तुकडे केले आहेत. त्यापैकी चतकोर सत्ता लोक आणि लोकप्रतिनिधी यांच्या नावावर ठेवून, तीनचतुर्थांश सत्ता पगारी, हितसंबंधी नोकरशाहीच्या मांडीखाली ठेवली आहे. सार्वभौम सत्ता लोकांची या क्रांतीकारक विचाराची कशी चेष्टा करून टाकली आहे हे अजून आमच्या लक्षांत आलेले नाही. विधीमंडळे, कायदेमंडळे, लोकसभा इथे जी कायदे करण्याची चतकोर सत्ता लोकप्रतिनिधीच्या नावावर ठेवली आहे, ती कायदे करण्याची सत्ताही प्रत्यक्षात लोकप्रतिनिधीच्या हातात किती असते हे कायदेमंडळात गेल्यानंतर कळते. मंत्रीमंडळ व सचीव बसून कायद्याची बिले तयार करतात. मंत्री फक्त कायद्याचा हेतू, आवश्यकता सांगतात. प्रत्यक्ष बिल तयार करायचे काम, सचीव व त्यांचे पगारी नोकरवर्गच करतो. तपशील तर सचीवांना हवा तोच असतो. कायदेमंडळात बिल सादर करीपर्यंत गुप्ततेच्या नावाखाली बिल लोकप्रतिनिधीनाही पहाता येत नाही. बिल कायदेमंडळांत मांडल्यानंत्र पक्षनेता जे ठरवेल त्यालाच मान हलवावी लागते. अन्यथा पक्षशिस्त मोडते. बिल वाचायलाही फारसा अवधी नसतो, वाचले तरी त्यातील क्लिष्ट भाषा आणि मांडणी नीट समजतेच असे नाही. त्यांत बहुतेक बिले इंग्रजीमधून तयार होतात. इंग्रजी न जाणणारे लोकप्रतिनिधी मख्ख बसून असतात. कायद्याची मराठी भाषाही समजायला अवघडच असते. सत्ताधारी राजकीय पक्ष कै. यशवंतरावांच्या काळापर्यंत ज्या विश्वासाने, निश्चित दिशा व दृष्टी घेऊन चालत होते त्या काळांत पक्षांतर्गत चर्चा बैठकी होऊन, त्यांत लोकप्रतिनिधी भाग घेऊन नियोजित बिलाची माहिती तरी घेत होते. आता पक्षांतर्गत लोकशाही बहुतेक राजकीय पक्षांनी मोडीत काढली असल्याने ती चर्चाही बंद झाली आहे.

''लोकशाहीतील सार्वभौम सत्ता लोकांची'' या क्रांतीकारक विचारांची, प्रत्यक्ष व्यवहारांत युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीने अशी फोलकटे करून टाकली आहेत.

तरीही आम्ही डोळे झाकून तिचाच पुरस्कार करीत राहिलो आहे, हे या देशातल्या प्रचलित अराजकाचे मूळ आहे. लोक आणि लोकप्रतिनिधी यांनी सत्ता हातात घेऊन, लोकांच्या अडचणी, लोकांचे प्रश्न नीट आणि तात्काळ सोडवायचे होते. लोकांचे राज्य, लोक ांच्या सर्वांगीण विकासाचे राज्य, नवसमाज निर्मितीची क्रांती, राजसत्ता हातात घेऊन करायची होती. प्रत्यक्षांत ती सार्वभौम सत्ता पगारी नोकरशाहीच्याच हातात ठेवून समाजातील चलाख, हितसंबंधी ''कौटिल्यांनी'' लोकशाहीतही लोक आणि लोकप्रतिनिधी यांना असहाय्य हतबल करून ठेवले आहे.

स्वातंत्र्यानंतर राजसत्ता लोकशाही पद्धतीने हातात घेऊन देशाची, समाजाची, जडणघडण करायची होती. त्या राजसत्तेचं साधनच असे निकामी, बोथट आणि उलटेच परिणाम देणारं निघालं. हे युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीचं हत्यार टाकून देऊन प्रत्यक्ष लोकशाहीची अनुभूती देणारी, सार्वभौम सत्ता खऱ्या अर्थाने आणि पूर्णपणे लोकांच्याच हातात राहील. लोकहितासाठीच वापरली जाईल याची हमी देणारा, लोक जिथं राहतात तिथून, त्या ग्रामसभेतून, विकेंद्रित विस्तृत पायावर भक्कमपणे उभा राहणारा लोकशाही व्यवस्थेचा पर्याय आपल्याला शोधून मांडलाच पाहिजे. मानवेंद्रनाथ रॉयच्या लोकसमित्यावर आधारित राज्यव्यवस्थेची कल्पना आणि म. गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या कल्पना पुन्हा विचारांत घेऊन, युरोपीय प्रातिनिधीक लोकशाहीचा हा फसवा ढाचा टाकून दिला पाहिजे.

सहकारी कृषी औद्योगिक समाजरचना करणारी अर्थव्यवस्था, ग्रामस्वराज्यावर आधारीत मजबूत अशी खरी लोकशाही राज्यव्यवस्था, परलोकवाद आणि पाश्चात्य भोगवाद यांच्या मानसिक गुलामगिरीतून मने मुक्त करून, व्यक्ती, समाज व सृष्टी यांचे परस्पर पूरक व पोषक नाते जोपासणारे संस्कार करणारी शिक्षणव्यवस्था, या परिवर्तनाच्या, नव्या महाराष्ट्राच्या जडणघडणीच्या दिशा आहेत. गतीमान विकासाची दिशा निश्चित केली तरी, आपल्याला जायचे आहे कुठे? हेही अनिश्चित असता कामा नये. चांगला माणूस, चांगला समाज, प्रसन्न सृष्टी यांचे स्पष्ट स्वरूप आपल्याला माहिती पाहिजे. अन्यथा विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रचंड अश्वशक्तीची घोडी, दाहीदिशा उधळीत बसलो तर मानवजातीला कुठे फेकून देतील त्याचा मागमूसही शिल्लक रहाणार नाही.

भारतीय संस्कृतीने हज़ारो वर्षे मानवी समाज चालवला आहे. रानटी अवस्थेतून जैन किंवा बुद्ध अवस्थेला येईपर्यंत अनेक जीवनपद्धतींचा, कुटुंबव्यवस्थांचा, टोळी जीवनाचा, राज्यव्यवस्थांचा, अर्थव्यवस्थांचा अनुभव घेतला आहे. किमान २५ हजार वर्षे विविध समाजव्यवस्था चालवून पाहिल्या आहेत. त्या सर्व अनुभवानंतर भारतीय

संस्कृती आदर्श कुणाला मानते? रविंद्रनाथ टागोरांच्या शब्दांत सांगायचे तर, ''इथे राजे, महाराजे सम्राट होऊन गेले. योद्धे, महायोद्धे, रथी, महारथी होऊन गेले, विद्वान, पंडित, तत्वज्ञ, विचारवंत होऊन गेले. धनपती, उद्योगपती, ऐश्वर्यसंपन्न कुबेरही होऊन गेले. कवी, साहित्यिक, संशोधक, कलाकार, कारागीर होऊन गेले. विद्या, सत्ता, संपत्तीच्या अत्युच्च पदावर बसणारे अनेक महापुरुष होऊन गेले. परंतु या सर्वांमधून भारतीय संस्कृती आदर्श कुणाला मानते? वरीलपैकी कुणालाही नाही. भारतीय संस्कृती आदर्श मानते ऋषी मुनींना, योगी महात्म्यांना.'' चांगले व्हायचे, पुढे यायचे, सुधारायचे म्हणजे नेमके काय व्हायचे? याचे फार स्पष्ट चित्र प्रदीर्घ अनुभवानंतर, भारतीय संस्कृतीने रेखाटले आहे. भारतीय जनगण मनांत आजही तेच आदर्श आहेत. म्हणून तर इतर सर्व बाबतीत अनेक भारतीय नेते फार वरचढ असताना, म. गांधी इथे आदर्श अनुकरणीय ठरले, सत्यशोधक सत्याग्रही आचार विचारांचा माणूसच इथे, कोट्यावधी मनांचा आदर्श ठरला. न भूतो असे स्वातंत्र्याचे सत्याग्रही आंदोलन सामान्य माणसांच्या अंतःकरणांत उठवू शकला.

महर्षी व्यासांनी माणसांच्या गरजा, इच्छा, अपेक्षा आणि त्यांची योग्य मार्गाने पूर्तता करण्याबद्दल सखोल विचार केला होता, आणि तो किती तरी आग्रहाने मांडला होता. जनावरी प्रेरणांच्या आहारी जाणाऱ्या माणसाला धर्माची दीक्षा का आणि किती आवश्यक आहे, हे सांगताना व्यास महर्षी म्हणताहेत, ''उर्ध्व बाहूः विरोमी एषां । नच् किंचित श्रृणोति माम् । धर्मात अर्थः कामः च । स धर्म किम न सेव्यते'' हात उंच उभारून मी ओरडून सांगतो आहे तरी माझं कुणी ऐकत नाही, अरे समाजधारणा करणारा धर्मच तुमच्या साऱ्या आर्थिक, मानसिक, भावनात्मक गरजा भागवू शकतो, त्या धर्माप्रमाणे तुम्ही का आचरण करत नाही?''

व्यक्ती, समाज आणि सृष्टीची धारणा करणारा धर्म, हा कर्मकांडांचा, मायावादाचा, रूढी परंपराचा किंवा ''ब्रह्म सत्य, जगन् मिथ्या'' म्हणणारा भ्रमिष्ट शिकवणुकीचा धर्म नाही. समाजधारणेसाठी खरा धर्म आवश्यकच आहे, हे धर्म ही अफूची गोळी म्हणून, अधर्मी, निधर्मी तत्वज्ञाने मांडणारांनी लक्षांत घेतलेले नाही, अंधश्रद्धा आणि श्रद्धा यांत जेवढे अंतर, तेवढेच अंतर रूढ धर्माचे प्रचलीत विकृत स्वरूप आणि खऱ्या धर्माचे स्वरूप यामध्ये आहे. समाजधारणेसाठी खऱ्या धर्माची आजही अत्यंत आवश्यकता आहे.

नागपूरकडील एक महापंडित विद्वत्‌रत्न भाऊसाहेब दप्तरी यांनी लिहीलेले एक पुस्तक माझ्या वाचनांत आले होते. ''धर्म-रहस्य'' असे त्या पुस्तकाचे नांव आहे.त्या

पुस्तकाच्या मुखपृष्ठावरच 'धर्माची बौद्धीक चिकित्सा' अशी टिपणी आहे त्या टिपणीमुळेच मी ते पुस्तक वाचले. लोकमान्य टिळकांनी ज्या सुमारास ''गीतारहस्य'' हा ग्रंथ लिहीला, त्याच सुमारास दप्तरीनी ''धर्म-रहस्य'' हे पुस्तक लिहीले आहे. त्यांत त्यांनी अत्यंत समर्पकपणे धर्माची उद्दीष्टे मांडून मनुष्य प्राण्याचे जगणे धर्माशिवाय शक्य नाही असे ''निधर्मी'' माणसालाही विचार करायला लावील अशा पद्धतीने विवेचन के ले आहे. भाऊसाहेब दप्तरीनी आद्य शंकराचार्यांचा ''ब्रह्म सत्य, जगन् मिथ्या'' या सिद्धांतालाच आव्हान दिले असून, ब्रह्म जेवढे सत्य तितकेच जगही सत्य, ते मिथ्या नाही'' अशी भूमिका फार समर्थपणे मांडली आहे. ''धर्म-रहस्य'' ग्रंथात त्यांनी धर्माची आवश्यकता सांगताना म्हटले आहे,'' मनुष्य हा आनंद शोधणारा सुख शोधणारा प्राणी आहे. त्याची सारी धडपड, त्या सुखाचा, आनंदाचा शोध घेण्यासाठीच असते. परंतु ते सुख, आनंद म्हणजे नेमके काय हे त्याला कळतेच असे नाही. तात्पुरत्या सुखासाठी अनंतकाल दु:ख भोगण्याचीही पाळी त्याच्या सुख वा आनंद या बाबतीतल्या अज्ञानामुळे येते. म्हणून खरे सुख, खरा आनंद म्हणजे काय? अत्युच आनंद कशात आहे व तो अत्युच्च आनंद कसा मिळवावा हे त्याला कुणीतरी समजून सांगितले पाहिजे, पटवून दिले पाहिजे. दु:ख निर्माण न करणारे सुख कोणते? आणि ते कसे मिळवावे? हे समजून सांगण्यासाठीच धर्म आहेत. श्री. दप्तरी म्हणतात त्याप्रमाणे धर्माची लक्षणे दोन, पहिले ''निश्रेयस् लक्षण'' आणि दुसरे ''चोदना लक्षण'' सर्वश्रेष्ठ आनंद कशांत आहे हे समजून सांगणे व तो मिळवण्यासाठी माणसाला उद्युक्त करणे हीच धर्माची दोन उद्दीष्टे आहेत. म्हणून मानवी जीवनांत, मानवी समाजात धर्माची आवश्यकता आहे. या मूलभूत आवश्यकतेमुळे अगदी आदिवासीपासून ते प्रगत समाजातील लोकही कसला न कसला तरी धर्म पाळतात. धर्माचा हा सार्वजनिक संचार माणसाच्या सुख शोधण्याच्या स्वभावातच आहे.

समजा चार दिवसाचा एक उपाशी माणूस आहे तसेच एक उपाशी मूलही त्याच्या शेजारी कोमेजून गेले आहे. अशा माणसाला समजा एक गरम भाकरी कोठून तरी मिळाली आणि ती त्याने गपागपा खाल्ली, तर त्या भाकरीपासून त्या चार दिवसाच्या उपाशी माणसाला मिळणारा आनंद अवर्णनीय असणार, परंतु त्यापेक्षाही उच्च कोटीचा आनंद त्याला मिळणे शक्य आहे, कधी? तर त्या उपाशी माणसाने सगळी एक भाकरी न खाता, त्यातली अर्धी भाकरी त्या उपाशी मुलाला दिली तर त्या मुलाच्या डोळ्यातील आनंद पाहून त्या माणसाला जो आनंद होईल तो त्या पूर्ण भाकरी खाऊन मिळालेल्या आनंदापेक्षा उच्चतर आनंद आहे. हे समजून सांगण्यासाठीच धर्माची आवश्यकता आहे. दुसरे उदाहरण असे देता येईल. समजा त्या चार दिवसाच्या उपाशी माणसापुढे तुपातल्या बुंदीच्या

लाडूने भरलेले ताट आणून ठेवले तर पहिला लाडू खाताना होणारा आनंद आणि दहावा लाडू खाऊन ढेकर देताना होणारा आनंद यांत फरक आहेच. पण पोट गच्च भरले तरी १२ वा, १३ वा, पंधरावा लाडू त्याने पोटांत कोंबला आणि मग भडा भडा उलटी झाली तर आनंदाऐवजी दु:खच मिळवले असे होईल. हेही समजून सांगायला धर्माची आवश्यकता आहे. त्यामुळे पुरोगामी पणाच्या नांवाखाली देवधर्म, श्रद्धांची टिंगलटवाळी करण्यापेक्षा, सर्व धर्मातील विकृत कर्मकांड, परहिताबद्दलची अनास्था, ढोंगी बडवेगिरी काढून टाकून खऱ्या आनंदमय धर्माचे रहस्य, सर्व धर्मात कसे उजळले जाईल, यासाठी प्रयत्न करणे, नवसमाजनिर्मितीला आवश्यक आहे.

आपण म. जोतिबा फुलेंचे आद्य समाज क्रांतीकारक म्हणून नांव घेतो. त्यांनी सुद्धा ''सार्वजनिक सत्यधर्म'' प्रस्थापित व्हावा म्हणूनच सत्यशोधक समाज संघटीत केला. म. गांधींनी सर्व धर्म समभाव सांगून ''सबको सन्मती दे भगवान'' अशीच आयुष्यभर प्रार्थना केली. राजर्षी शाहू महाराजांनाही पुनर्रचित ''आर्यधर्मा'' च्या प्रसारात स्वारस्य निर्माण झाले आणि जगांतील सर्वात पीडीत दलित जनतेचे नेते डॉ. बाबासो. आंबेडकर यांनीही आयुष्याच्या शेवटी, भगवान गौतमाच्या बौद्ध धर्माच्या मार्गानेच गेले पाहिजे असाच निर्णय घेतला. नवसमाज निर्मितीमधील खऱ्या धर्माचे स्थान नीटपणे समजून घेवूनच पुरोगाम्यांनी देव, धर्माबद्दलची आपली नकारात्मक भूमिका तपासून घेतली पाहिजे.

नवी मानवी संस्कृती ही आत्मज्ञान आणि विज्ञान यावर उभी राहिली पाहिजे. अशा संस्कृतीचा शोध फक्त सत्यशोधक सत्याग्रहीच घेऊ शकेल. ही मनोवृत्ती सार्वत्रिक स्वरूपांत कशी उभी करायची हेच आपल्यापुढील मुख्य आव्हान आहे. माणसाच्या मनोवृत्तीची जडणघडण करणारी तीन प्रमुख ठिकाणं आहेत. पहिले कुटुंब, दुसरे उपासनामंदीर आणि तिसरे शिक्षण मंदीर, या तिन्ही स्थानांची पुनर्रचना करून नव्या पिढीचे संगोपन, नव्या मानवी संस्कृतीचे पाईक, सैनिक, स्वयंसेवक म्हणून करता आले पाहिजे. मी ज्यांना गुरुस्थानी मानतो ते कै. आचार्य जावडेकर म्हणायचे कुटुंब म्हणजे घर, शाळा आणि देऊळ यांचा त्रिवेणी संगम असे असले पाहिजे. आम्ही ही माणसाच्या जडणघडणीची ठिकाणे फार दुर्लक्षित करून मोडकळीस आणली आहेत. ती तंदुरुस्त करूनच नवा महाराष्ट्र वा नवभारत उभा करता येईल.

आणखी दोन मुद्दे मांडून मी माझे हे तिसरे आणि शेवटचे भाषण थांबवणार आहे. मन:स्थिती परिवर्तनाबरोबर परिस्थिती परिवर्तन हे आवश्यक आहेच आणि त्यासाठी तंत्रज्ञानाची अमोघ शक्ती आज मानवाच्या हाती आली आहे. पाश्चात्य संस्कृतीची हीच

जगाला मोठी देन आहे. परंतु विज्ञान, तंत्रज्ञानाचा वापरही पाश्चात्यांची आंधळी कॉपी करीत बसल्यामुळे आम्ही आमचे नुकसान फार वेगाने करतो आहे. तंत्रज्ञान म्हणजे काहीतरी अत्यंत गुंतागुंतीचे, अवघड, प्रचंड भांडवली खर्चाचे, हाय टेक्नॉलॉजी म्हणजे काहीतरी आभाळाला जाऊन उंचीवर बसलेले, सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे असं काहीतरी स्वरूप आज दिलं गेलं आहे. सामान्य माणसाची परिस्थिती पालटण्यासाठी त्याच्या परिसरातच संपत्ती निर्माण करण्याचे काम गावोगांव झालं पाहिजे. संपत्तीचे खजीने सभोवारच्या नैसर्गिक साधन संपत्तीतच आहेत जमीन, पाणी, प्राणी, वनस्पती, हवा, सूर्यप्रकाश हेच आगाध खजिने आहेत आणि खजिन्याची दारे उघडणारी किल्ली विज्ञान, तंत्रज्ञानांत आहे. या नैसर्गिक पंचमहाभूतांचे सुयोग्य असे संधारण करणारे सुलभ, स्वस्त, उचित असे तंत्रज्ञान, लोकभाषेत प्रात्यक्षिकाद्वारे घराघरापर्यंत नेणे हेच यापुढे परिवर्तनातले मुख्य पाऊल ठरणार आहे, गावोगांव अशा सुलभ उचित तंत्रज्ञानाचा पुरवठा करणारे ''विज्ञान आश्रम'' सुरू केले पाहिजेत. खरं म्हणजे ज्ञानेश्वरी सप्ताह थोडे कमी करून विज्ञानेश्वरी सप्ताह गावोगांव सुरू केले पाहिजेत.

आपले नगराध्यक्ष, आमदार पी.डी पाटीलसाहेब यांनी परवा एक प्रसंग सांगितला. त्यांची आणि गगनगिरी महाराजांची एक चर्चा झाली. महाराज म्हणजे संत, अध्यात्मिक धार्मिक पुरुष. पण ते दोन तीन तास बोलले ते एकाच विषयावर. ते म्हणाले, यापुढे या देशाची सेवा व्हायची असली, या देशाचे दुर्भाग्य हटवून भाग्य उजळायचे असेल तर एकच मार्ग आहे. विज्ञान तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे. जगभर प्राप्त झालेले विज्ञान तंत्रज्ञान समजून घेऊन, आपल्या प्रश्नांची सोडवणूक करणारे उचित असे निवडून सुलभ रीतीने कसे घरोघर पोचवता येईल हेच पाहिले पाहिजे. हे आपण करू शकलो तर तीन एकर जमीन असणारा शेतकरीही हेलीकॉप्टरमधून फिरू शकेल.''

गगनगिरी महाराज बोलले ते थोतांड नाही, भौतिक सुविधा निर्माण करण्याचे विज्ञान तंत्रज्ञानाचे प्रचंड सामर्थ्य अजून आपण जाणलेले नाही. आपल्याजवळ आपल्याच चौथी, पांचवी इयत्तेपर्यंत शिकलेल्या शेतकऱ्यांनी द्राक्ष बागायतीत केवढी क्रांती करून दाखवली आहे. एकरी २६ टन द्राक्षे पिकविणारे शेतकरी आपल्या शेजारी आहेत. त्यांच्या भाषेत, प्रात्यक्षिकाद्वारे, आधुनिक ज्ञान विज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचवले तर तीन एकरवाला शेतकरीही हेलीकॉप्टरमधून सहज फिरू शकेल. ''सायन्स ऑफ इलेक्ट्रॉनिक्स्'' आणि ''सायन्य ऑफ जेनेटिक्स'' यांनी प्रयोगशाळांमधून जे शक्तीसामर्थ्य दाखवले आहे ते व्यवहारांत आणले तर गावोगांव ''मयसभा'' च उभ्या रहातील. आपल्या अनेकांच्या घरांत टी.व्ही. आला आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात घडणारी गोष्ट आपल्या खोलीत

बसून पाहू शकतो, ऐकू शकतो. लाखो मैल दूर असलेल्या आकाशांतील ग्रहगोलावरचे संदेश आणि चित्रफिती पाहू शकतो. अंतर संपवण्याचा हा झपाटा केवढा आहे? टी.व्ही. बघतो पण त्यातील विज्ञान, तंत्रज्ञान आपण समजून घेतले का? नाही. आपला आजही समज आहे, टी.व्ही. पहायचा म्हणजे हिंदी सिनेमातली "इलू इलू" ची गाणी ऐकायची आणि अर्धनग्न हिरो हिरॉईन अश्लील नाच करीत लोळताना पहायचे.

प्रत्येक कुटूंब, प्रत्येक गांव, प्रत्येक राष्ट्र भौतिक सुविधांच्या बाबतीत स्वयंपूर्ण संपन्न करण्यासाठीची शक्ती आज विज्ञान तंत्रज्ञानांत आहे. गांधीजींच्या ग्रामस्वराज्यातील स्वयंपूर्णता आता अशक्य नाही. पण माणसाचे मन षड्रिपूंच्या विळख्यातून बाहेर आले नाही तर मात्र हेच विज्ञान साऱ्या जगाची राखरांगोळी करू शकेल. आजच जगाच्या पाठीवरील "युनोमध्ये व्हेटो वापरणाऱ्या राष्ट्रांनी" सारी पृथ्वी मोजून २५ वेळा जाळून काढता येईल, इतक्या अणूबाँबचे साठे करून ठेवले आहेत.

युरोपची पाश्चात्य संस्कृतीची मानसिक गुलामगिरी, आता आपण टाकून दिली पाहिजे. आणि मी पहिल्या भाषणांत सांगितल्याप्रमाणे चिरंतन ठरलेली जीवनमूल्ये पुन्हा आचार विचारांत आणली पाहिजेत. हे पाश्चात्य लोक जगज्जेते आहेत. विद्या, सत्ता, संपत्तीचे डोंगर त्यांनी उभे केलेत. विज्ञानाच्या आघाडीवर तर त्यांनी खूप मोठा पल्ला गाठला आहे. हे सर्व खरे असले तरी व्यक्ती, समाज व सृष्टी उध्वस्त करणारी त्यांची संस्कृती ही एक राक्षसी संस्कृती आहे. आणि या युरोपीयन लोकांचा मानवी समाज चालवणेचा अनुभव किती? हजार पाचशे वर्षाचा. गेल्या हजार पाचशे वर्षांचा या युरोपीयन मंडळींचा इतिहास खोलांत जाऊन तपासला तर, त्यांच्या गोऱ्या गोमट्या चेहऱ्याआड दडलेला कसाई, भस्मासूर, बकासूर आपल्याला दिसेल. नुकतेच माझ्या वाचनांत एक पुस्तक आले. त्याचे नांव "पिपल्स हिस्ट्री ऑफ अमेरिका" असे आहे. आणि त्यांत गेल्या ५ शे वर्षात जग जिंकण्यासाठी या युरोपीयनानी काय काय अत्याचार केलेत याचा त्यात खरा इतिहास आहे. कोलंबसने अमेरिकन भूमीवर पाय ठेवल्यानंतर या युरोपीयन लोकांच्या टोळधाडी अमेरिकेत सुरू झाल्या. शंभर एक वर्षानंतर त्या देशांत वसाहती करण्याची मोहीम सुरू झाली. अमेरिकेत ही मोहीम होती. त्याप्रमाणे आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड इकडेही अशा मोहिमा सुरू झाल्या. आशिया खंडात व्यापारी कंपन्या स्थिरस्थावर झाल्या. अमेरिकेचा परराष्ट्र मंत्री जॉन फॉस्टर डल्लेस यांने जे पुस्तक लिहीले आहे त्याचा काल मी उल्लेख केला आहे. जॉन फॉस्टर डल्लेस त्या पुस्तकात युरोपने जग कसे जिंकले ते सांगतो आहे. तो म्हणतो मिशिनरी, मर्चंट आणि मिलिटरी हा त्रिशूल वापरून युरोपीयनांनी जग जिंकले प्रथम मिशनरी परक्या मुलुखांत जात. अत्यंत चिकाटीने तिथल्या स्थानिक लोकांचा विश्वास मिळवीत. त्या देशांतील

खडान् खडा माहिती काढीत. धर्मप्रचाराच्या नावाखाली त्या देशांत काही "पंचमस्तंभीय" लोक निर्माण करीत.

नंतर व्यापारी कंपनीतर्फे "मर्चंट" त्या मुलुखांत जात, साऱ्या आर्थिक नाड्या अभ्यासून आपल्या हाती घेत. तिथेच पैसा जमवून तिथेच तैनाती फौजा उभ्या करीत. तिथल्या राजे लोकांत गट,तट, भांडणे पेटवून देत आणि त्याचा फायदा घेऊन आपले "कवायती" सैन्य आणून तो मुलुख जिंकून घेत.

"अमेरिकेतील लोकइतिहास" हे पुस्तक वाचताना या युरोपीयन लोकांनी तिथल्या स्थानिक लोकांशी केलेला अमानुष व्यवहार पाहून मन चिडून जाते. अमेरिकेतील स्थानिक "रेड इंडियन" लोक हे आदिवासी निसर्गपुत्रच. सडे बांध्याचे, तांबूस रंगाचे, अति साधे भोळे, अत्यंत आदरातिथ्यशील. गोऱ्या लोकांच्या बोटी आल्या, कपडे घातलेले, कधीच न पाहिलेले विचित्र लोक मोठे कुतुहल, आश्चर्य, नवख्या लोकांना भीतिपोटी हाकलून द्यावे, असे नाही त्यांना वाटले. त्यांना ते पाहूणे वाटले. कुठून तरी आले. कुठेतरी निघून जाणार. त्यांच्या मनांत पाहुणचाराच्या कल्पना आल्या. आपल्याजवळ होते नव्हते ते सारे त्यांनी पाहुणचार म्हणून त्यांना दिले. मध, केळी, पक्षी. पण या पाहुण्यांनी त्या लोकांचा अंदाज घेतला. बोटीवर घेऊन पकडून ठेवले. त्यांचे आक्रमक हेतू उघडे झाले. युरोपीयनांनी त्यांना गुलाम केले. अमेरिका म्हणजे सोन्याचा देश अशी त्यांची कल्पना, त्या सोन्यासाठी स्थानिक लोकांना नद्या, नाली, डोंगरापर्यंत शेते खणायला लागले. पाहुणे त्यांना जिंकायला आले होते. त्यांना हाकलायला आले होते. त्यांचा देश कब्जात घेऊन तिथेच कायमचे रहायला आले होते. हे त्या वनवासी इंडियनांच्या उशीरा लक्षात आले आणि मग त्यांचा स्वाभिमान जागा झाला. त्यांनी प्रतिकार केला, आपल्या साध्या तिरकामट्यांनी काठ्याकुऱ्हाडींनी, बंदुकीचा मुकाबला केला. आणि मग युरोपीयनांनी आपले लढाऊ सैन्य, हत्यारे, तोफा आणून रेड इंडियनांच्या विरुद्ध युद्धच पुकारले. त्यांच्या वस्त्या जाळायच्या, बायकामुलांच्या कत्तली करायच्या, डोंगरमाळावर पळून गेलेल्यांच्या शिकारी करायच्या, असा वंशसंहार तीनशे वर्षे चालला. अमेरिकेची विशाल भूमी कब्ज्यात घेताना किती रेड इंडियनांच्या कत्तली केल्या? ते पुस्तक म्हणते तीन कोटी लोकांची. शेवटची वस्ती जाळण्यांची घटना १९११ साली घडली. आणि रेड इंडियनही बहाद्दूर, त्यांनी मरण पत्करले, वंशसंहार पत्करला पण युरोपीयनांची गुलामी पत्करली नाही.

तीन कोटी रेड इंडियन आदिवासींचे रक्त सांडून विशाल अमेरिकेचा कब्जा केला, पण ती भूमी कसायची कुणी? त्यासाठी मजूर कुठले? आफ्रिकेतील एका मिशनऱ्याने कल्पना सुचविली. आफ्रिकेतील निग्रो पकडून गुलाम म्हणून अमेरिकेत

विकायचे, आणि तेथील प्रचंड मळे कसायचे. कल्पना एकदम पसंत पडली. मग मासे झिंगे पकडायला जसे कोळी, भोई जातात, तसे निग्रोना पकडायला युरोपीयन कंपन्या तयार झाल्या. सुरुवातीचे स्पेन पोर्तुगाल मागे पडले. गुलामांचा व्यापार बरकतीला आणला. इंग्लिश व्यापाऱ्यांनी बोटी भरभरून आफ्रिकेतील निग्रो अमेरिकेत नेऊन विकले. प्रचंड फायद्याचा व्यापार झाला. किती निग्रोंना पकडले? आणि किती निग्रोंना गेल्या तीनशे वर्षात अमेरिकेत नेऊन विकले? ते पुस्तक म्हणते, ५ कोटी निग्रोंचा व्यापार झाला, अमेरिकत मात्र तीन कोटी गुलाम पोचले. बाकीचे दोन कोटी कुठे गेले? मासे, झिंगे भरावेत तसे निग्रो बोटीत भरल्याने ते वाटेतच मेले. त्यांची प्रेते बोटीतून समुद्रांत फेकून देण्यात आली.

तीन कोटी रेड इंडियन्स आणि पाच कोटी निग्रो यांच्या रक्ताने, घामाने आणि अश्रूने भिजलेली अमेरिकन भूमी आज त्या अत्याचाऱ्यांच्या मालकीची आहे. सोन्याच्या राशीवर आता बसलेत आणि तेथून "मानवी हक्क, अतिरेक्यांचा निषेध, न्याय, स्वातंत्र्य, लोकशाही अशा मूल्यांच्या घोषणा करीत आहेत.

युरोपीयनांनी ऑस्ट्रेलियातील मावरी आदिवासी असेच मारून टाकले आणि त्या खंडावर गेल्या दोनतीनशे वर्षात कब्जा केला. न्युझीलंडमध्ये मारून, जाळूनही संपेनात निरपराधी आदिवासी माणसे मारण्याचा नॉसिया काही युरोपीयन सैनिकांना आला. तशी त्यांनी घरी पाठविलेली पत्रे आहेत. मग मिशनऱ्यांनी माणसे मारण्याची नवी कल्पना काढली. प्रभूसेवा करण्यासाठी गेलेल्या न्युझीलंड मधल्या इंग्लिश मिशनऱ्याने आदिवासी मावरीना कपडे, घोंगडी, रग्ज वाटल्या. पण त्या वाटताना त्यांत प्लेगचे व हिवतापाचे जंतू भरले आणि त्या भयानक रोगांच्या साथी फैलावून हजारो लाखो मावरी मारले.

पहिल्या महायुद्धापर्यंत साऱ्या पॅसिफीक महासागरातील लहान मोठी सारी बेटे, प्रदेश असे "साफ व सेफ" करून या अमेरिकन युरोपीयनांनी आपल्या कब्जांत घेतली. त्यानंतर फिलीपाईन्समध्ये असाच कत्तलखाना चालवला. न्यूयॉर्कमध्ये मात्र स्वातंत्र्यदेवीचे भजन, पूजन चालू ठेवले. पहिले, दुसरे महायुद्ध या पांढऱ्या राक्षसांनी आपसातच केले. त्यात तीन कोटी माणसे मारली. जपानवर अणुबाँब टाकले. दोन मोठी शहरे बेचिराख केली. युद्ध संपले तरी कोरियांत भांडण लावले. व्हिएटनाममध्ये कार्पेट बॉबिंग केले. मध्य आशियात इस्त्रायल राष्ट्र जबरदस्तीने उभे करून तिथल्या पैलेस्टाईन रहिवाश्यांना देशोधडीला लावले. अमेरिकेच्या संयुक्त राज्यात इस्त्राइल हे अमेरिकेचे ५२ वे घटक राज्य आहे. आफ्रिकेत नवोदित राष्ट्रात कायम टोळीयुद्धे चालतील अशी

व्यवस्था केली. माघारी निघालेल्या इराकी फौजावर विमानातून बाँब हल्ले करून माणसे मारण्याची आपली सवय अमेरिकेने विझू दिली नाही.

आजही जगांत कुठे ना कुठेतरी युद्धे धुमसत ठेवायची. लढणाऱ्या दोन्ही बाजूला शस्त्रे पुरवायची, हे अमेरिकेचे, फ्रान्सचे, इंग्लंडचे आणि रशियाचे अधिकृत धोरण आहे. या देशांत शस्त्रास्त्र निर्मितीचे कारखाने फायद्यांत चालले पाहिजेत म्हणून या कत्तली चालूच राहिल्या पाहिजेत. अशी धोरणे युरोपीयन लोक फार "मुत्सद्दीपणाने" अमलात आणीत आहेत. युनोसारख्या जागतिक संघटना आपल्या हेतुपूर्तीसाठी वापरीत आहेत. जगाच्या पाठीवर काही दंगली, हिंसाचार, लढाया वा युद्ध झाले तर, लढणाऱ्या दोन पार्टीना जितके जबाबदार धरले जात तसे त्यांच्या हातात ज्यांची कुणाची शस्त्रे असतील, ती शस्त्रे निर्माण करणाऱ्या देशानाही तितकेच जबाबदार धरले पाहिजे. समूळ युरोपीयन लोकांचा आक्रमक, हिंसक, भोगवादी, शहरी, संघटित, औद्योगिक समाजरचनेचा ढाचा हा व्यक्ती, समाज आणि निसर्ग उध्वस्त करणारा ढाचा आहे. म्हणूनच तो अमानुष आहे. त्याच्या मायावी मोहातून आमच्या शिक्षितांनी, नेत्यानी, तज्ञांनी, समाजधुरीणांनी विनाविलंब बाहेर पडले पाहिजे. त्यांनी तयार केलली राज्यशास्त्रे, समाजशास्त्रे, अर्थशास्त्रे, शिक्षणशास्त्रे ही मुळापासून तपासून घेतली पाहिजेत आणि आपल्या संस्कृतीच्या उद्दीष्टांचा पूर्तीकडे नेणारी, आपल्या मन:स्थितीत व परिस्थितीत रूजतील, फुलतील, फळतील अशी समाजशास्त्रे, भौतिकशास्त्रे विकसित करण्याचे आव्हान आमच्यातल्या बुद्धीमंतानी, विद्वानांनी घेतले पाहिजे.

गेले तीन दिवस मी आपल्यापुढे माझे काही विचार मांडायचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्राच्या उभारणीच्या कामांत कै. यशवंतरावानी दाखवलेली दिशा आणि दृष्टी मला जशी भासते ती आपल्यापुढे मांडायचा प्रयत्न केलेला आहे. स्वातंत्र्यापर्यंतच्या शंभरवर्षात म. जोतिबा फुले ते महात्मा गांधी या कालखंडात, महाराष्ट्रात जे विचारमंथन झाले, समाजसुधारणेच्या, समाज परिवर्तनाच्या, जनजागरणाच्या ज्या ज्या चळवळी झाल्या, त्या सर्व मंथनाचा लघुत्तम साधारण संयोजक म्हणजे यशवंतराव चव्हाण यांचे आचार विचार आहे. कार्यकर्तृत्व आहे. ती त्यांची वैचारिक भूमिका, आचार विचाराची बैठक जे कुणी पुढे नेतील, विकसित करतील ते चव्हाणसाहेबांचे खरे वारस ठरतील. आज महाराष्ट्र त्यांचे वारस, त्यांचे मानसपुत्र म्हणून काहीजण त्यांच्या पुण्याईचा बाजार मांडून बसलेत पण त्या चेल्यांचे खरे आचार विचार काय आहेत? त्यांच्या राजकीय चाली कशा आहेत? त्यांचे अर्थकारण कसे चालते? हे आता सगळ्यांना माहित झाले आहे. ठीक आहे. मला त्या बाबतीत या ठिकाणी अधिक काही सांगायचे नाही. फक्त चव्हाणसाहेबांची बदनामी करण्याचे पाप कुणी करू नये असे मनापासून वाटते.

यशवंतरावांची स्तुती करताना, त्याचे भजन पूजन करा, त्यांची पोथी करा, त्यांचे देऊळ बांधा, असंही मला सांगायचं नाही. तीही एक् मूर्खपणाची प्रवृत्ती आहे.

महाराष्ट्रातील सामान्य मराठी माणसांची पिढ्यान् पिढ्यांची मानसिक कोंडी फोडण्याचे काम चव्हाणसाहेबांनी केले. मरगळून गेलेल्या मनांत नवा आत्मविश्वास भरला आणि कार्यकर्तृत्वाची अनेक दालने उघडून पुढे जाण्याचे रस्ते काढून दिले. यशवंतरावांचे जीवनकार्य हे महाराष्ट्राला प्रेरणा, स्फूर्ती, दिशा आणि दृष्टी देणारे आहे. आजच्या गोंधळातील वातावरणांत, तत्वहीन अराजकांत, पुढचं काहीच दिसत नाही. अशा अंधारात कराडचा हा दीपस्तंभ कार्यकर्त्यांना, विचारवंतांना आणि जनगणमनाला मार्गदर्शक होईल अशी माझी मनोमन खात्री आहे.

आपण दोन तीन दिवस वेळ देऊन माझे विचार ऐकलेत. मी आपला अत्यंत आभारी आहे. आमदार, नगराध्यक्ष पी. डी. पाटील, इतर सर्व नगरसेवक, कर्मचारी यांचेही मी अत्यंत आभार मानतो आणि माझे हे या सत्रातील तिसरे आणि अखेरचे भाषण संपवतो.

॥ जय हिंद, जय महाराष्ट्र ॥

दि. १४ मार्च १९९५

- प्राचार्य पी. वी. पाटील
सांगली



राम प्रधान
मुंबई

राम प्रधान यांनी १९५२ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये (आय.ए.एस्.) प्रवेश केल्यापासून निवृत्त होईपर्यंत अनेक महत्वपूर्ण पदांचा कार्यभार समर्थपणे सांभाळला. अशी संधी फारच थोड्या अधिकाऱ्यांना लाभते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि नंतर भारताचे संरक्षणमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांचे ते १९६० पासून १९६५ पर्यंत स्वीय सचिव होते. पुढे प्रधान यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक विचारविनिमयामध्ये सहभागी होण्याचे भाग्य लाभले. संयुक्त राष्ट्रसंघाची व्यापार आणि विकासविषयक परिषद व गॅट या दोन संस्थांमधील भारताचे निवासी प्रतिनिधी म्हणून प्रधान यांचे जिनिव्हा येथे बारा वर्षे वास्तव्य घडले. आंतरराष्ट्रीय सनदी अधिकारी हे पद त्यांनी पाच वर्षे भूषविले. १९७७ च्या जूनमध्ये भारतात परतल्यावर प्रधान यांची प्रथम महाराष्ट्र गृहसचिव म्हणून आणि नंतर मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली.

१९८५ च्या जानेवारीमध्ये राजीव गांधी यांनी प्रधान यांना दिल्लीस केंद्रीय गृहसचिव म्हणून बोलावून घेतले. भारताच्या या तरुण आणि तडफदार पंतप्रधानांसमवेत प्रधान यांनी अठरा महिने काम केले. पंजाब, आसाम आणि मिझोराम या राज्यांमधील राजकीय पेचप्रसंग सोडविण्याच्या दृष्टीने जे करार करण्यात आले ते याच काळात. साहजिकच या अशा निर्णायक वाटाघाटीच्या निमित्ताने राजीव गांधी यांना जवळून समजून घेणे प्रधान यांना शक्य झाले. राजीवजीभोवती वावरणाऱ्या व्यक्तींचे निरीक्षण करता आले.

शासकीय सेवेतून ३० जून १९८६ रोजी निवृत्त झाल्यावर प्रधान यांची तिबेट आणि ब्रह्मदेश या दोन देशांच्या सीमेलगत असलेल्या अरुणाचल प्रदेशाचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली. १९९० च्या मार्चमध्ये त्या पदाचा

त्याग केल्यावर त्या वर्षीच्या जूनमध्ये प्रधान महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आले. लोकसभेच्या १९९१ मधील सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी काँग्रेस पक्षाने पी. व्ही. नरसिंहराव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मध्यवर्ती निवडणूक समन्वय समितीचे सदस्य म्हणून प्रधान यांनी काम पाहिले.

कर्तृत्वसंपन्न शासकीय सेवेबद्दल राम प्रधान यांचा २६ जानेवारी १९८७ या दिवशी पद्मभूषण हा राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. 'वर्किंग वुईथ राजीव गांधी' हे इंग्रजी पुस्तक, मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या संरक्षण मंत्रिपदाच्या कालखंडाशी संबंधित 'वादळमाथा' हे मराठी पुस्तक प्रकाशित. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त. याशिवाय अनेक संस्थांच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून काम पहात आहेत.

❑ ❑ ❑

# " मी पाहिलेले एक अष्टपैलू व्यक्तिमत्व

आज कराडमध्ये यशवंतरावांच्या ११ व्या पुण्यतिथिच्या निमित्ताने आपण मला बोलविले, यशवंतरावांच्या स्मृतिला आणखी उजाळा देण्याची, तसेच आपण केलेले कार्य बघण्याची संधी दिली, याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

कराड आणि कराडच्या आसपासचा जो प्रदेश आहे, तो यशवंतरावांच्या स्मृतिने भारावलेला आहे. येथे जवळच यशवंतरावांचे जन्मस्थान आहे. यशवंतरावांचे शिक्षण येथे झाले. येथेच ते लहानाचे मोठे झाले. स्वातंत्र्य युद्धात त्यांनी येथेच भाग घेतला. येथेच त्यांनी इतिहास घडविला. येथूनच वेळोवेळी मुंबईच्या विधिमंडळामध्ये व नंतर महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये ते निवडून आले, आणि शेवटी, येथेच त्यांनी चिरंतन समाधी घेतली. आज माझे मन या सर्व आठवणींनी भारावलेले आहे.

यशवंतराव आणि माझा संबंध ३५ वर्षापूर्वी त्यांचा स्वीय सहाय्यक म्हणून झाला. परंतु मित्रत्वाचा संबंध शेवटच्या दिवसापर्यंत राहिला. असा संबंध निरनिराळ्या तऱ्हेने, निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या प्रकारे जिव्हाळ्याचा निर्माण झाला. माझे आणि त्यांचे नाते अत्यंत नाजूक, पण बंधुत्वाचे होते. मी शासकीय चाकोरीत होतो. ते राजकीय नेते होते. एक राजकीय उच्च पदस्थ नेता आणि एक उच्च पदस्थ शासकीय अधिकारी

यांच्या संबंधामध्ये जे एक नाजूक नाते असते, त्याची त्यांना चांगली जाणीव होती. जिव्हाळ्याचे संबंध, वैयक्तिक संबंध आणि शासनामधील संबंध यांच्यामध्ये कुठेतरी लक्ष्मणरेषा असायला पाहिजे, अशी त्यांची भावना असे आणि त्यांनी ती पाळली होती. मीही, ही लक्ष्मणरेषा कधी पार केली नाही. आमच्या संबंधाविषयीची माहिती जुन्या, माहितगार लोकांना होती. त्यांच्या मित्रांना होती, तसेच त्यांच्या नातेवाईकांना होती. हे जे संबंध निर्माण झाले, या संबंधातून गेल्या चार दशकात मला यशवंतरावांचे निरनिराळे पैलू बघण्याची संधी मिळाली. आज मी या विविध पैलूंविषयी बोलणार आहे.

आज यशवंतरावांची ११ वी पुण्यतिथि. गेली दहा वर्षे यशवंतरावांच्या विषयी लिहिण्याचे मनात होते. परंतु योग आला नव्हता. तो आपल्या आमंत्रणाच्या स्वरूपात आला. मनात आले की, कराडला जावयाच्या अगोदर यशवंतरावांच्या आयुष्यातील जो एक अत्यंत महत्वाचा क्षण व काळ होता, त्या विषयी आपण काही लिहावे व त्या दृष्टीतूनच मी 'वादळ माथा' हे पुस्तक लिहिले. दोन दिवसांपूर्वी पुण्यात ते प्रसिद्ध झाले आहे. आज मी कराडला, आपल्या सर्वांच्या साक्षीने 'वादळ माथा' यशवंतरावांच्या स्मृतिस अर्पण करीत आहे.

यशवंतरावांच्या आयुष्यातील वादळी काळ सुरू झाला, नोव्हेंबर १९६२ मध्ये. चीनने पूर्व व पश्चिमेच्या सरहद्दीवर युद्ध सुरू केले. भारतीय सैन्याची सर्वत्र माघार होत होती. दिल्लीचे तख्त हादरून गेले होते. अशा बिकट परिस्थितीत पंडित जवाहरलाल नेहरूंनी यशवंतरावांना दिल्लीला भारताचे संरक्षण मंत्री होण्यासाठी पाचारिले. त्या वेळी संपूर्ण महाराष्ट्रात, व विशेष म्हणजे कराडात, आनंदाची लाट लोटली. 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री जात आहे.' या शब्दात यशवंतरावांचे सर्वत्र कौतुक झाले. आपले यशवंतराव दिल्लीला जाताच काहीतरी चमत्कार करतील, ही जनतेची अपेक्षा. आणि तसाच काही चमत्कार झाला. २० नोव्हेंबरला यशवंतराव दिल्लीत दाखल झाले व त्याच रात्री चीनने युद्धबंदी जाहीर केली. असे काही होईल हे कोणाच्या स्वप्नातही नव्हते.

युद्धबंदी तात्पुरती आहे व चीन चार-पाच महिन्यानंतर परत युद्ध सुरू करील असा एक अंदाज होता. त्या युद्धासाठी तयारी, शस्त्रांची जमवाजमव व सैन्याचे मनोधैर्य मजबूत करण्यासाठी यशवंतराव संरक्षण मंत्र्यांच्या गादीवर बसले व जिद्दीने कामास लागले. पण दिल्ली व दिल्लीचे राजकारण म्हणजे महाराष्ट्राचे राजकारण नव्हे याची त्यांना प्रचिती आली. त्या राजकारणामुळे यशवंतरावांना कित्येक मनोव्यथा सहन कराव्या लागल्या. त्या बिकट परिस्थितीत त्यांनी सर्व काही सहन केले. ते त्या विषयी कोणाशी बोलले नाही. म्हणून मुद्दाम त्यांच्या ११ व्या पुण्यतिथीला, त्या व्यथा मराठी जनतेसमोर

आणाव्यात म्हणून मी 'वादळ माथा' लिहिले. ते आता आपल्यासमोर आहे. त्यातून आपणास यशवंतरावांच्या कित्येक पैलूंचे दर्शन होईल. आजच्या प्रसंगी मी काही निवडक पैलूंविषयीच बोलणार आहे.

आज कराडात येऊन कराडची प्रगती पाहण्याची संधी मिळाली. जवळ जवळ ४० वर्षापूर्वी माझा कराडशी संबंध आला. १९५७ ते १९६० अशी तीन साडेतीन वर्षे कोल्हापूरला कलेक्टर होतो. कोल्हापूरला जायचे म्हणजे कराडमार्गे. त्यावेळचे कराड लहान खेडेगाव होते. मी ते खेडेगांव यशवंतरावांच्या बरोबर पाहिले आहे. आज कराड, शहर झाले आहे आणि उत्कृष्टपणे विकासाच्या मार्गाला लागले आहे. त्याचे श्रेय एका माणसाला आहे, अशी माझी भावना आहे. ते आहेत पी. डी. साहेब.

पी. डी. पाटलांचे आणि साहेबांचे संबंधाविषयी मी काही बोलण्याची आवश्यकता नाही. दोघांनी एकाच गोष्टीवर प्रेम केले. ते म्हणजे 'कराड'. यशवंतरावांनी दुरून प्रेम केले. तर पी. डी. नी येथे राहून. यशवंतराव १९४६ साली कराडबाहेर गेले. पण त्यांचे मन व तन सदैव कराडात गुंतलेले असायचे. ते या शहरावर अमाप प्रेम करीत. त्यांच्या कराड प्रेमाचे उदाहरण म्हणून एक गोष्ट सांगतो.

१९६१ साली यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्य मंत्री झाले, तेव्हा ते रहात, 'सह्याद्री' मध्ये. सह्याद्री हे त्यांच्या मुंबईच्या बंगल्याचे नाव. शरीर मुंबईत, पण मन कराडमध्ये अशी त्यांची अवस्था होती. कराड आणि कराडची प्रगती, कराडमध्ये काहीतरी झाले पाहिजे, ही भावना सतत त्यांचे मनात असे. त्याचे प्रतीक म्हणून १६ मे १९६१ रोजी यशवंतरावांनी त्यावेळी नगराध्यक्ष असलेले पी.डी. पाटील यांना जे पत्र लिहिले त्याचा काही भाग मी वाचून दाखविणार आहे. कराडवरचे त्यांचे प्रेम आणि पी. डी. पाटील यांचे कार्य यांचा संगम कसा झाला हे त्यावरून आपणास कळेल.

यशवंतरावांनी लिहिले: ''मध्यंतरी एक दिवस सवड मिळाली म्हणून बऱ्याच वर्षांनी कऱ्हाडच्या प्रीती संगमावर मी फिरण्यासाठी गेलो. जुन्या आठवणी नेहमीच हृद्य असतात. तेच अनुभव या प्रसंगीही आले. परंतु वैयक्तिक अनुभवाखेरीज इतर जे विचार याप्रसंगी मनांत आले ते नगराध्यक्ष या नात्याने तुम्हास कळविण्याचे मी मनात योजले होते. आज ते विचार कागदावर उतरवीत आहे.

कऱ्हाडला शहर या दृष्टीने जे नैसर्गिक फायदे आहेत, त्या सर्वात महत्वाचा फायदा म्हणजे हे शहर दोन महत्वाच्या नद्यांच्या काठी वसले आहे. शहर एका नदीच्या काठावर असणे म्हणजे भाग्याचे मानले जाते. तर आपल्या शहराला हे दुहेरी भाग्य आहे.

शहर सुधारण्याच्या प्रयत्नात या नैसर्गिक फायद्याचा योग्य तो उपयोग करण्याची फारच शक्यता आहे. आधुनिक नगररचनेत अशा नद्यांच्या किनाऱ्यांची योजनापूर्वक बांधणी करून आकर्षक बगीचातून फिरण्याची सोय करण्याच्या कल्पनेस महत्वाचे स्थान दिले आहे. काही काही शहरांतून सुंदर छोटी छोटी उपहारगृहे बांधून उत्पन्नाचीही सोय केली जाते. श्रीनगर, अहमदाबाद या ठिकाणी असे झालेले प्रयत्न मी पाहिलेले आहेत. अर्थात ही दोन्ही शहरे राज्यांच्या राजधानीची शहरे आहेत. त्यामुळे त्यांना साधनांची विपुलता अधिक. परंतु आपल्या साधनांच्या मर्यादित आपणही अशा योजनापूर्ण रचनेचा प्रयत्न करू नये असे काही म्हणता येणार नाही.

कोयनाकाठी - पुलाच्या दोन्ही बाजूस किंवा इन्स्पेक्शन बंगल्याचे नजीक, पाटण कॉलनीचे नजीक, दाभोळ दरवाजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या ठिकाणी, बाग किंवा इतर कांही प्रयत्न करणे शक्य आहे.

कृष्णाकाठी - स्वामीची बाग, इतर घाट, मंगळवार पेठेतून नदीकडे जाणाऱ्या घाटाचे आसपासही अशी काही उद्याने वा इतर रचना आकर्षक पद्धतीने करणे शक्य आहे. कोयना योजनेच्या पूर्णतेनंतर प्रवाहाचे आजचे वळण बदलण्याची शक्यता आहे. प्रवाहांची स्वच्छता व पोहण्याची अधिक उत्तम सोयही करणे शक्य होईल. नदीकाठी सकाळी वा संध्याकाळी सहल करणे ही या शहरातील जुनी सामुदायीक सवय होती. ती एक महत्वाची संस्था होती असे मी मानतो. ही संस्था आता जवळ जवळ बंद झाल्यासारखे वाटते. पूर्वी सूर्यास्ताचे वेळी कृष्णेच्या वाळवंटात खेळणाऱ्यांची व फिरणाऱ्यांची काही शर्यतच असे. आज तशी परिस्थिती दिसत नाही. उलट परवा तर मी एक प्रकारचा शुकशुकाटच पाहिला व मन उदास झाले. याचे कारण समजण्यासारखे आहे. शहराच्या इतर भागांत नवी आकर्षणे निर्माण झाली आहेत. तर नदीकाठ व वाळवंट उलट अधिक निस्तेज बनली आहेत. आपण ही परिस्थिती प्रयत्नपूर्वक बदलली पाहिजे.

कऱ्हाडचे सर्वात महत्वाचे आकर्षण प्रीती-संगम. मराठी साहित्यांत व इतिहासातही ते अजरामर झाले आहे. परंतु प्रीतीसंगम आज पहाण्यासाठी येणाऱ्याला तेथील सर्व वातावरण अव्यवस्थेचे व अस्वच्छ व उपेक्षित असे वाटते. तेथपर्यंत जाताना वाटेत, रस्त्यावर व वाळवंटात अगदीच ओबडधोबड परिस्थिती आहे. घाटाच्या समोर खड्डे व इतर ढीग पडलेले असतात. ही सर्व परिस्थिती बदलणे आवश्यक आहे. स्वामीच्या बागेची जागा ताब्यात घेऊन तेथे एक सुंदर ''संगम-उद्यान'' बनविणे शक्य आहे. भुईकोट किल्ल्याच्या, संगमाशेजारील तटावर दुरुस्ती करून संगमाचे पावसाळ्यांतील अलौकीक स्वरूप पहाण्यासाठी आकर्षक व्यवस्था करणे जरूर आहे.

या भागांत कोयनेमुळे हल्ली देशी व परदेशी प्रवासी लोकांची संख्या वाढू लागली आहे. त्या सर्व लोकांच्या भेटीने प्रीती-संगम एक महत्वाचे केंद्र बनू शकेल. टुरिझम या खात्याचे मदतीने नगरपालिकेने हा प्रयत्न करून पहाण्यासारखा आहे. आपण व्यक्तिश: प्रयत्न करून नगरपालिकेचे या महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधावे म्हणून मी हे प्रश्न या शहराचा एक नागरीक या नात्याने लिहित आहे. आपण प्रयत्न सुरू केल्यास राज्याचे स्थानिक व वरिष्ठ अधिकारीही या प्रश्नांत लक्ष घालतील याबद्दल मला मुळीच शंका नाही.

पत्र काहीसे लांबले. परंतु मनांत असलेले कल्पनांचे ओझे आज हलके झाल्याचे समाधान मला मिळत आहे. पत्रोत्तराची अपेक्षा आहे.''

आज प्रीती-संगमावर यशवंतरावांना आदरांजली अर्पण करताना त्यांचे स्वप्न व नगराध्यक्ष पी. डी. पाटलांचे कार्य यांचा संगम पाहण्याचा योग आला. मी जे १९५७ साली कराड पाहिले, त्या आणि आजच्या कराडात मूलभूत फरक पडला आहे आणि ही एक अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

यशवंतरावांचा ऋणानुबंध व नियतीवर विश्वास. म्हणूनच त्यांनी आपल्या पुस्तकाचे नांव 'ऋणानुबंध' म्हणून ठेवले. माझा त्यांचा संबंध हाही एक ऋणानुबंधाचा भाग होता याची मला खात्री वाटते आणि तो केव्हा आणि कसा झाला हाही त्या ऋणानुबंधाचाच भाग आहे.

मी १९५२ साली आय. ए. एस. परीक्षा उत्तीर्ण होऊन त्या वेळच्या मुंबई राज्याच्या सेवेत दाखल झालो. माझे प्रशिक्षण झाल्यानंतर माझी पहिली नियुक्ती माऊंट अबूला असिस्टंट कलेक्टर (ज्याला प्रांत ऑफिसर म्हणत) म्हणून झाली. त्या वेळी माऊंट अबू, मुंबई राज्याचे शेवटचे टोक होते व भाषिक राज्य पुनर्रचनेनंतर ते राजस्थानात गेले.

तेथे माऊंट अबूला पाच-सहा महिने काढले नसतील, इतक्यात कळले की त्या वेळी नुकत्याच सुरुवात झालेल्या कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (समाज विकास कार्यक्रम) ची एक राज्य पातळीवरील सभा माऊंट अबूला करण्याचे योजिले आहे. त्या वेळी यशवंतराव चव्हाण समाज विकास खात्याचे मंत्री होते. १९५४ सालचा मे महिना असावा. त्या वेळचे मुख्य मंत्री मोरारजी देसाई, संपूर्ण मंत्रीमंडळाचे सदस्य, मुख्य सचिव व विधायक कार्यासंबंधी काम करणारे सर्व सचिव, तसेच मुंबई राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी त्या सभेस हजर राहणार होते.

माझे जिल्हाधिकारी श्री. व्ही. शंकर - जे आय. सी. एस. मधले वरिष्ठ अधिकारी होते व पूर्वी सरदार वल्लभभाई पटेलांचे खाजगी सचिव होते - त्यांनी मला सांगितले की, 'एवढ्या मोठ्या सभेची व्यवस्था तुला करावयाची आहे व याच्या यशस्वीतेवर तुझ्यामध्ये संघटना चातुर्य आहे की नाही हे दाखविण्याची ही एक संधी आहे.' अर्थातच त्या इशाऱ्यानंतर, माझ्या छोट्याशा अनुभवावर, माझ्या दृष्टीने ही परीक्षा यशस्वी करण्यासाठी जे काम करावयाचे होते त्यासाठी मी अहोरात्र प्रयत्न केले. तीन दिवस सभा चालू होती व तीनही दिवस यशवंतराव सर्व काही निरखून पहात होते. सदर परिषदेच्या शेवटच्या दिवशी त्यांनी मला भेटण्यासाठी बोलवले, ते मला म्हणाले, "प्रधान, तुमचे अभिनंदन. एवढ्या मोठ्या सभेविषयीचा काही अनुभव नसताना ज्या तऱ्हेने ती पार पाडली त्या मागे तुम्ही किती परिश्रम घेतले असतील याची मला कल्पना आहे."

मी, ते जे बोलतात, तो औपचारिक सभ्यतेचा भाग आहे असे समजून 'थँक यू' म्हणून म्हटले. परंतु -- यशवंतराव तेथे थांबले नाहीत. ते म्हणाले, "तुमच्यासारख्या एका तरुण अधिकाऱ्याच्या शोधात मी आहे. लवकरच मुंबई विभागात तीन-चार नॅशनल एक्स्टेन्शन ब्लॉक्स् सुरू होणार आहेत व माझी इच्छा आहे की तुम्ही कराडला यावे." मला आता आठवत नाही, परंतु कदाचित् त्या वेळेला कराड, सातारा किंवा सांगली विभागात होते. ते पुढे म्हणाले की, "मी या बाबत मुख्यमंत्र्यांशी बोलणार आहे."

कराड, सातारा, सांगली या भागांविषयी मला काहीच माहिती नव्हती. तसेच नुकताच आय. ए. एस. मध्ये दाखल झाल्यानंतर मी माझ्या कामात गुंतलो होतो. त्यामुळे ते काय बोलले, त्यामध्ये विशेष काही आहे, असे मला तरी त्या वेळेला वाटले नाही. त्याच दिवशी दुपारी माझ्या जिल्हाधिकाऱ्याने मला बोलावले व म्हणाले, "प्रधान, तुला कराडला नेमून घेण्याबाबत यशवंतरावांनी मोरारजी देसाईंना विचारले, परंतु मी त्यास विरोध केलेला आहे. तुला अजून शासनाविषयी बरेच काही शिकायचे आहे व जोपर्यंत महसुली अधिकारी व मॅजेस्ट्रेट म्हणून शासनाचा अनुभव संपूर्ण होणार नाही तो पर्यंत तू या विभागाच्या बाहेर जाऊ नये असे मी मुख्यमंत्र्यांना सांगितले आहे." त्यांनी जे काय सांगितले त्या विषयी मला तरी काही आश्चर्य वाटले नाही. यशवंतरावांची आणि माझी माऊंट अबूला तोंडओळखच झाली होती. तेही परिषदेच्या कामामध्ये गुंतले होते. शेवटच्या दिवशी निरोप घेण्याअगोदर यशवंतरावांनी मला सांगितले की "प्रधान, तुम्हाला कराडला नेमण्याची मुख्यमंत्र्यांनी परवानगी दिली असती, तर मला आनंद झाला असता. पण तुमच्या जिल्हाधिकाऱ्याने जे सांगितले ते सुद्धा बरोबर आहे." निरोप घेता घेता ते म्हणाले, "आपण लवकरच भेटू."

यशवंतरावांची पहिली भेट, यशवंतरावांची मी कराडला येऊन काम करण्याची इच्छा व त्या भेटीमुळे निर्माण झालेले आमचे संबंध - ज्यांना ऋणानुबंध म्हणावे, तर काय म्हणावे? माझे दुर्दैव की त्या वेळेला मी कराडला येऊ शकलो नाही व कराड आणि या परिसराच्या जनतेची सेवा करू शकलो नाही.

यशवंतराव म्हणाले होते की, "आपण लवकरच भेटू". त्यावेळच्या आमच्या संस्काराप्रमाणे, आमच्या प्रशिक्षणात शिकविले जाई की राजकीय नेत्यांशी फार जवळचे संबंध अधिकाऱ्यांनी ठेवणे इष्ट नाही. सनदी अधिकाऱ्यांचे क्षेत्र व राजकीय नेत्यांचे क्षेत्र अलग ठेवले पाहिजे. मंत्रीगण दोघांमधील दुवा असतात. परंतु एका मर्यादेपर्यंतच सनदी अधिकाऱ्यांनी मंत्र्यांशी वैयक्तिक संबंध ठेवावेत, असे शिक्षण नुकतेच मिळाले असल्यामुळे यशवंतराव निरोप घेताना जे काही म्हणाले त्यावर मी काही विशेष विश्वास ठेवला नाही.

दोन वर्षानंतर यशवंतराव द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. माऊंट अबू राजस्थानात गेले असल्यामुळे माझी बदली बनासकांठा जिल्ह्यात पालनपूरला झाली. एके दिवशी तार आली की, तुमची बदली तातडीने पुण्याला अतिरिक्त जिल्हाधिकारी (ॲडिशनल कलेक्टर) या पदावर करण्यात आली आहे. सगळ्यांना आश्चर्य वाटले. कारण त्या वेळच्या संकेताप्रमाणे गुजराथमधून पश्चिम महाराष्ट्रात बदली होत नसे. लवकरच कळले की यशवंतरावांनीच माझे नाव मुख्य सचिवांना सुचविले. अर्थातच मुख्य सचिवांना व इतरांना आश्चर्य वाटले की, राज्याच्या एका कोपऱ्यात असलेल्या एका तरुण अधिकाऱ्याविषयी मुख्यमंत्र्यांनी एवढी आस्था का दाखवावी ? मलाही थोडासा संकोच वाटला की, - वास्तविक त्यांची माझी तोंडओळखच होती, - त्यांनी एवढी आस्था का दाखवावी ? हा नुसताच ऋणानुबंधाचाच भाग नव्हता, तर यशवंतरावांच्या कार्यपद्धतीचा तो भाग होता आणि माझं सुदैव की मोरारजीभाईंनी नाही म्हटलं म्हणून, आपण मुख्य मंत्री होताच यशवंतराव चव्हाणांनी मला आपल्या पश्चिम महाराष्ट्रात आणले.

प्रत्यक्षात मात्र माझी त्यांची पुण्यात पहिली भेट झाली ती वादळी ठरली. माझ्या शासकीय जीवनातील पहिल्या बिकट प्रसंगाला मला सामोरे जावे लागले. राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद नॅशनल डिफेन्स ॲकॅडमीस भेट देण्यासाठी पुण्यात येणार होते. त्यावेळचे जिल्हाधिकारी रजेवर असल्यामुळे सर्व जबाबदारी माझ्यावर होती. त्या काळात राजशिष्टाचार फारच कडक असत. सकाळी पहाटे स्पेशल रेल्वेगाडीने राष्ट्रपतीचे आगमन होणार होते. रेल्वे स्थानकावर त्यांचे स्वागत करण्यासाठी मुख्यमंत्री, पुण्याचे महापौर व

इतर मान्यवर व्यक्ती हजर होत्या. गाडी थांबताच राष्ट्रपतींचे स्वागत करण्याचा मान मुख्यमंत्र्यांचा होता. काय झाले कोणास ठाऊक - त्यावेळचे दक्षिण सेनेचे प्रमुख यांनी रांग तोडली व ते राष्ट्रपतींच्या डब्यात घुसले.

राजशिष्टाचाराचा भंग झाला होता व मुख्यमंत्र्यांना राग येणे स्वाभाविक होते. यशवंतरावांचा एकंदर मूड पाहून माझे त्यावेळचे आयुक्त जी. एम. शेठनी मला सांगितले की, 'आज सकाळी जे झाले त्याबद्दल जिल्हाधिकारी म्हणून तुला जबाबदारी पत्करावी लागेल. पण घाबरू नकोस, मी सर्व काही सांभाळतो.'

सर्कीट हाऊसवर पोहोचताच यशवंतरावांनी त्या दिवसाचा कार्यक्रम मागितला. शेठ साहेबांनी तो दाखविताच यशवंतरावांनी पाहिले की दुपारचे जेवण राष्ट्रपतींबरोबर एन.डी.ए. मध्ये आहे. चव्हाण म्हणाले, "मला अजून आमंत्रण नाही, मी कसा जाऊ?"

जेव्हा मला विचारण्यात आले, तेव्हा मी सांगितले की एन.डी.ए. च्या प्रमुखांनी जे आमंत्रण पाठविले आहे ते माझ्याकडे आले आहे. कारण सदर आमंत्रण मुख्यमंत्र्यांना मुंबईस पाठविण्यास विलंब होईल म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवावे हे मीच त्यांना सांगितले होते.

एकंदर सकाळच्या प्रकारामुळे सैनिक अधिकाऱ्यावर यशवंतरावांचा राग होता. ते ताडकन म्हणाले, 'Since when the Chief Minister has become C/o the Additional Collector Pune?' केव्हापासून मुख्यमंत्र्यांचा पत्रव्यवहार ॲडिशनल कलेक्टरमार्फत सुरू झाला आहे.

ते पुढे म्हणाले, "मला आमंत्रण नाही, मी जेवायला जाणार नाही". शेठ साहेब खाली आले व मला म्हणाले, "आज मुख्य मंत्र्यांचा राग अनावर आहे. सातारी राग आहे. तो शांत होईपर्यंत तू त्यांना तोंड दाखवू नकोस". तोपर्यंत मलाही थोडासा राग आला होता.

सकाळी स्टेशनवर जे काही झाले होते, ते एका वरिष्ठ सेनानीनी केलेल्या कृत्यामुळे झाले होते व ते आमंत्रण माझ्याकडे पाठविण्यास मीच सांगितले होते. मी त्या वेळेला तरुण होतो. मी सरळ वर गेलो. यशवंतराव सोफ्यावर आपले दोन्ही हात छातीवर घडी करून ओठ दाबून बसले होते. डोळ्यातून रागाचे फुंकार उडत होते. त्यांनी डोळे वर करून माझ्याकडे पाहताच मी म्हणालो, "आपण मुख्यमंत्री आहात. आपण जे ठरवाल त्याच्यावर माझे भवितव्य अवलंबून आहे. आपणास खरोखरच वाटत असेल की माझी

चूक झाली असेल, तर मी लगेच राजीनामा सादर करण्यास तयार आहे." स्वाभाविकच माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहिले होते ते मुख्यमंत्र्यांच्या अन्यायाचे.

ते ऐकताच यशवंतराव उठले, माझ्याजवळ आले व म्हणाले, " प्रधान, सॉरी. माझा राग मी तुझ्यावर उगाचच काढला. माझी चूक झाली."

ते पुढे म्हणाले, "तुझे पहिले नाव काय?" ते सांगताच ते म्हणाले, "राम, झाले ते विसरुन जा. आपणाला पुढे कितीतरी कामे करावयाची आहेत."

ही माझी, यशवंतरावांची पहिलीवहिली खरीखुरी ओळख. पुढे तीस वर्षे, निरनिराळ्या पदांवर, निरनिराळ्या क्षेत्रातून आम्ही भिन्न भिन्न मार्गाने चाललो, परंतु शेवटपर्यंत भावना एकच 'आपल्याला पुढे कितीतरी कामे करावयाची आहेत.

कोणत्याही मोठ्या व्यक्तीविषयी बोलताना आपल्याकडे त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आहे, किंवा होते, असे म्हणण्याची रीत आहे. यशवंतरावांच्या बाबतीत मात्र असे बोलणे काही औपचारिकच नव्हे. जसे एका चांगल्या हिऱ्याला हिरकणी करताना किती पैलू दिले हे सहजासहजी मोजता येत नाही त्याप्रमाणे यशवंतरावांचे व्यक्तिमत्व होते.

आजच्या सभेत बोलण्यासाठी मी त्यांच्या विषयी आलेले काही लेख व पुस्तके चाळीत असताना माझ्या नजरेस आले की, निरनिराळ्या व्यक्तींनी आपापल्या परीने त्यांचे पैलू पाहिले व टिपले. त्यांच्या विषयी बोलताना किंवा लिहिताना जे काही म्हटले गेले ते मी आपल्यासमोर मांडतो:

थोर देशभक्त, रसिक मन, धुरंधर मुत्सद्दी, विचारवंत, गुणग्राही, सौजन्यमूर्ती, व्यवहारी राजकारणी, दिलदार मित्र व लोकांच्या प्रेमात गुरफटलेला नेता. समर्थ, समाजवादी, लोकशाहीनिष्ठ, लोकशाहीचे पुरस्कर्ते, थोर चारित्र्यसंपन्न समाजसेवक, अभिरुचीसंपन्न कलारसिक, सुसंस्कृत, गुणग्राही राजकारणी- संक्षेपी वाचक, ओजस्वी वक्ते, विचारवंत, समृद्ध महाराष्ट्राचे शिल्पकार, सह्याद्रीचा प्रतिभासंपन्न भूमिपुत्र, मराठी मनाचा तुरा वगैरे वगैरे.

हे मी उदाहरण म्हणून दिले आहे. अनेक कित्येक पैलू मांडता येतील. या सर्वातून माझ्या मते एकच बोध घेता येईल, तो म्हणजे यशवंतरावांचे व्यक्तिमत्वच इतके परिपूर्ण होते की कोणत्याही क्षेत्रात, कोणत्याही परिस्थितीत अशा व्यक्तिमत्वांनी आपली

छाप इतिहासात सोडली असती, व हेच यशवंतरावांच्या बाबतीत झाले आहे. सर्वात आश्चर्यजनक म्हणजे या थोर व्यक्तीचा जन्म कोठे झाला व ते तेथून कोणत्या उंच थराला पोहोचले. हे कोडे उलगडण्यासाठी मी काल देवराष्ट्रे गावाला जाऊन आलो.

त्यांचा जन्म झाल्यानंतर जवळ जवळ ८० वर्षानंतर मी ते गांव पहिले. गांव जवळ जवळ होते तसेच असावे असे वाटले. त्यांचा जन्म झाला ते घर बघितले. साहेबांची आठवणीची जागा म्हणून पाहण्यास गेलो. आज घराची आठवण म्हणून काही नाही. एक लाकडाचा दरवाजा फक्त उभा आहे. एका बाजूला एक भिंत आहे. त्याच्याच बाजूला लहानशी अंगणासारखी जागा आहे. एकंदर स्थिती वाईट आहे. ज्या जागेमध्ये एवढा महान मनुष्य जन्म पावला, ती जागा त्यांची आठवण म्हणून, पुढील पिढ्यांना एक आदर्श व स्फूर्तिस्थान व्हावी म्हणून आपण काही करू शकलो नाही याची मनाला थोडीशी खंत वाटली. पी. डी. पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीमुळे एवढे सुंदर स्मृतिस्थान निर्माण करू शकलो, पण जेथे त्यांचा जन्म झाला तेथे काही करू शकत नाही का? यशवंतरावांचा ज्या ठिकाणी जन्म झाला ते ठिकाण दाखवायला आज तेथे जागाच राहिली नाही. काही वर्षांनी तेथे ते दार व ती भिंतही राहणार नाही. आज माझ्याबरोबर शामराव पवार होते. म्हणून ते मला ती जागा दाखवू शकले. उद्याच्या पिढीला कोण व काय दाखविणार? अशी व्यक्ती देवराष्ट्रात जन्माला आली,तेव्हा त्याचे काहीतरी स्मारक तेथे असणे आवश्यक आहे असे मला वाटते.

यशवंतरावांचा पिंड स्वातंत्र्य युद्धात तळपून तयार झाला होता. आपल्या टिळक हायस्कूलातील मिळालेल्या शिक्षणामुळे त्यांचेवर जे संस्कार झाले होते त्यामुळे लोकमान्य टिळकांचे काही गुण यशवंतरावांच्या मनात उतरले होते हे जर मी म्हटले तर चुकीचे होणार नाही असे मला वाटते. टिळकांप्रमाणे यशवंतरावांच्या मनातही प्रखर ध्येयवाद, देशप्रेम, देशसेवा, स्वार्थ:त्याग व जिद्द या भावना पेरल्या गेल्या होत्या. त्याचबरोबर महात्मा फुले व स्वत:चे बंधू कै. गणपतराव यांचे सामजिक, आर्थिक विषमता दूर करण्याच्या कार्यामुळे त्यांना एक नवीन दृष्टी मिळाली होती. एम. एन. रॉय व त्यांचे विचार यामुळे कोणत्याही राजकीय, सामाजिक अथवा आर्थिक प्रश्नाकडे सूक्ष्म दृष्टीने पाहण्याची व पृथ:क्करण करण्याची प्रवृत्ती त्यांचे मनात जागृत झाली. ही झाली त्यांच्या मनाची जडणघडण व यामुळेच जेव्हा स्वातंत्र्यानंतर राजकारणामध्ये व राजकीय सत्तेमध्ये त्यांनी पदार्पण केले, तेव्हा त्यांची आपली स्वत:ची व आपल्या मनाची एक दृष्टी स्पष्ट होती. त्यांनी सामाजिक विषमता काय आहे, लहान शेतकऱ्यांचे व मोल-मजुरांचे प्रश्न काय आहेत, ते देवराष्ट्रात पाहिले होते व अनुभवले होते. त्यांच्या मनाची जडणघडण

कशी झाली असावी ? त्यांच्या सामाजिक विचारांना परिपक्वता कशी आली असावी ? यांची उत्तरे मला काल देवराष्ट्रात मिळाली.

एक उदाहरण म्हणून, त्या खेडेगावांतून त्यांच्या मनांत रुजलेला एक विचार सांगतो. १९५२ साली 'हिंदी लोकशाहीचे भवितव्य' या विषयी पुण्याच्या वसंत व्याख्यान मालेत यशवंतराव चव्हाण म्हणाले की, "गरीब मनात नव्या आकांक्षा उत्पन्न करून त्यांना कार्यप्रवण करण्यास प्रवृत्त करण्याऐवजी त्यांच्यात असंतोषच पसरविण्याचा प्रयत्न झाला तर रात्री त्यांचे लक्ष त्या श्रीमंतांच्या तिजोरीकडे जाईल इतकेच. पण खरा प्रश्न कायमच राहील. पैसा हा पुंजीपतीच्या किंवा सरकारच्या तिजोरीत नसून तो आकाशातील ढगात आहे. त्या ढगातून खाली पडणाऱ्या जलधारांत आहे. त्या पाण्याच्या प्रवाहरूपी नदीत आहे. नदीच्या दोन्ही काठास असणाऱ्या काळ्या जमिनीत आहे. त्याच जमिनीतील खनिज संपत्तीत आहे, त्याच खनिज संपत्तीद्वारा निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक यंत्रसामुग्रीत आहे, इतकेच नव्हे तर त्या सर्वांना एका सूत्रात बांधणाऱ्या मानवाच्या मनगटात आहे. असे जर ह्या गरीब जनतेला पटवून देऊन त्यांच्यात सृजन-शक्ती निर्माण करून कार्यप्रवण केले तर आपले सर्व प्रश्न सुटतील व त्या सुटण्यातच भारतीय लोकशाहीचे भवितव्य सामावलेले आहे."

सहा-सात वाक्ये, पण त्यांत कितीतरी विचार सामावलेले आहेत. त्यांना हे विचार कुठून सुचले? साहजिकच ज्या गावांत त्यांचा जन्म झाला व ज्या कराडात त्यांचे शिक्षण झाले तिथे. माणूस मोठा झाला की, तो मोठा कां व कसा झाला यांचे गुपित लोक शोधत असतात. काही व्यक्ती जन्मत:च मोठ्या असतात. इंग्रजीत म्हटले आहे की, 'Some men are born great, some men are made great.' यशवंतराव त्या मोठ्या व्यक्तींपैकी आहेत की, जे आपणाहून मोठे झाले. आपल्या प्रयत्नांनी व आपल्या परिश्रमाने, प्रत्येक अनुभवांचे विश्लेषण करून त्यांनी आपल्या विचाराची बैठक पक्की बसवली. माझ्या मते त्यांच्या मोठेपणाचा जर उगम शोधावयाचा असेल तर तो उगम या दहा-बारा ओळीत आहे.

हे मी ह्यासाठी उद्धृत करीत आहे की आज माणसे, व विशेषत: राजकीय क्षेत्रातील व्यक्ती, अगोदर मंत्री होण्यासाठी धडपड करतात व नंतर विचार करण्यास लागतात की आपण काय करावयाचे आहे. यशवंतराव चव्हाण व त्यावेळचे पुढारी असे होते की जनसेवा करता करता आपल्याला जर सत्ता मिळाली तर त्या सत्तेचा उपयोग आपण कसा व कोणत्या दृष्टीने करू याचा विचार त्यांच्या मनात परिपक्व होता व ह्याच जडणघडणीमुळे यशवंतरावजीसारखे नेते फक्त आजचे नेते म्हणून रहात नाही, तर उद्याचे

नेते म्हणून ते व त्यांच्या स्मृति अखंडपणे जागृत राहतात. अशा नेत्यांना, राजकीय नेत्यांना, इंग्रजीमध्ये स्टेटस्मन, व्यवहारकुशल, राजनीतिज्ञ, मुत्सद्दी म्हणून म्हणतात. असे नेते फक्त आजचा विचार करत नाहीत. तर उद्याचाही विचार करतात.

यशवंतराव मोठे झाले ते स्वतःच्या मौलिक विचारांच्या आधारावर. त्यांनी म्हटल्याप्रमाणे मानवाच्या मनगटात जगात परिवर्तन करण्याची शक्ति आहे. परंतु ते कसे करावयाचे? कोणत्या तऱ्हेने करावयाचे ह्यासाठी विचार व विचारांनी ठरवलेली दिशा महत्वाची आहे. त्यांच्या विचारांचे व त्यांनी दिलेल्या दृष्टीचे प्रतीक आज आपण महाराष्ट्राच्या स्वरूपात पहात आहोत. १९४६ चा महाराष्ट्र, १९५६ चा महाराष्ट्र , १९६६ चा महाराष्ट्र, १९७६ चा महाराष्ट्र - आपण जर ४० वर्षाचा काळ घेतला तर एक आमूलाग्र फरक झालेला दिसतो व तो दिसतो सामाजिक क्षेत्रात. मी काही इकॉनॉमिक डेव्हलपमेंट किंवा आर्थिक विकासाच्या संबंधी बोलत नाही. ज्यांनी १९४६ चा महाराष्ट्र बघितला आहे त्यांना त्या महाराष्ट्राची आज कल्पना येणार नाही. यशवंतरावांनी तो महाराष्ट्र काही क्रांती न करता, आपल्या विचारांनी आणि आपल्या आचरणानी कसा बदलला, तसेच बहुजन समाजाला सत्ता स्थानी आणण्यासाठी त्यांनी किती खुबीने महाराष्ट्राचे परिवर्तन घडवून आणले याचा इतिहास लिहावा लागेल. कारण तो सामाजिक परिवर्तनाचा इतिहास आहे. पी.डी. साहेबांना आठवत असेल की त्यावेळी बरेच नेते होते. बरेच जहाल नेते होते. आता मी नावे घेत नाही. पण त्यांचे विचार होते की आपण क्रांती केली पाहिजे. क्रांती करून समाजामध्ये परिवर्तन केले पाहिजे. पण, यशवंतरावांनी क्रांतीची भाषा केली नाही. त्यांच्या मनाची बैठक इतकी पक्की झाली होती की, त्यांनी ठरविले की सत्ता घ्यायची, सत्तेमधून परिवर्तन घडवून आणायचे व सत्तेचा उपयोग सामाजिक परिवर्तनासाठी करावयाचा. त्यांनी असे परिवर्तन, अशा तऱ्हेने घडवून आणले की लोकांना कळले सुद्धा नाही.

या माणसाच्या थोरपणाचे एक उदाहरण सांगतो. ज्यावेळी दिल्लीला नेहरूंनी त्यांना बोलाविले त्या वेळची गोष्ट आहे. १० नोव्हेंबरला मी त्यांच्याबरोबर दिल्लीला प्लेनने गेलो. दोघेही शेजारी बसलो होतो. नेहरूंनी फोन करून त्यांना संरक्षण मंत्री म्हणून बोलविले होते. तेव्हा साहजिकच त्यांच्या नंतर कोण ? हा प्रश्न उपस्थित झाला होता. मी त्यांना विचारले तेव्हा ते म्हणाले, 'राजकीय प्रक्रीया सुरू झाली आहे. पण अजून कोणीही उघडपणे बोलत नाही.' मी म्हणालो, 'तुमच्या मनामध्ये कोण आहे ?' ते म्हणाले, 'खरे तर, स. गो. बर्वे, मुख्यमंत्री व्हावेत अशी माझी इच्छा आहे'. मी एवढेच म्हणालो की, 'सर, आपण म्हणता ते बरोबर आहे, पण खरोखर आपल्याला वाटते का, बर्वे तुमच्या नंतर मुख्यमंत्री होऊ शकतात ?' यशवंतराव म्हणाले, 'होय, मी आणखी दोन

वर्षे असतो तर, माझी खात्री आहे मी बर्वेना मुख्यमंत्री केले असते.' मला ते पटले नाही म्हणून मी त्यांना विचारले, 'ब्राह्मण वर्गाचे प्रतिनिधी म्हणून लोक बर्वेकडे पहाणार नाहीत कां? त्यासाठी महाराष्ट्र आज तयार आहे कां?' ते म्हणाले, 'तू म्हणतोस ते बरोबर आहे. परंतु शेवटी मी जे प्रयत्न महाराष्ट्रात केले आहेत ते कशासाठी ? सामाजिक विषमता अणि निरनिराळ्या समाजामधील असलेले परस्पर अविश्वासाचे संबंध विसरून जाऊन, आपण मराठी माणूस एक आहोत व महाराष्ट्र हा आपला धर्म राहिला पाहिजे, त्या दृष्टीने माझी खरोखर इच्छा आहे की, पूर्वीचे सगळे विसरून जाऊन, मराठा-ब्राह्मण वाद विसरून जाऊन, जो मनुष्य चांगल्या तऱ्हेने राज्य करू शकेल त्याची निवड मुख्यमंत्री म्हणून केली पाहिजे'. मी थोडक्यात हे संभाषण यशवंतरावांची दृष्टी आणि त्यांच्या मनाच्या मोठेपणाचे उदाहरण म्हणून आज सांगत आहे.

आता दुसऱ्या एका पैलूचे उदाहरण देणार आहे. यशवंतराव द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले आणि त्यांचे १५ ऑगस्ट १९५७ ला, स्वातंत्र्य दिनाचे पहिले भाषण झाले. त्यात ते म्हणाले, "आपल्याला मिळालेल्या राजकीय स्वातंत्र्याचा उपयोग करून आपणाला दारिद्र्य, रोग आणि अज्ञान या पासून मुक्त व्हावयाचे आहे आणि इतर मूलभूत स्वातंत्र्ये प्राप्त करावयाची आहेत. या सर्वांच्या प्राप्तीनंतर आजच्या आपल्या राजकीय स्वातंत्र्याला खराखुरा अर्थ येईल. स्वातंत्र्याचे खरे फळ म्हणजे एखाद्या व्यक्तीचा किंवा गटाचा अल्पस्वल्प लाभ नव्हे, तर संबंध समाजाचे जास्तीत जास्त कल्याण होय."

यावरून स्पष्ट होते की राज्याचा मुख्यमंत्री होण्याअगोदर आपल्या सत्तेचा उपयोग कसा करावयाचा हे यशवंतरावांनी ठरविले होते. याचा प्रत्यय मला त्यांनी पुढे भूषित केलेल्या पदात दिसून आला. त्यामुळेच यशवंतराव कालचे किंवा आजचे नेते म्हणून राहिले नाहीत, तर ते उद्याचे नेते म्हणून गणले गेले. शेवटी माणूस जातो, पण त्याचे विचार राहतात. त्याचप्रमाणे यशवंतरावांचे विचार व त्याची स्मृति महाराष्ट्रात अखंड राहील.

यशवंतरावांच्या विषयी शंतनुराव किर्लोस्करांनी कित्येक वर्षापूर्वी जे लिहिलं ते किती मार्मिक आणि योग्य आहे, म्हणून मी वाचून दाखवतो. त्यांनी लिहिले : 'त्यांच्या (यशवंतरावांच्या) यशाचं मर्म त्यांच्या मनाच्या घडणीत आणि व्यक्तिगत विचारसरणीत आहे. आजच्या राजकीय परिस्थितीत अतिरेकी भूमिका घेऊन अनेक गट निर्माण होतात, तसे ते होणं आवश्यक आहे असंही मानलं जातं. मला वाटतं यशवंतराव चव्हाण अतिरेकी भूमिका शक्य तो टाळतात. आताच्या क्षणाला बरोबर किंवा चूक काय वाटते ह्या बरोबरच

नजिकच्या आणि दूरच्या भविष्यकाळी आजच्या घटनांचे काय प्रतिसाद उमटतील ह्याचा विचार करून ते आपली भूमिका ठरवितात आणि अतिरेक टाळतात असा माझा समज आहे.' माझ्या मते हे वर्णन योग्य व मार्मिक आहे.

यशवंतरावांची राजकीय नीति काही पक्क्या स्तंभावर आधारित होती आणि त्यातील तीन प्रमुख स्तंभ म्हणजे लोकशाही, समाजवाद व नियोजन.

लोकशाहीवरील त्यांचा विश्वास फक्त निवडणूकीत भाषण करण्यापुरता नव्हता. तसेच लोकांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन एक फक्त व्होट बँक म्हणून नव्हता. हे खरे आहे की ते परत परत आपल्या कार्यकर्त्यांना सल्ला देत की, 'लोकशाहीत वजाबाकीचा हिशोब चालत नाही, तेथे बेरजेचाच हिशोब असतो.' पण ही बेरीज फक्त काही मतांसाठी नव्हे, तर लोकांना संघटित करून त्या संघटित शक्तिकडून, त्या संघटनेतून त्यांचा आर्थिक, सामाजिक विकास कसा करता येईल यासाठी ते बेरजेची भाषा बोलत. त्या भाषेमुळे बऱ्याच वेळा त्यांच्याविषयी गैरसमजही पसरविले गेले व काही खरेही होते. कारण राजकारणात काही वेळेला बेरीज करता करता सुप्तपणे वजाबाकीही करावी लागते, हे विसरता कामा नये. पण यशवंतरावांचा खरोखर विश्वास होता तो जनसेवेवर आणि त्यांनी म्हटल्याप्रमाणे 'जनसेवा हाच खरा ईश्वरभक्तीचा मार्ग होय.' असे ते मानीत आणि जनशक्ती निर्माण करणे हा त्यांचा धर्म होता असे मला वाटते. त्यांना दुसरा कोणता धर्म मान्य नव्हता. ते पूजेच्या विरुद्ध होते. म्हणून, 'प्रीती संगमावर कोणतीही पूजा होता कामा नये, कोणतीही आरती होता कामा नये', हे त्यांनी कटाक्षाने म्हटले. जनतेची सेवा हा त्यांचा धर्म होता व त्याचे पालन त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत केले.

लोकशाही, जनसेवा व ईश्वरभक्ति यांचे परस्परांचे संबंध काय व कसे आहेत, त्याचे गणित त्यांनी आपल्या मनात मांडले होते. लोकशाहीवर त्यांची नितांत श्रद्धा होती. ते नेहमी सांगत, 'लोकशाही ही वैचारिक जीवनावर अधिष्ठीत आहे. वैचारिक स्वातंत्र्याच्या वातावरणात वावरण्यास एक प्रकारची मानसिक तयारी असावी लागते. माझे तत्व खरे किंवा बरोबर हा आग्रह लोकशाहीशी विसंगत आहे'.

या विचारांमुळे त्यांचेवर बरीच टीका झाली. आपण बोलता एक, पण कित्येक वेळा आपले मन बदलता. त्याला यशवंतरावांचे उत्तर होते : 'लोकशाहीमध्ये मन बदलण्याची तयारी केली पाहिजे.' त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे महाराष्ट्राची निर्मिती. मोठ्या कौशल्याने त्यांनी पंडित नेहरूंचे मन बदलले व महाराष्ट्राची निर्मिती केली. या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहे की, द्विभाषिक राज्य चालविण्यासाठी ते जेव्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी, ते मोठे राज्य कशा तऱ्हेने यशस्वी करावयाचे या भावनेने

मुख्यमंत्रीपद स्वीकारले. पण त्याचवेळी लोकांना काय पाहिजे आणि लोकशाहीमध्ये राज्यकर्त्यांचे मन कसे बदलता आले पाहिजे हे त्यांनी दाखविले. नेहरूंचे मन वळविताना लोकशाही ज्या तत्वावर आधारित असते त्यांचा त्यांनी आदर केला.

लोकशाहीविषयी ते म्हणतात, "लोकशाही म्हणजे दोन पक्ष, दोन पार्ट्या असा त्याचा अर्थ नाही. नवी बुद्धी, नवे विचार व त्यामागे लोकशाही उभी करणे हा लोकशाहीचा अर्थ आहे." पुन्हा पुन्हा ते लोकांना सभेमध्ये सांगत, 'ज्ञान-विज्ञानाच्या बुद्धिचा वारसा प्राप्त झालेला माणूस निर्माण करणे हीच खरी लोकशाही'. लोकशाही वाढवायची असेल, तर त्याची सुरुवात ज्ञान व विज्ञानाच्या बुद्धीच्या वाढीने झाली पाहिजे. हा एक मूलभूत विचार त्यांनी मंत्र म्हणून वापरला. मला वाटते की, लोकशाही आणि लोकशाहीवर श्रद्धात्मक त्यांनी जे विचार मांडले आहेत, त्या विचारांची बैठक कशी बसली आणि कसे परिवर्तन होत गेले, त्यांच्या विषयी संशोधन करण्याची आवश्यकता आहे. तसेच लोकशाहीत राज्यकर्ते व नोकरशाहीचे संबंध कसे असावेत या विषयी ते काही संकेत पाळत. या विषयी माझे एक-दोन अनुभव आपणास सांगतो.

मी १९५७ च्या आक्टोबरमध्ये कोल्हापूरला कलेक्टर म्हणून गेलो. १९५८ च्या सुरुवातीला यशवंतरावांचे गॅल ब्लॅडरचे (Gall bladder) ऑपरेशन झाले. ऑपरेशन झाल्यानंतर कोठेतरी चांगल्या निवांत स्थळी तीन आठवडे जाण्याचे त्यांनी ठरविले. त्याच वेळेला पन्हाळा गडावर एक थंड हवेचं ठिकाण निर्माण करण्याचा कार्यक्रम मी हाती घेतला होता. तेव्हांचा पन्हाळा म्हणजे आजचा पन्हाळा नव्हे. तेथे काहीच सोयी उपलब्ध नव्हत्या. लोहिया शेठ आणि रुईया शेठ यांचे दोन बंगले होते. सरकारी निवासस्थान मुख्यमंत्र्यांच्या निवासासाठी योग्य नव्हते म्हणून यशवंतरावांनी आपल्या राहण्याची व्यवस्था रुईया शेठच्या बंगल्यात केली होती. मीही पन्हाळात काही दिवस राहिलो.

दुसऱ्या दिवशी मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा त्यांनी विचारले, "तुम्ही कोठे राहता?" मी म्हटले, "मी इन्स्पेक्शन बंगल्यामध्ये राहतोय." इन्स्पेक्शन बंगला थोडा दूर होता. ते म्हणाले, "मी जिथे रहातोय तिथे चार-पाच बेडरुमस् आहेत. तू येथेच येऊन रहा." मी म्हटले, "एक अडचण आहे, तुम्ही यायच्या दोन दिवस अगोदर रुईयांचा हा बंगला जप्त करावा म्हणून मी सरकारी हुकूम काढला आहे आणि आता कलेक्टर म्हणून त्याच बंगल्यामध्ये राहिलो तर ते योग्य होणार नाही." मी त्यांना सांगितले की, ज्या अटीवर रुईया शेठना बंगला दिला होता, त्या अटी त्यांनी पाळल्या नाहीत म्हणून दोन दिवसांपूर्वी मी माझ्या अधिकारांत जप्तीचा हुकूम काढला होता. पुढल तीन

आठवड्यामध्ये त्या हुकूमाविषयी ते एक शब्द बोलले नाहीत. एक सन्मित्र म्हणून रुईया शेठनी त्यांना विश्रांतीसाठी बंगला दिला. ते तिथे त्यांचे पाहुणे म्हणून राहिले. पण यशवंतराव चव्हाण म्हणून. त्यातूनच आपले वैयक्तिक जीवन व शासकीय जीवन यामधील लक्ष्मणरेषा ते किती काटेकोरपणे पाळीत याचा मला धडा मिळाला.

दुसरी गोष्ट आठवण म्हणून सांगतो. कोल्हापूरला फार मोठी व्यापारपेठें होती. १९५७ साली चार करोडचा गुळाचा व्यापार तेथे व्हायचा. आता तो व्यापार ४०० करोडचा झाला आहे. त्यावेळी शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नसे. त्या संदर्भात यशवंतराव एक दिवस म्हणाले, "येथे मार्केटयार्ड केले पाहीजे." मी म्हणालो, "मार्केटयार्ड कसे होणार, सर्वांचा विरोध आहे." ते म्हणाले, "तू प्रयत्न सुरू कर, मी संपूर्ण पाठिंबा देईन. मार्केटयार्ड झालेच पाहिजे." त्यावेळी मुंबई राज्य होते व मंत्रीमंडळातील अर्धे मंत्री गुजराथी होते. गुळाचा व्यापार होता गुजराथी व्यापाऱ्यांच्या हातात व जवळ जवळ सर्व गूळ गुजराथला जात असे. त्यामुळे त्यांचा दबाव फार होता. पुढील सहा महिन्यांमध्ये मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही अहोरात्र काम करून मार्केटयार्ड तयार केले व ते कार्यान्वित करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बाजूने शासनास व्यापाऱ्यांविरुद्ध लढा करावा लागला. स्वत: यशवंतरावांनी मंत्रीमंडळातील वजनदार गुजराथी मंत्र्यांना न जुमानता जिल्हा शासनास प्रोत्साहन दिले व मदत केली. एक ऐतिहासिक लढा यशस्वी झाला. आज ते मार्केटयार्ड एक यशस्वी यार्ड म्हणून प्रसिद्ध आहे.

लोकशाहीविषयी यशवंतरावांच्या मनाची बैठक आणि वैचारिक भूमिका मी मुद्दामच विस्तारानी मांडली आहे. कारण त्यांच्या पिंडात लोकशाही होती व राज्यकर्ता म्हणून जेव्हा जेव्हा लोकशाहीला धोका निर्माण झाला, तेव्हा यशवंतरावांनी लोकशाहीला परत रुळावर आणण्याचा कसा व काय प्रयत्न केला या विषयी अजूनही संपूर्ण माहिती बाहेर आलेली नाही. त्यांनी त्या विषयी काही लिहिले नाही. ते काही मित्रांशी व सहकाऱ्यांशी त्या संबंधी बोलले, परंतु ते सर्व अजून लोकांपर्यंत पोहोचले नाही.

भारत सरकारचा गृहमंत्री म्हणून यशवंतरावांनी कित्येक राज्यामध्ये त्यावेळी उपस्थित झालेले घटनात्मक प्रश्न १९६७ ते १९७० मध्ये हाताळले. तो काळ अत्यंत अस्थिरतेचा होता. जवळ जवळ सहा-सात राज्यांमध्ये काँग्रेस व्यतिरिक्त पक्षांची सरकारे होती. त्या काळात अस्थिरतेमुळे ह्या पक्षातून त्या पक्षात आमदार आणि खासदार मनसोक्त प्रवास करत होते, त्याला 'आयाराम आणि गयाराम' या शब्दामध्ये यशवंतरावांनी लोकसभेमध्ये वर्णन केले व ते वर्णन भारताच्या इतिहासात नोंदले गेले. त्याचबरोबर राज्यपाल व मुख्यमंत्री, राज्याचे मुख्यमंत्री व भारत सरकार ह्यांच्या संबंधामध्ये बऱ्याच

वेळा कटुता आली होती. त्या समयी अनेक प्रसंगी भारताचे गृहमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांनी लोकसभेत व राज्यसभेत जी भाषणे केली ती माझ्या मते एक ऐतिहासिक ठेवा आहेत. प्रत्येक कठीण प्रसंगी आपली भूमिका कठोरपणे बजावताना त्यांनी एकच मार्गदर्शक तत्व सर्वांसमोर परत परत मांडले आणि ते दर्शविते त्यांची भारतातील लोकशाहीवर नितांत भक्ति. वेळेअभावी मी विशेष बोलू शकत नाही, पण त्यांची ती भाषणे नुसती वाचण्यासारखी नाही, तर चिंतन करण्यासारखी आहेत व आजही जेव्हा जेव्हा संविधान प्रसंग निर्माण होतात, तेव्हा तेव्हा यशवंतरावांचे विचार, त्यांनी मांडलेली तत्वे व त्यांनी दिलेले मार्गदर्शन शासनकर्त्यांना उपयोगी पडते.

यशवंतरावांचा दुसरा वैचारिक आधारस्तंभ म्हणजे 'समाजवाद'. काँग्रेसमध्ये समाजवादी समाजरचनेचा संकल्प पक्षाने जाहीर केला पाहिजे यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. तसेच महाराष्ट्रात सामाजिक समता व न्याय कसा मिळू शकेल यावर त्यांचा भर होता. ते करताना त्यांचे लक्ष ग्रामीण जनता व त्या जनतेतही गरीब व खालच्या थरातील लोकांपर्यंत निरनिराळ्या योजना व त्याचे फायदे कसे मिळू शकतील याकडे होते. त्यादृष्टीने त्यांनी आपल्या मनामध्ये महाराष्ट्राच्या बांधणीचा चार सूत्री कार्यक्रम परिपक्व केला होता. एक शेती, दुसरा उद्योगधंदे, तिसरा मनुष्यबळ आणि चौथा शिक्षण.

शेतीमध्ये त्यांचे लक्ष दुष्काळी भागाचा प्रश्न व त्याचा विकास याकडे विशेष होते. कारण ते स्वत: त्या भागातून आलेले होते. त्या भागातील लोकांचे हाल व त्रास यांचे त्यांना आकलन होते. त्याचबरोबर शेती-उद्योग म्हणून जोपर्यंत प्रगत होत नाही तोपर्यंत ग्रामीण विभागाचा खरा विकास होणार नाही व त्या दृष्टीने कृषिचे औद्योगिकरण व कृषिसंबंधी औद्योगिकरण लवकरात लवकर झाले पाहिजे यावर त्यांनी भर दिला व आज महाराष्ट्रात आणि विशेषत: दक्षिण महाराष्ट्रात शेतीसंबंधी किंवा शेतीवर आधारितच जे उद्योगधंदे प्रस्थापित झालेले आहेत व ज्यामुळे झपाट्याने ग्रामीण विभागाची प्रगती झालेली आहे याचे सर्व श्रेय यशवंतरावांना आहे.

याचबरोबर महाराष्ट्रात उद्योगधंदे निरनिराळ्या विभागात स्थापन करण्यासाठी ज्या संस्था यशवंतरावांच्या अडीच वर्षाच्या कारकीर्दीत स्थापन झाल्या त्या आपल्याला सर्व परिचित आहेतच. त्यामध्ये सिकॉम (Sicom), एम. आय. डी. सी. (MIDC), एम. एस. एफ. सी. (MSFC) आहेत. या संस्थांचे जाळे आज सर्वत्र पसरलेले दिसत आहे. या विषयी आणखीन काही बोलण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

आपल्या समाजवादी विचारामध्ये मनुष्यबळाचा उपयोग आणि विकास करण्यासाठी सहकार व सहकारी संस्था याचे गणित यशवंतरावांनी आपल्या मनात पक्के मांडले होते. महाराष्ट्र निर्माण व्हायच्या अगोदरच कोल्हापूर व सांगली ज़िल्ह्यामध्ये काही सहकारी साखर कारखानदारी सुरू झाली. त्यामध्ये त्या त्या भागातील ग्रामीण नेतृत्वाचा उपयोग चव्हाणांनी केला. वारणामध्ये तात्यासाहेब कोरे, पंचगंगेत रत्नाप्पा कुंभार, सांगलीत वसंतदादा पाटील असे प्रत्येक ठिकाणी ग्रामीण औद्योगिक नेतृत्व निर्माण झाले व ग्रामीण जनता संघटित झाली. या कार्यात यशवंतरावांचे काय योगदान होते त्याविषयी आपल्याला आज काही सांगण्याची मला तरी आवश्यकता वाटत नाही.

त्यांनी निवडलेले तिसरे क्षेत्र म्हणजे शिक्षण. महाराष्ट्र स्थापन झाल्यावर पहिली जर काही घोषणा त्यांनी केली असेल तर ती गरीब कुटुंबातून आलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती व त्याचबरोबर ग्रामीण विभागात शिक्षण संस्था, ग्रामीण विद्यालये व महाविद्यालये प्रस्थापित करण्यासाठी विशेष सवलती जाहीर करण्यात आल्या. त्यावेळी ज्या झपाट्याने ग्रामीण विभागात कॉलेजेस निर्माण होत आहेत त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावेल व त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना दुय्यम दर्जाचे शिक्षण मिळेल अशी बरीच टीका झाली. मला आठवतंय या विषयावर एकदा चर्चा चालू असताना काही विद्वान लोकांनी अशा उथळ शिक्षणाविषयी टीका केली. ती यशवंतरावांनी मान्य केली. पण ते म्हणाले की, 'मी ज्या भागात राहतो तेथे कृष्णेचे पात्र उथळ आहे, परंतु जशी कृष्णा पूर्वेकडे वाहते तसतसे तिचे पात्र खोल होत जाते. आज जे शिक्षण आपल्याला कदाचित उथळ वाटत असेल, त्या शिक्षणाचा दर्जा काही वर्षांनी खोलावेल यात माझ्या मनात शंका नाही.' आज आपण ग्रामीण क्षेत्रातील पसरलेले शिक्षणाचे जाळे बघितले तर त्या म्हणण्यात बरेच तथ्य होते असे दिसून येते. अलिकडे कित्येक वर्षे एस.एस.सी. व हायर सेकंडरीमध्ये जी मुले येतात त्यात प्रामुख्याने ग्रामीण भागातील मुले जास्त प्रमाणात दिसून येतात. पूर्वी एक काळ असा होता की जेव्हा दादर आणि पुणेकडील मुलेच पहिल्या दहा-वीस नंबरामध्ये येत ते चित्र आज बदलले आहे. आपल्या शेजारील सातारामधील सैनिक स्कूलमध्ये काही वर्षापूवी मी आलो होतो, तेव्हा मला सांगण्यात आले की जवळ जवळ पंधरा ते वीस टक्के मुले लातूरमधील एका शाळेतून गेल्या तीन वर्षात दाखल झालेली आहेत. तेव्हा मला थोडेसे आश्चर्य वाटले, पण आज आश्चर्य वाटत नाही. कारण आता 'लातूर पॅटर्न' म्हणजे काय, हे सर्व परिचित आहे.

यशवंतरावांच्या विचारामध्ये चौथा स्तंभ होता नियोजनाचा. महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांनी ज्या नियोजनाच्या दिशा आखल्या त्याविषयी या प्रसंगी विशेष काही बोलण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

आज मी यशवंतरावांच्या शासनातील कार्याविषयी जरुर बोलणार आहे. कारण त्या क्षेत्रात फार जवळून त्यांना बघण्याची व त्यांच्या बरोबर कार्य करण्याची संधी मला मिळाली. १९४६ ते १९५६ या दहा वर्षात त्यांनी निरनिराळ्या मंत्रीपदावर काम केले. शासन म्हणजे काय व शासनाचा उपयोग जनतेच्या सेवेसाठी कसा करून घेता येईल याची काही तत्वे त्यांनी आपल्या मनात बांधली होती. मला आठवतंय की द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांची एक बैठक बोलावली आणि त्यात त्यांनी पहिल्यांदा ''लोकांचे समाधान हे लोकशाही कारभाराचे उद्दिष्ट असले पाहिजे.'' हे तत्व स्पष्टपणे सर्व अधिकाऱ्यांसमोर मांडले. त्यांनी पुढे हे स्पष्ट केले की सरकारी यंत्रणेमध्ये राहून जे काम करतात ते जसे सार्वजनिक सेवक (पब्लीक सर्व्हन्ट) असतात, तसेच लोकांचे बरोबर सार्वजनिक क्षेत्रात, सरकारी यंत्रणेच्या बाहेर जे काम करतात तेही सार्वजनिक सेवक असतात, आणि तेव्हा दोन्ही सार्वजनिक सेवकांची उद्दिष्टे एक असली पाहिजेत.

त्यांनी आमच्या समोर आणखी एक विचार आपल्या भाषाशैलीत मांडला. ते म्हणाले, ''कोणत्याही बाबतीत नाही म्हणावयाचे माझ्या जीवावर येते, हो म्हणता आले तर बरे, अशी माझी कळकळीची इच्छा असते. कारण नाहीचे हो करून देण्यासाठी हे राज्य निर्माण झाले आहे.''

त्यांच्या शब्दांचा तरुण अधिकाऱ्यांवर फार मोठा परिणाम झाला. एक नवीन दृष्टी मिळाली. आपण शासनात काम करत असताना, आपण काही केवळ सरकारी नोकर किंवा शासकीय चाकर म्हणून काम करावयाचे नाही, तर ज्या लोकांचे हे राज्य आहे त्या जनतेसाठी आपण झटले पाहिजे, ह्या विचाराचा आमच्या मनावर ठोस परिणाम झाला.

स्वतः माझ्याबद्दल बोलावयाचे झाले तर १९५७ साली ऑक्टोबर महिन्यामध्ये माझी केवळ चार-साडेचार वर्षांची नोकरी झाली होती. तेव्हा मला कोल्हापूरला कलेक्टर म्हणून पाठविण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ चालूच होती. कोल्हापूर त्या चळवळीचे एक प्रमुख स्थान होते व कोल्हापूरात एक अननुभवी अधिकाऱ्याला पाठवू नये म्हणून मुख्य सचिव व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गळ घातली. पण यशवंतरावांना कोल्हापूरची माणसे व कोल्हापूरची माती याची जाणीव होती व त्यांनी ठामपणे सांगितले, 'कोल्हापूरला तरुण जिल्हाधिकारी आवश्यक आहे.' मला हे सर्व नंतर कळले. परंतु यशवंतरावांनी घेतलेला निर्णय अचूक होता हे मात्र मी म्हणू शकेन. कारण पुढील साडेतीन वर्षे मी कोल्हापूरात काढली. कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासात सहभागी होण्याचे भाग्य मिळाले आणि आज जी कोल्हापूरची प्रगती झालेली

दिसत आहे, त्या पायाभरणीत आपणही सहभागी झालो या विचाराने विशेष आनंद मिळतो. मी हे एवढ्यासाठीच सांगत आहे की यशवंतरावांनी ज्या काही कसोट्या म्हणून आम्हा तरुण अधिकाऱ्यांसमोर मांडल्या, त्या कसोट्या अशा होत्या : लोकांचे समाधान, लोकांचा विश्वास, कार्यक्षम कारभार व निरपेक्ष कारभार. यामुळे या तत्वांचा तंतोतंत पालन करण्याचा प्रयत्न मी केला व आनंदाची गोष्ट म्हणजे लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. पक्षाचे राजकारण सोडून सर्व लोक कामास लागले व त्या तीन-साडेतीन वर्षामध्ये संबंध जिल्ह्याचा जणू काही कायापालट झाला. याचे सर्व श्रेय यशवंतरावांच्या चतुराईला दिले पाहिजे. कारण आपल्या हातात असलेल्या शासनाचा केव्हा व कसा उपयोग करावा यामध्ये राजकीय नेत्याचे यश आणि अपयश अवलंबून असते. या विषयी यशवंतरावजी सांगत की, 'जी साधने दिली आहेत, त्या साधनांनी संपादन करून काही साधणे शक्य नाही. या साधनांचा कशाप्रकारे उपयोग केल्यास ही साधने जास्तीत जास्त उपयुक्त व परिणामकारक ठरतील हे ज्यांच्या हातात साधने आहेत त्यांनीच ठरवावयाचे असते.' अशा साधनांचा उपयोग करण्यात यशवंतरावजी कुशल होते. या विषयी आपणास दोन आठवणी उदाहरणे म्हणून सांगाव्या असे वाटते म्हणून सांगतो.

२० नोव्हेंबर १९६२ रोजी यशवंतरावजींच्याबरोबर मीही दिल्लीला गेलो होतो. आम्ही विमानातून दिल्लीला उतरलो तेव्हा कळले की त्या दिवशी पंतप्रधानांनी नवीन सेनाप्रमुख, तसेच संरक्षण मंत्रालयाचा सचिव यांची नेमणूक केली आहे. अर्थातच यशवंतरावजींना त्या विषयी काही माहिती दिली नव्हती. त्यामुळे दिल्लीला उतरल्यावर ते थोडेसे बेचैन झाले. त्याचे एक विशेष कारण होते. कारण संरक्षण सचिव पी.व्ही.आर. राव आदल्या दिवसापर्यंत टी.टी. कृष्णामाचारीबरोबर काम करत होते. यशवंतरावांना माहीत होते की टीटीकेंनी संरक्षण मंत्रीपद मिळविण्यासाठी पंतप्रधानांवर बराच दबाव आणला होता. त्यांना असा संशय आला की आपल्याला ते पद मिळाले नाहीतरी कमीत कमी आपल्या खात्रीचा मनुष्य संरक्षण मंत्रालयाचा सचिव असावा. त्यामुळे पी.व्ही.आर. राव संबंधी त्यांचे निष्ठेबद्दल यशवंतराव थोडेसे साशंक होते.

दुसरे दिवशी शपथविधीनंतर यशवंतराव समक्ष मंत्रालयात गेले. सर्व अधिकाऱ्यांबरोबर पी.व्ही.आर. राव सुद्धा त्यांना भेटले. ती पहिली सलामी झाल्यानंतर सर्व अधिकारी आपापल्या कामांसाठी गेले. काही मिनीटांनी संरक्षण मंत्र्यांना भेटण्यासाठी पी.व्ही.आर. राव परत आले. त्यांचा चेहरा अत्यंत गंभीर होता. संरक्षण मंत्र्यांना भेटून पाच-सात मिनीटातच ते बाहेर आले तेव्हा त्यांचा चेहरा हास्याने व अभिमानाने फुललेला दिसला. मी खोलीत गेल्यावर यशवंतरावांना विचारले की, ''आपले काय बोलणे झाले की त्यामुळे पी.व्ही. आर. रावांमध्ये असा फरक पडला.''

यशवंतराव म्हणाले, खोलीत येताच राव म्हणाले, ''मला माहीत आहे की माझी सचिव म्हणून नेमणूक आपल्याशी सल्लामसलत न करता केली आहे. अशा बिकट प्रसंगी आपल्या विश्वासातील व्यक्ती आपल्या मंत्रालयाचा सचिव असावा हे योग्य आहे. ते आपल्याला करता यावे यासाठी मी या क्षणी रजेवर जाण्यास तयार आहे.''

यशवंतरावांनी त्यांना सांगितले, ''तुम्ही म्हणता ते खरे आहे, पण तुम्हीच संरक्षण मंत्रालयामध्ये सचिव रहावे अशी माझी इच्छा आहे.''

ते एकच वाक्य, पण त्या एका वाक्याने पी.व्ही.आर. रावचा उत्साह व कार्यक्षमता कित्येक पटीने वाढली व पुढील पाच वर्षे ते यशवंतरावांच्या खांद्याला खांदा लावून संरक्षण सचिव म्हणून राहिले.

साधनांची ओळख व साधनाचा उपयोग करून घेण्याची लकब यशवंतरावांना कशी होती त्यासाठी मी हे उदाहरण म्हणून सांगितले आहे. दुसरे एक उदाहरण : संरक्षण सचिव पी.व्ही.आर. राव अत्यंत विद्वान व शिस्तप्रिय आणि कडक. ते सैन्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुद्धा कामामध्ये धारेवर धरत व त्यांच्या बोलण्याची पद्धत अशी काही होती की, कित्येक वेळा ती अपमानास्पद वाटे. एके दिवशी जनरल चौधरी बऱ्याच तक्रारी घेऊन रागारागात संरक्षण मंत्र्यांना भेटण्यासाठी आले व आपल्या तक्रारीचा पाढा त्यांनी सादर केला. त्यांची विशेष तक्रार होती ती, पी.व्ही.आर. रावांच्या बोलण्याच्या पद्धतीविषयी व थोड्याशा रागीट व उद्धट भाषेबद्दल व ते बोलताना त्यांच्या अविर्भावाविषयी. यशवंतरावांनी हे सर्व ऐकून घेतले आणि मध्येच जनरल चौधरींना विचारले, ''आपली सैन्यात किती वर्षे नोकरी झाली?'' जनरल म्हणाले, ''जवळ जवळ पस्तीस वर्षे.'' त्यावर यशवंतरावजी जनरल चौधरींना म्हणाले की, ''आता जर मी तुम्हाला सांगितले की तुमच्या बोलण्याची पद्धत व अविर्भाव बदला, तर आपल्याला कसे वाटेल ?''

जनरल चौधरींनी अर्धाएक मिनीट विचार केला, हसले व म्हणाले, ''आपल्या बोलण्याचा मतितार्थ मला कळला.'' त्यावर यशवंतराव एवढेच म्हणाले की, ''पी.व्ही.आर. च्या पद्धती विषयी थोडीशी नाराजी आहे याची मला जाणीव आहे, परंतु त्यांची कार्यक्षमता व कामाचा उरक ह्यांची आपल्याला आज जरुरी आहे आणि ते जास्त महत्वाचे आहे. कदाचित त्यांना त्यांचे बोलणे व अविर्भाव बदलण्यास मी जर सांगितले, तर त्यांची उपयुक्तता कमी होईल आणि हे करणे बरोबर आहे का?''

अर्थातच हे ऐकताच जनरल चौधरी चितपट झाले आणि मी हरलो या भावनेने खोलीतून बाहेर निघाले.

हा पाच-सहा मिनीटांचाच संवाद, परंतु याचे परिवर्तन जनरल चौधरी व पी. व्ही.आर. राव यांच्या मैत्रीत झाले. त्या दोघांनी यशवंतरावांना बिकट काळी साथ दिली व त्यांची संरक्षण मंत्री म्हणून कारकीर्द अत्यंत वैभवशाली करण्यात योगदान दिले. याचे मूळ कुठे होते, तर ते यशवंतरावांच्या प्रशासकीय कौशल्यात व त्यांच्या प्रत्येक साधनांचा कसा उपयोग करून घ्यावा या असामान्य कर्तृत्वावर. ह्या गुणांमुळे ज्या ज्या विभागात यशवंतरावजींनी जबाबदाऱ्या सांभाळल्या, संरक्षण मंत्री, गृह मंत्री, अर्थ मंत्री व परराष्ट्र मंत्री म्हणून, त्या त्या क्षेत्रात त्यांनी आपल्या कामाचा ठसा ठेवला, तसेच एका फार मोठ्या वरिष्ठ अधिकारी वर्गाचे जाळे निर्माण केले. आजही त्यांच्या मृत्युच्या अकरा वर्षानंतर कुठेही त्यांचे नाव घेतले तर निरानिराळ्या क्षेत्रातील वरिष्ठ सनदी अधिकारी, निरनिराळ्या क्षेत्रातील उच्च पदस्थ अत्यंत प्रेमाने व भावनेने यशवंतरावांविषयी बोलतात. ह्याचे गूढ कुठे होते? दुसऱ्यांच्या बाबतीत असे का होत नाही किंवा झाले नाही ? माझ्या मते आणि माझ्या अनुभवाप्रमाणे आपल्या बरोबर काम करणाऱ्या व्यक्तीविषयी व त्या व्यक्तीशी संबंध ठेवणेविषयी एक मार्गदर्शक तत्व त्यांनी मांडले होते. ते म्हणत की, 'जे अधिकारी माझ्या बरोबर काम करतात त्यांच्याकडून मी तत्वनिष्ठेची अपेक्षा करतो तेवढीच निष्ठा मी त्यांना परत दिली पाहिजे. निष्ठा म्हणजे दुहेरी मार्ग आहे. तो एकतर्फी होऊ शकत नाही.''

एक असामान्य शासनकर्ता म्हणून जेव्हा आपण यशवंतरावजीबद्दल बोलतो, तेव्हा त्यांनी अविष्कृत केलेल्या तत्वांचा विसर पडू देता कामा नये. ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे की आजच्या परिस्थितीत राज्यकर्त्यांमध्ये या तत्वांची जाणीव नाही व शासनकर्ते आपल्या अधिकाऱ्यांकडे एका संकुचित वृत्तीने, एकतर्फी निष्ठेच्या भावनेनेच पाहतात.

शासन व शासनकर्ता म्हणून यशवंतरावांचा उल्लेख करताना त्यांनी केलेली लोकशाही व शासन यांची सांगड घालण्यासाठी पंचायत राज्याची, महाराष्ट्र राज्याची स्थापना केली त्याचा थोडक्यात उल्लेख करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राची स्थापना झाल्याबरोबर महाराष्ट्रात सर्वांत चांगले -खरेखुरे पंचायती राज्य कसे प्रस्थापित करता येईल याकडे यशवंतरावांनी लक्ष दिले व ते करताना लोकशाही, शासन, सहकारी चळवळ व सरकारी यंत्रणेतील सार्वजनिक सेवक व सरकारी क्षेत्राबाहेर काम करणारे सार्वजनिक सेवक यांना एका उद्दिष्टासाठी जुंपण्याचे त्यांनी ठरविले व त्यादृष्टीने ठोस पावले उचलली. त्यांनी त्या विषयी वेळोवळी मांडलेले विचार'सह्याद्रीच्या वाऱ्यात' आजही उपलब्ध आहेत आणि त्या विषयी आपणासमोर काही विशेष बोलण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. पण एक यशवंतरावांचे वैशिष्ट्य म्हणून सांगितले पाहिजे. कारण या विषयी यशवंतरावांचे कार्य त्यांच्या मनामध्ये बांधलेल्या काही सिद्धांतावर बसवले

होते आणि ते मी थोडक्यात आपल्यासमोर मांडणार आहे. त्यांच्या विचारांचा पाया होता लोकशाहीमध्ये. त्या विषयी मी त्यांचे विचार आपल्यासमोर मांडीत आहे. लोकशाहीमध्ये सहकारी चळवळीच्या स्थापनेविषयी, सहकारी चळवळ ही मूलतः लोकशाहीची चळवळ आहे, अशी त्यांची धारणा होती. त्याचबरोबर सत्ता विकेंद्रीत करण्याची प्रक्रिया केवळ शासकाची प्रक्रिया नसून, सत्तास्थानावर असणाऱ्या व्यक्तीने आपल्या मनाने, भावनेने आणि विचाराने सत्ता विकेंद्रीत करण्याचा नित्य प्रयत्न केला पाहिजे हे त्यांचे ठाम मत होते. त्यांनी मांडलेले गणित लोकशाही, सहकारी व सत्ता विकेंद्रीकरण करण्याचे गणित जेवढे अचूक होते तेवढेच न बदलणारेही आहे. त्यामध्ये जे तथ्य काल होते ते आजही आहे व उद्या सुद्धा राहील त्याच्याबद्दल शंका असता कामा नये.

यशवंतरावांच्या पैलूंविषयी कितीतरी बोलता येईल व कितीतरी आठवणी सांगता येतील. त्यांच्याबद्दल, त्यांच्याबरोबर भारताच्या इतिहासातील अत्यंत बिकट काळी संरक्षण मंत्रालयात काम करण्याची मला जी संधी मिळाली त्या विषयी मी बरेच काही माझ्या "वादळ माथा" पुस्तकात लिहिले आहे. त्या आठवणी लिहिताना माझे उद्दिष्ट एकच होते आणि ते म्हणजे यशवंतराव चव्हाणांची स्मृति व त्यांच्या अंगाचे अलौकिक गुण जे निरनिराळ्या प्रसंगी पाहण्याचा मला योग आला ते लोकांपर्यंत पोचवावे व त्याच उद्देशाने मी हे पुस्तक लिहिले आहे. त्याचबरोबर कालांतराने जेव्हा यशवंतराव चव्हाणांच्या आयुष्याचा, त्यांच्या राजकीय जीवनाचा जेव्हा इतिहास लिहिला जाईल व त्यांच्या कार्याचे मूल्यमापन होईल त्यावेळी अशा साधनांचा उपयोग करावा लागेल या विषयी माझ्या मनात काही संशय नाही आणि म्हणूनच त्या कामात पुढे मदत व्हावी म्हणून जे काही योग्य वाटेल ते मी लिहिले आहे. अजून बरेच काही लिहावयाचे आहे व ते लिहिण्याचा माझा विचार आहे.

यशवंतरावांच्या पैलूंविषयी मी सुरुवातीस जे सांगितले की, असंख्य पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वात कसे साध्य झाले हे एक कोडे आहे. राजकारणी विचारवंत असू शकतात, लेखक असू शकतात, त्याला निरनिराळे छंद असू शकतात. पण कोणत्याही क्षेत्रातील व्यक्तीशी यशवंतरावांचा जेथे जेथे संबंध आला तेथे तेथे त्यांनी अशी भावना निर्माण केली की या माणसाने आपले जीवन त्याच क्षेत्रामध्ये का नाही घालविले ? एक उदाहरण म्हणून मी आपल्याला प्राध्यापक ना. सी. फडके यांनी लिहिलेल्या "इथे झाला सुंदर संगम तीन अनमोल गुणांचा", हे आपण जरुर वाचावे म्हणून विनंती करेन. आपल्या भाषाशैलीत एक आदर्श राज्यकर्ता म्हणून यशवंतराव चव्हाणांच्या विषयी जेवढा आदर व्यक्त केला तेवढाच त्यांनी साहित्य आणि वक्ता म्हणून, एक साहित्यिक म्हणून

यशवंतरावांनी जगायचं ठरवलं असतं, तर मराठी भाषा कितीतरी पटीने समृद्ध झाली असती या विषयी काही शंका नाही. त्या विषयी ना.सी.फडके म्हणाले, 'यशवंतरावांची प्रभावी वाणी जशी स्पृहणीय आहे, तसाच त्यांच्या लेखणीचा संचारही कौतुकास्पद आहे. यशवंतरावांचं पडलेलं भाषण जसं कधी कुणी ऐकलेले नाही. त्याचप्रमाणे त्यांचा फसलेला लेख मी कधी वाचलेला नाही.' भावनेने ओथंबलेले, प्रभावी भाषेनं नटलेलं लेखन जी लेखणी करू शकते, ती साधी-सुधी लेखणी नाही. श्रेष्ठ दर्जाच्या अस्सल साहित्यिकाच्या हातात शोभावी अशीच ती आहे.

त्यांचे पुस्तकावरचे प्रेम कराडवासियांना सर्वश्रुत आहे आणि आपले सौभाग्य आहे की त्यांचे संपूर्ण ग्रंथालय वेणूताई चव्हाणांच्या स्मृतिप्रित्यर्थ कराडात आहे. त्यांचे पुस्तकावरचे प्रेम एवढे होते की परदेशात कोठेही आणि केव्हाही गेले तरी तेथील मोठमोठ्या पुस्तकालयांना ते जरुर भेट देत. पुस्तकांबद्दलच्या प्रेमाविषयी बोलताना ते म्हणाले, "ग्रंथवाचनाने माणूस मोठा झाला नाही तरी शहाणा मात्र जरुर होतो." आपल्या अनुभवाबरोबर त्यांनी हेही पुढे म्हटले की, "जसे सर्व मोठे लोक शहाणे नसतात, त्याचप्रमाणे सर्व शहाणे लोक मोठे होऊ शकत नाहीत."

ते इतिहासाचे गाढे अभ्यासक होते. आपण जर त्यांची पुस्तके पाहिली तर त्यात प्रामुख्याने राजकीय नेत्यांच्या आठवणी, आत्मचरित्रे व इतिहासाची पुस्तके बघावयास मिळतील. ते करण्यामध्येही त्यांची काही तात्विक भूमिका होती. त्यांच्याच शब्दात म्हणावयाचे तर 'वर्तमान काळ समजण्यासाठी इतिहासाचे चिंतन करावे लागते. कारण वर्तमान काळांशी झगडणाऱ्या माणसाला भूतकाळ समजण्याची जर अक्कल नसेल तर वर्तमान काळाशी तो फारसा झगडू शकणार नाही.'

मी सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे यशवंतरावांच्या अनेक पैलूंपैकी काही निवडक पैलूंविषयीच मी आतापर्यंत बोललो आहे. ह्या सर्व पैलूंमध्ये, हिऱ्यामधून जशी हिरकणी निर्माण केली जाते, तसेच थोडक्यात यशवंतरावांविषयी बोलले जाते की, "आता यशवंतराव एक व्यक्ती राहिली नसून तो एक विचार म्हणून राहिला आहे."

ह्या उपमेचा उगम, त्यांचा अनुभव, त्यांनी कारावासात काढलेले आयुष्य, निरनिराळ्या राजकीय शास्त्रांचे मनन, चर्चा व चिंतन ह्यात आहे. त्यांच्याच शब्दात म्हणावयाचे तर, "१९४० पासूनची वैचारिक बैठक, राजकीय प्रवासातील माझी कायमची सोबत झाली आहे. ह्या विचारमंथनात, आर्यभूषण भवनाच्या शेजारच्या गुडलक रेस्टॉरंटचाही भाग आहे. १९३९ साली लॉ कॉलेजला असताना गुडलकमध्ये पिवळा हत्ती सिगारेटचा धूर सोडीत व तो पहात मी तासन तास काढी."

ह्याच विचाराने परिपक्क झालेला नेता म्हणून व एक विचारवंत राजकीय पुरुष, व आपल्या विचारांचा वारसा पाठीमागे ठेवून, यशवंतरावांनी आपल्यासाठी एक अमाप खजिना ठेवला आहे. त्याचा उपयोग, तसाच त्याचा उपभोग कसा करावा हे आपल्यावर अवलंबून आहे.

मी या अगोदरच यशवंतरावांचे लोकशाहीवरील विश्वास व राज्यकारभाराच्या कसोटीच्या विषयी बोललो आहे. पण कित्येक वेळा विचारात आणि आचरणात बरीच फारकत होऊ शकते याची यशवंतरावांना जाणीव होती. या विषयी एक आठवण म्हणून त्यांनी अहमदाबाद येथे २७ जानेवारी १९६१ रोजी केलेल्या भाषणाचा मी उल्लेख करू इच्छितो.

दादासाहेब मावळणकरांच्या स्मृतिप्रित्यर्थ हेरॉल्ड लॉस्की नावाच्या इन्स्टिट्यूटमध्ये लोकशाही व लोकांचे अधिकार या विषयी बोलताना त्यांनी संसदीय लोकशाहीची काही वैशिष्ट्ये असतात ती सांगितली. ही वैशिष्ट्ये म्हणजे संसदीय लोकशाहीत कायद्याचे राज्य असते. संसदीय लोकशाहीत ठराविक कालावधीनंतर प्रौढ मताधिकाऱ्यांच्या मतांवर निवडणूक होत असते आणि महत्वाचे हे की संसदीय लोकशाहीत जनतेला विचारस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य असे मूलभूत अधिकार असतात. त्याचबरोबर अशा मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी स्वतंत्र न्याय संस्था असते.

हे स्पष्ट करताना यशवंतरावांनी सांगितले की, 'संसदीय लोकशाहीत प्रत्यक्ष आंदोलनाला (डायरेक्ट ॲक्शन) कायदेभंगाच्या चळवळीला स्थान असता कामा नये. परंतु, त्यालाही दोन अपवाद आहेत. एक, जेव्हा सरकारच स्वत: लोकशाही नष्ट करत असते तेव्हा, आणि जेव्हा संपूर्ण मानवजातीचे भवितव्य धोक्यात येईल तेव्हा.'

मला आठवतंय ह्या भाषणाचा, त्यावेळी नुकत्याच निर्माण झालेल्या गुजराथ राज्यात बराच गाजावाजा झाला. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी गुजराथच्या राजधानीत येऊन लोकांना आंदोलन करण्याचे काय अधिकार आहेत, हे सांगण्यात काही तरी छुपे उद्दिष्ट असले पाहिजे असे म्हटले गेले. परंतु तसे काही नव्हते. त्यांनी हे एक विचार म्हणून आपल्या मनात बांधलेले सिद्धांत लोकांसमोर उघड केले होते. परंतु त्यावेळेला त्यांना कल्पनाही नव्हती की चौदा वर्षांनंतर, भारतात अशी काही परिस्थिती निर्माण होईल की जणू काही लोकशाहीच नष्ट होईल का असे वाटावे.

त्यावेळेला यशवंतरावांच्या मनाची जी द्विधा स्थिती झाली त्याची फारच मोजक्या व्यक्तींना कदाचित माहिती असेल. पण मला आठवतंय की आणीबाणी जाहीर झाल्यानंतर जेव्हा परराष्ट्र मंत्री म्हणून यशवंतराव पहिल्यांदाच देशाबाहेर निघाले, तेव्हा त्यांनी

जिनीव्हात एक रात्र मुक्काम करण्याचे ठरविले. बऱ्याच अधिकाऱ्यांना व स्वित्झर्लंडमधील राजदूतांना आश्चर्य वाटले की काही विशेष काम नसताना यशवंतराव जिनीव्हाला का जाऊ इच्छितात. त्यांनी दोन वाक्यांचा एक निरोप पाठविला. 'जिनीव्हात राम प्रधान आहेत, त्यांच्याबरोबर एक दिवस काढण्यासाठी मी जिनीव्हाला येत आहे. दुसरा कोणताही कार्यक्रम माझ्या भेटीत कृपा करून ठेवू नका.'

ठरल्याप्रमाणे यशवंतराव आले. आमच्याकडे भोजनासाठी आले व त्यानंतर स्वित्झर्लंडच्या वनश्रींनी फुललेल्या डोंगरात आम्ही गेलो, हिंडलो व खूप खूप बोललो. त्या बोलण्यात मी त्यांना अहमदाबादमधील त्यांच्याच भाषणाची आठवण करून दिली व विचारले की, "भारताची संसदीय लोकशाही धोक्यात आली आहे, हे आपणास वाटत नाही का व त्यासाठी आपण काय करणार आहात?"

त्यांनी बर्फाच्छादित उत्तुंग पर्वताकडे पहात बराच वेळ विचार केला व म्हणाले, "तू आठवण करून दिलीस हे बरे केले, पण आत्ताच काय करावे या विषयी मी साशंक आहे. कारण सरकारच्या बाहेर राहून, सरकारच्या धोरणांमध्ये काही फरक करू शकेन असे मला तरी वाटत नाही. सरकारात राहूनच पंतप्रधानांचे मन वळविण्याचा प्रयत्न करण्याचे मी ठरविले आहे."

आणि त्याप्रमाणे त्यांनी केले. आता उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणे हे स्पष्ट झाले आहे की त्या वेळी सार्वत्रिक निवडणुका घेण्यासाठी यशवंतरावांनी पंतप्रधानांना सल्ला दिला व आग्रह धरला. हेही खरे, की निर्माण झालेल्या परिस्थितीतून, लोकशाहीला परत रुळावर आणण्यासाठी दुसरा काही पर्याय नाही म्हणून पंतप्रधानही त्या निर्णयाला पोचले व १९७७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्या नंतरचा इतिहास आपणा सर्वांस परिचित आहेच.

आज त्या भेटीविषयी जेव्हा विचार करतो, तेव्हा त्या लोकशाहीचा खराखुरा प्रेमी, लोकराज्याचा पुजारी, जनतेचे राज्य आणण्यासाठी विकेंद्रीकरणाचा पुरस्कर्ता, यशवंतराव चव्हाण यांच्या त्यावेळच्या मानसिक स्थितीची आठवण होते. त्या नंतरचा १९७७ ते १९८० सालचा इतिहास अजून ताजा आहे. त्या विषयी आज काही बोलणे इष्ट नाही. कारण महाराष्ट्रात जे काही घडले त्यात खरोखरच यशवंतरावांचे सहकार्य होते. कै. वसंतरावदादा पाटील काय किंवा शरद पवार व इतर काँग्रेस पुढारी हे सर्व यशवंतरावांना श्रद्धास्थान मानणारे होते. पण जे काही झाले त्याचे परिणाम किंवा दुष्परिणाम यशवंतरावांना भोगावे लागले, अशी माझी धारणा आहे. त्यांच्या राजकीय वाटचालीवर जसा त्याचा परिणाम झाला तसाच कित्येक व्यक्तींशी वैयक्तिक संबंधात दुरावा आला,

हे सत्य आहे. १९८० नंतर जवळ जवळ तीन वर्षे यशवंतरावांनी राजसंन्यासात घालविली. ज्या पक्षाला, लहानपणापासून तनाने व मनाने आपल्या सर्वस्वाचे अर्पण ज्यांनी केले होते ते, त्या पक्षाच्या बाहेर त्यांना रहावे लागले व त्या पक्षात परत जाण्याचे मनोधैर्य जेव्हा त्यांनी दाखविले त्या नंतरही पक्षाच्या दाराच्या चौकटीत यशवंतरावांना ताटकळत उभे रहावे लागले. पण हे सर्व होत असताना त्यांनी आपल्या मनाचा तोल संतुलीतपणे कायम ठेवला. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी आपल्या यातना दाखविल्या नाहीत. अशा यातना सहन करण्याची त्यांना सवय होती असे मला वाटते.

माझ्या 'वादळ माथा' पुस्तकात १९६२ साली दिल्लीत दाखल झाल्यानंतर पहिल्या सहा-आठ महिन्यात त्यांना किती प्रकारच्या मानसिक यातना सहन कराव्या लागल्या, या विषयी मी बरेच कांही लिहिले आहे. कारण तो आता इतिहासाचा एक भाग आहे आणि यशवंतरावांचे विषयी जेव्हा जेव्हा मी विचार करतो, तेव्हा माझ्या डोळ्यासमोर सह्याद्री उभा राहतो. यशवंतरावांनी सह्याद्रीप्रत कणखर मनाने त्यावेळेला बरेच काही सहन केले.

शेवटी माणूस गेल्यानंतर त्या माणसाच्या विषयी काही ठोस चित्र पक्के मनात रहाते. माझ्या दृष्टीने विचाराल, तर माझ्यासाठी एक राष्ट्रवादी, महाराष्ट्र नेता व लोकशाहीवर नितांत श्रद्धा असलेला नेता, अशी आठवण सदैव राहील.

महाराष्ट्राविषयी बोलावयाचे तर, त्यांच्याच शब्दात "महाराष्ट्र राज्य मराठी जनतेच्या कल्याणाचे काम करण्यासाठी निर्माण झाले आहे. मराठी भाषिकांजवळ जे देण्यासारखे आहे, जीवनामध्ये चांगले आहे, उदात्त आहे, त्याच्यात देशासाठी त्याग करण्यासाठी हे राज्य निर्माण झालेले आहे. देशाचे आणि महाराष्ट्राचे हित जेव्हा एकरूप होते, तेव्हा देश मोठा होतो आणि महाराष्ट्रही मोठा होतो."

हा विचार चिरंतन स्वरूपाचा आहे. तसेच लोकशाही विषयी त्यांचे असलेले निस्सीम प्रेम व त्याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर त्यांना जेव्हा राष्ट्रपती संजीव रेड्डीनी पंतप्रधान होण्यासाठी आमंत्रण दिले, त्या क्षणाची आठवण होते. आज भारतात जे होत आहे व सत्तेवर येण्यासाठी जी सर्व नेतेमंडळी धडपड करत आहेत ते पाहिले तर विश्वास ठेवता येत नाही की यशवंतरावांना जेव्हा पंतप्रधान होण्यासाठी आमंत्रण आले, तेव्हा त्या परिस्थितीत मला सरकार बनविणे शक्य नाही हे त्यांनी राष्ट्रपतींना सांगितले. आज कोणी नेता असे वागू शकेल काय? हे स्वप्नातही येणे शक्य नाही.

त्या प्रसंगाविषयी यशवंतरावांचे कॉँग्रेसमधील सहकारी श्री.सी. सुब्रमण्यम जे त्यावेळी तामीळनाडू कॉँग्रेसचे अध्यक्ष होते व काही वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्यात राज्यपाल म्हणून होते - त्यांनी म्हटले आहे की, ''पक्षहितासाठी व देशहितासाठी यशवंतरावांनी स्वार्थ बाजूला ठेवला व पंतप्रधानकी मिळाली असता तिचा अव्हेर केला याबद्दल मी चव्हाणांचा गौरव करीन. लोकशाही समाजवादाच्या ध्येयासाठी पंतप्रधान पदाचे आमिष ठोकरून मनाचा मोठेपणा दाखविणारा हा भारताच्या इतिहासातील एकमेव नेता होय याची मूर्तिमंत साक्ष पटते.''

यशवंतरावांनी एक लोकशाहीचा सेवक व भोक्ता म्हणून पंतप्रधानकी नाकारली. हे करताना माझ्या मते त्यांनी संसदीय लोकशाहीला आदराचा मुजरा केला.

त्या यशवंतरावांची आज आठवण करून मी त्यांना भावपूर्ण अभिवादन करतो व आपले भाषण संपवितो.

२५ नोव्हेंबर १९९५

राम प्रधान

**राम प्रधान**



प्रा. ग. प्र. प्रधान
पुणे

नांव : गणेश प्रभाकर प्रधान

जन्म: २६ ऑगस्ट १९२२

शिक्षण : फर्ग्युसन कॉलेज
बी. ए. (इंग्रजी व ऑनर्स) १९४२
एम. ए. (इंग्रजी व मराठी) १९४५

अध्यापन : १९४५ ते १९६६ फर्ग्युसन कॉलेज,
१० वर्षे पदव्युत्तर, पुणे विद्यापीठ. इंग्रजीचे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक.
प्रसिद्ध वक्ते व विचारवंत

लेखन : इंग्रजी : लो. टिळक चरित्र
म. गांधी-मुलांसाठी चरित्र (प्रा. अ. के. भागवत यांच्या समवेत.)
राम गणेश गडकरी, इंडियाज फ्रीडम स्ट्रगल

लेखन : मराठी:लो. टिळक व्यक्ती व कार्य
हाजीपीर, कांजरकोट, सोनार बंगला, (युद्ध भूमीवरील प्रवास वर्णने)
भाकरी आणि स्वातंत्र्य, साता उत्तराची कहाणी, स्वातंत्र्य संग्रामाचे
महाभारत, लो. टिळक, (नॅशनल बुक ट्रस्ट) राजकीय बखर.

संपादन : आगरकर लेखसंग्रह, (साहित्य अकादमी) पं. नेहरू, विविध दर्शन.

स्फुट लेखन : साधना, समाज प्रबोधन पत्रिका व अन्य वृत्तपत्रातून.

कार्य : राष्ट्र सेवादल, १९४२ स्वातंत्र्य लढ्यात ११ महिने कारावास,
समाजवादी पक्षाचे कार्य, नंतर जनता पक्ष.
१९७५ आणीबाणीत १६ महिने कारावास.
विधान परिषदेवर पदवीधर मतदार संघातून,
(१९६६, १९७२ व १९७८) अशी तीन वेळा निवड,
एकूण अठरा वर्षे आमदार.
१९८० ते १९८२ विधानपरिषद विरोधी पक्षनेता.

**ग्रंथालय चळवळीत काम:** दोन वेळा ग्रंथालय परिषदेचे अध्यक्ष.
१९८४ पासून साधना साप्ताहिकाचे संपादक
महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष.

त्यांच्या 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत' ह्या पुस्तकास हेंद्रे पारितोषिक.

❑❑❑

# " भारतीय लोकशाहीची वाटचाल "

प्रथम मी यशवंतरावजींच्या पवित्र स्मृतीस वंदन करतो. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जायला मिळालं. काही ठिकाणी विचार मांडण्याचा आवेश तर काही ठिकाणी बौद्धिक द्वंद्व असतं. त्याचा आनंद वेगळाच असतो. पण ज्याच्याबरोबर आपण स्वातंत्र्य लढ्यात वाटचाल केली. त्या थोरल्या भावासारख्या ज्येष्ठ स्नेह्याला वंदन करण्याची संधी आज मिळते आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ही व्याख्यानमाला आहे. त्यामुळे यात सहभागी होण्यामध्ये मनाला साफल्य वाटतं. माझी भावना इथे गुंतलेली आहे. आम्ही सर्व मित्रांनी स्वातंत्र्य चळवळीत सर्वस्व पणाला लावलं, कोणी थोडं काम केलं असेल पण आमचं सर्वांचं एक कुटुंब होतं. आमच्यावर समान वैचारिक संस्कार झाला होता. यशवंतरावांनी स्वतःच्या ग्रंथामध्ये १९३२ सालच्या अनुभवात ते लिहितात. 'तुरुंग हे एक विद्यापीठ आहे.' आणि तोच अनुभव मला १९४२ साली आला. १९३२ ला आचार्य भागवतांनी व्याख्याने देऊन वैचारिक संस्काराबरोबरच साहित्याचा रसास्वाद कसा घ्यावा हे त्यांना सांगितलं. १९४२ ला ज्या वार्डात मी होतो तिथं आचार्य भागवत, आचार्य जावडेकर, कऱ्हाडची सर्व ज्येष्ठ मंडळी गणपतरावजी आळतेकर वगैरे होते. त्यावेळी आचार्य भागवतांची भारतीय तत्वज्ञान व जगातील तत्वज्ञानावरची अशी जवळ जवळ ६० व्याख्याने मला ऐकायला मिळाली. तिथंच आचार्य जावडेकरांनी गांधीजींच्यावर दिलेली

व्याख्याने मी कधीच विसरू शकणार नाही. जावडेकर गांधींच्यावर बोलत असताना आमच्या आवारात सानेगुरुजीही होते. साने गुरुजींनी १९३२ साली तुरुंगात असताना विनोबाजींची गीताप्रवचने लिहून घेतली. त्यामुळे ते पुस्तक अमर झाले. त्याचप्रमाणे जावडेकरांची तीन व्याख्याने साने गुरुजींनी लिहून घेतली आणि पुढं ती पुण्याच्या कोकाट्यांनी प्रसिद्ध केली. त्याला आचार्य जावडेकरांनी लिहिलेली प्रस्तावना अपुरी, थोडी आहे. ते म्हणाले, यातील शब्द, विचार माझे पण अेकूण भाषेचाच प्रसाद परंतु त्याला वेगळा स्पर्श झालेला आहे, तो सर्व सानेगुरुजींचा हे म्हणणारे आचार्य जावडेकर मोठे आणि ते लिहून ते प्रसिद्ध करणारे साने गुरुजीही मोठे. आमच्या पिढीला हे भाग्य लाभलं. वीर वामनराव जोशी यांच्या एका नाटकांत म्हटलेलं होतं - "देशभक्ता प्रासाद बंदीशाला" हे थोर देशभक्त आम्ही जवळून पाहिलेले होते, आणि त्यांच्या समवेत राहायला मिळालं, त्यामुळे माझ्या आयुष्याची जडण-घडण झाली.

स्वातंत्र्यपूर्व काळात आमच्या पिढीला जसं संघर्षातून जावं लागलं, त्यानंतरही स्वातंत्र्याला ५० वर्षे झाली तरी ही खडतर वाटचाल सुरू आहे. यामध्येही आपला कस लागलेला आहे. काहीजण तिथंच पडलेले असतील. काहीजण मुख्य रस्त्यापासून बाजूला गेले असतील. पण काहीजण निर्धारानं तिथं टिकून राहिले असतील. आणि याचं श्रेय कुणाला ? ते नंतर ठरवू.

भारतीय लोकशाहीची वाटचाल या विषयावर प्रथम मी ऐतिहासिक आढावा घेऊन ९१ सालपर्यंत येणार आहे. आणि नंतर गेल्या ५ वर्षातील आज आपणापुढं असणारी आव्हानं आणि भारतीय लोकशाहीचं भवितव्य अशी विषय मांडणी करून मी बोलणार आहे. नुसतं ऐतिहासिक, तात्विक, प्राध्यापकीय विवेचन करावं अशी माझी भूमिका नाही. मी धकाधकीच्या राजकारणापासून दूर झालेलो असलो, तरी या प्रत्यक्ष राजकारणामध्ये लोकशाहीची जी प्रक्रिया आहे, त्यात सहभागी होतांना जो आनंद लाभतो त्यासाठी मी माझी नोकरी देखील सोडून दिलेली होती. मी तटस्थपणे बाजूला उभा राहिलेलो नाही. त्यामुळे लोकशाही प्रक्रियेत काम करीत असतांना मनाला येणारी धुंदी मिळणारा आनंद आणि अपयशाच्या वेळी मनाला वाटणारी खंत अशा वेगवेगळ्या अवस्थांतून मी गेलेलो आहे. म्हणून माझं विवेचन हे विश्लेषण करण्याचा एक प्रयत्न आहे. त्याप्रमाणे लोकशाहीच्या चळवळीत या वाटचालीत आम्हाला ठेचा कशा लागल्या, नवीन शिकलो कसं, सत्यशोधन कसं झालं हे मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

भारताचे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर घटना समितीची स्थापना झाली. घटना समितीत भारताची भविष्यातील जी राज्यपद्धती असावी ती लोकशाही राज्यपद्धती असावी हे

आपण स्वीकारलं. हे इतिहासात पूर्वी कधीही घडलेलं नव्हतं. छत्रपती शिवाजी महाराजांचा कालखंड हा इतिहासातला एक उज्वल कालखंड मी मानतो. ते राजे होते, जनमताला त्यांनी वाव दिला. पण त्यांच्या मतावर काही घडत होतं असं नाही. पण घटनेत आपण म्हणालो - "We the people of India" आम्ही जे भारताचे नागरीक आहोत ते आम्ही स्वत:ला आपलं भविष्य ठरविण्याची सनद ही स्वत:लाच देतो आहोत हे प्रथमच घडलं. हे एकाएकी घडलं नाही. घटना समिती अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, घटनासमितीचे ड्राफ्टींग कमिटीचे चेअरमन डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तसेच या वादविवादात पंडित नेहरू व इतर अनेक देशभक्त होते. या वाद विवादात त्यांच्या जीवनातील अनेक अनुभवांचा आविष्कार झालेला दिसतो. तरीही हे एका दिवशी ठरलेलं नाही. स्वातंत्र्य संग्रामात भारतीय जनतेच्या मनावरती लोकशाहीचा संस्कार घडला. भविष्यामध्ये भारताचं जीवन उज्वल करायचं असेल तर लोकशाहीच्याच मार्गाने गेलं पाहिजे. म्हणून आपण लोकशाही राज्य पद्धती स्वीकारली आहे. ही काही देशभक्तांनी किंवा मूठभर लोकांनी स्वीकारली नाही तर सर्व जनता त्यात सहभागी झालेली आहे.

न्या. रानडे हे पहिल्या देशभक्तांपैकी पहिले थोर विचारवंत होत. त्यांनी ''ब्रिटीश राजवटीशी जो संबंध आला तो दैवी संकेत होता'' असे उद्गार काढले आहेत. मी विद्यार्थी असताना हे वाक्य वाचलं तेव्हा मला ते बोचलं, खटकलं आणि मला वाटलं की, आम्ही परतंत्र झालो यात कुठला आहे दैवी संकेत ? पण पुढे न्या. रानडेंचे साहित्य वाचलं तेव्हा समजलं की, आपल्या मनाला पारतंत्र्य आल्यामुळे जेवढ्या वेदना झाल्या तितक्याच वेदना न्या. रानडेंच्या मनालाही झाल्या होत्या. परंतु भारत हा मध्ययुगीन काळात वावरत असताना आधुनिक ज्ञान आणि विज्ञान याच्याशी जो संपर्क आला तो ब्रिटीश राजवटीमुळं आला. हे अमान्य करण्याचं कारण नव्हतं आणि याला उद्देशून न्या. रानडे यांनी दैवी संकेत म्हटलं होते. न्यायाच्या बाबतीत, न्यायासनासमोर सर्वजण समान आहेत. जातपात, धर्म, गरीबश्रीमंत, उच्च पदस्थ, खालच्या पातळीचा असा विचार न करता, न्यायासनासमोर सर्वजण समान आहेत ही कल्पना ब्रिटीश राजवट आल्यामुळेच आली. आपल्याकडे पूर्वी ती नव्हती. आपल्या जाती व्यवस्थेमध्ये ब्राह्मणाच्या हातून गुन्हा झाला तर त्याला होणारी शिक्षा आणि तोच तर अतिशूद्राच्या हातून झाला तर त्याला होणारी शिक्षा यात फरक असे. ब्रिटीश इथे आल्यामुळे आपला पाश्चात्य जगतातील विचारांशी संबंध आला. पहिल्या देशभक्तांच्या पिढीवर 'मिल आणि स्पेन्सर' या थोर विचारवंतांचा किती परिणाम झालेला होता हे आपण जाणतो. मिलची 'लिबर्टी' आणि 'सबजक्शन ऑफ विमेन' ही पुस्तकं आणि सोशॉलॉजीवरचे स्पेन्सरचे विचार या संबंधी लोकमान्य टिळक (दुसऱ्या पिढीतले देशभक्त) यांनी लिहिलेलं आपण वाचलंत

तर या विचारामुळं त्या पिढीवर कसा सुसंस्कार घडलेला होता हे समजून येते. न्या. रानडे, दादाभाई नौरोजी यांचा इथे उल्लेख करावयास हवा. दादाभाई नौरोजी इंग्लंडमध्ये जाऊन पार्लमेंटमध्ये निवडून आले होते. त्यांनी लोकशाहीवर केवळ तात्विक विचार केलेला नव्हता. लोकशाहीची जी जन्मभूमी आपण मानतो त्या देशात ते निवडून आले होते. हा आपला वारसा आपणाला विसरून चालणार नाही. महात्मा फुलेंच्या साहित्यातून आपणाला असं दिसून येते की, राजकीय दृष्ट्या समानता प्रस्थापित झाली पाहिजे. पण त्याला सामाजिक समता असेल तरच अर्थ प्राप्त होईल. जोतिराव फुलेंच्यावरती 'पेन' या विचारवंताचा परिणाम झाला होता. सामाजिक समतेशिवाय राजकीय लोकशाहीला खरा आशय प्राप्त होणार नाही हे त्यांनी बरोबर जाणलं होतं. राज्यशास्त्रीय परिभाषेत त्यांनी हे मांडलेले नाही. पण त्यांचं लेखन आज जरी वाचलं तरी त्यामध्ये हे स्पष्ट झालेलं आढळून येईल. अशी पहिल्या पिढीची वाटचाल होती.

या पिढीतील लोकहितवादी, हे सरदार घराण्यातले. १८२३ चा त्यांचा जन्म. पेशवाईचा उत्तरकाळ त्यांनी पाहिला. १८९२ ला त्यांचे निधन झालेलं आहे. त्यांची जी शतपत्रे प्रसिद्ध झालेली आहेत. ती वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी लिहिलेली आहेत. आणि त्यामध्ये 'हिंदुस्थानला पार्लमेंट हवे' असा विचार त्यांनी व्यक्त केलेला आहे. १८५७ पूर्वी देखील आपणाकडे हा विचार आलेला आहे म्हणून ही लोकशाहीची परंपरा आपणाला विसरून चालणार नाही. ती समृद्ध केली पाहिजे.

पहिल्या पिढीतले न्या. रानडे यांनी सरकारी नोकरी करत प्रबोधन करून आपले आयुष्य व्यतीत केले पण हे करतांना आपण लोकशाहीची पायाभरणी करत आहोत याची पुरेपूर जाणीव त्यांना होती. एका बाजूला वैचारिक पायाभरणी आणि दुसऱ्या बाजूला संस्थात्मक जीवन उभं करणं हे पहिल्या पिढीनं केलं. १८८५ मध्ये 'इंडियन नॅशनल काँग्रेसची' स्थापना झाली. हा लोकशाहीच्या वाटचालीतला महत्वाचा टप्पा आहे. एक व्यासपीठ आपण निर्माण केलं आहे. ज्या व्यासपीठावर सर्व स्तरातले लोक, सर्वधर्मीय लोक आले पाहिजेत असे ८५ मध्ये लिहिले आहे. काँग्रेसचे पहिले अध्यक्ष ख्रिश्चन होते. बद्रुद्दीन तैयबजी दोन वर्षांनी झाले. ही लोकशाहीची सर्वधर्म-समभावाची कल्पना या ठिकाणी निर्माण झालेली आहे. त्यावेळी व्यासपीठावर व्यापारी व शेतकरी दोन्हीही आले पाहिजेत असं वक्तव्य लोकांनी केलेलं आहे. एका बाजूला संस्था निर्माण होत होत्या आणि दुसऱ्या बाजूला नव्या व्यासपीठावरची कार्यपद्धती लोकशाहीची असली पाहिजे असं स्वीकारलं होतं. म्हणून काँग्रेसची कार्यपद्धती पाहिली तर त्यात अध्यक्ष ज्या पद्धतीने निवडून येतात, वर्कींग कमिटीमध्ये ज्या रीतीनं निर्णय व्हायचे, त्यामध्ये लोकशाही प्रक्रियेला स्थान दिलेलं आहे, असं आढळून येईल.

याच्या पुढची पिढी टिळक आगरकरांची. या पिढीतील ध्येयवादी तरुणांना सरकारी नोकरी करून न्या. रानडे सारखं प्रबोधन करणं हे मान्य नव्हतं. सर्व वेळ देशभक्ती केली पाहिजे या विचारांचे ते होते. आधी सामाजिक, आधी राजकीय असे जरी काही मतभेद टिळक व आगरकर यांच्यात होते, तरी त्यांनी प्रथम शिक्षण क्षेत्रात बरोबर काम केले. नंतर 'केसरी' आणि 'मराठा' ही वर्तमानपत्रे काढली. म्हणजे लोकशाहीची नवी वाटचाल पुन्हा सुरू झाली. लोकशाहीच्या साधनात 'वृत्तपत्र' हे अतिशय महत्वाचे साधन आहे. 'दर्पण' हे महाराष्ट्रातलं पहिलं वर्तमानपत्र असलं तरी पहिलं राजकीय वर्तमानपत्र म्हणून आपणाला केसरीचाच उल्लेख करावा लागेल, म्हणून हा एक महत्वाचा टप्पा आहे.

लोकशाही मार्गानं हा स्वातंत्र्याचा लढा चालला पाहिजे असं त्या काळात सर्वांनी म्हटलेलं आहे. लोकशाही मार्ग म्हटल्यावर त्यात एक मत नसते. त्यात विचारांच्या वेगवेगळ्या छटा येतात. त्यावेळी राजकीय वैचारिक तीन प्रवाह होते. उदारमतवादी तत्वज्ञानाने भारलेले, सनदशीर पद्धतीने चळवळ चालावी असे वाटणारे प्रागतिक नेमस्त हे एका बाजूला होते. यात ना. गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे नेते होते. दुसऱ्या टोकाला सनदशीर मार्गाने आपणाला स्वराज्य मिळणार नाही, आपणाला सशस्त्र क्रांती केली पाहिजे, असे वाटणारा दुसरा प्रवाह. १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धात तो प्रथम प्रगट झाला. नंतर वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू, अरविंद घोष, स्वा. सावरकर, भगतसिंग हे सर्व याच सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने गेले. तिसरा महत्वाचा प्रवाह म्हणजे जन आंदोलनाच्या मार्गानं जाणारा लोकमान्य टिळकांनी हा प्रवाह सुरू केला. लाल-बाल-पाल यांनी असेच जनआंदोलन वंगभंगाच्या वेळी केले. गांधीजींनी त्याच प्रवाहाचे प्रचंड प्रवाहात रूपांतर करून जनसामान्यांना स्वातंत्र्य चळवळीत आणलं. लोकशाहीच्या संदर्भात टिळक आणि गोखले यांचा वाद झालेला आहे, हा वाद वाचला म्हणजे स्वातंत्र्यपूर्वकाळातल्या लोकशाहीच्या वाटचालीमध्ये टिळक, महात्मा गांधी यांचा प्रवाह आणि गोखले आणि अन्य नेमस्तांचा प्रवाह यांच्यामधला फरक आपल्या लक्षात येईल. ना. गोखले ज्यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष झाले व त्यांनी देशभर दौरा काढला. त्या दौऱ्याच्या वेळी त्यांनी आपल्या भाषणात सतत असं सांगितलं की, आपल्या देशातल्या स्वातंत्र्याची चळवळ ही सनदशीर मार्गानेच झाली पाहिजे. याला उत्तर देणारा अग्रलेख टिळकांनी केसरीमध्ये लिहिलेला आहे. त्या अग्रलेखाचे शीर्षक 'सनदशीर की कायदेशीर' असं आहे. त्यात सुरुवातीला टिळक लिहितात, "ज्या राष्ट्राला हक्काची सनद असते, तेथेच चळवळ सनदशीर होऊ शकते. इंग्लंडमधील जनतेनं तिथल्या राजाशी संघर्ष करून राज्यहक्क मिळविले आहेत. मॅग्नाचार्टा,

विल ऑफ राईटस्, १८३२ चा निवडणूक सुधारणा कायदा आदींच्या द्वारे ब्रिटीश जनतेने आपली हक्कांची सनद मिळविली. त्यामुळे त्यांची चळवळ सनदशीर झाली पाहिजे हे योग्य आहे. परंतु भारतीय जनतेला अशी हक्काची सनदच नाही. राणीचा जाहीरनामा हा इथल्या नोकरशाहीने राज्यकारभार कसा करावा, याबाबत त्यांना दिलेल्या अधिकाराची ही सनद आहे. त्यामुळे आमची चळवळ सनदशीर होऊच शकणार नाही. मग आमची चळवळ ही कायदेशीर होते की नाही ते पाहता येईल. पण या देशातले कायदे परकीय सरकार करत असल्यामुळे कायदा न्याय्य असेल असं सांगता येणार नाही. त्यामुळे आमची चळवळ काही वेळेला या कायद्याच्या चौकटीत राहू शकणार नाही. या ठिकाणी टिळकांनी सुंदर वाक्य लिहिलेलं आहे की, "कायदा आणि नीती यांची ज्या ठिकाणी फारकत होते, तेथे कायदा मोडून नीतीचं पालन केलं पाहिजे" नीतीचं त्यांनी केलेलं स्पष्टीकरण अपूर्व आहे.- "लोकांच्या आकांक्षेतून जो कायदा निर्माण होतो, त्याला नैतिक अधिष्ठान आहे." आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशात जे कायदे होतात, ते लोकप्रतिनिधींनी केलेले आहेत. त्यामुळे त्यांना नैतिक अधिष्ठान आहे हे मान्यच केलं पाहिजे. पण स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय सरकार येथे त्यांचे राज्य चालावे, ते दीर्घकाळ टिकावे यासाठी कायदे करीत होते. लो. टिळक म्हणाले "स्वातंत्र्याची आकांक्षा ही खरी नैतिक आकांक्षा आहे. ही आकांक्षा व कायदा यांच्यामध्ये जर संघर्ष आला तर आम्ही कायदा मोडून नीतीचं पालन करू व त्यासाठी होणारं शासन निर्भयपणानं स्वीकारू" हा टिळकांचा विचार श्रेष्ठ आहे. १९२२ साली ज्यावेळी गांधीजींच्यावर खटला भरण्यात आला त्यावेळी त्यांनी हाच विचार मांडलेला आहे. गांधीजींनी आपली भूमिका पुढील शब्दात मांडली - "मी लोकांना राजद्रोह शिकवतो, कारण तोच माझा धर्म आहे. ब्रिटीशांना येथे राज्य करण्याचा अधिकारच नाही. आणि ब्रिटीश सरकारचे कायदे नीतीवर आधारलेले नसल्यामुळे हे कायदे मोडावे ही शिकवण मी देणार आणि त्यासाठी न्यायमूर्तींनी मला जास्तीत जास्त शिक्षा करावी, अशी मी त्यांना विनंती करतो." गांधीजींच्या सत्याग्रहाची हीच भूमिका आहे. स्वातंत्र्य लढ्याने सत्याग्रहाद्वारा लोकशाहीत जी भर टाकलेली आहे ती अमोल आहे. ब्रिटनची उदारमतवादी लोकशाही महत्वाची आहे. त्यात शंकाच नाही. अनेक संघर्षातून, अग्निदिव्य करीत त्यांनी वाटचाल केलेली आहे. पण आपल्या लोकशाहीने त्यामध्ये आणखी भर टाकलेली आहे. ती भर म्हणजे कायद्याला नीतीचं अधिष्ठान हवे, कायदा हा जनहिताचा हवा, मूठभरांच्या संरक्षणासाठी कायदा असून चालणार नाही. जनसामान्यांसाठी कायदा हवा. म्हणून लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर आपल्या राष्ट्रातही अन्यायाविरुद्ध सत्याग्रह करण्याचा आपणाला अधिकार आहे, तो अधिकार आम्ही शांततेच्या मार्गाने बजावणार आणि त्यासाठी शिक्षा झाली तर निर्भयतेनं स्वीकारणार, असे भारतीय लोकशाहीचे स्वरूप आहे.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात आपण ब्रिटीशांविरुद्ध होतो पण आपण लोकशाहीच्या बाजूचे आहोत हे जगाला सांगून आपली पुरोगामी भूमिका प्रस्थापित करणे आवश्यक होते. १९४२ ची चळवळ सुरू करताना याबाबतीत कसोटीचा क्षण आला. १९३९ ला दुसरं महायुद्ध सुरू झाले. दुसऱ्या महायुद्धात एका बाजूला हिटलर आणि मुसोलिनी हे हुकुमशाह होते. दुसऱ्या बाजूला इंग्लंड व फ्रान्स होते. आणि नंतर अमेरिका त्यांच्या बाजूला आली. एका बाजूला लोकशाही राष्ट्रे तर दुसऱ्या बाजूला हुकूमशाही राष्ट्रे होती. युद्ध सुरू होताच ब्रिटननं असं जाहीर केलं की, हिंदुस्थानही या युद्धात आमच्यामध्ये सामिल झालेला आहे. त्यावेळी सात प्रांतात काँग्रेसची मंत्रीमंडळे होती. नंतर काँग्रेसने जाहीर केले की आमची संमती घेतल्याशिवाय तुम्हाला असे जाहीर करता येणार नाही, आमचा लोकशाहीला पाठिंबा आहे. पण आमचा निर्णय आम्हीच घेणार. येथे काँग्रेसने मांडलेली भूमिका फार महत्त्वाची होती. ब्रिटनला जर ते खरे लोकशाहीवादी आहेत असं जगाला दाखवायचं असेल तर त्यांनी आपलं भारतावर असणारं साम्राज्य संपवलं पाहिजे, असे काँग्रेस नेत्यांनी सांगितले. येथील साम्राज्याची राजवट संपून भारताला जेव्हा स्वातंत्र्य मिळेल. त्याचवेळी ब्रिटनला आपण लोकशाहीवादी आहोत असा दावा करता येईल, हे गांधीजींनी स्पष्ट केले. ब्रिटन जरी त्यांच्या देशापुरते लोकशाहीवादी राष्ट्र असलं तरी भारतावर त्यांचं साम्राज्य असल्यामुळे ते १०० टक्के लोकशाहीवादी नाहीत हे गांधीजींनी पुन्हा सांगितलं. हेच पूर्वी लो. टिळकांनी लिहिले होते. ज्यावेळी मोर्ले हा भारत मंत्री झाला, त्यावेळी गोखले आणि अन्य नेमस्तांनी त्या घटनेचे स्वागत केले. कारण मोर्ले हा उदारमतवादी विचारसरणीचा होता, म्हणून भारतातील नेमस्त पुढारी गोखले आणि त्यांचे सहकारी त्यांच्या मनात आशा पल्लवीत झाली. त्यावेळी टिळकांनी 'तत्वज्ञ की मुत्सद्दी' असा अग्रलेख लिहिला. त्या अग्रलेखात टिळकांनी लिहिले, मोर्ले हे, 'ऑन कॉम्प्रोमाइज' या ग्रंथात तत्वचिंतक वाटतात हे मी मान्य करतो. पण ते ज्यावेळी ब्रिटनमध्ये काम करतात त्यावेळी ते तत्वचिंतक आहेत. भारताच्या संबंधात ते ब्रिटिश साम्राज्याचेच प्रतिनिधी आहेत. इथं ते मुत्सद्दी म्हणून वागणार आणि आम्हाला त्यांच्याशी संघर्ष करावाच लागणार, हे टिळकांनी १९०७ साली लिहिले होते. १९३९ ला दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी तीच भूमिका गांधीजींनी घेतलेली आहे असे आपल्याला आढळून येते. पं. नेहरू म्हणाले, "जगात लोकशाही यशस्वी व्हावी असं आम्हाला वाटतं आणि ती यशस्वी व्हायची असेल तर आम्हाला स्वातंत्र्य मिळालं पाहिजे." गांधीजींनी त्यावेळी सांगितले "जपान जर्मनीनं इथे हल्ला केला तर स्वतंत्र भारताची जनताच स्वत:चं रक्षण करू शकेल. गुलाम लोक कधीही स्वत:चं रक्षण करू शकणार नाहीत. ही खरी लोकशाहीवादी भूमिका होती. या संदर्भात

१९४२ च्या चलेजाव आंदोलनाची घोषणा करणाऱ्या ८ ऑगस्टच्या ठरावाकडे आपण काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. पं. नेहरूंनी लिहिलेला तो ठराव आपण वाचलात तर एका बाजूला त्यात स्पष्ट लिहिलेलं आहे की, जगामधल्या पुरोगामी शक्तींना पाठींबा देणं हे भारताचं ऐतिहासिक कर्तव्य आहे. या युद्धांत लोकशाहीचा विजय झाला पाहिजे असं आम्हाला वाटतं. हा विजय व्हायचा असेल तर स्वतंत्र भारत ते कार्य अधिक प्रभावीपणे करू शकेल. म्हणूनच ब्रिटीशांना आम्ही चलेजाव असं सांगत आहोत. आम्ही "Englands difficulties are India's Opportunities" अस या ठरावात म्हटलेलं नाही. इंग्लंड अडचणीत आहे म्हणून आम्ही साम्राज्यविरोधी भूमिका घेतलेली नाही. आमची भूमिका वेगळी आहे. आम्ही स्वतंत्र असलो तरच आमची लोकशाही खरीखुरी असेल आणि मग आम्ही लोकशाही राष्ट्रांच्या खांद्याला खांदा लावून लढू शकू, हे या ठरावात सांगितलेले सत्य फार महत्वाचे आहे. हे स्वातंत्र्य कालापर्यंत झालं.

१९४७ ला आपण स्वतंत्र झालो, त्यानंतर १९४८ च्या जानेवारीत मृत्युपूर्वी गांधीजींनी असा विचार मांडला की, काँग्रेस ही आजपर्यंत स्वातंत्र्यासाठी लढणारे राष्ट्रीय व्यासपीठ म्हणून वावरली, काँग्रेस हा राजकीय पक्ष नव्हता. या राष्ट्रीय व्यासपीठावर वेगवेगळ्या मतांचे लोक वेगवेगळ्या वेळी आले. म्हणजे एका बाजूला गांधीजी अहिंसेची भूमिका मांडीत होते. त्याचबरोबर अहिंसेवर श्रद्धा नसलेले आणि सशस्त्र मार्गाने जाता येइल असं वाटणारे सुभाषबाबू त्या व्यासपीठावर होते. तसेच समाजवादी, कम्युनिस्ट, रॉयीस्ट, आदि लोक होते. काँगेसमध्ये तेव्हा पं. मदन मोहन मालवीयही होते. त्यांची भूमिका हिंदुत्ववादी होती. हे सर्व लोक त्या व्यासपीठावर एकत्र आले हे लक्षात घेतलं पाहिजे. म्हणून गांधीजी म्हणतात, स्वातंत्र्यानंतर काँग्रेस व्यासपीठ सत्ता मिळविण्याकरता, सत्ता काबीज करण्याकरता, साधन म्हणून वापरणे हे मला मान्य नाही. मला असे वाटते की काँग्रेसने लोकसेवक संघ म्हणून रहावे. नंतर लोक आपआपल्या विचाराप्रमाणे आपले पक्ष काढतील. अनेक पक्ष झाले तरी हरकत नाही. अशी त्यांची विचारांची दिशा होती. पं. नेहरू आणि सरदार पटेल यांनी गांधीजींचे हे म्हणणं त्यावेळी ऐकलं नाही. वास्तववादी दृष्टीकोन जर ठेवला तर पंडितजी व सरदारांची भूमिका हीच योग्य होती असं मला वाटतं. याचं कारण असं की दुसरं महायुद्ध संपलेलं होतं आणि सर्व जगात परिस्थिती अस्थिर होती. फाळणीमुळे अनेक क्षेत्रातले जीवन उध्वस्त झालेलं होतं. अशा वेळी परिवर्तनासाठी स्थैर्य आवश्यक होतं. परिवर्तन तर करायचंच होतं. परतंत्र भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इथलं समाजजीवन आमुलाग्र बदललं पाहिजे सर्वांनाच वाटत होतं. आर्थिक, सामाजिक, राजकीय बाबतीत परिवर्तन झालं पाहिजे, असंही वाटत होतं. पण परिवर्तनासाठी कुठलं तरी एक प्रभावी साधन असावे लागते आणि किमान स्थैर्यही असावे लागते. म्हणून

काँग्रेस हे प्रभावी साधन आहे आणि संक्रमण काळात जरूर असणारं स्थैर्य हे काँग्रेस देऊ शकेल असं वाटत असल्यामुळे नेहरू व पटेल यांनी गांधीजींचं ऐकलं नाही. गांधीजींची कल्पना ही काही बाबतीत पुरोगामी, उदात्त होती, हे मान्य केलं तरीदेखील वास्तववादी दृष्टीकोन ठेवला तर त्या कालखंडात पंडितजींचाच निर्णय योग्य होता असं दिसून येईल. पण याचे पुढे परिणाम जे घडले हेही लक्षात घेतले पाहिजेत. जनतेच्या मनांत हे होतं की, काँग्रेसच्या निशाणाखाली आपण स्वातंत्र्यासाठी लढलो. त्यावेळी स्वातंत्र्यलढ्यात आम्ही सर्वजण काँग्रेसमध्ये होतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडले त्या पक्षांना स्वातंत्र्यलढ्याच्या पुण्याईचा फायदा मिळाला नाही. एकावेळी कम्युनिस्ट काँग्रेसमध्ये होते पण नंतर ते बाहेर गेले. १९४८ साली समाजवादी पक्षही बाहेर गेला. कारण काँग्रेसनं घटनाच अशी केली की काँग्रेस अंतर्गत असा विशिष्ट विचारसरणीचा गट असून चालणार नाही. यामुळे दीर्घकाळपर्यंत या पक्षात जे लोक राहिले, त्यांना या स्वातंत्र्यलढ्याची पुण्याई होती; त्याचं जे श्रेय होतं, त्याचा फायदा मिळाला. पं. नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद इत्यादीसारखी असामान्य व्यक्तीमत्वं काँग्रेसमध्ये होती आणि लोकांना असं वाटत होतं की, यांचे सर्व निर्णय बरोबर असतील, काही चुकतील पण हे स्वार्थासाठी काही करणार नाहीत. हा विश्वास त्यांच्या आयुष्यभरच्या तपश्चर्येमुळे मिळवला असल्या कारणाने काँग्रेसला देशभर १९५७ पर्यंत प्रचंड पाठिंबा मिळाला. परंतु लोकशाहीसाठी एकच प्रबळ पक्ष असणे योग्य नाही. प्रबळ विरोधी पक्षही असायला पाहिजे, ही प्रक्रिया आपल्या देशात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९६७ पर्यंत सुरू होऊ शकली नाही. स्थैर्य हे काँग्रेस पक्षाचं सामर्थ्य होते. त्यामुळे लोकशाहीची ती एक जमेची बाजू होती. परंतु त्याचवेळी स्थैर्य हे पुरेसे नाही हे लक्षात न आल्यामुळे प्रबल विरोधी पक्ष उभा राहू शकला नाही. जनता म्हणाली, "तुमचे काही मतभेद असतील पण काही वर्ष आम्ही काँग्रेस पक्षालाच पाठिंबा देऊ" आणि हेच १९५२, १९५७ आणि १९६२ च्या निवडणुकीत प्रकर्षाने प्रगट झालं. काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळालं. त्यावेळी मला आठवतं की, स्वातंत्र्यपूर्व काळात जसा पंडित नेहरू दौरा काढत. तसा स्वतंत्र भारततही त्यांनी काढला. पंडित नेहरूंच्या बद्दल लोकांना प्रेम वाटे. त्यामुळे लोकांना वाटे, पं. नेहरू सांगतील त्याच मार्गानं आपण गेलं पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळात १९३६ ची फैजपूर काँग्रेस झाली आणि १९३७ च्या इलेक्शनमध्ये पंडित नेहरूंनी झंझावाती असा दौरा काढला होता. त्यावेळी त्यांची भाषणे मी ऐकलेली आहेत. पुण्याच्या सभेतलं भाषण मी ऐकलेलं आहे. त्यात त्यांनी सांगितले, "मी काँग्रेसला मत द्या म्हणून मी तुम्हाला सांगत आहे याचं कारण काँग्रेसला मत म्हणजे स्वातंत्र्य लढ्याला मत असं तुम्ही लक्षात ठेवलं पाहिजे." स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसला मत म्हणजे स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सेनानींना, त्यांच्या विचारसरणीला मत असे लोकांना वाटत असल्याचे दिसून आले. हे झाल्यामुळे

जे विचारमंथन झाले त्यात दोन वैचारिक प्रभाव निर्माण झाले. त्याचे स्वरूप नीट समजून घेतले पाहिजे. १९५३ मध्ये समाजवादी पक्षात अशोक मेहता यांनी एक सिद्धांत मांडला की, जे अविकसित देश आहेत त्या देशात एक अधिकारारूढ पक्ष आणि त्याला सर्व बाबतीत विरोध करणारा विरोधी पक्ष हा आकृतीबंध योग्य नव्हे. यात दोन्ही पक्षांनी ज्या विषयावर आपली एकमत होतील अशी क्षेत्रं शोधून त्यांच्यासाठी एकत्र काम केलं पाहिजे. उदा. हिंदुस्थानची लोकसंख्या ही भरमसाठ वाढलेली आहे, या लोकसंख्येचं जर आपणाला नियंत्रण करायचं असेल तर हा केवळ अधिकारारूढ पक्षाचा कार्यक्रम असून चालणार नाही, सर्व देश त्याच्यामध्ये सहभागी झाला पाहिजे. अशोक मेहता यांनी ही भूमिका मांडताना अधिकारारूढ पक्ष व विरोधी पक्ष यांनी काही बाबतीत एकमेकांशी सहकार्य करणे हे मागास अर्थव्यवस्थेत आवश्यक आहे आणि अपरिहार्यही आहे असे सांगितले. आणि एकमत होणारी कुटुंब नियोजन, कृषी उत्पादन, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण अशासारखी क्षेत्रे निश्चित करावीत असेही आवाहन केले. अशोक मेहता यांच्या भूमिकेस समाजवादी पक्षातही प्रखर विरोध झाला. त्यांचे टीकाकार आणि विरोधक असे म्हणाले की, एकदा आपण काँग्रेस बरोबर सहकार्याची भूमिका घेतली की लोकांत आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची जरूरच वाटेनाशी होईल आणि कालांतराने या भूमिकेवरून काम करणाऱ्यांना काँग्रेसमध्येच विलीन व्हावे लागेल. डॉ. राममनोहर लोहिया यांनी असा विचार मांडला की विरोधाची धार प्रखर करणे हेच विरोधी पक्षाचे कार्य आहे आणि ते समाजवादी पक्षाने सतत केले पाहिजे. ही भूमिका मांडताना डॉ. लोहिया म्हणाले, ''समाजवादी पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व टिकावयाचे असेल तर आर्थिक प्रश्नाबाबत काँग्रेस व कम्युनिस्ट पक्षापेक्षा आपली भूमिका मूलतः वेगळी असली पाहिजे.'' डॉ. लोहिया यांनी अशी स्वतंत्र भूमिका पंचमढी येथील समाजवादी पक्षाच्या अधिवेशनात पुढील शब्दात मांडली. ''भांडवलशाही व कम्युनिझम हे दोन ध्रुव वाटत असले तरी दोनही समाजरचनांमध्ये अर्थसत्तेचे केन्द्रीकरण केले असून प्रचंड यंत्रांच्या सहाय्याने औद्योगिकरण केलेले आहे. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशाला हे उत्पादन तंत्र परवडणार नाही. आपण आपल्या परिस्थितीत अनुरूप असे तंत्रविज्ञान (अप्रोप्रिएट टेक्नॉलॉजी) वापरले पाहिजे. आपल्याला भारतात छोटी यंत्रे वापरून अधिक हातांना काम दिले पाहिजे. प्रचंड मोठे कारखाने, प्रचंड धरणे हा पं. नेहरूंचा हव्यास मला चुकीचा वाटतो. म. गांधींचा विकेंद्रीकरणाचा विचार, त्याला परिस्थितीप्रमाणे योग्य ती मुरड घातल्यास, आपल्याला मार्गदर्शक ठरू शकेल. लोकांच्या श्रमातूनच आपल्याला नवा भारत निर्माण करावा लागेल.'' डॉ. लोहिया याच भाषणांत म्हणाले, ''स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतरही आपण आर्थिक समतेवर भर दिला. परंतु भारतात सामाजिक विषमतेचा प्रश्न आर्थिक विषमतेपेक्षाही अधिक बिकट आहे. सामाजिक समता व आर्थिक समता

या दोनही उद्दिष्टांसाठी आपल्याला दीर्घकाळ लढा द्यावा लागेल आणि ही उद्दिष्टे साध्य होतील तेव्हाच आपले लोकशाही समाजवादाचे स्वप्न साकार होईल."

भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत डॉ. लोहिया यांनी मांडलेले हे विचार फार मौलिक होते. या विचारांच्या आधारे वाटचाल करणारा विरोधी पक्ष संघटित करणे हे डॉ. लोहिया यांचे ध्येय होते, परंतु त्यांच्या अकाली निधनाने हे कार्य अपुरेच राहिले.

भारतीय लोकशाहीने १९४७ ते १९६७ अशी वाटचाल करताना कोणत्या वैचारिक भूमिका मांडल्या गेल्या याचा मी येथवर आढावा घेतला. १९६७ नंतर भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत जे चढउतार झाले त्याचे विवेचन करून आपली भविष्यकालीन वाटचाल कोणत्या दिशेने व्हावी या संबंधीचे विचार मी उद्याच्या भाषणात मांडेन. आपण शांतपणे माझे भाषण ऐकले याबद्दल मी आपला आभारी आहे.

१३ मार्च १९९६

गं. प्र. प्रधान

ग. प्र. प्रधान

# “ भारतीय लोकशाहीची वाटचाल ”

१९४७ ते १९६७ या कालखंडात भारतीय लोकशाहीची वाटचाल ही जवळपास एकपक्षीय लोकशाहीचीच वाटचाल होती. काँग्रेस पक्षाची देशव्यापी संघटना आणि पं. नेहरूंचे तेजोवलयांकित व्यक्तिमत्व यामुळे १९५२, १९५७ आणि १९६२ या तीन साली झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला सर्व राज्यांमध्ये आणि केंद्रातही भरघोस यश मिळाले. काँग्रेस पक्षाची ही पकड ढिली व्हावी यासाठी डॉ. राममनोहर लोहिया यांनी १९६७ च्या निवडणुकीत सर्व विरोधी पक्षांची एकजूट घडवून आणली आणि त्यामुळे काही राज्यांमध्ये काही काळ संयुक्त विधायक दलाची सरकारे स्थापन झाली. परंतु आपापसातील मतभेदामुळे ती फार काळ टिकू शकली नाहीत. केन्द्रामध्ये सत्ता काँग्रेस पक्षाकडेच होती. १९६९ मध्ये काँग्रेसमध्ये फूट पडली. परंतु इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील गटाच्या हातात पूर्वीच्या काँग्रेस पक्षाची सूत्रे राहिली. १९७१ च्या निवडणुकांमध्ये इंदिरा गांधींनी ‘गरीबी हटाओ’ ही घोषणा देऊन पुन्हा प्रचंड विजय मिळविला. परंतु देशापुढील बेकारी, महागाई आणि वाढती आर्थिक विषमता हे प्रश्न अंशतःही सोडविण्यात त्यांना अपयश आले. किंबहुना अधिकाधिक बिकट होत गेले आणि देशात भ्रष्टाचाराही वाढू लागला. जनतेत यामुळे वाढलेल्या असंतोषाला संघटित करून जयप्रकाश नारायण यांनी देशव्यापी चळवळ सुरू केली. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी

परचक्राची व अंतर्गत बंडाची शक्यता नसतानाही, आणीबाणी जाहीर करून जवळ जवळ सर्व विरोधी पक्ष नेत्यांना आणि विरोधी पक्षाच्या हजारो कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले. १९७७ च्या जानेवारीत आणीबाणी उठविण्यात आली आणि इंदिरा गांधींच्या लोकशाही विरोधी कृतीबद्दल लोकांच्या मनातील तीव्र असंतोष मतपेटीद्वारे व्यक्त होऊन इंदिरा गांधी यांच्या काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तीस वर्षांनी विरोधीपक्षांच्या हातात राजसत्ता आली. जयप्रकाश नारायण यांनी चार विरोधी पक्षांना जनता पक्षात विलीन व्हावयास लावले. त्यामुळेच हे घडू शकले. १९६७ साली डॉ. लोहिया यांनी जे पाऊल टाकले त्याच्या पुढचे हे पाऊल होते. परंतु विलीनीकरणानंतरही हे चार राजकीय पक्ष आपापल्या जुन्या संघटनांचे हितसंबंध जपत राहिले. त्यांच्यामध्ये वैचारिक एकवाक्यता नव्हतीच. त्यामुळे त्यांच्यातील मतभेद विकोपास जाऊन दोन वर्षातच जनता पक्ष फुटला. पुनश्च इंदिरा काँग्रेसच्या हाती सत्ता आली. यानंतर इंदिरा गांधी यांनी राजसत्ता व अर्थसत्ता यांचे केन्द्रीकरण करून विरोधी पक्षांचा पाया उखडण्याचे ठरविले. हे करतांना पंजाबमध्ये अकाली दलाला उखडण्यासाठी त्यांनी ज्या कारवाया केल्या त्यामुळे शीख समाजात तीव्र प्रतिक्रिया झाली. त्यांच्यामधील अतिरेकी प्रबळ झाले व त्यांनी खलिस्तानची मागणी केली. या फुटीर प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी शीख समाजातील जबाबदार आणि नेमस्त नेत्यांशी तडजोड करणे आवश्यक होते. परंतु हे न करता इंदिरा गांधी यांनी भिन्द्रनवाले यांना हाताशी धरले आणि तो भस्मासूर त्यांच्यावरच उलटला. भारतासारख्या खंडप्राय देशात प्रत्येक राज्यातील जनतेच्या रास्त आकांक्षांना वाव देणे आवश्यक आहे. परंतु हे न करता इंदिरा गांधी यांनी केन्द्र सत्तेपुढे सर्वांनी नमले पाहिजे अशी आतताई भूमिका घेतली आणि त्याची प्रतिक्रिया म्हणून पंजाबमध्ये अतिरेक्यांचा दहशतवाद उसळला. भिन्द्रनवाले हाच दहशतवाद्यांचे नेतृत्व करीत होता. या देशघातकी प्रवृत्तीचे निर्मूलन करणे आवश्यक होते, परंतु हे करताना पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 'ऑपरेशन ब्लु स्टार' मध्ये सुवर्णमंदिरात सैन्य घुसवून सर्व शीख समाजाच्या धार्मिक श्रद्धा जणू पायदळी तुडविल्या. यामुळे दहशतवाद तर थांबला नाहीच. उलट इंदिरा गांधींच्या अंगरक्षकाने या दुर्दैवी घटनेचा बदला म्हणून त्यांची दिल्लीमध्ये हत्या केली. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर दिल्लीत आणि देशातील अनेक भागात निरपराध शिखांच्या ज्या कत्तली झाल्या त्यामुळे शीख समाज राष्ट्रीय प्रवाहापासूनच जणू दूर जाऊ लागला. ज्या शीख समाजाने स्वातंत्र्य लढ्यात असीम त्याग केला, ज्या समाजातील भगतसिंगांच्या सारख्या क्रांतिकारी नेत्याने हजारो तरुणांच्या मनात देशभक्तीचा स्फुल्लिंग पेटवला तो समाज अशा रीतीने दुरावणे, त्या समाजातील अनेक उमद्या तरुणांनी दहशतवादी बनणे ही राष्ट्रीय एकात्मतेवरच आघात करणारी घटना होती. इंदिरा गांधींच्या निधनानंतर राजीव गांधी हे पंतप्रधान झाल्यावर त्यांनी शीख समाजातील

ज्येष्ठ आणि जबाबदार नेते लोंगोवाल यांच्याशी समझौता करून पूर्वीच्या चुकांचे अंशत: तरी निवारण केले. वस्तुत: ज्यावेळी भाषावार राज्य पुनर्रचना करण्यात आली त्यावेळीच पंजाबी सुभ्याची मागणी मान्य केली असती तर पुढे निर्माण झालेले तणाव टळू शकले असते. ते त्यावेळी न केल्यामुळे शीख समाजात असंतोषाचे बीजारोपण झाले आणि इंदिरा गांधींच्या एकतंत्री राजकीय कृतीमुळे या असंतोषाचा विषवृक्ष होऊन त्याला दहशतवादाची विषारी फळे आली. दहशतवादामुळे हजारो निरपराध माणसांचे बळी पडले आणि भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत एक प्रचंड संकट उभे राहिले. या संकटाचे निराकरण करताना भारताला फार मोठी किंमत द्यावी लागली. लोकशाहीत लोकांच्या रास्त आकांक्षांना योग्य वेळी वाव देण्याऐवजी त्या पायदळी तुडविल्या तर काही काळाने भीषण उद्रेक होऊन लोकशाहीच धोक्यात येते, हा धडा पंजाबमधील दुर्दैवी घटनांमधून भारतास मिळाला.

इंदिरा गांधी यांच्या निधनानंतर राजीव गांधी यांची पंतप्रधान म्हणून निवड करण्यात आली, हा काँग्रेस पक्षाचा निर्णय लोकशाही संकेतांना डावलणारा होता. कोणत्याही क्षेत्रात एखाद्या व्यक्तीस अत्युच्च पदावर नियुक्त करताना त्या व्यक्तीचा त्या क्षेत्रातील अनुभव आणि वैशिष्ट्यपूर्ण असामान्य कर्तृत्व लक्षात घेतले जाते. राजेशाहीत मात्र वंशपरंपरेने राजपुत्राकडे राज्यपद जाते. पं. जवाहरलाल नेहरूंनी स्वातंत्र्य लढ्यात केलेले नेतृत्व, राजकारणातील त्यांची पुरोगामी वैचारिक भूमिका व प्रदीर्घ अनुभव यामुळे ते स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले. लालबहादूर शास्त्री यांचा स्वातंत्र्य लढ्यातील त्याग, काँग्रेस संघटनेतील त्यांची कामगिरी आणि विविध राजकीय पदावरून त्यांनी केलेली कामगिरी यामुळे पं. नेहरूंनी आपल्यानंतर लालबहादूर शास्त्री हेच भारताचे पंतप्रधान व्हावे असे सूचित केले होते. आणि काँग्रेस पक्षातील परिपक्व नेत्यांनी तोच निर्णय घेतला. इंदिरा गांधी यांनाही पंतप्रधानपदी येण्यापूर्वी राजकारणाचा आणि मंत्रीपदाचा अनुभव होता. परंतु राजीव गांधी हे पायलट झाले, जाणीवपूर्वक राजकारणापासून दूर राहिले. त्यांनी आयुष्यात कोणतेही सार्वजनिक वा राजकीय कार्य केले नव्हते. भारतीय जनतेशी त्यांचे संबंधही नव्हते. अशा व्यक्तीस पंतप्रधान म्हणून नियुक्त करून काँग्रेस पक्षाने घराणेशाहीची अनुचित प्रथा लोकशाहीवर लादली. भारतीय लोकशाहीच्या परंपरेच्या दृष्टीने हे अयोग्य होते.

राजीव गांधी हे पंतप्रधान असताना 'बोफोर्स' प्रकरणी त्यांच्या राजवटीवर आक्षेप घेण्यात आला. निवडणुकीत भ्रष्टाचार हाच महत्वाचा मुद्दा देशापुढे होता आणि काँग्रेस पक्षाला बहुमत न मिळाल्यामुळे जनता दल हा पक्ष अन्य पक्षांच्या पाठिंब्यावर सत्तारूढ झाला, विश्वनाथ प्रताप सिंग हे पंतप्रधान झाले. या निवडणुकीत कोणत्याच पक्षाला

केन्द्रामध्ये बहुमत मिळाले नाही. भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील हे अनपेक्षित वळण होते. १९७७ साली जनता पक्षाला बहुमत मिळाले असूनही घटक पक्षातील मतभेदांमुळे त्या पक्षाचे सरकार टिकू शकले नाही. विश्वनाथ प्रताप सिंग यांना तर भाजपने आणि कम्युनिस्ट पक्षांनी बाहेरून पाठिंबा दिला होता, त्यामुळे हे सरकार स्थिर होऊ शकले नाही आणि अल्पावधीतच मित्र पक्षांनी पाठिंबा काढून घेतल्यानंतर सरकार कोसळले. यानंतर चंद्रशेखर यांनी त्यांना पाठिंबा देणारे जनता दलातील केवळ एकतृतियांश खासदार असताना काँग्रेस पक्षाच्या सहाय्याने मंत्रीमंडळ बनविले. ज्या काँग्रेस पक्षाच्या विरुद्ध निवडणूक लढवून चंद्रशेखर व त्यांचे सहकारी निवडून आले होते, त्याच काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्याने त्यांनी मंत्रीमंडळ बनविणे हे लोकशाही संकेतांच्या विरुद्ध होते. एका अर्थाने हे पक्षांतरच (डिफेक्शन) होते. हे सरकार त्यामुळेच अल्पकाळ टिकले आणि पुन्हा निवडणुका झाल्या. काँग्रेस पक्षाला लोकसभेत सर्वात अधिक जागा मिळाल्या तरी त्या पक्षाला बहुमत नव्हते. या अस्थिर परिस्थितीत सर्व राजकीय पक्षांनी एक नवा विचार करणे आवश्यक होते आणि तो म्हणजे केन्द्रातील सरकार हे राष्ट्रीय एकमताचे (नॅशनल कॉन्सेन्ससचेच सरकार असले पाहिजे. येथे असाच प्रश्न उपस्थित केला जाईल की भिन्न भिन्न विचारसरणीच्या पक्षांमध्ये एकमत कसे होऊ शकेल ? या प्रश्नाला जे उत्तर आहे ते प्रत्यक्षात आणण्यासाठी घटनेच्या स्वरूपातच बदल करावा लागेल. हा मुद्दा नीट स्पष्ट करणे आवश्यक आहे.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी देशात अस्थिरता राहणे परवडणारे नव्हते. त्यामुळेच काँग्रेस पक्षाचे विसर्जन करावे ही म. गांधींनी १९४८ च्या जानेवारी महिन्यात केलेली सूचना, पं. नेहरू, सरदार पटेल आदी नेत्यांनी मान्य केली नाही. माझ्या मते त्या नेत्यांचा हा निर्णय योग्य होता कारण फाळणीनंतर देशात स्थैर्य निर्माण होण्यासाठी एका प्रबळ पक्षाच्या हाती सत्ता राहणेच इष्ट होते. १९५० साली घटनासमितीने ज्यावेळी नवी राज्यघटना स्वीकारली त्या राज्यघटनेत भारत हे संघराज्य आहे याची पूर्ण जाणीव ठेवूनही केन्द्र शासन प्रबल असावे आणि सर्व बाबतीत अंतीम अधिकार पार्लमेंटकडे व पार्लमेंटमधील बहुमतवाल्या पक्षांकडेच असावे अशी तरतूद असणारी घटना तयार केली. या प्रश्नावर पं. नेहरू आणि अन्य राजकीय नेते व घटना समितीतील डॉ. आंबेडकर, गोपालस्वामी अय्यंगार, अल्लादी कृष्णास्वामी अय्यर आदींच्यासारखे घटना तज्ञ यांच्यामध्ये एकमत होते. या प्रश्नावर डॉ. आंबेडकर यांची भाषणे अत्यंत सुस्पष्ट असून त्यांनी भारताची घटना फेडरल (संघराज्यात्मक) स्वरूपाची ठेवणे इष्ट नाही असे प्रतिपादन केले आहे. बॅ. मिनू मसानी यांनी मात्र केन्द्र शासनाकडे सर्व खात्यांचे अंतीम अधिकार न ठेवता, शेती, अन्न व नागरी पुरवठा, सहकार आदी

काही खाती पूर्णपणे राज्यांच्या अखत्यारीत असावीत असे सांगून संरक्षण, परराष्ट्र संबंध, कायदा व सुव्यवस्था, आर्थिक धोरण, दळणवळण आदी विभाग मात्र केन्द्राकडे असावे असे प्रतिपादन केले होते. मसानी यांना त्यावेळी फारसा कोणी पाठिंबा दिला नाही, हे समजण्यासारखे आहे. परंतु स्वातंत्र्याच्या चाळीस वर्षांनंतर बदलत्या राजकीय परिस्थितीत बॅ. मिनू मसानी यांच्या विचारांची दखल घेणे आवश्यक आहे. १९५० साली प्रबल केन्द्रसत्ता ही देशाची गरज होती. परंतु स्वातंत्र्यानंतर अनेक महत्वपूर्ण घटना घडल्या. भाषावार राज्यपुनर्रचना केल्यानंतर जी नवी राज्ये अस्तित्वात आली, त्यांच्यामध्ये पूर्वीच्या बहुभाषिक राज्यांपेक्षा वेगळी अस्मिता जागृत झाली होती. भाषावार राज्ये झाल्यानंतर राज्यकारभार मातृभाषेतून चालू लागल्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या आकांक्षांचे प्रतिबिंब प्रभावीपणे राज्यांच्या कारभारात उमटू लागले. तळागाळातील, आजवर दडपल्या गेलेल्या जातीजमाती, आदिवासी, दलित या समाजातील लोकांमध्ये स्वत्वाची जाणीव अधिक तीव्र झाली आणि आजवर सोसलेले अन्याय यापुढे सहन करू नयेत असे त्यांना वाटू लागले. या नव्या सामाजिक जाणिवांमुळे, तसेच आर्थिक शोषणांविरुद्ध कामगार वर्गाने केलेल्या संघटित प्रयत्नांमुळे आणि जमिनीच्या फेरवाटपासंबंधी झालेल्या काही कायद्यांमुळे भारतीय समाजाच्या स्वरूपातच बदल होत गेला. याचे प्रतिबिंब राजकारणात पडणे अपरिहार्य होते. या नव्या जाणिवांमुळे नवे तणावही निर्माण झाले आणि काही ठिकाणी हे फारच तीव्र झाले. व्ही. एस. नायपॉल भारतीय पूर्वज असलेला, परंतु वेस्ट इंडिजमध्ये दोन पिढ्या गेलेल्या कुटुंबात जन्मलेल्या, विख्यात लेखकाने भारतातील बदलत्या परिस्थितीचे चित्रण करणारे एक पुस्तक अलीकडे लिहून प्रसिद्ध केले आहे. या पुस्तकाचे नांव आहे 'इंडिया, ए मिलिअन म्युटिनीज'. नायपॉल हा भारतभर तीन वेळा हिंडला. त्याने अनेकांच्या मुलाखती घेतल्या, येथील परिस्थितीचे निरीक्षण केले आणि असे लिहिले की, पारतंत्र्यात असताना भारताचे जीवन डबक्यासारखे होते. त्यात चलनवलनच नव्हते. स्वातंत्र्य मिळाल्यावर भारताचे जीवन हे डबके न राहता प्रवाही बनले. येथील समाजाच्या विविध स्तरांमध्ये नवे चलनवलन सुरू झाले, नव्या अस्मिता जागृत झाल्या. यामुळे आर्थिक हितसंबंध, राजकीय अधिकार, सामाजिक नाती यात बदल व्हावा असे अनेकांना वाटू लागले, आणि यातूनच बंडखोरीचे नवे धुमारे या समाजात फुटू लागले. पूर्वीच्या समाजातील उच्च वर्णीयांच्या, जमीनदारांच्या, श्रीमंतांच्या वर्चस्वाला सुरुंग लावण्याची धडपड सुरू झाली. यामुळे अस्थिरता आली, तणाव निर्माण झाले, काही ठिकाणी हिंसक उद्रेकही झाले. नायपॉल याने या नव्या बंडखोरीचे वास्तव चित्र त्याच्या पुस्तकात रेखाटले आहे. मी हे सारे इतके विस्ताराने सांगितले कारण या नव्या उद्रेकांचा परिणाम भारतीय लोकशाहीवर होणे अपरिहार्य होते, आणि तसा तो

झालाही आहे. पूर्वीचे राजकीय पक्ष झपाट्याने कालबाह्य होत आहेत. एक प्रबल अधिकारारूढ पक्ष आणि अधिकारारूढ पक्षाला तुल्यबळ असा जागृत विरोधी पक्षही इंग्लंडच्या अनुकरणातून आपण स्वीकारलेली लोकशाहीची कल्पना तर संपूर्णतया कालबाह्य झाली आहे. वेगवेगळ्या पक्षांचा प्रभाव आहे. पश्चिम बंगालमध्ये आणि केरळमध्ये डाव्या पक्षांच्या आघाडीचे राज्य असून डावा कम्युनिस्ट पक्ष तेथे सर्वात प्रबळ आहे. आंध्र, तामिळनाडू येथे प्रादेशिक पक्षांच्या हातात सत्ता आहे. उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील काही राज्यामध्ये भारतीय जनता पक्ष सत्ताधारी आहे. ईशान्येकडील राज्यांमध्ये फार मोठी अस्थिरता असून तेथे मिझो, नागा, कुकी, बोडो, गारो, खासी आदी विविध समाज गटांमध्ये (ज्यांना आपण चुकीने टोळ्या असे म्हणतो) फार मोठे तणाव असून काही ठिकाणी वारंवार हिंसक उद्रेक होत आहेत. अशा परिस्थितीत केन्द्रशासनाकडे सर्व राजसत्ता एकवटली तर परिस्थिती अधिक स्फोटक होत जाईल. याउलट या नव्या जाणिवा लक्षात घेऊन काही बाबतीत सत्तेच्या विकेन्द्रीकरणाकडे जर आपली वाटचाल सुरू झाली तरच भारताची एकात्मता टिकविणे सुलभ होईल, असे माझे स्पष्ट मत आहे. या संदर्भात शिखांनी आपल्या मागण्या ज्या आनंदपूर साहेब ठरावाद्वारे व्यक्त केल्या, त्यामधील अतिरेक टाळून योग्य त्या भागाचा विचार करणे आज आवश्यक आहे. कोणत्याच राजकीय पक्षाला यापुढे लोकसभेत बहुमत मिळण्याची शक्यता नाही. अशा स्थितीत संधीसाधूपणाने राजकीय आघाड्या करून सत्तेची रस्सीखेच चालू ठेवणे मला सर्वथैव अनिष्ट वाटते. त्याऐवजी केन्द्र शासनात स्थैर्य राहून देशाच्या प्रगतीसाठीच राष्ट्रीय सहमतीने कारभार चालावा अशी व्यवस्था करणे ही आजची ऐतिहासिक गरज आहे. यासाठी ज्या मूलभूत प्रश्नांवर राष्ट्रीय सहमती शक्य आहे आणि अत्यावश्यक आहे असे राष्ट्रहिताचे प्रश्न कोणते हे समजून घेतले पाहिजे. भारत हा शांततावादी देश असला आणि अणुशक्तीचा उपयोग आपण संहारासाठी करणार नाही असे भारताने अनेकदा जगाला सांगितले असले तरी आपण स्वसंरक्षणासाठी आवश्यक ती सिद्धता केलीच पाहिजे. पाकिस्तान व चीन या राष्ट्रांना भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत होणार नाही अशी लष्कराची, नौदलाची, वायुदलाची तयारी आपण केली पाहिजे आणि शस्त्रास्त्र निर्मिती बाबतही आपण स्वयंपूर्ण असले पाहिजे. या संरक्षणाच्या प्रश्नांवर भारतातील सर्व पक्षांचे एकमत आहे. त्याचप्रमाणे भारत कोणत्याही गटात सामील न होता आपले हित पाहील आणि जगात निर्माण होणाऱ्या विविध समस्यांवर न्याय्य भूमिका घेईल हे १९४७ पासून आपल्या परराष्ट्रनीतीचे मध्यवर्ती सूत्र आहे. केन्द्रात कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी या धोरणात बदल झालेला नाही, होणार नाही, म्हणजे परराष्ट्रनीतीबाबत भारतात सहमती आहेच.

तिसरा प्रश्न आर्थिक धोरणाचा आहे. या प्रश्नावर आज सहमती दिसत नसली तरी जगातील आर्थिक प्रवाहापासून कोणताच देश अलिप्त वा दूर राहू शकत नाही हे आता स्पष्ट झाले आहे. या ग्लोबलायझेशनमुळे पश्चिम बंगाल मधील सत्तारूढ आघाडीचे नेते आणि ज्येष्ठ डावे कम्युनिस्ट नेते ज्योती बसू यांनी देखील बंगालमध्ये परदेशी भांडवलास वाव दिलेला आहे. या परिस्थितीत भारताच्या अर्थरचनेत गरिबांच्या हित रक्षणासाठी काही पथ्ये पाळावी लागली तरी एकूण काही प्रमाणात लिबरलायझेशन हे अटळ आहे. अर्थरचनेतील हा बदल काँग्रेसने उघडपणे स्वीकारला. जनता दल आणि भारतीय जनता पक्ष यांनी वरवर आढेवेढे घेत स्वीकारला आणि कम्युनिस्ट पक्षाने ही 'पण' 'परंतु' म्हणत ते मान्य केले. काही सर्वोदयी नेते आणि अन्य काही संघटना यांचा तात्विक विरोध सोडला तर या प्रश्नावरही सहमती आहे. देशातील चलन व्यवस्था केंद्राकडे असावी, त्याचप्रमाणे दळणवळणाची व संपर्क माध्यमांची व्यवस्था - रेल्वे, टेली-कम्युनिकेशन्स, राष्ट्रीय महामार्ग इ. चे नियंत्रण केंद्राने करावे याबद्दलही राष्ट्रीय सहमती आहेच. भारतातील सर्व निसर्ग संपत्तीवर मालकी केंद्राचीच असेल आणि या संपत्तीचे वाटप करण्याचे अंतिम अधिकार केंद्र शासनाकडेच राहिले पाहिजेत, या बाबतीत दुमत होऊन चालणार नाही. जरी मुंबई जवळील समुद्रातून नैसर्गिक वायु मिळत असला तरी त्यावर मालकी केंद्राचीच असेल आणि केंद्र शासनच त्यातील किती वाटा महाराष्ट्राला द्यावयाचा हे ठरवील. वेगवेगळ्या नद्यांचे पाणी वेगवेगळ्या राज्यात कसे वाटून द्यावयाचे या बाबत तज्ज्ञ आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या सहाय्याने केंद्र शासनच निर्णय घेतील.

कायदा आणि सुव्यवस्था याबाबतची जबाबदारी मुख्यतः राज्यांकडे असली तरी, राज्यशासन घटनेच्या चौकटीत राहूनच कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करते की नाही हे पाहण्याची आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी केंद्र शासनाचीच असेल. उत्तरप्रदेशात भारतीय जनता पक्षाचे शासन असताना बाबरी मशीद पाडण्यात आली तेव्हा केंद्रशासनाने उत्तर प्रदेशातील सरकार बरखास्त केले. याच तऱ्हेने कायदा व सुव्यवस्था या बाबतीत अंतीम अधिकार केंद्राचे राहतील, मात्र घटनेच्या चौकटीत राहून जोपर्यंत राज्यशासन आपली जबाबदारी पार पाडेल तोपर्यंत केंद्र दैनंदिन कारभारात ढवळाढवळ करणार नाही. इतर सर्व विभागाबाबत, म्हणजे शिक्षण, सहकार, कृषी, समाजकल्याण, अन्न व नागरी पुरवठा आदी विभागाबाबत धोरणविषयक मार्गदर्शक तत्वे केंद्र शासन ठरवील आणि प्रत्यक्ष कार्यवाहीची जबाबदारी राज्य शासनाकडेच असेल. अशा तऱ्हेची राष्ट्रीय सहमती आपण करू शकलो तर केंद्र शासन हे राष्ट्रीय सरकार म्हणून काम करील आणि भारतीय लोकशाहीची भावी काळातील वाटचाल सुलभ रीतीने चालू राहील.

ही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया राज्यापर्यंतच नेऊन चालणार नाही. आपल्या लोकशाहीचा पाया आपल्याला व्यापक आणि विशाल करावा लागेल आणि पंचायत समित्यांकडे अधिकाधिक अधिकार द्यावे लागतील. भारतातील सध्याच्या व्यवस्थेचे वर्णन एका विचारवंतांनी 'इनव्हर्टेड पिरॅमिड' - म्हणजे एक बिंदूवर उभा केलेला डोलारा, असे केले आहे. राजसत्ता व अर्थसत्ता यांचे केंद्रीकरण झाल्यामुळे केंद्रशासनावरच सर्व देशाचा भार तोलण्याची जबाबदारी येऊन पडली आहे. या केंद्रीकरणामुळे सामान्य माणसाला देशाच्या कारभारात सहभाग उरलेला नाही. पार्लमेंटमध्ये अनेक निर्णय घेतात परंतु गरीबांच्या कल्याणासाठी मंजूर केलेल्या पैशांपैकी दहा टक्के रक्कमही ग्रामीण भागापर्यंत पोहोचत नाही. नोकरशाहीवरील अवाढव्य खर्च एकसारखा वाढत चालला आहे, फायलींची संख्या फुगत चालली आहे आणि विकास मात्र कुंठीत झाला आहे. सामान्य माणूस विकास प्रक्रियेपासून दुरावला आहे. किंबहुना तो विकासाला पारखा झाला आहे. या अवस्थेला इंग्रजीत 'एलिनेशन्' असे नांव आहे. हा शब्द कार्लमार्क्सने भांडवलशाहीतील श्रमिकांच्या अवस्थेचे वर्णन करताना वापरला होता. परंतु भांडवलशाहीला पर्याय म्हणून जी कम्युनिस्ट राजवट रशियात व अन्य काही देशात आली, तेथेही उत्पादन पद्धती केंद्रानुवर्ती असल्यामुळे अर्थसत्ता व राजसत्ता यांचे केंद्रीकरण होऊन त्यांच्या अनिष्ट युतीच्या हातात सर्व सत्ता आली व सामान्य जनता विकासाला पारखी झाली. ही अवस्था टाळण्याचा मार्ग गांधीजींनी सुचविला असून उत्पादनपद्धती आणि राज्यव्यवस्था यांचे विकेंद्रीकरण करून ग्रामस्वराज्य स्थापन करावे असे सांगितले. गांधीजींच्या बद्दल माझ्या मनात नितांत आदर असला तरी त्यांच्या ग्रामस्वराज्याच्या कल्पनेत अपूर्णता आहे असे माझे मत आहे. स्वयंपूर्ण गाव ही गांधीजींची कल्पना स्वीकारली तर मानवाने जी वैज्ञानिक प्रगती केली आहे तिच्याकडे पाठ फिरवावी लागेल. हे आज शक्यही नाही आणि इष्टही नाही. माणूस यंत्राचा गुलाम बनू नये हे गांधीजींचे तत्व मला मान्य आहे. या तत्वाच्या आधारानेच आधुनिक तंत्रविज्ञानाचा वापर कसा करता येईल या संबंधी काही विचारवंतांनी मांडलेल्या कल्पना मी आपणासमोर ठेवू इच्छितो. येथे हे प्रथम स्पष्ट केले पाहिजे की उत्पादन व्यवस्था आणि राज्यव्यवस्था यांचा फार निकटचा संबंध असतो. म्हणून भारतीय लोकशाहीच्या वाटचालीची भावी दिशा काय असावी, हे सांगताना मी भारतात लोक सहभागी होत असलेली विकेंद्रीत लोकशाही अस्तित्वात आणण्यासाठी आधुनिक तंत्रविज्ञानाचा वापर विकेंद्रीत पद्धतीने करून नवी उत्पादन व्यवस्था निर्माण करावी लागेल, हा विचार आपल्यापुढे ठेवीत आहे. अल्विन टॉफलर या लेखकाने त्याच्या 'थर्ड वेव्ह' या पुस्तकात या विषयाचे अत्यंत उद्‌बोधक विवेचन केलेले आहे. ज्यांना शक्य असेल त्यांनी 'थर्ड वेव्ह' हे पुस्तक वाचले पाहिजे असे मला वाटते. या पुस्तकातील काही कल्पना मी सूत्ररूपाने आपणापुढे

मांडीत आहे. टॉफलरच्या मते आधुनिक तंत्रविज्ञानाच्या मदतीने मानवी श्रमांचा वापर किमान करावयाचा ही पद्धती अयोग्य आहे, त्याचप्रमाणे उत्पादनाचे केंद्रीकरण करणारे प्रचंड मोठे औद्योगिक प्रकल्प उभारणेही अनिष्ट आहे. यापुढे उत्पादन व्यवस्थेत इलेक्ट्रॉनिक्सचा उपयोग विकेंद्रीत पद्धतीने करून औद्योगिक प्रकल्प शहरात एकत्र न ठेवता त्यांचे वेगवेगळे उत्पादक विभाग ग्रामीण भागात नेणे शक्य होईल. टॉफलर याने एका प्रकरणात लिहिले आहे की, उत्पादनाचा घटक 'इलेक्ट्रॉनिक्स' नी सुसज्ज असलेली झोपडी (इलेक्ट्रॉनिक् कॉटेज) हा असेल आणि उत्पादन तंत्र पूर्णतः विकेंद्रीत करता येईल. उत्पादनाचा दर्जा टिकविण्यासाठी संगणकांचा उपयोग करावा लागेल असेही टॉफलर यांनी त्यांच्या विवेचनात म्हटले आहे. गांधीजींची विकेंद्रीत अर्थव्यवस्थेची कल्पना आणि आधुनिक तंत्रविज्ञान यांचा संगम घडवून आणणे शक्य आहे, हा विचार विस्ताराने मांडलेल्या या पुस्तकातील प्रकरणाला टॉफलर यांनी 'गांधीजींसह उपग्रह' 'गांधी वुअिथ सॅटलाइट' असे शीर्षक दिलेले आहे. उर्जेच्या बाबतीतील विवेचन करताना टॉफलर यांनी मानवाने निसर्गाशी सुसंवाद साधण्याचे तंत्र निर्माण केले पाहिजे अशी भूमिका मांडून भारतासारख्या देशात सौर उर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात करावा लागेल असे ठामपणे सांगितले आहे. राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण यांची गुंफण लक्षात घेऊन भारतीय लोकशाहीचे विकेंद्रीकरण करावयाचे असल्यास अर्थव्यवस्थेचे आणि उत्पादन तंत्राचे विकेंद्रीकरण कसे करता येईल याचे मी आतापर्यंत विवेचन केले. आता आपल्या मुख्य सामाजिक समस्यांचा विचार लोकशाहीच्या संदर्भात कसा करावा लागेल यासंबंधी काही विचार मांडू इच्छितो.

एकविसाव्या शतकात जगापुढील समस्या कोणत्या असतील याचे सुंदर विवेचन पॉल केनेडी या विचारवंताने आपल्या 'ॲप्रोचिंग दि ट्वेन्टी फर्स्ट सेंच्युरी' (एकविसाव्या शतकाच्या समीप जाताना) या पुस्तकात केलेले आहे. या पुस्तकात भारत आणि चीन यांच्यावर एक विस्तृत प्रकरण आहे. या प्रकरणातील विवेचनात केनेडी यांनी भारत व चीन या खंडप्राय देशातील प्रचंड लोकसंख्येची समस्या किती बिकट आहे हे स्पष्टपणे मांडले आहे. २१ व्या शतकातील पहिल्या पंचवीस वर्षानंतर भारताची लोकसंख्या एक अब्ज इतकी होईल. त्यातही भारतातील आयुर्मर्यादा सध्या वाढली असल्यामुळे ६०वर्षावरील स्त्री पुरुषांची संख्या खूप मोठी होऊन हा अनुत्पादक लोकसंख्येचा भार सहन करणे भारताला कठीण जाईल ; असा केनेडी यांचा अंदाज आहे. भारतातील कृषी उत्पादन व औद्योगिक उत्पादन असे एकूण उत्पन्न २+२+२ या बेरजेच्या पद्धतीने वाढते आणि लोकसंख्या २ x २ x २ अशा गुणाकाराच्या पद्धतीने वाढते ; त्यामुळे

जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा वाढत जाऊन दारिद्र्य भीषण स्वरूप धारण करते हे आपण आजवर अनुभवले आहे. २१ व्या शतकात ही समस्या अधिक बिकट होणार आहे आणि त्यामुळे आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात प्रचंड वाढ केल्याशिवाय आपल्याला जगताच येणार नाही. याच प्रश्नाची आणखी एक बाजू ही की माझ्या पिढीतील लोकांच्या गरजा फार कमी होत्या. आज जग झपाट्याने जवळ येत असल्यामुळे, दूरदर्शनवर इतर देशातील लोक आणि आपल्याकडील श्रीमंत लोक कसे जगतात, काय खातात, पितात, कशा तऱ्हेचे कपडे घालतात आदी गोष्टी सतत पाहिल्यामुळे सर्वसामान्य माणसाची जगण्याबद्दलची आकांक्षा बदलली आहे; पूर्वी ज्या वस्तू चैनीच्या मानल्या जात त्या आता जीवनावश्यक वस्तू मानल्या जातात. म्हणजे एकीकडे उत्पादन अपुरे पडणार आणि त्याचवेळी आकांक्षा वाढलेल्या असणार, याचा परिणाम समाजातील तणाव व संघर्ष वाढण्यात होईल. परंतु काही विचारवंतांच्या मताने आपण परिस्थितीमुळे निराश न होता, या समस्येला सामोरे गेले पाहिजे आणि आधुनिक विज्ञानाच्या सहाय्याने काळाचे हे आव्हान स्वीकारले पाहिजे. येथे मी पुन्हा टॉफलरने त्याच्या पुस्तकात मांडलेल्या काही विचारांचा आणि आपल्याकडे काही कल्पक वैज्ञानिकांनी केलेल्या प्रयोगांचा उल्लेख करू इच्छितो. टॉफलरच्या मताने बायोगॅसचा वापर प्रत्येक लहान गावात पद्धतशीरपणे व प्रचंड प्रमाणात करावा लागेल. या बायोगॅसच्या सहाय्याने घराघरात स्वयंपाकासाठी आवश्यक तो गॅस देता येईल आणि काही प्रमाणात गावाला वीजही मिळू शकेल. जी जनावरे आपण भाकड समजून कसायाकडे पाठवितो त्यांचे मलमूत्र हे जैविक खत म्हणून वापरल्यास अशी जनावरे पाळणे उत्पादक ठरू शकेल. वनीकरणाने अनेक गरजा भागविणे शक्य होईल. त्याचप्रमाणे सौर ऊर्जेचा वापर भारतात ग्रामीण भागात फार मोठ्या प्रमाणावर करावा लागेल. सोलापूर जिल्ह्यात सांगोला तालुक्यात अंकली येथे श्री. अरुण देशपांडे यांनी उत्पादन तंत्रात केलेला प्रयोग, श्री. अ. दाभोळकर यांचे शेतीतील प्रयोग, औरंगाबाद जिल्ह्यातील आरगाव व पुणे जिल्ह्यात विलासराव साळुंखे यांचे प्रयोग, तसेच नगर जिल्ह्यात अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धी येथे उभे केलेले आदर्श गाव, यांच्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. अरुण देशपांडे यांच्या प्रयोगाप्रमाणे दहा बारा इंच पाऊस पडणाऱ्या भागात दहा गुंठे जमिनीत पाणी अडवून, पाणी जिरवून आणि सौर ऊर्जेचा योग्य वापर करून पाच माणसांच्या कुटुंबास चांगले मध्यमवर्गीय जीवन जगता येईल. अशा रीतीने आधुनिक तंत्र विज्ञानाचा उपयोग ग्रामीण भागात कल्पकतेने करणे आणि उत्पादन वाढविणे या मार्गाने आपल्याला एकविसाव्या शतकातील आपल्यापुढील समस्यांना सामोरे जाता येईल. या समस्यांवर मात केली तरच भारतीय लोकशाहीची वाटचाल चालू राहील.

आजच्या काळातील आणखी एका समस्येचे विवेचन 'ग्लोबल पॅरॅडॉक्स' (जागतिक विसंवाद) या ग्रंथात मोठ्या मार्मिकपणे केल्याचे मला आढळून आले. या ग्रंथकाराचे म्हणणे असे आहे की, एका बाजूला आधुनिक तंत्रविज्ञानामुळे जग झपाट्याने जवळ येत चालले आहे. राष्ट्रांच्या सीमांना आज फारसा अर्थ उरलेला नाही. त्यामुळे मानवी मनाला एकीकडे विशालतेचा स्पर्श होत आहे. यापुढे संकुचित वृत्ती ठेवून चालणार नाही याची जाणीव एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या मानवाला झाली आहे. परंतु तंत्रविज्ञानात प्रचंड प्रगती झाली तरी मानवाच्या मूलभूत प्रेरणांमध्ये, त्याच्यातील अंगभूत दोषांत बदल झालेला नाही. आजही माणसांमधील स्वार्थी, स्वयंकेंद्रीत वृत्ती कमी झालेली नाही आणि या वृत्तीतून निर्माण होणारे संघर्षही चालूच आहेत. म्हणजे जग एकीकडे काही बाबतीत एक होत आहे आणि त्याच जगात त्याचवेळी वंश, धर्म, पंथ, जात, भाषा आणि प्रदेश यांच्या दुराभिमानामुळे रक्तपात सुरूच आहेत. सोमालियात दोन टोळ्यांतील लोक एकमेकांचा संहार करीत आहेत, नागा आणि कुकी क्रूरपणे एकमेकांच्या कत्तली करीत आहेत, श्रीलंकेतील तमिळ आणि सिंहली लोकांतील युद्ध वर्षानुवर्षे चालू असून त्यात हजारो लोक मारले गेले आहेत, बॉस्निया आणि सर्बियातील भीषण हत्याकांडाला जगातील सुधारलेली राष्ट्रे आळा घालू शकली नाहीत. अफगाणीस्तानमध्ये यादवी युद्ध वर्षानुवर्षे चालूच आहे. या विसंवादातून मार्ग निघावयाचा असेल तर ममतेतून समतेकडे जाणे आणि सहिष्णु वृत्तीने वागून अहिंसक समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हा एकच मार्ग आहे. आपण गेल्या काही वर्षांमध्ये काश्मीर व पंजाबमध्ये किती मोठी प्राणहानी झाली हे पाहिले आहे, अनुभविले आहे. या दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती भारतातील अन्य भागात झाली तर भारतीय लोकशाही टिकू शकणार नाही. विविधतेत एकात्मता हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य टिकवून आपण परस्परांशी सहिष्णुतेने वागलो तरच भारतीय लोकशाहीची वाटचाल पुढे चालू राहील.

आता शेवटी सध्या भारतात लोकशाहीला ज्या संकटाने ग्रासले आहे. त्या संकटासंबंधी मी थोडेसे बोलू इच्छितो. हे संकट म्हणजे भ्रष्टाचार. आपण कितीही निर्दोष राज्यपद्धती स्वीकारली तरी समाज जर भ्रष्टाचाराने पोखरलेला असेल तर समाजाची प्रगतीच होऊ शकणार नाही. आपल्याला भारतात आज तोच अनुभव येत आहे. आपण लोकशाही पद्धती स्वीकारली आहे. अनेक चांगले कायदे केले आहेत. समाजकल्याणाच्या अनेक योजना आहेत. परंतु तरीही आपल्याकडे गरिबांना न्याय मिळत नाही. मूठभरांची श्रीमंती वाढत चालली आहे. याचे मुख्य कारण भ्रष्टाचार हे आहे. सत्ता आणि संपत्ती यांची अनिष्ट युती झाली आहे. सत्ता मिळविण्यासाठी अमाप खर्च केला जातो. सत्ता हाती आली की, अमाप संपत्ती गैरमार्गाने मिळविली जाते. याचे

एक प्रमुख कारण आपली आजची निवडणूक पद्धती हे आहे. निवडणुकीत प्रचंड पैसा खर्च केला जातो, गुन्हेगारांची मदत घेतली जाते व सर्व तऱ्हेचा भ्रष्टाचार केला जातो. या दुष्ट चक्रातून अलीकडे राजकारणाचे झपाट्याने गुन्हेगारीकरण होत चालले आहे. पप्पु कलानी, हितेंद्र ठाकूर यांच्यासारखे गुन्हेगार लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येतात हा आपल्या लोकशाहीला लागलेला काळिमा आहे. झुंडशाही, दहशतवाद, खंडणी गोळा करणे हे राजकारणातील गैरप्रकार वाढत गेले तर भारतातील लोकशाही लवकरच संपुष्टात येईल. हे घडू नये यासाठी प्रथम निवडणूक कायद्यात सुधारणा करून, निवडणूक खर्चावर बंधन आणले पाहिजे. शेषन यांनी आचारसंहिता कठोरपणे लागू करून उमेदवारांच्या खर्चाचे नियंत्रण केले, ही स्वागतार्ह घटना आहे. ही प्रक्रिया अधिक गतिमान आणि अधिक प्रभावी झाली पाहिजे. त्याचप्रमाणे व्यक्तिगत संपत्तीवरही काही निर्बंध असले पाहिजेत. आपल्याकडे ज्याप्रमाणे दारिद्र्यरेषा म्हणजे काय हे तज्ज्ञांनी ठरविले आहे, त्याप्रमाणेच श्रीमंतीची रेषा ठरवून त्यापेक्षा अधिक संपत्ती कोणी जमा केली तर ती शासनाने जप्त केली पाहिजे. अशा कायद्यापेक्षाही समाजाचे शिक्षण करणे, तरुण पिढीवर सुसंस्कार करणे हे प्रबोधन कार्य समाजसेवी संस्थांनी सतत चालू ठेवले पाहिजे. आज आपल्या समाजातील भ्रष्ट वातावरणामुळे आणि भ्रष्टाचाराच्या साखळीमुळे, प्रामाणिकपणे जगणे अशक्यप्राय होऊन बसले आहे. बर्ट्रांड रसेल या तत्वज्ञाने म्हटल्याप्रमाणे There cannot be a moral man in an immoral society भ्रष्ट समाजात कोणतीच व्यक्ती नैतिक राहू शकत नाही हे आपण अनुभवीत आहोत. या भ्रष्टाचाराविरुद्ध जनआंदोलनही झाले पाहिजे. परंतु हा लढा दीर्घकाळ चालणारा आहे. या संदर्भात मी एक उदाहरण देतो. इंग्लंडमध्ये दुसरा चार्ल्स हा राजा असताना सर्व तऱ्हेचा भ्रष्टाचार बोकाळला होता. इंग्लंडचा एका वेळचा पंतप्रधान वॉलपॉल हा उघडपणे लाच घेत असे आणि त्या भ्रष्ट आचरणाचे समर्थन 'प्रत्येक माणसाची काही किंमत ठरलेली असते - Every man has his Price या शब्दात करीत असे. या अवनत अवस्थेला तोंड देण्यासाठी इंग्लंडमधील अनेक समाजसेवक, सामाजिक व शैक्षणिक संस्था यांनी सतत प्रयत्न केले, तेथील काही राजकीय नेत्यांनी व राजकीय पक्षांनी दीर्घकाळ अनेक चळवळी करून समाजरचनेत व आर्थिक व्यवस्थेतही आवश्यक ते बदल घडवून आणले आणि त्यातूनच इंग्लंडचे राष्ट्रीय चारित्र्य घडविले गेले. या राष्ट्रीय चारित्र्याच्या आधारावरच इंग्लंडने दुसऱ्या महायुद्धात हिटलर विरुद्ध खंबीर लढा देऊन जगातील हुकूमशाहीचा पराभव करण्यात मोठीच कामगिरी करून दाखविली. आपल्याला हेच करावे लागेल. या साठी समाजरचना व अर्थ रचना बदलावी लागेल, आणि माणसांच्या वृत्तीतही परिवर्तन घडवून आणावे लागेल. या मुद्याचे थोडे अधिक स्पष्टीकरण करू इच्छितो. आपण एकाच वेळी उत्पादक आणि उपभोक्ते असतो. शेतकरी धान्य पिकवतो, कामगार कापड

निर्माण करतो, शिक्षक शिकवितो हे सारे उत्पादक श्रम आहेत. त्याचवेळी आपल्यापैकी प्रत्येक जण आपल्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या गरजा भागवितांना आपण उपभोक्तेही असतो. आपण समाजासाठी उत्पादक श्रम करतो आणि समाजातील अन्य घटकांनी केलेल्या उत्पादनाचा उपभोग घेतो. या दोहोंमध्ये समतोल राखला गेला तर तो सदाचार ठरतो. परंतु आज भारतात प्रत्येकजण उत्पादक श्रम करताना कुचराई करतो आणि उपभोग जादा घेतो. कामगारांना कामाचे तास कमी हवेत, प्राध्यापकांना अध्यापनाचे तास कमी हवेत; मात्र पगार भरपूर हवा, महागाई भत्ता वाढवून हवा. बोनसही जादा हवा. हा भ्रष्ट आचार आहे. कारण येथे आपण आपल्या हक्कांचा आग्रह धरताना आपले कर्तव्य करण्यात मात्र कुचराई करतो. आपल्यातील या स्वार्थी प्रवृत्तीला आळा बसला आणि आपण हक्काइतकीच कर्तव्याची जाणीव ठेवली तर भ्रष्टाचाराचे नियंत्रण होऊ शकेल. हा व्यक्तिजीवनातील बदल जितका आवश्यक आहे तितकीच आवश्यकता समाजरचनेत व अर्थरचनेत बदल करण्याची आहे. हा रचनात्मक बदल करताना आर्थिक शोषणावर नियंत्रण घालणे, कोणाही एका व्यक्तीस दुसऱ्याच्या न्याय्य हक्कांवर आक्रमण करू न देणे हे जरुर आहे. म्हणजेच सामाजिक न्याय व समता यावर आधारलेला समाज निर्माण करावा लागेल. हे केले तरच आपल्या समाजाला लागलेले भ्रष्टाचाराचे ग्रहण सुटू शकेल. यासाठी प्रयत्न करणारे तरुणांचे गट आजही भारतात आहेत. परंतु या कार्यकर्त्यांचे एक व्यासपीठ नाही. असे पुरोगामी कार्यकर्त्यांचे व्यासपीठ हाच भारतीय लोकशाहीचा आधार होऊ शकेल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण लोकशाही राज्यपद्धती स्वीकारली. परंतु लोकशाही ही भारताची जीवनपद्धती झालेली नाही. सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे तसेच समाजजीवनातील भ्रष्टाचाराचे निर्मूलन झाले नाही तर लोकशाही ही केवळ दिखाऊ राहील. या लोकशाहीच्या आजवरच्या वाटचालीतील खाचखळग्यांचे तसेच आपण केलेल्या चुकांचे दिग्दर्शन करतानाच या लोकशाहीच्या भविष्यकालातील वाटचालीचे स्वरूप कसे असावे हे सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. कऱ्हाडच्या प्रगल्भ श्रोत्यांनी माझे विचार शांतपणे ऐकले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

१४ मार्च १९९६

ग. प्र. प्रधान

# नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाडच्या
# 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाले' ची
# आजपर्यंतची वाटचाल

(साल, वर्ष, विषय आणि व्याख्याते असा या सूचीचा क्रम आहे)

❖ १९७३ वर्ष १ ले

राजकारण आणि समाजजीवन

**प्राचार्य देवदत्त दाभोळकर, पुणे**

भारतीय समाजवाद : काही विचार

**डॉ. मा. पं. मंगुडकर, पुणे**

भारतीय समाजवाद आणि ऐहिक निष्ठा

**प्रा. गं. बा. सरदार, पुणे**

❖ १९७४ वर्ष २ रे

भारतीय लोकशाही : काही विचार

**प्रा. ए. एम. खान, पुणे**

लोकशाही समाजवाद

**वि. अ. नाईक, पुणे**

अविकसित समाजवादाचे स्वरूप

**सदाशिव बागाईतकर, पुणे**

❖ १९७५ वर्ष ३ रे

आजची आर्थिक परिस्थिती व
त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग

**डॉ. भा. शं. भणगे, मुंबई**

समाजसुधारणेच्या समस्या

**त्र्यं. कृ. टोपे, मुंबई**

सद्य:स्थिती

**डॉ. प्र. चिं. शेजवलकर, पुणे**

❖ १९७६ वर्ष ४ थे

भारतीय समाजवादाच्या परिवर्तनाची
दिशा आणि वेग (दोन व्याख्याने)

**गोपाळराव मयेकर, गोवा.**

राजर्षि छत्रपति शाहू आणि
नवभारताची मागणी

**पद्मभूषण धनंजय कीर, मुंबई**

❖ १९७८ वर्ष ६ वे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि
सामाजिक क्रांती

**डॉ. भालचंद्र फडके, पुणे.**

❖ १९७९ वर्ष ७ वे

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे
(दोन व्याख्याने)

**आमदार पी. बी. साळुंखे, कोल्हापूर**

भारतीय राज्यघटना आणि
सामाजिक परिवर्तन

**डॉ. सत्यरंजन साठे, पुणे.**

❖ १९८० वर्ष ८ वे

महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण
कालचे, आजचे व उद्याचे
(दोन व्याख्याने)

**डॉ. जनार्दन वाघमारे, लातूर**

शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील
दुग्ध व्यवसायाचे स्थान

**खासदार प्रतापराव भोसले, भुईंज**

○ १९८१ वर्ष ९ वे

विज्ञान आणि मानवी मूल्ये
(तीन व्याख्याने)

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई**

○ १९८२ वर्ष १० वे

महाराष्ट्र धर्माची नवी व्याख्या
(दोन व्याख्याने)

**नानासाहेब गोरे, पुणे**

○ १९८३ वर्ष ११ वे

**बॅ. पी. जी. पाटील, सातारा.**
**तात्यासो कोरे, वारणानगर.**
**सौ. शांताबाई किर्लोस्कर, पुणे**
(जमावबंदी आदेश जारी झालेने
ही व्याख्याने झाली नाहीत.)

○ १९८४ वर्ष १२ वे

कार्ल मार्क्स - जीवन - विचार आणि
समाजशास्त्र (तीन व्याख्याने)

**वसंत पळशीकर, मंचर.**

○ १९८५ वर्ष १३ वे

**डॉ. पंजाबराव जाधव पुणे.**
**द्वा. भ. कर्णिक, मुंबई.**
(रशियाचे राष्ट्राध्यक्षांचे निधनामुळे
ही व्याख्याने झाली नाहीत.)

❖ १९८६ वर्ष १४ वे

१) यशवंतराव चव्हाण आणि
महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन,
२) यशवंतराव चव्हाण : काँग्रेस
संस्कृतीचे उपासक व प्रवक्ते
३) दिल्ली दरबारातील यशापयशाची
मीमांसा (तीन व्याख्याने)

**द्वा. भ. कर्णिक मुंबई.**

○ १९८७ वर्ष १५ वे

धर्म आणि इतिहास लेखन
(दोन व्याख्याने)

**डॉ. रावसाहेब कसबे, संगमनेर.**

○ १९८८ वर्ष १६ वे

भारतीय बहुजन समाजाच्या प्रगतीची
वाटचाल (दोन व्याख्याने)

**ॲड. डॉ. पंजाबराव जाधव पुणे**

❖ १९८९ वर्ष १७ वे

महात्मा फुले : सामाजिक विचार आणि आजचे सामाजिक संदर्भ (दोन व्याख्याने)

**प्रा. बा. ह.कल्याणकर, औरंगाबाद.**

❖ १९९० वर्ष १८ वे

भारतीय राजकारण : अभ्यासाची एक दिशा (दोन व्याख्याने)

**डॉ. राम जोशी, मुंबई.**

○ १९९१ वर्ष १९ वे

सामाजिक न्याय व सामाजिक परिवर्तन (दोन व्याख्याने)

**प्रा. मे. पुं. रेगे, मुंबई.**

❖ १९९२ वर्ष २० वे

आपल्या विकासाची दिशा आणि लोकशाहीचे भवितव्य (तीन व्याख्याने)

**डॉ. भा. ल. भोळे, नागपूर.**

○ १९९३ वर्ष २१ वे

समाजवादाची फलश्रुती (दोन व्याख्याने)

**प्रा. श्रीनिवास विष्णू खांदेवाले, नागपूर**

○ १९९४ वर्ष २२ वे

महाराष्ट्र : परंपरा आणि परिवर्तन (तीन व्याख्याने)

**प्रा. पुष्पा अनंत भावे, मुंबई**

❖ १९९५ वर्ष २३ वे

महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव (तीन व्याख्याने)

**प्राचार्य पी. बी. पाटील, सांगली**

❖ १९९६ वर्ष २४ वे

भारतीय लोकशाहीची वाटचाल (दोन व्याख्याने)

**प्रा. ग. प्र. प्रधान, पुणे**

○ १९९७ वर्ष २५ वे

सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि भारताचे परराष्ट्रीय धोरण (दोन व्याख्याने)

**श्री. कुमार केतकर, मुंबई**

○ १९९८ वर्ष २६ वे

यशवंतराव चव्हाण यांची वैचारिकता (दोन व्याख्याने)

**प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे, औरंगाबाद**

---

○ अशी दर्शविलेली व्याख्यानांची पुस्तके प्रकाशित झालेली नाहीत.



महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतरावजी चव्हाण समाधी परिसर